आंतरराष्ट्रीय बेस्टसेलर पुस्तक

दी आर्ट ऑफ वॉर

सन त्झु

संपादन

व्यंकटेश उपाध्ये

आंतरराष्ट्रीय बेस्टसेलर पुस्तक

दी आर्ट ऑफ वॉर

सन त्झु

संपादन
व्यंकटेश उपाध्ये

आंतरराष्ट्रीय बेस्टसेलर पुस्तक

दी आर्ट ऑफ वॉर

आयुष्याचे व्यवस्थापन

सन त्झु

अनुवाद-संपादन

व्यंकटेश उपाध्ये

साकेत प्रकाशन

दी आर्ट ऑफ वॉर
व्यक्तिमत्त्व विकास
सन त्झु
अनुवाद-संपादन : व्यंकटेश उपाध्ये

•

प्रकाशन क्रमांक - 1549
पहिली आवृत्ती - 2013

•

प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - 431 005,
फोन- (0240)2332692/95.
www.saketpublication.com
info@saketpublication.com

•

पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. 02, 'ए' विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

प्रिय सौ. स्वातीस सप्रेम सादर!

तू दिलेल्या अमाप उत्तेजनामुळेच हे शक्य झाले.

युद्धकला ही राज्यासाठी परमोच्च बाब आहे. हा जीवन मृत्यूचा प्रश्न आहे. सुरक्षेचा नाही तर विनाशाचा हा मार्ग आहे. म्हणून हा चर्चेचा विषय आज ....आणि उद्याही आपल्यापैकी अगदी प्रत्येकाला कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्षिता येणार नाही.

- सन त्झु

मनोगत

प्रिय वाचकहो,

प्रसिद्ध चिनी सेनापती, योद्धा, तत्त्ववेत्ता व विचारवंत असलेल्या सन त्झु याच्या 'दी आर्ट ऑफ वॉर' या पुस्तकाचा मराठी अनुवाद-संपादन असे रूप तुमच्यासमोर ठेवताना मला आनंद होत आहे.

यंदा एप्रिलच्या सुमारास 'साकेत' प्रकाशनाच्या संचालकांनी हा प्रस्ताव माझ्यासमोर ठेवला, तेव्हा मला या पुस्तकाच्या ख्यातीची व उपयोगितेची फारशी ओळख नव्हती. पूर्वतयारी व होकार देण्यापूर्वीचा अभ्यास म्हणून मी सन त्झुबद्दल माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. जेम्स क्लॅव्हेल, लिओनेल गाइल्स व थॉमस ह्युन्ह यांच्या प्रबंध व भाष्यवजा पुस्तकांचा मी अभ्यास केला. याशिवाय इतर संदर्भांचा व इंटरनेटचा वापर केला. याद्वारे सन त्झु व त्याच्या कामगिरीबद्दल माहिती मिळविली. हे करत असताना मला जी प्रचीती आली त्याचे वर्णन शब्दात करणे अशक्य आहे.

सन त्झु हा चिनी सैन्यात मुत्सद्दी सेनापती होता. हे पुस्तक अनेक वर्षांपूर्वी लिहिले गेले आहे. या पुस्तकात दिली गेलेली तत्त्वे व सिद्धांत युद्ध कसे टाळावयाचे व जर युद्ध करणे भाग पडलेच तर जलद गतीने व त्वरित तो संघर्ष कसा संपवायचा यावर चर्चा करतात.

भारतीय ग्रंथात भगवद्गीतेचे व कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे जे स्थान आहे तेच स्थान या पुस्तकाचे चिनी संस्कृतीत आहे. दोन्ही राष्ट्रांतील नागरिकांच्या जीवनात या पुस्तकातील शिकवण भिनली आहे. किंबहुना यांची व्यापकता जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर उपयुक्त ठरली आहे; परंतु असे असूनही आधुनिक भारतीय युद्धकला ब्रिटिशांच्या आधिपत्याची परिणती म्हणून त्यांच्या सिद्धांतावर आधारलेली आहे. या उलट चिनी संस्कृतीत मात्र ही नुसतीच भिनली गेली नसून तेथील राजकारणी, मुत्सद्दी व निर्णय घेणाऱ्या व्यक्ती या ग्रंथाचा व्यापक वापर आजही प्रत्येक क्षेत्रात (वाणिज्य, व्यवस्थापन, रणनीती, तंत्रज्ञान, मानव संसाधन इ.) करतात.

माझ्या अभ्यासादरम्यान मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, याची उपयोगिता प्रत्येक क्षेत्रात आहे. जेवढे याच्या अध्यायातील वचनांचे तुम्ही मनःपूर्वक व सखोल मनन कराल तेवढे वेगवेगळे अर्थ तुम्हाला सापडतील व तुमची विचारशक्ती तेवढी प्रगल्भ व सर्जनशील होईल. कोणत्याही संघर्षाच्या प्रसंगी उद्विग्न न होता शांतिपूर्ण व विवेकी मार्गाने तो लवकरच कसा संपविता येतो, हे या पुस्तकाचा अभ्यास केल्यानंतर तुमच्या लक्षात येईल.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या पुस्तकात मी दिलेले विश्लेषण व भाष्य काही अंशी माझ्या उद्योग क्षेत्रातील अनुभवांवर आधारित आहे. ते या पुस्तकातील गर्भितार्थाचे चीज होऊ शकत नाही.

म्हणून मी आग्रह करतो की, आपली विचारसरणी व जीवनशैली अधिक समृद्ध, संघर्ष व तणावविरहित करण्यासाठी वाचकांनी या पुस्तकाचे मनन करून आपले स्वतःचे नवनवीन मार्ग काढावेत व जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग शोधावा.

हे पुस्तक माझ्याकडून करवून घेण्यात भांड कुटुंबीयांचा, विशेषतः बाबा भांड, साकेत भांड व सौ. प्रतिमा भांड यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या उत्तेजनाशिवाय व माझ्यावर टाकलेल्या विश्वासाशिवाय हे शिवधनुष्य मी पेलूच शकलो नसतो. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार

- व्यंकटेश उपाध्ये

(टीप : मी या पुस्तकाची रचना करताना वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथांचा वापर केला. त्यांचा उल्लेख मी या पुस्तकाच्या शेवटी केला आहे.)

प्रास्ताविक

हे पुस्तक इ. स. पू. 515 मध्ये लौकिकार्थाने फारशा प्रसिद्ध नसलेल्या, सन त्झु नावाच्या एका चिनी पंडिताने लिहिले आहे. या पुस्तकाचे शीर्षक वाचल्यास हे पुस्तक युद्धात वापरायच्या डावपेचांबद्दल आहे, असे वरकरणी वाटते. खरेतर यात संघर्षाबद्दल केलेल्या चर्चेपेक्षा बुद्धिमत्तेबद्दल जास्त ऊहापोह केला आहे असे वाटते. हे पुस्तक इतके जुने असूनही त्याने आपला कालातीतपणा सिद्ध केला आहे. आजही त्याचा अभ्यास जगभरातील सैनिकी विद्यालयात केला जातो. यातील डावपेच, युद्धातील परिस्थितीबरोबरच इतर पार्श्वभूमीवर व युद्धेतर परिस्थितीतदेखील परिणामकारक सिद्ध होतात. कुठल्याही पुस्तकाच्या दुकानातील अर्थशास्त्र वा व्यवस्थापन क्षेत्रातील विभागात सन त्झु याच्या तत्त्वांचा वापर या प्रतिस्पर्धात्मक वातावरणात कसा करायचा, हे सांगणारी अनेक पुस्तके दिसून येतात. इतरांशी असलेल्या संघर्षामुळे वा अंतर्द्वंद्वामुळे आपले आयुष्य कसे झाकोळले जाणार नाही याचा मार्ग दाखविणारे, आध्यात्मिक बैठक असलेले असे छोटेखानी तेरा धडे या पुस्तकात आहेत.

आध्यात्मिकतेचा कोणताही मार्ग तुम्ही अनुसरत असाल किंवा नसाल तरीही सन त्झु याची ही प्राचीन विचारसरणी प्रत्येकास एकसारखीच लागू आहे. तुमच्या तीव्र स्पर्धात्मक जीवनात संघर्ष हाताळण्याचा परिणामकारक, आध्यात्मिक व सहानुभूतिपूर्ण मार्ग शिकायचा असेल, जीवनातील ध्येयाची स्पष्ट अनुभूती करून घ्यायची असेल व अत्यंत बिकट परिस्थितीतही मनःशांती अनुभवायची असेल तर 'दी आर्ट ऑफ वॉर' हे पुस्तक तुमच्यासाठी आहे.

'दी आर्ट ऑफ वॉर' हे नुसते युद्धशास्त्रावरील पुस्तक आहे, असा एक गैरसमज आहे. सन त्झु हा सैन्यात प्रमुख होता हे अर्थातच खरे आहे; पण हा झाला त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू. सन त्झु हा युद्धप्रिय अथवा युद्धाची खुमखुमी असणारा अधिकारी नव्हता. त्याच्या मते, इतर सर्व मार्ग बंद झाल्यावर युद्धाकडे अत्यंत दुःखद व अंतिम पर्याय म्हणून पाहण्यात यावे; एवढेच नाही तर हा मार्ग अनुसरावा लागलाच तर त्याला योजनेचा, नेतृत्वाचा अभाव व कर्तव्यातील दिरंगाईच म्हणावे लागेल. सन त्झुने युद्ध म्हणजे हर्षोल्हास करण्याची संधी अथवा बाब या दृष्टीने त्याचा कधीच विचार केला नाही. युद्धात दोन्ही पक्ष जी भयानक किंमत मोजतात याची त्याला जाणीव होती.

'दी आर्ट ऑफ वॉर' हे पुस्तक लिहिण्याचा सन त्झुचा हेतू युद्धशास्त्राचे उदात्तीकरण करणे, असा कधीच नव्हता. किंबहुना सैन्यातील अधिकाऱ्यांना सशस्त्र संघर्ष

लवकरात लवकर कसा संपवायचा किंवा त्याहूनही मुळात तो कसा टाळायचा, यासंबंधी आदेश देण्याचा होता. सन त्झु विजयाचा उल्लेख करायचा तेव्हा त्याच्या विचारसरणीनुसार विजय म्हणजे प्रतिस्पर्ध्यावर मात नसून युद्ध टाळणे अथवा संघर्ष लवकरात लवकर संपविणे असा अर्थ आहे.

सन त्झुच्या विचारसरणीनुसार, संघर्ष संपविण्यासाठी मूलभूत यंत्रणा म्हणजे आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध सामर्थ्य व युद्धसामग्री यांचे कुशलतेने व निर्णायकपणे प्रचंड असंतुलन निर्माण करणे व नंतर या असंतुलनाचा प्रभावीपणे उपयोग करणे. ज्यामुळे शत्रू पूर्णपणे गांगरून जाईल व युद्ध करण्यापेक्षा पराभव पत्करणे श्रेयस्कर ठरवेल.

अशा परिस्थितीत मनुष्यहानी व मालमत्तेची नासधूस टाळता येते. तुमच्या या प्रामाणिक सौहार्दतेच्या वर्तणुकीमुळे तुम्ही शत्रूच्या आदरास व निष्ठेस पात्र व्हाल. हे सोपे नसले तरी शेवटी यामुळे दीर्घकाळ टिकणारी शांतता प्रस्थापित होण्याची खात्री असते. अशा प्रकारची विचारसरणी विवादास्पद म्हणून हिणविली जाऊन, खूप सरळसोट अन् भेकड म्हटली जाऊ शकते; पण जर दुसऱ्या पर्यायाबद्दल चर्चा केली तर काय दिसेल? नुसत्या हिंसेचा व बळाचा वापर करून अल्पकालीन विजय मिळवता येईल; पण अशा प्रकारच्या नीतीने कलह व द्वेषाचेच बीजारोपण होते. जगात हा धडा सन त्झुच्या कालखंडात जेवढा लागू होता तेवढाच आजच्या आधुनिक जगातही लागू आहे.

नुसत्या संसाधनांचा व शस्त्रास्त्रांचा भरणा केल्याने तुम्ही तुमच्या शत्रूहून सरस आहात, असा सरळसोट अर्थ निघत नाही. निष्काळजीपणा, आडमुठेपणा, उद्दामपणा व फाजील आत्मविश्वासामुळे अशा गोष्टींची उधळपट्टी होऊ शकते. शांतीचा खराखुरा मार्ग काढण्यासाठी कौशल्य, सर्जनशीलता व नि:स्वार्थीपणाची भावना मनात खोलवर रुजलेली असणे अत्यावश्यक आहे. तुमच्याकडे संसाधनांची कमतरता असतानादेखील तुम्हाला विजयी होण्यास या गुणांची मदत होते. ते तुमच्याकडे असलेल्या सामर्थ्याच्या बाबींना तुमच्या दिशेने कसे झुकवायचे हे 'दी आर्ट ऑफ वॉर' पुस्तक तुमच्या निदर्शनास आणून देते. सन त्झुचे पुस्तक दुबळ्या लोकांना व त्यांच्या समाजाला सामर्थ्यवान कसे बनायचे व सशक्त स्थितीत कसे स्थित्यंतर करायचे, हे शिकविते.

आजच्या काळात याची दीर्घकालीन प्रसंगानुरूपता

प्रत्येकाला आयुष्यात कधी ना कधी संघर्षास तोंड द्यावे लागते. प्रदीर्घ संघर्षामुळे जोम कमी होणे, सर्जनशीलतेचा ऱ्हास होणे, मनोधैर्य खचणे यासारख्या दुष्परिणामांचे गांभीर्य समजण्यासाठी तुम्ही सैन्यात वा व्यवसायातच असायला हवे असे काही नाही.

कुठल्याही परिस्थितीत वा प्रतिपक्ष कोणताही असला तरीही संघर्षात्मक घटनांचा सामना करण्यात सन त्झुची तत्त्वे तितकीच परिणामकारक आहेत, असे सिद्ध झाले आहे.

कुठल्याही प्रकारे संघर्ष होऊच द्यायचा नाही आणि झालाच तर तो कसाबसा टाळून त्याची विस्तारपूर्वक चर्चा करणे व लवकरात लवकर कुठलीही जीवित वा वित्त हानी होऊ न देता आपले वर्चस्व कौशल्याने कसे प्रस्थापित करायचे हेच सन त्झुच्या 'दी आर्ट ऑफ वॉर' या पुस्तकाचे अंतिम ध्येय होते. आश्चर्याची बाब ही की, हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी त्याने विस्ताराने सांगितलेल्या पद्धती आध्यात्मिकतेच्या मार्गाचा अवलंब करतात. त्याचे मनन व त्याची अंतर्दृष्टी यांचे प्रतिबिंब जगात प्रचलित ताओ, ख्रिस्ती, ज्यू, हिंदुत्व वा बौद्ध अशा प्रकारच्या समांतर विचारसरणीच्या धर्मांतील परंपरांमध्ये आढळून येतात. यापैकी सर्वांत मूलभूत आणि महत्त्वाचे मनन म्हणजे भावनेच्या आहारी न जाता, प्रसंगानुरूप, आपल्या वैऱ्याच्या तुलनेत आपली तुल्यबळता पडताळणे व असे करताना भावनानिरपेक्षतेने वागणे हे आहे. आपल्या भावनांच्या आहारी जाणे, आपल्या सद्य बलस्थानांचे मापन करताना अतिशयोक्तीचा अवलंब करणे, स्वतःची दुर्बलस्थाने काय याचा विचारही न करणे व उगीचच कल्पनाविलासात अडकून जाणे, ही लक्षणे नक्की संकटास आमंत्रण देणारी ठरतात; पण निश्चितच तुम्ही नि:पक्षपणे स्वत:च स्वत:चे मूल्यांकन केल्यास परिस्थितीचे आकलन स्पष्टपणे करू शकता व यामुळे तुम्हाला निर्विवाद निर्णय घेण्यास मदत होते; तसेच बदलत्या परिस्थितीचा सामना करताना तुम्ही योग्य प्रतिसाद देऊ शकता.

अशा प्रकारे भावनाविवश न होता अलिप्त राहण्याची दूरगामी वृत्ती व बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान यात खूप लक्षणीय साम्य दिसते. दोन्ही विचारप्रवाहांमध्ये थोड्या फार फरकाने, आपल्याच भावनांत गुरफटून न राहता, नि:पक्षपणे, कुठल्याही त्वरित निष्कर्षाच्या आहारी न जाता निरीक्षण करण्यास प्रोत्साहन दिले आहे. यामध्ये आपल्या भावनांच्या प्रवाहास मुरड घालण्याबद्दल चर्चा केली आहे. तुम्हाला हव्या तशा भ्रामक स्वरूपात कोणतीही परिस्थिती न पाहता परिस्थितीचे खरे स्वरूप काय आहे, ते तुम्हाला अशा प्रकारे दिसून येईल.

सन त्झुने लवचीकपणाचादेखील पुरस्कार केला आहे. कारण बदलत्या परिस्थितीची खरी शक्ती त्यामुळे दिसून येते. ताओ संप्रदायात लवचीकपणाच्या मूल्यास खूप आदराचे स्थान आहे. काही परिस्थितीत दृढता समर्थनीय असू शकते; पण परिस्थिती बदलत असली तर ती एक भार बनू शकते. उदाहरणादाखल एखादी मजबूत इमारत दणकट असते; पण भूकंपाच्या परिस्थितीत ती लवचीक नसल्याने कोसळू शकते.

याउलट तिच्या बाजूलाच उभी असलेली वेल वाकू शकते, झटके सहन करू शकते; पण तिला काहीच हानी पोहोचत नाही.

आयुष्यात कुठल्याही नव्या परिस्थितीत सांभाळून घेण्याची, नव्हे त्या परिस्थितीतदेखील आवश्यक ते बदल करत सर्वोत्कृष्टपणे वागण्याची, आपल्यात असलेली मूलभूत क्षमता म्हणजे लवचीकपणा होय. तिच्याशी शत्रुत्व न पत्करता तिचे खुल्या मनाने स्वागत करायचे व तिचे निरीक्षण करायचे, तिच्यावर टीका न करता तिला समजून घ्यायचे व अवलंबायचे, तिच्याकडे कानाडोळा न करता तिला आपल्यात सामावून घ्यायचे व तिच्याबरोबर एकरूप व्हायचे, असा हा सिद्धांत आहे. ताओ संप्रदायातील हा सिद्धांत त्या काळी जेवढा प्रभावी होता तेवढाच आजही आहे.

सन त्झुच्या कार्यातील आणखी एक आध्यात्मिक तत्त्व म्हणजे तुमच्या वैऱ्याकडे बघण्याचा तुमचा दृष्टिकोन व त्यावरील भाष्य. यासंदर्भात वैरी म्हणजे दुष्ट बुद्धीने व हेतूने तुमच्या प्रगतीस खीळ घालणारी अशी व्यक्ती. 'दी आर्ट ऑफ वॉर' या संपूर्ण पुस्तकात सन त्झुने शत्रुत्वाच्या क्रोध व वासना (राग व हाव) या दोन विशिष्ट प्रवृत्तींवर भर दिला आहे. या प्रवृत्ती स्वार्थी आहेत. तुमच्या प्रवृत्ती याउलट असायला हव्यात. हा फरक समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण 'दी आर्ट ऑफ वॉर' कोणीही वाचू शकते; पण त्यात समाविष्ट असलेली खरी तत्त्वे फक्त दयाळू प्रवृत्तीच्या व विवेकी लोकांनाच कळू शकतात. वरकरणी निष्ठुर व सरळसोट वाटणाऱ्या व्यूहांच्या रचनांचे विवरण देणाऱ्या या पुस्तकातदेखील सन त्झुचे आध्यात्मिक व वैश्विक प्रेम (आपल्या वैऱ्याबद्दलदेखील) सौहार्दतेची ऊब आणते. सन त्झुचा हेतू विनाश नसून संरक्षण हा आहे. सन त्झु आपल्या सैनिकांच्या तब्येतीची व सुखसोयींची काळजी आपल्या मुलांसारखी घ्यायचा. त्याच्या कारकीर्दीत शत्रू पक्षाचे बंदी केलेले हेर व सैनिक मारले जात नसत, तर त्यांची चांगली काळजी घेऊन त्यांना स्वतःच्या सैन्यात भरती केले जात असे. निर्दयी होऊन नव्हे तर उदार व कनवाळू अंतःकरणाने सन त्झु आपले रक्षण करतो, या जाणिवेमुळे लोकांची श्रद्धा व विश्वास तो जिंकत असे. शत्रूच्या मनात आदर निर्माण करत असे. अशाप्रकारे तो आपले सैन्य आणखी बळकट आणि शत्रूहून बलाढ्य करत असे.

सन त्झुचा कनवाळूपणा एवढा अधिक असायचा की, तो शत्रू पक्षास पराभवानंतरही त्यांचा विनाश न करता त्यांना घरी जाऊ देत असे; पण त्याबरोबरच तो चाणाक्षही होता.

'दी आर्ट ऑफ वॉर' मध्ये दिल्या गेलेल्या सर्व योजना दोन प्रश्नांची उत्तरे पदोपदी देताना आढळतात -एक, हे खरोखर अमलात आणण्याजोगे आहे का? आणि दुसरे हे अनुकंपेचे द्योतक आहे का? सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे या दोन्ही गोष्टी एकमेकांहून

वेगळ्या नाहीत. कुपमंडुक व्यावहॉरिक दृष्टिकोनातून पाहिल्यास शत्रूचा निदान त्यावेळेपुरता तरी संपूर्ण विनाश करून वाटाघाटीची, तडजोडीची किंवा बोलणी करण्याची चिंताच नाहीशी करून टाकणे हा अधिक प्रभावी मार्ग वाटत असला तरी, तो मार्ग दुसऱ्या प्रश्नाचे -'हे अनुकंपेचे द्योतक आहे का?', याचे उत्तर समाधानपूर्वकपणे देण्यात अपयशी ठरतो. तिरस्कार किंवा सुडाच्या भावनेने प्रेरित होऊन हाती घेतलेली कोणतीही मोहीम पूर्णपणे यशस्वी होऊच शकत नाही. कालांतराने शत्रू पक्ष जेत्याच्या आधीच्या कृत्यांमुळे चवताळून जाऊन अधिक सामर्थ्य मिळवितो व परतून हल्ला चढवतो, म्हणूनच कनवाळूपणे व चाणाक्षपणे वागणाराच दीर्घकालीन शांती प्रस्थापित करू शकतो.

सन त्झुच्या कार्यामागे दडलेला एक महत्त्वाचा पैलू म्हणजे दूरदृष्टीच्या विचारसरणीची नितांत गरज हा होय. सन त्झु प्रतिपादन करतो, 'जे युद्धकलेत खरोखर निष्णात असतात व जे विजयी होतात त्यांना तो विजय सहज प्राप्त होतो.' अर्थात ज्यांच्याकडे अस्सल शहाणपण असते ते समस्या मोठ्या व कठीण होण्यापूर्वी त्या लहान व साध्या असतानाच त्या समजून घेतात. मोठ्या व कठीण समस्या सोडविल्याने एक निष्णात मुत्सद्दी म्हणून तुमची ख्याती होऊ शकते; पण सन त्झु ठामपणे मांडतो की, हे वरकरणी यश म्हणजे एका प्रकारे अपयशच होय. कारण खरे शहाणपण मोठ्या समस्या मुळात निर्माण होऊच न देण्यात असते. विरोधाभास हा आहे की, या अत्युच्च दर्जाच्या कामगिरीकडे लोक कानाडोळा करतात. कारण त्या नेत्याचे काम वरकरणी खूप विनासायास व संथपणे चाललेले असते. या दूरगामीपणामुळे तुम्हाला फारशी प्रसिद्धी मिळणार नाही; पण सन त्झुचा ठाम विश्वास आहे की, शौर्य आणि स्थैर्य म्हणजे इतर लोक तुमच्याबद्दल काय बोलतात, तुमची स्तुती करतात की निंदा-नालस्ती याकडे लक्ष न देणे व आपण जे करत आहोत त्यावर दृढविश्वास ठेवणे. खरा शूरवीर स्वत:च्या सुखाचा व अहंकाराचा त्याग करतो व शिक्षेच्या भीतिपोटी वा बक्षिसाच्या लालसेने कधीच काम करीत नाही. काही लोक या स्वभाववैशिष्ट्यांना विनम्रपणा व धैर्य अशा नावाने संबोधतात. सन त्झुच्या नजरेत ही फक्त बिरुदे आहेत. या अध्यायात तो दररोज प्रभावशालीपणे व सन्मानाने कसे जगायचे याचे वर्णन करतो.

सन त्झुच्या प्रत्येक कृतीत हेतुपुरस्सरपणा निदर्शनास येतो. आपल्या कामाचे नियोजन करण्यासाठी तो शकुनांवर अथवा दैवी संकेतांवर अवलंबून नसायचा. त्याच्या मते या सर्व क्लृप्त्या विचारहीन व अंधश्रद्धाळू लोकांसाठी आहेत. या विपरीत विश्वसनीय स्रोतापासून सर्वांत प्रथम मिळालेल्या योग्य माहितीच्या आधारावर स्वतःच्या पुढच्या हालचाली ठरविण्यासाठी तो स्वत:वर अवलंबून असायचा. सन

त्झुच्या विचारसरणीनुसार विश्वासपात्र व साध्या माहितीचा वापर करून असाधारण यश मिळविता येते.

सन त्झुचा सुज्ञपणा आपल्या निदर्शनात हे आणते की, संघर्ष अटळ असला तरीही बुद्धिमत्ता व सहानुभूतीचा मार्ग अनुसरून सर्व संघर्षाची सांगता आपण त्वरित व कनवाळूपणे करू शकतो. ज्या क्षणी एकमेकांशी वैर असलेले दोन पक्ष सशस्त्र युद्ध करण्यास एकमेकांसमोर येऊन भिडतात, त्या क्षणापासून त्यांचे वैर संपते. ते मानवजातीतील सहचर असलेले मनुष्यप्राणी असतात. अनादिकाळापासून, शतकानुशतकांपासून, त्यांच्या पूर्वजांपासून चालत आलेल्या दोन पर्यायांचे ते धनी असतात : ते पर्याय म्हणजे एकमेकांचा विनाश करायचा किंवा एकत्र जीवन जगून समृद्ध व्हायचे?

सन त्झुने या पुस्तकाची सुरुवातच आपण आपल्या संघर्षाचा काळजीपूर्वक विचार करा, या एका कळकळीच्या निवेदनाने केली आहे. आपण त्याचा सल्ला अगदी प्रामाणिकपणे पाळला तर या दोन्हींपैकी कुठला पर्याय उत्तम हे आपल्याला लगेच कळते. आपल्या स्वतःसाठी व आपल्या सभोवतालच्या लोकांसाठी योग्य व सहिष्णू निर्णय घेण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली तर आपल्याला कर्तव्याचे पालन करताना उशीर झाला, असे म्हणायची पाळी कधीच येणार नाही.

जगातील सर्वांत गोपनीय असलेले रहस्य

सर्वसाधारणतः सैन्यात रहस्यांची गोपनीयता खूप जोपासली जाते. असे असताना तुमच्या मनात हा प्रश्न येणे खूप साहजिक आहे की, असे पुस्तक त्याने का लिहिले की ज्यातील तत्त्वांमुळे वाचकास फायदा होईल?

हे खरे आहे की, जपानी समुराई योद्धे व चिनी सेनापती युद्धाआधी पुस्तकांचा अभ्यास करीत व त्यामुळे कित्येक शतके हे पुस्तक सार्वजनिक संपर्क न होईल अशा प्रकारे दडवले गेले होते.

फक्त एका पक्षानेच सन त्झुचे तत्त्वज्ञान व रणनीती आत्मसात केली तर खरोखरच त्याला त्याच्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करता येईल; पण दोघांनाही त्याची शिकवण समजली. दोन्हींपैकी किमान एका पक्षाला तरी उमज पडेल. यशासाठी आवश्यक बाबींचा सांगोपांग विचार केल्यास युद्धाच्या फोलपणाची जाणीव होईल. कारण युद्धाची परिणती शेवटी परिस्थितीस हरविण्यात होते. अशा प्रकारे युद्धजन्य परिस्थिती सहज टाळता येते व उभय पक्षांच्या साधनसंपत्तीचा विनाश टळतो, तिचे संरक्षणच होते- या विचारसरणीचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचे त्याच्या मनात नक्कीच होते.

ऐतिहासिक संदर्भ

या पुस्तकामागील खरी प्रेरणा कोणाची? सन त्झु (इ. स. पू. 544 ते 496) हा चिनी सैन्यातील जनरल होता. तो तत्त्ववेत्ताही होता. सन त्झुच्या काळात चीनमधील प्रचंड अस्वस्थतेचा कालखंड इ.स.पू.770 ते इ.स.पू.476 सुरू होता. सन हे त्याचे आडनाव होते व त्झु हे त्याचे बिरूद होते. अशा प्रकारे सन त्झुचा शब्दशः अर्थ स्वामी सूर्य असा आहे. सन त्झुचा जन्म चि राज्यातील एका सरदार कुटुंबात झाला. त्याचे जन्मनाव (खरे नाव) वु होते. त्याचे आजोबा त्या प्रांतातील राज्यपाल होते. त्याचे वडील सैन्यातील यशस्वी जनरल होते. त्याच्या वडिलांच्या सान्निध्यामुळे त्याला सैन्यातील कामकाज कसे चालते याचे सखोल ज्ञान होते. दरवर्षी वसंत व ग्रीष्म ऋतू संपेपर्यंत सैन्यात हजारो, लाखोंच्या संख्येत सैनिक सामील झालेले असत. हे ज्ञान व त्याबरोबरच आधीच्या युद्धांचा सखोल व्यासंग व अभ्यास यामुळे लहान वयातच एक प्रगल्भ मुत्सद्दी व जाणकार म्हणून त्याची ख्याती पसरली होती.

राजघराण्यातील एका विश्वासू सल्लागाराकडून एकदा नव्हे तर सातवेळा उल्लेख झालेल्या शिफारशीच्या आधारावर वु राज्याचा राजा हो लु शेवटी सन त्झुला भेटण्यास तयार झाला. त्या भेटीतच सन त्झुने आपले 'दी आर्ट ऑफ वॉर' पुस्तक राजाला भेट दिले. या पुस्तकात तेरा अध्याय आहेत; पण क्लिष्ट भाषेमुळे सन त्झुला हो लु पुढे या पुस्तकाची तोंडी उकल करावी लागली होती.

तेव्हा तो फक्त तीस वर्षांचा होता. यानंतर राजाने सन त्झुला युद्धनीती ठरविण्यासाठी आपल्या दरबारात ठेवून घेण्याचे ठरवले. आपल्या लहानशा वु राज्याकडून, बलाढ्य चु राज्याची राजधानी यिंग काबीज करण्यात सन त्झुकडून त्याला खूप मदत झाली. एवढेच नाही तर चि चीन व युएह राज्यांची अटळ असणारी आगेकूचही थांबविण्यात त्यांना यश मिळाले. सन त्झुच्या या नेत्रदीपक यशामुळे त्याची ख्याती लवकरच देशभर पसरली व त्याचाच परिणाम की काय आजदेखील 2500 वर्षांनंतरही त्याची ख्याती अबाधित आहे.

हो लुच्या दरबारातील कामगिरीनंतर सन त्झुचे काय झाले अथवा तो कशा प्रकारे मरण पावला याची नोंद फारशी नाही. चीनच्या, युएह चुएह शु (शब्दशः अर्थ: युएहच्या राज्याचा अंत) या ऐतिहासीक दस्तावेजात नंतर सापडलेली एकच नोंद आहे. ती अशी. वुच्या प्रवेशद्वाराबाहेर एक मोठे थडगे आहे- वुच्या राज्यातील परदेशी अधिकाऱ्याचे- त्याचे नाव सन त्झु- हे राज्याच्या सीमेबाहेर दहा मैलावर आहे. तो युद्धनीतीमध्ये निपुण होता.

सन त्झु हा प्रथमतः हाडाचा व्यासंगी माणूस होता. युद्धनीतिज्ञ या नात्याने वर उल्लेख केल्याप्रमाणे सन त्झुच्या बुद्धिमत्तेची ख्याती अगाध आहे. त्यातून शिकणाऱ्या सर्व लोकांनी हे पुस्तक जतन केले होते. अनेक वर्षांपासून ते सतत वापरात आहे. ते

कधीच हरवले गेले नाही वा नष्ट झाले नाही. ज्ञान संपादनासाठी अगणित वेळा चीनला भेट देणाऱ्या जपानी लोकांनी इ.स.पू.च्या सुमारास (एवढ्या प्राचीन कालापासून) या पुस्तकाच्या वापरास सुरुवात केली.

'दी आर्ट ऑफ वॉर'चे भाषांतर

साधारण 225 वर्षांपूर्वी या पुस्तकाने पाश्चात्त्य जगात प्रवेश केला. चीनमध्ये वास्तव्य करणाऱ्या फादर जे.जे.एम. एमियट या एका फ्रेंच जेसुईट धर्मगुरूने याचे भाषांतर फ्रेंचमध्ये केले.

जपानमध्ये अभ्यास करीत असताना कॅप्टन इ.एफ.कॅल्थ्रॉप या ब्रिटिश अधिकाऱ्याने 'दी आर्ट ऑफ वॉर' चे इंग्रजीतील पहिले भाषांतर 1905 साली केले. आज या पुस्तकाचा जगातील प्रत्येक भाषेत अनुवाद झाला असून त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढतच आहे.

या पुस्तकामुळे नि:संशयपणे प्रभावित झालेल्या प्रसिद्ध व्यक्ती म्हणजे कॉलिन पॉवेल, जॉर्ज पॅटन, फो गुयेन गियाप, अकिरा कुरोसावा, ब्रूस ली, रोनाल्ड रीगन, जॉन मुर्था, माईक हकाबी, रॉबर्ट गेट्स, मर्क बेनिऑफ, लेरी एलिसन,बिल बेलिचिक् डस्टी बेकर्, जॉर्ज श्टाईनबेकर्, पॅट रिली व तुपॅक शकुर. सैन्य, व्यवसाय, व्यावसायिक क्रीडा व संगीत क्षेत्रात नाव कमाविलेल्या लोकांची ही यादी. यावरूनच कळते की, सन त्झुचे पुस्तक वेगवेगळ्या क्षेत्रातदेखील किती उपयुक्त व प्रसंगोचित्त आहे.

या पुस्तकाच्या रचनेबद्दल

हे पुस्तक तेरा अध्यायात विभागले गेले आहे.

ही विभागणी 'दी आर्ट ऑफ वॉर'च्या मूळ प्रतीप्रमाणे आहे. यातील प्रत्येक अध्याय मूळ संकल्पनेवर अथवा योजनेच्या मूळ तत्त्वावर लक्ष केंद्रित करते. महत्त्वाचे म्हणजे, हे पुस्तक साध्या-सोप्या पद्धतीने संघर्षावर टप्प्याटप्प्याने मात कशी करायची याचा उपाय सांगत नाही. हे 'रेडी रेकनर' नाही. सन त्झुने आपल्या मनातील विचारांचा संयोग करून, पद्धतशीरपणे कधी कधी आधीच्या अध्यायांचा आधार घेत, कधी कधी माहितीची पुनरावृत्ती करून, कधी कधी वाचकांच्या आकलनशक्तीवर विश्वास ठेवीत व ते स्वतःच्या कविकल्पना व समर्पक शैलीची उकल करतील अशा भावनेने व अशी अपेक्षा ठेवून हे पुस्तक लिहिले आहे. 'दी आर्ट ऑफ वॉर' हे वरकरणी फसवे वाटते, एका बैठकीत संपविण्याएवढे लहान वाटते; पण त्याचा अभ्यास करण्यात वर्षानुवर्षे, दशकानुदशके नव्हे अनेकांची आयुष्यं खर्ची पडली आहेत.

सन त्झुच्या 'दी आर्ट ऑफ वॉर' चा अभ्यास करून, त्याचा अंगीकार करून, तुम्ही तुमचे आयुष्य संघर्षविरहित व तीव्र स्पर्धेतदेखील अबाधित ठेवण्यात यशस्वी होऊ शकता. मानसिक तयारी ठेवून, तुम्ही निष्क्रियपणे नव्हे तर कृतिशीलपणे आणि परिश्रमाने तुमच्या आयुष्यात शांती निर्माण करू शकता. याचा अर्थ नुसता अध्यात्माचाच मार्ग वा सहिष्णुतेचा मार्ग अवलंबिणे असा नसून चाणाक्षपणाचा आणि कुठल्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी जय्यत तयारी करणे असाही होतो. नैतिक व बौद्धिक प्रभुत्वाने स्वत:बरोबरील व इतरांबरोबरील संघर्ष तुम्ही सहजपणे सोडवू शकता. याबरोबरच तुमच्या आयुष्यात सर्वांत प्रिय काय (किंवा कोण) आहे त्यामधील अदृश्य भिंत तुम्ही पाडू शकता.

अध्याय 1
युद्ध योजना

या अध्यायात सन त्झुने युद्धाचे आयोजन कशा प्रकारे करावयाचे, अंदाज कशा प्रकारे लावायचा याबाबत मार्गदर्शन केले आहे. कोणत्याही मोहिमेचे पूर्वनियोजन करताना ऊहापोह करावा लागतो. प्राचीन काळात चीनमधील देवळात अशाच प्रकारचे आयोजन केले जायचे. आयुष्यात तुम्हाला एखाद्या संकटाचा सामना करावयाचा असेल तेव्हा एखादी निवांत जागा शोधावी. अशा ठिकाणी तुमचे मन शांत व संतुलित होईल. तुम्ही पारदर्शीपणे व सम्यक वृत्तीने विचार करू शकाल. सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे, विचारांचे व तथ्यांचे अशा रीतीने संकलन करणे म्हणजे संघर्षास तोंड देण्यास आयोजनाच्या प्रक्रियेची पहिली पायरी आहे.

वचन 1 :

सन त्झु म्हणतो : युद्धकला व युद्धनीती राष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

स्यु मा चियेनने संकलित केलेल्या 'शिह-चि'(ऐतिहासिक कागदपत्रे) मध्ये याचा उल्लेख आहे. यात सन त्झुने आपली सैनिक तत्त्वे मौखिक व लिखित स्वरूपात वु प्रांताचा राजा, हो लु किंगला इ. स. पू. 515 मध्ये समजावून सांगितल्याचा उल्लेख आहे.

ही तत्त्वे अनेक पिढ्यांना गेली कित्येक दशके वैयक्तिक व सामाजिक जीवनात लाभप्रद ठरली आहेत.

वचन : 2

हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. हा मार्ग तुम्हाला सुरक्षिततेकडे नेऊ शकतो वा सर्वनाशाकडेदेखील. म्हणूनच हा विषय कुठल्याही परिस्थितीत दुर्लक्ष करण्यायोग्य नाही.

सन त्झु येथे युद्धाच्या अनेकविध पैलूंवर भाष्य करतो. ही नुसतीच शारीरिक लढाई नाही. या घटनेशी सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, नैतिक व एवढेच नाही तर भावनात्मक पैलूही निगडित आहेत.

या भाष्यांचे आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक जीवनाशी काय नाते आहे हे पाहूया. कौटुंबिक जीवनात तुम्ही आपल्या मुलाशी एखाद्या घरगुती बाबीसंबंधी भांडत असाल; ऑफिसमध्ये तुमच्या वरिष्ठाशी वा ग्राहकाशी संघर्ष होत असेल. इतर काही वेळेस आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी काही लोक तुम्हाला लक्ष्य बनवीत असतील. काही वेळा तुम्ही अशा संघर्षाकडे कानाडोळा करीत असाल. कारण त्याच्याशी दोन

हात करण्याची तुमची मानसिक तयारी नसते. या दिरंगाईमुळे गंभीर परिणाम घडू शकतात. तुम्हाला हानी पोहोचविणाऱ्या लोकाकडे दुर्लक्ष करून तुम्ही तो संघर्ष तात्पुरता टाळण्यात यशस्वी ठरला असालही; पण यामुळे तुम्ही मनातल्या मनात जळफळत असाल व त्याचबरोबर तुम्ही असे का वागत आहात, याबद्दल इतरांच्या मनात संशयदेखील येत असेल.

आणि म्हणूनच सन त्झुच्या म्हणण्यानुसार, मानसिकरीत्या एक वस्तुस्थिती म्हणून या संघर्षास तुम्ही स्वीकारले पाहिजे व याच्या मुळाशी काय आहे याचा सांगोपांग विचार केला पाहिजे.

वचन : 3

म्हणून याचा परामर्श खालील पाच घटकांचा आधार घेऊन करावा

एक : मार्ग अथवा नीती,

दोन : स्वर्ग/अध्यात्म,

तीन : धरती/भूमी,

चार : नेतृत्व,

वचन : 4

सन त्झुच्या पाच घटकांपैकी पहिला म्हणजे मार्ग अथवा नीती म्हणजे आपल्या वरिष्ठांप्रमाणेच विचार करण्याची प्रेरणा.

तुमचे लक्ष्य नैतिक असेल तर तुमचा मार्ग अथवा तुमची नीती तितकीच सुदृढ असेल.

वँग युच्या म्हणण्याप्रमाणे अशा प्रकारे या नीतिमत्तेचा मार्ग अवलंबणे फार गरजेचे आहे नाहीतर रणांगणावर आल्यावर अधिकारीवर्ग घाबरून जाईल व कोणताच निर्णय धैर्याने घेऊ शकणार नाही. संकटकाळात नेतृत्व हतबल ठरेल. कोणत्याही परिस्थितीत दगाफटका होऊ शकेल. येथे व्यक्त करण्यात आलेली दग्याफटक्याची भीती नेत्यांना लागू आहे. कारण त्यांनी अयोग्य व अनैतिक मार्गाचे अनुसरण केले तर जनहितास घातक असे त्यांचे वर्तन असेल.

वचन : 5

स्वर्ग म्हणजे दिवस-रात्र, उन्हाळा, हिवाळा, काल व ऋतू व त्याच्याशी संलग्न अडचणी

सन त्झुचा दुसरा घटक म्हणजे स्वर्ग. हा वातावरण, वेळकाळ, हवामान व ऋतू यांचे प्रतिनिधित्व करतो. सर्व सैनिकांची कार्यक्षमता या बाबींवर अवलंबून असते.

सामाजिक संदर्भात स्वर्ग याचा अर्थ आजूबाजूच्या लोकांची मानसिकता असा होतो. ती कालमानानुसार बदलू शकते. हवामानाचे अनुमान अचूकपणे करणे कठीण असते, त्याचप्रमाणे सामाजिक परिस्थितीचा अंदाज लावणेदेखील सोपे नसते. त्यांचा

अंदाज लावणे व प्रत्यक्ष काही घटना घडली तर त्या परिस्थितीचा फायदा उचलणे श्रेयस्कर ठरते. आपण नेहमी निर्णय घेण्यापूर्वी परिस्थितीस जोखले पाहिजे; म्हणजे आपली बलस्थाने कुठली व आपण कुठे दुबळे आहोत याचा अंदाज घेता येतो व तो घेतला पाहिजे. आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात याला म्हटले जाते गरिल टॅक्टिक.

वचन : 6

भूमी सखल वा उंच असते, जवळ अथवा दूर असते, अडथळे असलेली वा सुगम असते, रुंद वा चिंचोळी असते. धोक्याची वा सुरक्षित असते.

सन त्झुचा तिसरा घटक म्हणजे भूमी. या घटकास सन त्झुने बरेच महत्त्व दिले आहे. इथे त्याने भूमिप्रदेशाच्या मर्यादेचीच फक्त ओळख करून दिलेली नसून यातील वैविध्याचा वापर करून कुठल्या प्रकारे आयोजन करता येते याबद्दलदेखील सांगितले आहे.

सामाजिक संदर्भात भूमी (ground rules and reality) म्हणजे समाजाचे अभेद्य असे लिखित वा अलिखित नियम व समाजात कसे वागायचे याचे मापदंड. जरी आपण नियम वा त्या जागेची संस्कृती सहजासहजी बदलू शकत नसलो तरी त्याची माहिती करून घेतल्याने एखाद्या संघर्षकाळी कुठला मार्ग अवलंबायचा हे कळते.

स्वर्ग व धरती हे दुसरे व तिसरे घटक मिळून वातावरण व परिस्थितीच्या निर्मितीस कारणीभूत असतात. ते सहजासहजी बदलत नाहीत; पण तुमची भूमिका लवचीक असेल, तुमची प्रत्येक घटकाच्या स्वरूपानुसार वागायची तयारी असेल तर तुम्हाला अनेक मार्ग सापडू शकतात. त्यामुळे तुमचा खूप फायदा होऊ शकतो.

वचन : 7

नेतृत्व म्हणजे चातुर्य विश्वासपात्रता, परोपकाराची भावना, धैर्य व शिस्त यांचा अजोड संगम.

येथे नेत्यास आवश्यक अशा पाच गुणांचा उल्लेख केला आहे. हे पाच सद्गुण नसतील तर सेनापती आपल्या सैनिकांच्या निष्ठेस पात्र राहणार नाही. परिणामस्वरूप सैनिकांकडून मनःपूर्वक प्रयत्न व विश्वासाची अपेक्षादेखील तो करू शकणार नाही.

हे सद्गुण सामाजिकसंदर्भातदेखील तंतोतंत लागू पडतात. जर अशा प्रकारचे सद्गुण असलेले लोक नेतेपदी असले तर जनतादेखील त्यांचे पालन करेल. असे सद्गुण असलेले नेतेच एक सशक्त समाज निर्माण करू शकतील.

वचन : 8

नियम म्हणजे संघटन, अधिकाराची साखळी, दळणवळणाची साधने व खर्चावर नियंत्रण करणे.

सन त्झुचा पाचवा घटक म्हणजे नियम. याचा अर्थ आपल्या बलस्थानांचे व्यवस्थापन. आपल्या प्रचंड सैन्यबलात सुसूत्रता, निर्विघ्नता व कार्यक्षमता सातत्याने ठेवण्यासाठी नियमांची आवश्यकता असते. आजच्या सामाजिक व व्यावसायिक संदर्भात पाहिले तर याचा अर्थ प्रमाणिकृत कार्यपद्धती, कामाचे विभाजन व खर्चात कपात आहे (Standardized work procedures, division of labour, cost reduction.) या सर्व गोष्टी या घटकात समाविष्ट आहेत. यात दळणवळणाच्या योग्य साधनांचादेखील समावेश आहे, ज्यास आजच्या व्यवस्थापनशास्त्रात लॉजिस्टिक्स म्हणतात.

वचन : 9

या पाचही घटकांची जाणीव सेनापतीस असणे आवश्यक आहे, जो सेनापती हे जाणतो तोच यशस्वी ठरतो.

सन त्झु येथे म्हणतो की सर्व नेत्यांना या घटकांची जाणीव असणे अपरिहार्य आहे; परंतु असे असूनही, कित्येक नेते या घटकांकडे कानाडोळा करतात व त्यामुळे सर्वनाशास व अनावश्यक अशा रक्तपातास कारणीभूत ठरतात.

नुसत्या या घटकांचे ज्ञान असून उपयोग नाही, तर ते अमलात आणण्याची जबाबदारी व कौशल्य त्यांच्याकडे असणे आवश्यक आहे. कुठल्याही संघर्षाची परिणती या घटकांवर अवलंबून असते.

वचन : 10

म्हणून त्यांचा योग्य ताळेबंद जोडा, त्यांची सद्य:स्थिती पडताळून पहा.
खालील प्रश्न विचारा
कुठल्या राज्यकर्त्यास उपाय ठाऊक आहे?
कुठला सेनापती अधिक सक्षम आहे?
वातावरणावर (स्वर्ग व धरणी) कुणाचे वर्चस्व आहे?
नियमाचे व आज्ञेचे निष्ठुरपणे कोण पालन करतो?
कुणाचे सैन्य बलवान आहे?
कुठल्या सैन्यातील अधिकारी व सैनिक प्रशिक्षित आहेत?
कुठल्या सैन्यात बक्षीस व शिक्षा देण्याची पद्धत स्पष्टपणे ठरविली गेली आहे?
हे सर्व स्पष्ट झाले तर मला विजय की पराजय पत्करावा लागेल हे, नक्की कळेल.

येथे सन त्झु वरील पाच घटकांचे मूल्यमापन कसे करायचे हे स्पष्ट शब्दात समजावतो व निर्णय काय होईल याचे भाकीतही कसे करायचे हे सांगतो. प्रत्यक्ष युद्धभूमीवर पाय ठेवण्याआधीच सर्व बाबींचा सांगोपांग अभ्यास कसा करायचा, अंदाज कसा घ्यायचा याचे तरल विवेचन येथे आहे. अशा प्रकारे नि:स्पृहपणे तुलना

करणे सोपे नाही; पण ती केल्यास आपली बलस्थाने व आपल्या कमकुवत बाजू यांचे संपूर्ण चित्र डोळ्यासमोर येते.
या सर्व पाचही घटकांचे मूल्यमापन केल्यावर आपली पुढील योजना करणे फार सोपे होते. व्यावसायिक व सामाजिकसंदर्भातसुद्धा असा अभ्यास खूप लाभप्रद ठरतो व कुठलाही निर्णय भावनेच्या आहारी व घाईघाईत घेतला जाण्याची शक्यता जवळजवळ संपुष्टात येते. कुठलीही कृती करण्याआधीच केलेल्या या मूल्यमापनामुळे शेवटी काय परिणाम पदरी पडेल याची पूर्ण कल्पना येते. अशा प्रकारे हे पाच घटक कालातीत आहेत.

वचन : 11

जो सेनापती माझ्या मूल्यमापनाच्या पद्धतीकडे व सल्ल्याकडे लक्ष देतो व त्याप्रमाणे वागतो, तो नक्कीच विजयी ठरतो. त्याला अधिकारपदावर ठेवावे. या विपरीत वागणाऱ्या सेनापतीचा पराभव होईल, अशा सेनापतीस पदच्युत करावे.

सन त्झुचे या क्षेत्रातील प्रकांड ज्ञान व अनुभव यामुळे त्याचा हा सल्ला गेली अनेक शतके ग्राह्य व प्रभावी ठरला आहे. या नि:स्पृह पद्धतीमुळे अयोग्य व्यक्तीस कसे ओळखायचे व योग्य व्यक्तीस कसे प्रोत्साहन द्यायचे हे समजणे, याचा निर्णय घेणे तर्कशुद्ध झाले आहे

वचन : 12

आपल्याला असलेल्या माहितीचा फायदा घ्या व त्याप्रमाणे अनपेक्षित परिस्थितीचा सामना करण्यासाठी कुमक बांधा.

आपल्या बलस्थानानुसार व सामर्थ्याचा समतोल साधण्यासाठी शक्तीचा वापर करा.

या सर्व पाच घटकांतील वरिष्ठतेनुसार विजय कुणास मिळेल हे ठरते; पण अनपेक्षित घटकांचा सामना करण्याचे आयोजन तुम्ही कसे कराल? येथे शक्ती याचा अर्थ प्रचंड सामर्थ्य - या अनपेक्षित घटनांचा सामना करून त्यांना नामोहरम करू शकते. अतिरिक्त सामर्थ्य - तुम्हाला तुमच्या शत्रूच्या तुलनेत एक वेगळे अतुल्य स्थान प्राप्त करून देते.
व्यावसायिक भाषेत, आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात याला युनिक सेलिंग पॉइंट (यूएसपी) म्हटले आहे.

वचन : 13

युद्ध म्हणजे संभ्रम निर्माण करण्याची पद्धत

खरे पाहिल्यास संभ्रम निर्माण करणे म्हणजे प्रामाणिकपणा व निष्ठा या सारख्या मूल्यांवर घाला आहे, असे प्रथमदर्शनी वाटणे साहजिक आहे; परंतु सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे एका खूप मोठ्या ध्येयप्राप्तीसाठी अशा प्रकारचा संभ्रम निर्माण करणे

चुकीचे नाही. उदा. तुम्ही संभ्रम निर्माण करण्यासाठी जर अज्ञात वा अस्तित्वहीन राहिलात तर तुमचा शत्रू तुमच्यावर हल्ला करू शकत नाही. अशा प्रकारे हल्ला परतवून लावल्याने तुम्ही उभय पक्षाची हानी व दु:खद परिणाम टाळता. या संदर्भात जर तुम्ही 'संभ्रम' या संकल्पनेचा विचार केलात तर हा एक नक्कीच उमदा व सकारात्मक सिद्धांत आहे.

वचन : 14

म्हणूनच

सशक्त असाल तर अशक्त आहात असे भासवा.

सक्रिय असाल तर निष्क्रियतेचा आव आणा.

जवळ असाल तर दूर आहात असे भासवा.

त्यांची स्थिती मजबूत असेल तर त्यांना आमिषे दाखवा.

ते संभ्रमात असतील तर सामना करा.

त्यांचे संख्याबळ अधिक असेल तर आपली तयारी करा.

ते बलाढ्य असतील तर सामना टाळा.

ते त्वेषात असतील तर त्यांचे मनोधैर्य खच्ची करा.

ते विनम्र असतील तर त्यांना उन्मत्त करा.

ते आरामात असतील तर त्यांना पलायन करण्यास भाग पाडा.

ते संघटित असतील तर त्यांना विस्कळीत करा.

त्यांची तयारी नसताना त्यांच्यावर हल्ला चढवा, अपेक्षा नसेल अशा जागी त्यांना हाका.

या वचनात सन त्झुने शत्रूला संभ्रमित कसे करायचे याची अनेक उदाहरणे दिली आहेत. यातील बहुतेक उदाहरणात शत्रूस मानसिकरीत्या कसे नामोहरम करायचे हे सांगितले आहे. जेव्हा शत्रू संभ्रमात असतो वा दिङ्मूढ झालेला असतो तेव्हा त्याची लढायची क्षमता अस्तंगत होऊ लागते. चिनी युद्धशास्त्राप्रमाणे शत्रूचा पराभव करणारे योद्धे प्रत्यक्ष युद्ध कधी करतच नाहीत.

वचन : 15

ही विशिष्ट युद्धकला तुम्हाला विजयी करते. म्हणूनच हिचा उपयोग योग्य वेळेआधी करू नये.

या संभ्रमकलेत अज्ञात राहणे व चकित करणे या युक्त्या समाविष्ट असल्याने, ही नीती अखेरपर्यंत स्वत: जवळच गुप्त ठेवावी.

वचन : 16

युद्ध सुरू करण्याआधी पूर्वतयारी म्हणून देवळात जाऊन विचार करून गणित मांडतो, तो जिंकतो. कारण त्याने आधीच सांगोपांग विचार केलेला असतो.
युद्धापूर्वी देवळात जाऊन संपूर्ण गणित मांडत नाही व अर्धवट विचार करतो तो युद्ध हरतो.
सांगोपांग विचार व युक्तिपूर्ण नियोजन म्हणजे विजय व अर्धवट विचार व नियोजनाचा अभाव म्हणजे पराजय, मग अर्धवट म्हणजे किती कमी?
याचे निरीक्षण करून मी विजय किंवा पराजय याचे भाकीत करू शकतो.
चीनमधील युद्धात हजारो सैनिकांचा सहभाग असे. त्यामुळे अनेक सैनिक मारले जात व अपरिमित नुकसान होत असे. म्हणूनच सन त्झुसारखा सुज्ञ व चाणाक्ष सेनापती युद्धभूमीत घाईघाईने वा अविचारीपणे जात नसे. तो देवळात जाऊन पाच घटकांचा सखोल विचार करीत असे आणि मग आपल्या परिस्थितीचे मूल्यांकन करीत असे. शक्यतो प्रत्यक्ष युद्ध न करता जिंकावे कसे यावर तो आपली रणनीती ठरवीत असे.
आपल्या आयुष्यातदेखील आपण अशा प्रकारे सांगोपांग विचार केला व दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर केला तर संघर्ष व अतिघाईने होणारी अपरिमित हानी टाळता येईल. आपली बलस्थाने, आपली पात्रता, आपल्या मर्यादा यांचा तटस्थपणे, एकांतात विचार केल्यास पुढील मन:स्ताप, हानी व तणाव टाळता येतो. येथील 'देऊळ' सांकेतिक आहे. अलिप्तपणे, एकांतात, शांत डोक्याने, सखोल, सांगोपांग विचार असा त्याचा अर्थ आहे.

अध्याय 1

युद्ध योजना

सारांश -

युद्ध हाच एकमेव मार्ग उरला आहे का याचे विश्लेषण करा.
पाच घटकांचा विचार करून स्थितीचे परीक्षण करा.
ते पाच घटक असे :
1) नीती - आचरण व विवेक
2) स्वर्ग/अध्यात्म - वातावरण व परिस्थिती
3) धरती/भूमी - प्रत्यक्ष परिस्थिती व भौगोलिक स्थिती
क्र.1) व 2) मिळून वातावरण व परिस्थितीच्या निर्मितीस कारणीभूत ठरतात.
4) नेतृत्व : समाजापुढील आदर्श
5) नियम : कायदे, कानून, संगठन, वाहतूक इ.
या पाच घटकांचे प्रत्यक्षपणे विश्लेषण व शत्रुपक्षाचे मूल्यमापन कसे करायचे हेदेखील या अध्यायात सांगितलेले आहे.

संभ्रम निर्माण करण्याची पद्धत म्हणजे युद्ध

संभ्रम कसा निर्माण करायचा याचेसुद्धा निर्देश देण्यात आलेले आहेत.
सैनिकी गुपिते उघडकीस आणू नयेत.
परिस्थितीनुसार आयोजन बदलावे.
आधी आपली बलस्थाने व उणिवा समजून घ्या, मग शत्रूस समजून घ्या. असे केल्याने तुम्ही हजारो युद्धे जिंकू शकता.

आजमितीस याचा व्यवसायास उपयोग

- स्वतःची परिस्थिती, उत्पादन, कच्चा माल, साधने आधी उमजून घ्या, मग प्रतिस्पर्ध्याचे विश्लेषण करा.
- नीतिमत्ता, नेतृत्व, वर्तणूक इ. चे नियम लागू करा.
- संघर्ष सुरू करण्याआधी सखोल अभ्यास करा.
- बाह्य परिस्थिती सदोदितपणे बदलते, त्याचा सामना करण्यासाठी स्वतःस लवचीक ठेवा.
- प्रतिस्पर्ध्याच्या मनात संभ्रम निर्माण करा. आपल्या खऱ्या योजना कधीच उघडकीस येऊ देऊ नका.

□□□

अध्याय 2
युद्ध पुकारणे

सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे, दुसरा काही पर्याय उरला नसेल तरच एक निपुण सेनाधिपती प्रत्यक्ष युद्ध करतो. प्रत्यक्ष युद्ध वा कृती न करता, आयुष्यातील अनेक वाद सामोपचाराने सोडविले जाऊ शकतात. युद्धामुळे उभय पक्षांची असीमित हानी होते. तुमचा प्रतिस्पर्धी, काहीही झाले तरी संघर्ष झालाच पाहिजे असा निर्धार करून बसला असेल तरीही आधीच्या अध्यायात उल्लेख केल्याप्रमाणे त्याहून उच्च मानसिक, शारीरिक, बौद्धिक व नैतिक दर्जामुळे तुम्ही यशस्वी सुरुवात करून युद्ध न करतादेखील युद्ध जिंकू शकता. हा सिद्धांत कोणत्याही राष्ट्राचा, सैन्याचा अथवा व्यक्तीचा विरोध करताना वापरता येतो. युद्ध टाळणे अशक्यच झाले तर मात्र सन त्झुच्या या अध्यायातील सल्ल्यानुसार वागल्याने कमीत कमी हानी होऊन तुम्ही त्वरितपणे विजय मिळवू शकाल.

वचन 1

सन त्झु म्हणतो,
साधारणतः लढाईसाठी खालील गोष्टी आवश्यक असतात
चार घोडे असणारे एक हजार हलके रथ
एक हजार आरोहण करून चालविण्याजोगे अवजड रथ

आता सन त्झु संपूर्ण युद्धसामग्रीचा गोषवारा येथे देत आहे. तो चर्चेस सुरुवात रणनीती वा शस्त्रास्त्रांचे प्रकार यांचे विवरण देऊन करीत नाही. येथे तो खर्चाचा अंदाज घेत आहे. या अंदाजामुळे तुमचा आडमुठेपणे लढाई सुरू करण्यावर आळा बसू शकतो. इथे घोडदळाचा उल्लेख नाही. कारण त्या काळी घोडे रथाबरोबरच वापरले जात असत. मथितार्थ असा की, शत्रू पक्षाच्या व स्वतःच्या खर्चाचा अंदाज, लढाई करण्यापासून परावृत्त करू शकतो. वैयक्तिक जीवनातसुद्धा कुठल्याही संघर्षाला सामोरे जाण्याआधी हा परामर्श घ्यावा, असे सन त्झुचे कथन आहे.

या वचनात उल्लेख केलेले हलके रथ म्हणजे आक्रमण करण्यासाठी बनविलेले रथ व अवजड रथ म्हणजे आत्मरक्षणासाठी वापरण्यात येणारे जड रथ. हे रथ महत्त्वाचे ठरण्याचे कारण असे की, यांच्या भोवताली पायदळाची योजना केली जात असे.

वचन 2

एक लाख पायदळ
लि (400 कि. मी.) एवढ्या अंतरावर वाहतुकीची व्यवस्था

सेनेचा अंतर्गत व युद्ध भूमीवरील खर्च
तसेच इतर पाहुण्यांचा खर्च
सन त्झुच्या काळात 1 लि म्हणजे 400 मीटर. 1000 याप्रमाणे लि म्हणजे 400 कि. मी. एवढ्या अंतरावर मोहीम घेऊन जाण्याच्या खर्चाचाही विचार करण्यात यावा असा त्याचा सल्ला आहे. या व्यतिरिक्त एक लाख सैनिकांचे पायदळ हीसुद्धा खर्चीक बाब आहे. लढाई चालू असताना सैन्याचे मनोबल उच्च ठेवण्यासाठी, जखमींची शुश्रूषा करण्यासाठी लागणारा खर्च, अंतर्गत खर्चात त्यांचा अतिरिक्त पगार इ. समाविष्ट आहे. येथे त्याने उल्लेख केलेले पाहुणे म्हणजे मित्र राष्ट्रे व इतर सल्लागार जे तुम्हाला शत्रूची रणनीती, त्याचे डावपेच व त्याचे ठिकाण याची माहिती देतात. अशी माहिती काढणे अत्यावश्यक असते. कारण यामुळे सेनापतीचे श्रम व नुकसान कमी होते. या माहितीमुळे आपल्याला संपूर्ण डावपेच आखायला मदत होते.
इथे लक्षात ठेवण्याजोगे हे आहे की, तो पुन्हा तुम्हाला या सर्व आयोजनाची नोंद करायला लावून व खर्चाचा अंदाज घ्यायला लावून लढाईपासून परावृत्त करण्याच्या प्रयत्नात आहे.

वचन 3

युद्धासाठी गोंद व लाख
रथातील व सैन्यातील साधने
यांचा खर्च दिवसाला एक हजार सुवर्णमुद्रा एवढा असेल
तरच मग एक लाख सैनिकांचे दल लढविता येते.
अशा प्रकारे सैन्याच्या खर्चाची यादी करून आपल्या खास पद्धतीने सन त्झु विचारत आहे : तुमची सगळी संसाधने व संपत्ती पणाला लावून आता युद्धास उतरण्याचा दृढनिश्चय आहे का? आता सर्व अंदाज लावल्यावर जर तुम्हाला वाटत असेल की तुम्हाला हे झेपणार नाही तर इतर मार्ग शोधा. अशी अर्धवट तयारी म्हणजे पराजयावर शिक्कामोर्तब आहे. याचाही विचार करा की, युद्धमोहीम सुरू करण्याचा खर्च पर्वताएवढा आहे; परंतु तुम्ही ज्या संधी गमावता व ज्यामुळे तुम्ही काहीतरी निर्माण करू शकता ते हातातून निघून जाते ही आहे. म्हणूनच युद्ध करण्याआधी हाच एकमेव पर्याय आहे याची पुनःपुनः खात्री करून घ्या.
खरी हानी आहे, या उक्तीचा व्यावहारिक व व्यावसायिक जीवनात उपयोगी पडणारा संदेश हा की, वरवर दिसणाऱ्या कारणांमुळे संघर्ष करण्यास बाजारपेठेत उतरू नका. तुमच्या प्रतिस्पर्ध्याने तुम्हाला आव्हान दिले म्हणून लगेच त्याच्या उत्पादनावर हल्ला चढवू नका. हे करण्यास किती खर्च येतो व यानंतर किती नुकसान होते याचा अंदाज घ्या.

वचन 4

युद्ध केल्यास लगेच विजय प्राप्त करा.
प्रदीर्घ युद्धाने शस्त्रे बोथट होतात व आवेश कमी होतो.
सैन्याने किल्ल्यावर हल्ला केला तर त्यांची शक्ती क्षीण होते.
सैन्यास प्रदीर्घ लढाईस तोंड द्यावे लागले तर राष्ट्राची संपत्ती पुरणार नाही.

दुसरा कोणताच पर्याय नसल्याने युद्ध करावेच लागले तर सेनापतीने ते लवकरात लवकर संपविले पाहिजे. यामुळे जास्तीच्या खर्चास आळा बसतो. एवढेच नाही तर सैनिक थकत नाहीत. हानी नियंत्रणाखाली राहते व सैनिकांचे मनोबल कमी होत नाही. या स्पष्टीकरणामुळे सन त्झु एक चतुर मुत्सद्दी म्हणून आपल्याला दिसून येतो.
आजच्या काळात असे दिसून येते की, अतिरेकी राजकारणी विधानांमुळे राष्ट्रांमध्ये युद्धे होतात व नंतर मात्र ती वक्तव्ये व आत्यंतिक भावना विसरल्या गेल्या तरीही संघर्ष चालूच राहतो. राष्ट्रे आर्थिकरीत्या क्षीण होतात व हजारो जीव मारले जातात. म्हणूनच युद्ध प्रदीर्घ होऊ द्यायचे नाही हासुद्धा तुमच्या युद्धकलेचा भाग होणे आवश्यक आहे, असे सन त्झु प्रतिपादित करतो.
आपल्या वैयक्तिक जीवनातदेखील जेव्हा तणाव निर्माण होतो, घरात कलह होतो तेव्हा लवकरात लवकर वाद संपवून संघर्ष संपविला पाहिजे. प्रदीर्घ चालणारा तंटा भावनिक आगीत तेल ओतण्याचे काम करतो व उभयपक्षी नुकसानच होते.
आपल्याला काय अपेक्षित आहे व आपण कुठवर तडजोड करू शकतो, याचा आधीच अंदाज घेतल्याने आपले सर्व प्रयत्न त्या दिशेने सुरू होतात. त्यामुळे वेळही वाया जात नाही. नुकसानदेखील कमी होते. ज्या कृतीचा संघर्ष सोडविण्यास काहीही उपयोग होत नाही त्यावर वेळ वाया घालवू नये.
वेळ, ऊर्जा व साधने -तिन्हीही मर्यादित आहेत व त्यांचा सदुपयोग करणे म्हणजे संघर्ष होऊच न देणे अथवा झालाच तर तो लवकरात लवकर संपविणे.

वचन 5

जेव्हा शस्त्रे बोथट होतील व आवेश संपुष्टात येईल, बळ संपेल व साधने रसातळाला जातील, तेव्हा शेजारचे शासक या गुंतागुंतीच्या परिस्थितीचा फायदा घेतील.

लढाई लांबणीवर पडली तर एका शत्रूचा सामना करता करता दुसऱ्या कुठल्याही शत्रूचा मुकाबला करण्याची शक्ती तुमच्या सैन्यात उरणार नाही. म्हणूनच सन त्झु तुम्हाला सतर्क करीत आहे की, एकाच शत्रूशी प्रदीर्घ काळ लढाई चालू ठेवण्याचे दुसरे नुकसान म्हणजे आणखी कोणत्याही नवीन संकटास तुम्ही तोंड देऊ शकणार नाही.

हे आपल्या सद्य:जीवनातदेखील समर्पकरीत्या लागू आहे. एका समस्येत गुरफटून राहणे म्हणजेच दुसऱ्या संकटाला आमंत्रण देणे. संघर्ष जीवनाचा भाग आहे; पण हाती असलेला संघर्ष टाळा अथवा त्याचा सामना करताना ती लढाई लवकर संपवा.

वचन 6

मग मात्र हुशारातला हुशार सल्लागारदेखील संभाव्य परिणामांना थांबवू शकणार नाही.

शत्रू पक्ष चाल करून येत आहे हे ऐकताक्षणीच लढाईची तयारी करण्यात सेनापती असमर्थ ठरला तर त्याच्या जगण्याची शक्यता शून्यप्राय असेल. जेव्हा थकल्या भागलेल्या, हतोत्साहित व मनाने मेलेल्या सैन्यावर सुसज्ज व संधिसाधू शत्रू हल्ला करेल तेव्हा कितीही हुशार सेनापती अटळ हानी व पराजय टाळू शकणार नाही. तुम्हाला युद्ध करायचे नसले तरीही जर तुमच्यावर बळजबरीने युद्ध थोपले गेले तर त्याचा सामना करण्याची तयारी तुम्ही ठेवली पाहिजे. यासाठी प्रदीर्घ युद्ध टाळून पुढील संघर्षासाठी तुमची शक्ती व उत्साह राखून ठेवले पाहिजेत.

सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे, पुढची संकटे टाळण्यास पूरक असे चातुर्य हवे. ते प्रतिक्रियात्मक नसावे. संभाव्य समाधान शोधल्यास ते तुमच्या मनाच्या खिडक्या उघडते; पण तयारी नसली की नुसत्या प्रतिक्रियेने नुकसानच होते.

वचन 7

म्हणूनच मी गुंतागुंतीच्या पण त्वरित सैनिक मोहिमांबद्दल ऐकले आहे; पण प्रदीर्घ व कौशल्यपूर्ण मोहिमांबद्दल ऐकलेले नाही.

प्रदीर्घ युद्धाने कोणत्याही राष्ट्राचा फायदा झालेला नाही

म्हणूनच युद्धाचा अविभाज्य घटक असणाऱ्या धोक्याची जाणीव तुम्हाला नसेल तर तुम्ही युद्ध करण्याचे फायदे संपूर्णतः जाणूच शकणार नाही.

ते लोक प्रदीर्घ युद्धास बळी पडतात, ते मग काहीही झाले तरी जिंकलेच पाहिजे या मूर्ख ईर्षेस बळी पडतात.

संघर्ष लांबणीवर पडल्यावर झालेल्या नुकसानीची भरपाई आपल्या पुढील जीवनात नक्कीच होईल, या फोल आशेने माणूस संघर्ष चालूच ठेवतो. आर्थिक व्यवहारात हेच घडते. तोट्याच्या व्यवहारात शिरण्याआधी संपूर्ण विश्लेषण केलेले नसते व जेव्हा पुढे मार्ग नाही हे लक्षात येते तेव्हा संघर्ष संपवून बाहेर पडणे श्रेयस्कर असते.

एखादे राष्ट्र व त्याच्याकडे असणारी अनंतकाळपर्यंत टिकणारी संपत्ती हा सर्व कल्पनाविलास आहे. अशी संपत्ती असणारे प्रदीर्घ लढाई लढतात; पण वास्तविक

जीवनात प्रदीर्घ लढाई म्हणजे पराजय किंवा अनेकांचे प्राण गमावून संपादन केलेला विजय.

वचन 8

युद्धकलेत निष्णात असतात ते पुन: पुन्हा सैन्याची उभारणी व वाहतुकीची व्यवस्था करीत नाहीत.

युद्धाची शस्त्रात्रे व साधनसामग्री घरून न्या; पण रसद मात्र शत्रूकडूनच घ्या.

अशा प्रकारे शस्त्रास्त्रे व रसद या दोन्हीबाबतीत तुमचे सैन्य सुसज्ज होईल.

जर सैन्याला दूर अंतरावर पुरवठा करावा लागला तर ते राष्ट्र दरिद्री होईल

आणि जेव्हा रसद व शिध्याची वाहतूक खूप लांबवर करावी लागेल तेव्हा प्रजा दरिद्री होईल.

रसद व शिधा शत्रूच्या प्रदेशातील वापरावा असे सुचवून सन त्झु आपले चातुर्य दाखवितो. अशा प्रकारे दूरवर रसद पोहोचविण्याचा व त्यामुळे ती खराब होण्याचा धोका व खर्च टाळता येतो. निष्णात सेनापती याच कारणासाठी युद्ध लवकर संपवितात व त्यामुळे सैन्याची उभारणी दुसऱ्यांदा करण्याची गरजदेखील भासत नाही.

तुम्हाला जेव्हा शत्रूचा सामना करायचा असतो तेव्हा तुम्ही ऊर्जा आणि साधने सांभाळून व काटकसरीने वापरली पाहिजेत. तुमची आगेकूच होण्यासाठी शक्य तेथे शत्रूच्याच साधनांचाच वापर केला पाहिजे.

आजच्या व्यवसायात आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या संसाधनांचा उपयोग म्हणजे त्याच्याच कल्पनांचा, नैपुण्याचा, तंत्रज्ञानाचा व सैनिकांचादेखील (म्हणजे त्याच्याच कर्मचाऱ्यांचा) वापर करावा.

वचन 9

सैन्याच्या सान्निध्यात असणारे लोक त्यांचा माल महाग किमतीत विकतील.

जेव्हा सर्वकाही महाग होईल तेव्हा नागरिकांची संपत्ती संपुष्टात येईल.

जेव्हा संपत्ती संपुष्टात येईल तेव्हा नागरिकांना वाढलेल्या करांचे ओझे सहन करावे लागेल.

येथे उल्लेख करण्यात आलेली नागरिकांची संपत्ती म्हणजे स्वतःच्या देशातील नागरिकांची संपत्ती. ही संपुष्टात आली की मग देशातील राज्यकर्ते युद्धाचा खर्च चालविण्यासाठी कर लादतात. यामुळे गोरगरिबांवर खूप बोजा वाढतो. ही हलाखीची परिस्थिती असे समजायचे.

त्याने शत्रूकडून रसद काबीज करून सैन्य चालवायचे असे म्हटले असले तरी तेथील नागरिकांवर अन्याय करावा असा त्याचा हेतू नाही. त्याने सैन्याच्या सान्निध्यात म्हणजे

शत्रूच्या प्रांतात माल महागण्याचा जो उल्लेख केला आहे त्याचा अर्थ असा की, शत्रूच्या नागरिकांकडून माल महागात विकत घ्यावा लागेल असा आहे-म्हणजेच लुटालूट न करता त्यांच्याकडून तो विकत घ्यायचा आहे. येथे नैतिकतेवर भर दिला आहे. ही साखळी अशी- युद्ध टाळा, करावेच लागले तर लवकर संपवा- अन् रसद कमी पडल्यास शत्रूच्या प्रदेशातूनच घ्या; पण नैतिक मार्गाने, लुटालूट करून नाही. येथे शत्रूच्या रहिवासीत लोकांच्या सुरक्षिततेचा विचार गर्भित आहे आणि याच विचाराचे रूपांतर.... वर्षांनंतरच्या जिनिव्हा कन्व्हेन्शनमध्ये झाले.

शत्रूची जी अबाधित असलेली संपत्ती व जमीन राहील ती अखेर सेनापतीस उपयोगीच पडेल. हा विचार नैतिकदृष्ट्या तसेच आर्थिकदृष्ट्या परिपक्व आहे. शत्रूच्या राज्यातील नागरिकांना अभयदान दिल्याने व आदर दिल्याने तणाव कमी होतो व संबंध चांगलेच राहतात. कमीत कमी वैरभाव निर्माण होतो.

वचन 10

संपूर्ण शक्तिपात होतो व साधने संपुष्टात येतात तेव्हा सर्व मुख्य योजना संपूर्णपणे उद्ध्वस्त होतात आणि नागरिकांची 70 टक्के संपत्ती नष्ट होते.

नष्ट झालेले रथ, थकलेले अश्वदल, मोडकळीस आलेली शस्त्रास्त्रे, चिलखत, शिरस्त्राणे, बाण व धनुष्य, ढाल-तलवारी, बैल व अवजड वाहतुकीची वाहने तेव्हा यांच्यावरील खर्च तिजोरीतील 60 टक्के संपत्तीएवढा असेल.

इथे सन त्झु पुन्हापुन्हा आर्थिक नुकसानीचा अंदाज प्रत्यक्ष आकड्यात देऊन राज्यकर्त्यांना जागरूक करीत आहे. अशा प्रकारच्या युद्धाने नागरिकांची 70 टक्के व सरकारच्या तिजोरीत शिल्लक रकमेच्या 60 टक्के रक्कम नष्ट होईल. 2500 वर्षांपूर्वीचा अंदाज व आज सैनिकी कारवायांवर प्रत्यक्षात होत असलेला खर्च यात फारसा फरक नाही. हाच खर्च आरोग्य, शिक्षण, निवारा, अन्न, रोगराई निवारण यावर खर्च करा. सन त्झुच्या या वचनातील गर्भितार्थ हेच सुचवतो.

सन त्झुची ही चेतावनी आपल्या वैयक्तिक आयुष्यातदेखील लागू आहे. कुठल्याही संघर्षास तोंड देण्यासाठी विवेकपूर्ण तयारी आवश्यक आहे. नाही तर 60 ते 70 टक्के संपत्ती वाया जाईल. दशकानुदशके चाललेले कज्जे व कोर्ट कचेऱ्यातील विवाद काय दर्शवितात?

येथे 60 टक्के व 70 टक्के अशी दिलेली आकडेवारी खूप अर्थपूर्ण आहे. पहिल्या मोहिमेतच एवढा खर्च झाला की मग युद्ध प्रदीर्घपणे लढण्याचा विचार म्हणजे संहारच. अरब व इस्राएलमधील वर्षानुवर्षे चाललेला संघर्ष हेच प्रतिपादित करतो. यानंतर जे काही उरते ते बेचिराख झालेल्या राष्ट्राची उभारणी करण्यास कमी पडते.

वचन 11

म्हणूनच निष्णात सेनापती आपल्या सैन्यास लागणारी रसद शत्रूकडूनच मिळवितो.
शत्रूकडील धान्याचे एक पोते आपल्या वीस पोत्यासमान आहे.
त्याचा एक पिकुल आपल्या वीस पिकुलांएवढा आहे.
(पिकुल म्हणजे 65.5 कि.ग्रॅ.)
याचा अर्थ असा की, वाहतुकीत वीस पोती पाठविली तर रणभूमीवर पोहोचेपर्यंत त्यातील एकच उरेल. आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात याचाच अर्थ असा की, तुम्ही जेथे युद्ध करता तेथीलच कच्चा माल वापरा, यामुळे तुमचा खर्च कमी होईल. वाहतुकीवर पैसा वाया घालवू नका.

वचन 12

शत्रूस मारणे म्हणजे सैनिकांतील क्रोधाचा उद्रेक करणे.
शत्रूची संपत्ती काबीज करणे म्हणजे पुरस्कार मिळविणे.
म्हणूनच रथाच्या लढाईत नेहमी आपला पहिला रथ गमावू शकता
म्हणजे नंतरचे कमीत कमी दहा तुम्ही जिंकू शकाल.
शत्रूचे ध्वज व इतर चिन्हे उतरवून स्वत:चा ध्वज फडकवा.
काबीज केलेले रथ आपल्या रथास जोडा.
काबीज केलेल्या शत्रूच्या सैनिकांना चांगली वागणूक द्या.
याला शत्रूचा पराजय व स्वत: ची शक्ती वाढविणे असे म्हणतात.
सन त्झु येथे मोठ्या गुंतागुंतीच्या मानसशास्त्राचा उपयोग करीत आहे. क्षणिक भेदभाव विसरून शत्रूशी दीर्घकालीन संबंध कसे जोडायचे हे विशद करीत आहे.
येथे क्रोध हा शत्रूचा वध करतो, याचा उल्लेख असला तरीही पुढील ओळीत तो शत्रूच्या सैनिकांना सन्मानाने वागविण्यावर भर देतो. काबीज केले गेले तरी त्यांच्या मनात दुजाभाव नसावा यासाठी हा उपदेश आहे. या प्रकारे आपोआपच शत्रूची शक्ती पणास लागते व स्वतःचे सामर्थ्य वाढते. शत्रूच्या सैनिकांस सहानुभूतीने व दयेने वागविणे- नैतिकता व करुणा यांचा वापर करून सन त्झु - युद्धजन्य परिस्थितीदेखील कशा प्रकारे हाताळतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे.
सामान्य व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातसुद्धा हा उपदेश आचरणात आणता येतो. जेव्हा तुमच्या प्रतिस्पर्ध्याच्या तुलनेत तुमची स्थिती भक्कम असते तेव्हा तुमची सदिच्छा दर्शविण्यासाठी तुम्ही आपणहून त्याच्याकडे जाऊ शकता व त्याला मदत करू शकता. यामुळे तुमच्याविरुद्ध आपल्या कमकुवतपणाची त्याला लाज वाटणार नाही व तुमच्याशी तो विनाकारण संघर्ष करणार नाही. आपोआपच तुम्हालासुद्धा त्याच्याशी संघर्ष करावा लागणार नाही.

वचन 13

युद्धात विजय महत्त्वाचा असतो, प्रदीर्घ संघर्ष नव्हे.

म्हणूनच युद्धशास्त्र समजणारा सेनापती हा लोकांच्या जीविताचा रक्षक असतो व राष्ट्राच्या सुरक्षिततेचा तो प्रमुख असतो.

येथे सन त्झु पुन्हा पुन्हा प्रजाजनांच्या जीविताच्या सुरक्षेचा भार कुशल सेनापतीवर टाकतो. त्यांच्या जीविताचे रक्षण म्हणजे विजय -आणि म्हणूनच युद्धाचा त्वरित शेवट आवश्यक असतो.

सामान्य जीवनातसुद्धा तुमच्यावर प्रतिस्पर्ध्याने हल्ला केला तर तात्काळ कृती व त्या संघर्षाचा शेवट ही तुमची जबाबदारी ठरते. तुम्ही त्याहून बलाढ्य असाल तर त्याला संपूर्ण नामोहरम करण्याचा संकल्प करू नये. तुमच्या क्षमाशीलता व दयाळूपणामुळे, कमीत कमी जीवितहानी होऊन तुमचा विजय होईल. यामुळे दीर्घकालीन शांतता प्रस्थापित होईल. याउलट केवळ विध्वंसक विजय झाला तर शत्रूच्या मनात नेहमीच द्वेषाची भावना घर करून राहील आणि तो पुन्हा सूड उगविण्याचा प्रयत्न करेल.

अध्याय 2

युद्ध पुकारणे

सारांश -

युद्ध घोषित करण्याआधी खर्चाचा अंदाज सविस्तरपणे घ्या.
युद्धासाठी वाहतुकीचा, रसद पुरविण्याचा व सैनिकांच्या वेतनाचा खर्च किती येईल याचा सविस्तर अंदाज घ्या.
प्रदीर्घ युद्धाचे धोके
1) राष्ट्राच्या संपत्तीत घट
2) सैन्य दूर अंतरावरून नेत असल्यास अतिरिक्त खर्चाचा बोजा
3) बोथट शस्त्रे, थकलेले सैन्य
4) हताश व कमी झालेले मनोबळ
5) प्रदीर्घ हल्ल्यानंतर होणारी जीवितहानी
यावर उपाय एकच
'त्वरित विजय'

इतर मार्गदर्शक चिंतन

1) युद्धाची घाई करणे मूर्खपणाचे लक्षण आहे. योग्य वेळ साधल्यास जीवितहानी टळते.
2) त्वरित विजयासाठी.... अध्यायमधील सविस्तर तयारी महत्त्वाची असते.
युद्धाची वाईट बाजू आधी समजून घेतल्यास युद्ध केल्याने होणारे फायदे खरे आहेत का हे सविस्तरपणे कळते.
एक निष्णात सेनापती खालील गोष्टी कटाक्षाने पाळतो.
1) तो कधीच सैन्याची उभारणी दुसऱ्यांदा करत नाही.
2) धान्य व रसद शत्रूच्याच इलाख्यात मिळवितो.
3) सर्व शस्त्रे व साधने स्वत: नेतो.
4) शत्रुपक्षातील सैनिकांना ताब्यात घेताना मानाने वागवतो.
5) ताब्यात घेतलेली शस्त्रास्त्रे पुन्हा वापरतो.

याचे फायदे

- आपल्या देशातील अन्नधान्याच्या किमती व साठा अबाधित राहतो.
- दूरवर सामान नेण्याने होणारा वाहतुकीचा खर्च वाचतो.
- शत्रुपक्षातदेखील आपल्याबद्दल आदराची भावना वृद्धिंगत होते.
- राष्ट्राची संपत्ती अबाधित राहते/ नुकसान कमी होते.

आजच्या जगात अपेक्षित अर्थ

1) प्रतिस्पर्ध्याशी सामना सुरू करण्याआधी खर्चाचा सविस्तर आराखडा मांडून अंदाज घ्या. त्याशिवाय मैदानात उतरू नका.

2)उत्तम परिणाम मिळण्यासाठी शत्रूच्या नैपुण्याचा आदर करा. शक्य झाल्यास त्याच्या सैन्याला आपलेसे करून घ्या.

3) स्थानिक कच्चा माल वापरा.

4) अयशस्वी होत आहात असे वाटल्यास लगेच संघर्ष संपवा वा रणनीती बदला.

□□□

अध्याय 3
आक्रमणाचे आयोजन

युद्ध करणे अटळ असते तेव्हा वेगाने विजय मिळविण्याचा मार्ग म्हणजे एक उत्तम योजना तयार करणे. असे करण्यामागे हेतू हा की, कमीत कमी हानी होऊन युद्ध समाप्त करणे. मनुष्य, वित्त तसेच साधनसंपत्तीची हानी टाळल्याने उभय पक्षांचे भले होते. तुमचा शत्रुपक्ष तुमचा ऋणी होतो. कारण पराजित होऊनही त्याला दयनीय अवस्था, सैनिकांची शारीरिक इजा व मानसिक उद्विग्नता यांचा मोठ्या प्रमाणात व दीर्घकाळपर्यंत सामना करावा लागत नाही. आक्रमणाचे नियोजन करताना निर्णायक कृतींकडे विशेष लक्ष द्यावे लागते. त्या कृती कालबाह्य असतात. या अध्यायात सन त्झुने आणखी पाच तत्त्वे विशद केलेली आहेत. या तत्त्वांवरून तुम्ही विजयी होणार की पराभूत हे ठरविण्यास मदत होते.

वचन 1

सन त्झु म्हणतो,

कुठल्याही युद्धात सर्वसामान्यपणे शत्रूचे राष्ट्र अभंग व अबाधित ठेवणे सर्वोत्तम पर्याय आहे; परंतु विध्वंस करणे हा त्याच्यापाठोपाठचा पण त्याहून कनिष्ठ पर्याय असतो.

मनात सूडबुद्धी अथवा प्रति हल्ला करणे अशा कुठल्याही दुष्ट भावनांनी प्रेरित होऊन सन त्झु युद्धाचे आयोजन करीत नाही. युद्ध कितीही अटीतटीचे व निकराचे झाले तरीही आयोजन करताना सहानुभूती व सहिष्णुता हे स्थायी भाव असले पाहिजेत, अशी त्याची दृढधारणा नव्हे तर तत्त्वप्रणाली आहे. 'आर्ट ऑफ वॉर' नामक पुस्तकात सहानुभूती व सहिष्णुता यास प्राधान्य दिल्यामुळे ही खूप मोठी विसंगती आहे, असे खूप जणांना वाटण्याची शक्यता आहे; पण ही नुसतीच तत्त्वप्रणाली नसून यामागे व्यावहारिकता हादेखील स्थायिभाव आहे. येथे त्याने उपलब्ध साधनसामग्री, संपत्ती, शस्त्रास्त्रे, मनुष्यबळ इ.चा सांगोपांग विचार केला आहे. पराजीत व उद्ध्वस्त झालेल्या लोकमनात कमालीचा संताप उसळत असतो जो आपल्याला भविष्यात अडथळा निर्माण करतो याची त्याला पुरेपूर जाणीव होती. त्यामुळे शत्रुपक्ष जरी असला तरी त्याची एका सुज्ञ व अनुभवी सेनापतीला जाणीव असायला हवी. शहर आहे त्या स्थितीत, कुठलाही विध्वंस न होता काबीज करणे व तिथल्या नागरिकांचे सहकार्य मिळवून पुढे कूच करणे हे महत्त्वाचे असले पाहिजे - नव्हे त्याची विचारसरणी, त्यावर आधारित आयोजन त्या प्रकारचे असले पाहिजे, असे प्रतिपादन

सन त्झु करतो. सन त्झुने एका ठिकाणी म्हटलेच आहे, 'जेव्हा दोन्ही बाजूतील सैन्याचे बळ, योजना, युक्ती या अगदी सर्वार्थाने समान असतात तेव्हा जे सैन्य सहिष्णू असते तेच विजयी ठरते.'

आजच्या जगात व व्यवसायात विजय प्राप्त करण्यासाठी आपल्या प्रतिस्पर्ध्यास मात दिली पाहिजे, अशी आपली जी धारणा आहे त्यावरच सन त्झु घाव घालतो. तुमच्या शत्रूस विनाकारण त्रास देऊन वेदना दिल्यास स्वतःची स्थिती काही सुधारत नाही. किंबहुना अशा वर्तणुकीने त्याच्या त्राग्याचा, सूडबुद्धीचा व आक्रमणाचा सामना करण्यासाठी आपली शक्ती आणखी वाया घालवावी लागते. स्वतःची सूडबुद्धी, दुष्ट भावना, आवेग व आवेश बाजूला ठेवून तटस्थपणे आयोजन केले, तर तुम्ही आणखी बलाढ्य व्हाल व शत्रूसही त्याची जाणीव होऊन तोदेखील तुमच्याविरुद्ध युद्धयोजना करताना काळजी घेईल. अशा प्रकारे उभय पक्षांची हानी टळेल.

वचन 2

सैन्य अबाधित ठेवणे हा सर्वोत्तम पर्याय आहे, सैन्याचा नाश करणे हा त्यापाठोपाठचा कनिष्ठ पर्याय असतो.

सैन्याची तुकडी अबाधित ठेवणे हा सर्वोत्तम पर्याय आहे, तुकडीचा नाश करणे हा त्यापाठोपाठचा कनिष्ठ पर्याय असतो.

सैन्याचा एक विभाग अबाधित ठेवणे हा सर्वोत्तम पर्याय आहे, विभागाचा नाश करणे हा त्यापाठोपाठचा कनिष्ठ पर्याय असतो.

सैन्याचे पथक अबाधित ठेवणे हा सर्वोत्तम पर्याय आहे, पथकाचा नाश करणे हा त्यापाठोपाठचा कनिष्ठ पर्याय असतो.

राष्ट्रीय पातळीपासून ते सैनिकांच्या वैयक्तिक पातळीपर्यंत तत्त्वप्रणाली एकच आहे. यात सैन्य, तुकडी, विभाग, पथक असा कुठलाही भेदभाव नाही. सैन्य व साधनसामग्री वाचवा. प्रत्यक्षात युद्ध करणे म्हणजे आयोजनाचा व दूरदृष्टीचा अभावच म्हणायचा. हानी होऊ न देण्यास प्राधान्य द्यावे. एका राष्ट्राची निर्मिती करण्यात - मग ते राष्ट्र तुमचे असो वा शत्रूचे- पिढ्यान्पिढ्या खर्ची पडतात. ही समृद्धी परत मिळविण्यात प्रदीर्घ काळ जातो. विध्वंस करण्यापूर्वी तो कसा टाळायचा याचे आयोजन करा हा या 'आक्रमणाचे आयोजन' या अध्यायामागील सुप्त संदेश आहे. संहार करणे तसे सोपे असते; पण त्याची भरपाई करणे कठीण.

सृजन व जतन - तुमच्या शत्रूकडून शक्यतो अधिक आर्थिक फायदा करून घेणे व असे करताना त्याची सद्भावना मिळवणे हे कठीण असते. त्यामागे असलेली तत्त्वप्रणाली त्याचा कणा आहे. याचे आयोजन करताना उतावीळपणा चालत नाही,

इथे वैचारिक बैठक असावी लागते व त्या तत्त्वप्रणालीचा प्रचार सन त्झु येथे करीत आहे.

वचन 3

म्हणूनच शंभर युद्धात शंभर विजय प्राप्त करणे म्हणजे काही अत्युत्कृष्ट कामगिरी नव्हे तर, शत्रूच्या सैन्यास युद्ध न करता पादाक्रांत करणे म्हणजे अत्युत्कृष्ट कामगिरी होय.

शंभर वेळा शंभर युद्ध म्हणजे सदैव अशांती, मनुष्यबळ व इतर साधनांची अपरिमित हानी करणे होय. एवढी युद्धे करण्यासाठी अपरिमित कौशल्य लागते व तरीही मनोबलाची हानी होते. युद्ध न करता शंभर संघर्ष जिंकणे याचा अर्थ परिपक्वता व सहिष्णुता अंगी असणे. सन त्झु आवर्जून म्हणतो की, सेनापतीने जरी शंभर लढाया जिंकल्या तरीही अपरिमित हानी व मनोबलाचे अधःपतन या स्वरूपात त्या जिंकण्याची किंमत मोजावीच लागते. सन त्झुला विजय हवा आहे, याबद्दल शंकाच नाही; पण शेवटी विजय कशासाठी मिळवावासा वाटतो, तर ऐश्वर्य, सन्मान व प्रगतीसाठी! मग तुम्ही अवलंबिलेला मार्ग हे सर्व तुम्हास प्राप्त करून देत नसेल, तो तुमची असलेली संपत्ती नष्ट करण्यास पूरक असेल व पराजित पक्षाच्या द्वेषास पात्र ठरत असेल, तर तुमचे आयोजन नक्कीच योग्य नाही, याचा स्पष्ट अर्थ त्या मागील विचारसरणी व वैचारिक बैठक सुधारणे गरजेचे आहे असा होतो. सन त्झुने हेच प्रतिपादन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

कित्येकांना या प्रतिपादनात एक विरोधाभास आहे असे वाटेल. जेव्हा तुम्ही कुठलीही लढाई न करता वर सांगितल्याप्रमाणे 'अत्युत्कृष्ट' कामगिरी केली तर फार कमी लोकांच्या नजरेत भरण्यासारखी ही बाब असेल, त्यांना याचे कौतुक असणार नाही, महत्त्वदेखील कळणार नाही. किंबहुना यात एक प्रकारचा भ्याडपणा आहे असेही त्यांना वाटेल. युद्ध म्हणजे मनुष्यहानी, हौतात्म्य, त्याग इत्यादी. असे वाटणाऱ्या जनतेस याची किंमत कळणार नाही; परंतु या तत्त्वप्रणालीचा अवलंब करून आपली योजना आखणारा सेनापती हा अनुभवी व युद्धकौशल्यात पारंगत तसेच सहिष्णु असतो, तो भावनाविवश होऊन त्वेषाने काहीही करीत नाही. कालांतराने अशा प्रकारच्या तत्त्वप्रणालीशी सुज्ञ लोकांचा व नंतर सामान्य जनतेचा परिचय होतो व त्यावर त्यांचा विश्वास बसू लागतो. तुम्ही व तुमच्या योजना तोपर्यंत अलिप्त असतात व ज्या थोड्याबहुत लोकांना तुमच्या कारकिर्दीबद्दल माहिती असते तेदेखील तुमच्या क्षमतेबद्दल साशंक असतात. कित्येकदा तुम्हाला नाउमेद करून परावृत्त करण्याचा प्रयत्नसुद्धा केला जातो. जेव्हा युद्धात जिंकूनसुद्धा कधीही न भरून निघणारं नुकसान ते प्रत्यक्ष अनुभवतात त्यावेळी मात्र तुमच्या अलौकिक सामर्थ्याचा त्यांना साक्षात्कार

होतो. अमेरिकेतील सिव्हिल युद्ध सुरू झाले तेव्हा लढाईस निघालेले दक्षिण अमेरिकेतील कोवळे तरुण जनतेच्या अशा प्रकारच्या आवेशपूर्ण निरोपाचे साक्षीदार होते. ते युद्धावर जाताना संपूर्ण गाव समारंभपूर्वक ढोलताशाच्या गजरात त्यांना निरोप देत असे, आवेशपूर्ण भाषणे होत, संहार करा-संहार करा अशा घोषणा होत; परंतु दीर्घ युद्धानंतर परत येणाऱ्या मूठभर तरुणांच्या जखमा, खचलेले मनोबल पाहून या आवेशातील फोलपणा त्याच जनतेच्या व नातेवाइकांच्या डोळ्यात अंजन घालत असे. म्हणूनच अस्सल अत्युत्कृष्टता म्हणजे परिस्थितीचे स्वतःच केलेले वस्तुनिष्ठ मूल्यमापन. यात लोक काय म्हणतील या आक्षेपास स्थान नाही.

वचन 4

म्हणूनच युद्धाचे अत्युत्कृष्ट आयोजन म्हणजे शत्रूच्या रणनीतीवरील हल्ला, त्या खालोखाल उत्कृष्ट नीती म्हणजे शत्रूच्या मित्रपक्षावर हल्ला, त्या खालोखाल उत्कृष्ट नीती म्हणजे त्याच्या सैन्यावर हल्ला व सर्वांत निकृष्ट म्हणजे त्याचा चहू बाजूस भिंतींनी बंदिस्त राजधानीवर हल्ला.

इतर काहीही पर्याय उपलब्ध नसतील तरच राजधानीवर हल्ला केला जातो.

इ.स.पू. 500 मध्ये चीनमधील चौ प्रांताच्या हानतान नावाच्या राजधानी भोवताली पासष्ट फूट रुंद व पन्नास फूट उंच अशा अवाढव्य मापाच्या भिंती होत्या. तोफगोळा व इतर कुठलीही आधुनिक स्फोट सामग्री अथवा स्फोटक रसायने नसताना अशी भिंत नष्ट करून राजधानीच्या शहरात प्रवेश करणे हे कसोशीचे व धाडसाचे काम असे. यात मनुष्यहानी, जीवितहानी अपरिहार्य होती. इतकेच नव्हे तर राजधानीतील इमारती, उत्तम वास्तू, राजवाडा व शहरात वास्तव्य करणारे सामान्य नागरिक, यांना इजा पोहोचणे क्रमप्राप्त व अपरिहार्य होते. या बरोबरच त्या भिंती उद्ध्वस्त करताना स्वत: च्या सैन्याचे नुकसानदेखील टाळणे अशक्य होते. एकंदरच हा उभय पक्षाच्या प्रचंड विध्वंसास कारणीभूत अशी बाब होती.

तुमच्या लक्षात येईल की, या वचनात अत्युत्कृष्ट योजनेकडून आपण जेव्हा निकृष्ट योजनेकडे क्रमाक्रमाने जातो तसतशी क्षतीची मात्रा व्यस्त प्रमाणात वाढतच जाते. जेवढी हानी कमी तेवढी सकारात्मक परिणती. यात सहिष्णुतेच्या भावनेचा भाग मोठा आहे, सद्भावनेचे स्थान महत्त्वाचे आहे. या वचनात सुप्त असा आणखी एक अर्थ आहे व तो सन त्झुच्या आधीच्या सल्ल्यास पूरक आहे; तो म्हणजे अत्यल्प काळात संघर्षाचा शेवट. जेवढ्या लवकर तो कृती करतो तेवढे कमी नुकसान होते व या पर्यायातील सर्वांत वेगवान व गतिशील निर्णय म्हणजे शत्रूच्या युद्धनीतीस कूटनीतीने, युद्धात प्रत्यक्ष न उतरता नामोहरम करणे- शह देणे होय.

आपल्या दैनंदिन जीवनातदेखील संघर्षाचा अंगीकार करून त्यावर त्वरित उपाययोजना करणे श्रेयस्कर ठरते. तुमच्या प्रतिपक्षाची अशक्त बाजू कोणती हे त्वरित जाणून घेणे, त्याची वागणूक काय आहे हे समजून घेणे, त्याचे बाह्य स्वरूप परिचित करून घेणे व यावर आयोजन करणे महत्त्वाचे आहे. त्वेषात येऊन भांडण्यात व व्यक्तिगत हल्ले करण्यात अर्थ नाही. अशा प्रकारच्या मुत्सद्दीपणामुळे शत्रूचे प्रत्यक्ष नुकसान होत नाही, त्याच्या स्वाभिमानास धक्का पोहोचत नाही. यामुळे शत्रू व्यक्तिगत हल्ला केला गेला आहे असे समजणार नाही व यामुळे तुम्हाला जे हवे ते सहज मिळेल- त्याचे आक्षेपार्ह वर्तन तो सोडून देईल.

वचन 5

भिंतीजवळ मातीचे ढिगारे बांधावयास आणखी तीन महिने लागतील

जर सेनापतीने आपला त्वेष ताब्यात ठेवला नाही व आपले सैन्य भिंतींवर हल्ला करण्यासाठी पाठविले तर त्यातील एकतृतीयांश मारले जाईल अन् तरीही राजधानी काबीज होणार नाही.

जेव्हा सभोवताली भिंत असलेल्या राजधानीवर आक्रमण केले जाते तेव्हा अशा प्रकारच्या संकटाचा सामना करावा लागतो.

सन त्झु आपला मुद्दा आणखी प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रत्यक्ष होणाऱ्या नुकसानीचा अंदाज येथे देत आहे. सभोवताली भिंत असलेल्या राजधानीवर प्रत्यक्ष आक्रमण करण्याच्या निकृष्ट आयोजनास कुठल्याही परिस्थितीत त्याचा विरोध आहे. मानवी हानीचा अंदाज देऊन अशा विचारसरणीपासून सेनापतीस तो परावृत्त करीत आहे.

पन्नास फूट उंच भिंत उल्लंघण्यासाठी चिनी सेनापतीस प्रचंड तयारी व आयोजन करावे लागत असे. ही तयारी व्यवस्थित केली नाही तर विजय लगेच मिळेल अशा अपेक्षेने, उतावळेपणाने सैनिक पाठविले तर त्यातील बरेच सैनिक आपले प्राण गमावून बसतील. या ऐवजी आक्रमणाच्या नुसत्या तयारीची बातमी शत्रुपक्षापर्यंत पोहोचली व खरोखरच तुमच्या निष्णात कूटनीतीमुळे त्याला भय वाटू लागले तर प्रत्यक्ष युद्ध न करतादेखील तुम्ही विजय प्राप्त करू शकाल.

दैनंदिन जीवनातदेखील अशा पन्नास फुटी भिंतीसारख्या संघर्षाच्या संकेतात्मक भिंतीचा तुम्हाला सामना करायचा असेल आणि मग आवेशात येऊन, अर्धवट अथवा कुठलीही तयारी न करता त्यावर हल्ला चढवाल तर यात फक्त तुमचे, तुमच्या ऊर्जेचे व संसाधनांचेच नुकसान होईल. कुठल्याही संघर्षाचा मुकाबला सबुरीने व संयमानेच व्हायला हवा, असे सन त्झु पुन्हा पुन्हा सांगत आहे.

समस्येचे छोट्या छोट्या भागात वा घटकात विघटन करा व ते एकामागोमाग एक, अनुक्रमाने सोडवत जा. वैयक्तिक संघर्ष असेल तेव्हा त्या संघर्षाच्या कारणांचे

विघटन करा व त्यातील कुठला घटक संघर्षास कारणीभूत आहे ते ठरवा. 'सब घोडे बारटक्के' या न्यायाने एक ढोबळ स्वरूप त्यास देऊ नका. ज्या घटकांवर सहमती आहे वा जिथे मतभेदच नाही त्यावर आणखी मेहनत घ्या व ते घटक सहमतीचा पाया बनवा. असे केल्याने सहमतीच्या मुद्द्यांचे आधिक्य होईल व कदाचित असहमतीची बाब आपोआपच विरघळून, विलीन होऊन जाईल. अशा प्रकारे संघर्ष व तणाव कमी होत जाईल, तुम्ही तुमची ऊर्जा व संसाधने कमी प्रमाणात खर्च कराल. सामंजस्याच्या दिशेने प्रगती संथ का होईना; पण तुम्ही एका निश्चित दिशेने पुढे जाल.

वचन 6

म्हणून युद्धनीतीच्या तत्त्वप्रणालीतील जाणकार व्यक्ती युद्ध न करता शत्रूस नमवतो, भोवताली भिंत असलेली शत्रूची राजधानी आक्रमण न करता पादाक्रांत करतो, प्रदीर्घ लढाई न करता शत्रुपक्षास पदच्युत करतो.

येथे सन त्झु पुन्हा युद्ध टाळण्याचे प्रतिपादन करतो व युद्धनीतीत निष्णात कोण हे कसे ओळखावे हे समजावून सांगतो. पुढील कुठलाही मार्ग विचार न करता, निष्काळजीपणे अवलंबिणे कसे चुकीचे आहे व हे तुमच्या नैपुण्याचे लक्षण नाही हे सांगतो. दीर्घ काल टिकणाऱ्या यशाची व रणनीतीची व्याख्या तो करतो.

वचन 7

स्वर्गाखाली असलेल्या संपूर्ण सृष्टीस शाबूत ठेवणे हे त्याचे ध्येय असावयास हवे.

स्वर्ग, पृथ्वी व मानवजात यांचा पारस्परिक व जवळचा संबंध आहे, अशी प्राचीन काळच्या चीनमधील लोकांची श्रद्धा होती. स्वर्ग व मनुष्यजातीतील दुवा म्हणजे तेथील राजा. तो हुशार व सद्गुणी असला तरीही त्याच्या स्थानावर व नियुक्तीवर शिक्कामोर्तब स्वर्गातील आदेशानेच होत असे. या आदेशानुसार त्याने पृथ्वीतलावरील प्रजेची काळजी घेणे, त्याबरोबर सर्व सृष्टीची काळजी घेणेदेखील अनिवार्य होते व ज्याच्या अंगी हा सद्गुण असेल तोच या पदास पात्र ठरत असे. जर तो असा नसेल तर त्यास पदच्युत करून त्याचे स्थान दुसरा राजा घेत असे.

येथे सैन्याचा मुख्य, म्हणजे सेनापती कसा असावा याबद्दल स्पष्ट व साध्या शब्दात प्रतिपादन केले गेले आहे. ज्याप्रकारे प्रजेची एकात्मता राजाच्या वर्तनावर अवलंबून असते, त्याचप्रमाणे सैनिकांच्या एकजुटीस व निष्ठेस सेनापतीचे नि:संदिग्ध वर्तन व सद्वर्तन जबाबदार असते. आपल्या सहिष्णुतेचा परिचय करून देण्यासदेखील हे वचन मदत करते.

वचन 8

याप्रकारे शस्त्रास्त्रे बोथट होणार नाहीत व जे प्राप्त केले, जिंकले तेदेखील अबाधित राहील.

ही आक्रमणाची मूलतत्त्वे व सिद्धांत आहेत.

स्वर्गातील आदेश – म्हणजे सद्वर्तन, सहिष्णुता व मनुष्य प्राण्याची काळजी घेणे; पण या पलीकडे जाऊन पाहिले तर याचा एक व्यावहारिक पैलूदेखील आहे. विध्वंस कमीत कमी करणे-म्हणजेच जे आहे ते वाचवणे, कमी ऊर्जा खर्च करणे म्हणजे खूप वाचविणे व हीच गोष्ट संसाधनांच्या बाबतीतदेखील लागू होते. सैनिक, दळणवळणाची साधने, रसद, मुलकी प्रजा अन् सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संस्कृतीचे संरक्षण. हे अबाधित ऐतिहासिक सत्य आहे की, प्रदीर्घ युद्धात प्रजाती व अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत.

आपल्या जीवनात नातेसंबंध टिकवून ठेवणे केव्हाही श्रेयस्कर व लाभदायक असते. भले मतभेद व संघर्ष असोत; पण परिस्थिती लक्षात घेऊन त्यावर त्वरित व तटस्थपणे योग्य तो तोडगा काढला तर कुठलाच विनाश होत नाही, उभय पक्ष गुण्यागोविंदाने राहतात. नाती व संपदा वृद्धिंगतच होत जाते. कुठल्याही गोष्टीची खंत नसते व आयुष्य गतिशील राहते, कुंठित होत नाही.

वचन 9

सर्वसामान्यपणे जर तुमचे सैन्य शत्रूपेक्षा दहापट असेल तर त्याला घेराव घाला.

सेनापतीकडे शत्रूपेक्षा दहापट सैन्य असेल व त्यामुळे तो सशक्त स्थितीत असेल तर अशा बलाढ्यतेच्या नुसत्या प्रदर्शनानेच, प्रत्यक्ष युद्ध न करता शत्रूस तो घाबरवून सोडेल. त्याला आक्रमण करून युद्ध करण्याची गरजच पडणार नाही. आता या नीतीची तुलना प्रत्यक्ष युद्ध करण्याशी करूया. सुरुवातीस थोडे सैन्य तुल्यबळ संख्येत पाठवून जरी विजय मिळविला तरीही उभय पक्षांची हानी तर निश्चितच होणार. याबरोबर एवढे बलाढ्य असूनही उदारपणा न दाखविता आपला नाश केल्याची खंत, उद्विग्नता, कटुता व सल शत्रूच्या मनात सदासर्वदा राहणारच; पण त्याऐवजी नुसता घेरा घातल्याने कुठलाही विरोध न दर्शविता, हार पत्करण्याशिवाय शत्रूकडे पर्यायच उरणार नाही. आता, इथे शत्रूस पूर्णतः चिरडून टाकण्याचा पर्यायदेखील बलाढ्य सैन्यबळ असलेल्या सेनापतीकडे आहे; पण त्याऐवजी अत्यंत नाट्यपूर्ण चाल खेळून त्याने जर शत्रुपक्षास घेरून टाकले तर तो भांबावून जाईलच आणि त्याबरोबर शरणागतीही पत्करेल. अशा वेळेस शत्रूस व त्याच्या सैनिकांस, मुलकी नागरिकांस सन्मानाने वागवून तो स्वत:स व स्वत: च्या सैन्यास त्यांच्या प्रशंसेला पात्र ठरवून घेईल. या चालीमध्ये 'युद्ध म्हणजे एक संभ्रम आहे' या वचनाचीही प्रचीती आपणास येते.

सामान्य जीवनातसुद्धा आपण बलाढ्य असतो तेव्हा नैसर्गिकपणे येणाऱ्या अरेरावीच्या व बलाढ्यखोरपणाच्या भावनेवर मात करणे आवश्यक आहे. अशा

अरेरावीचे प्रदर्शन करून प्रतिस्पर्ध्याचा पाणउतारा करणे, त्याला अपशब्दांनी दुखावणे अथवा शाब्दिक व आर्थिक आक्रमण करणे टाळावयास हवे. किंबहुना तुमच्या शालीन व विनम्र स्वभावाने त्यास जवळ करून जिंकावयास हवे. तुमच्या बलाढ्य परिस्थितीचा दुरुपयोग न करता, आक्रमक व हिंसक न बनता जर सहिष्णुतेने त्याच्या मनावर, भावनांवर व तर्कावर प्रभाव टाकला तर प्रत्यक्ष कुठलाही संघर्ष न करता विजय प्राप्त करू शकाल.

वचन 10

तुमचे बळ पाच पट असेल तर आक्रमण करा.
तुमचे बळ दुप्पट असेल तर शत्रुपक्षात दुही माजवा.
तुल्यबळ असाल तर लढाईस तयार व्हा.
त्याहून संख्येने कमी असाल तर युद्ध टाळा.
व त्याहूनही क्षीण असाल तर शत्रूपासून दूर रहा.
म्हणूनच जे सैन्य शत्रूपेक्षा छोटे व आडमुठे असते ते त्याच्याहून मोठ्या शत्रूकडून पादाक्रांत केले जाते.

सन त्झुची दृष्टी, व्यावहारिकपणा, संघर्षातील प्रत्यक्ष स्थिती व त्याची तत्त्वप्रणाली यांची मार्गदर्शक तत्त्वांमध्ये उत्तम सांगड घातली आहे. यात सहिष्णुतेचाही अंतर्भाव आहे.

आपण आपल्या शक्तीच्या आधारे शत्रूचा पूर्णपणे पाडाव करू याची प्रचीती जोपर्यंत येत नाही. तोपर्यंत पुढील पावले कुठल्याही सेनापतीने उचलणे, विशेषकरून युद्धाचा निर्णय घेणे विनाशक असते. त्याची जोवर खात्री होत नाही की आपण शत्रूपेक्षा कमीत कमी पाच पट बलाढ्य नाही तोवर तो आक्रमणाचा विचार करीत नाही. दहापट सामर्थ्यापेक्षा कदाचित ही स्थिती थोडी कमकुवत असेल; पण तरीही दिसायला व मानसिकरीत्या शत्रूस हतबल करण्यास ही स्थिती पुरेशी आहे. पाचपट बलाढ्य असतानादेखील अल्पावधीत विजय प्राप्त करता येईल व यात हानीदेखील नगण्य असेल.

पण आता हेसुद्धा पाहा की, जर आपण तुल्यबळ असू तर सन त्झु युद्ध करा, असा दिशानिर्देश न करता आपल्याला 'तुल्यबळ असाल तर लढाईस तयार व्हा' असा सल्ला देतो. फक्त तुल्यबळच असल्याने तो सक्रियपणे लढाईत उतरणार नाही; पण सरतेशेवटी त्याला लढाईत उतरावे लागले तर त्या वेळेस त्याला लढावेच लागेल; पण सुरुवात शत्रूकडून होईल. लगेच मध्यस्थीची वेळ आली तर त्याने स्वतः युद्ध न सुरू केल्याने साहजिकच मध्यस्थाच्या तसेच शत्रूच्या जनतेच्या नजरेत त्याची छबी

स्वच्छ असेल. इथे तो आपल्या जगण्यासाठी व अस्तित्वासाठी युद्धात उतरलेला असेल. यात कुठलाही आर्थिक फायदा त्याच्या मनात नसेल.
यानंतर तुम्ही कमकुवत असाल तर काय करायचे याबद्दल नि:संदिग्धपणे व वस्तुनिष्ठतेने त्याने सल्ला दिला आहे. आपण पाहतो की, भावनाविवश होऊन, त्वेषात येऊन, कुठलाही नीट विचार न करता, कमकुवत असूनही काही मूर्ख माणसे थेट संघर्ष करण्यास, युद्ध करण्यास सुरुवात करतात. सन त्झुच्या नजरेत मात्र तुम्ही दुबळे असताना युद्ध टाळण्यात कोणताही भ्याडपणा वा लाज वाटून घ्यायचे कारण नाही. सर्व पैलू विचारात घेऊन जर तुम्ही युद्ध टाळण्याचा निर्णय घेत असाल तर तो योग्यच आहे. कारण यामुळे खूप मोठी हानी-नव्हे तर सर्वनाश टाळण्यात तुम्ही यशस्वी व्हाल व हाच तुमचा विजय ठरेल. याचा अर्थ हा की, कोणत्याही संघर्षाचे निराकरण करण्यात यश मिळवणे म्हणजे अर्थपूर्ण सुसंगत निष्क्रियता असते; किंबहुना जेव्हा तुम्ही सुसज्ज व सशक्त नसता तेव्हा कृती न करणे संयुक्तिक ठरते- आवेगात येऊन कृती करणे हे संयुक्तिक नव्हे. जर ती कृती करण्याने व्यावहारिकरीत्या तुमचा फायदा होत असेल तरच ती कृती करा. निव्वळ भावनेच्या आहारी जाऊन कुठलंही अविचारी पाऊल उचलू नका. तीच ऊर्जा काहीतरी सकारात्मक कार्य करण्यासाठी, सशक्त बनण्यासाठी वापरा.

वचन 11

सेनापती हा देशाचा रक्षक असतो
राष्ट्राकडे हा आधार असतो तेव्हा राष्ट्र सशक्त बनते; परंतु जेव्हा
हा आधार नसतो तेव्हा राष्ट्र नक्कीच सशक्त बनू शकत नाही.

त्या काळात नागरिक राजाच्या मुलकी नियमांच्या आधिपत्याखाली असले तरीही इतर राष्ट्रांशी होणाऱ्या संघर्षांपासून, त्याच्या घातक परिणामांपासून सेनाधिपतीच प्रजेचे रक्षण करीत असे. इतर प्रांत जेव्हा आपल्या राज्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत असत. तसेच राज्यातील आनंदी वातावरण कलुषित करण्याचा डावपेच आखत असत. तेव्हा त्या थांबविण्याचे, त्यांच्यावर वचक बसविण्याचे तसेच त्या देशाच्या सेनाधिकाऱ्यांशी संवाद साधून चांगले संबंध प्रस्थापित करण्याचे काम सेनाधिपती व त्याचे अधिकारी करीत असत. आजमितीसदेखील जर सेनाधिपती असे करण्यात असमर्थ असेल तर देशावर संकट येते व सर्व नागरिक भीतीच्या छायेखाली जगतात; पण तो आपले काम चोख बजावत असेल तर साहजिकच देशात सुख व शांतता नांदते. ते आपल्या राष्ट्राच्या उभारणीवर, प्रगतीवर लक्ष केंद्रित करू शकतात. आपल्या वैयक्तिक अडचणी दूर ठेवून, सेनाधिपती राष्ट्राच्या संरक्षणावर

लक्ष केंद्रित करतात. अशा प्रकारे त्याला अंतःप्रेरणा मिळते व आपले काम करण्यास तो सशक्त बनतो.

या वचनात सन त्झुने आणखी एक संदेश दिला आहे, तो म्हणजे सेनाधिपतीची पात्रता. जेव्हा तो युद्धकलेत व संरक्षणकलेत उत्तम अर्हता असलेला व प्रशिक्षित असेल तेव्हाच तो रक्षक बनू शकेल. दैनंदिन जीवनात समस्या असल्या, तरीही स्वतःच्या स्वार्थाहून स्वतःची जबाबदारी अधिक मोठी मानणे या विचारसरणीमुळे एक आदर्श सेनापती बनतो.

वचन 12

एक राजा आपल्या सैन्यास तीन प्रकारे संकटात टाकू शकतो :

आपले सैन्य आगेकूच करण्याच्या परिस्थितीत नाही याची जाणीव नसताना त्याला आगेकूच करण्याची आज्ञा देणे किंवा माघार घेण्याच्या स्थितीत नाही याची जाणीव नसताना अशा परिस्थितीत माघारी फिरण्याची आज्ञा देणे.

याला सैन्यास खोड्यात अडकविणे असे म्हणतात.

सैनिकी कारवायांचे ज्ञान नसताना सैन्याचे संचलन करणे म्हणजे मुलकी क्षेत्राचे ज्ञान नसताना राज्य चालविण्यासारखेच आहे -यामुळे सैन्यातील अधिकारी व सैनिक यात संभ्रम निर्माण होतो.

सैन्याचे योग्य समीकरण माहीत नसताना सैन्याची सूत्रे हातात घेण्यामुळे सैन्यातील अधिकारी व सैनिक कर्तव्य पार करण्यात कुचराई करतात.

पुरातनकालात चीनमधील राजाकडे अमर्याद अधिकार व सत्ता असत. राज्यकर्त्याला कुणालाही शिक्षा करण्याचा, क्षमा करण्याचा, जिवे मारण्याचा अधिकार होता. त्याचा स्वामी फक्त स्वर्गाधिपती होता. तो देवाचा प्रतिनिधी होता व त्याच्या आज्ञा सर्व जण पाळत. सेनाधिपती हा राज्यकर्त्याच्या म्हणजे राजाच्या अधिपत्याखाली होता. तो त्याच्याशी वचनबद्ध होता. आजच्या राजकारण्यापेक्षा, पंतप्रधानापेक्षा वा राष्ट्राध्यक्षापेक्षा अधिक सत्ता व बळ राजाकडे असायचे. तो सार्वभौम असायचा; परंतु राज्यकारभार चालविताना त्याने काही विधिनिषेध बाळगणे गरजेचे होते. सैन्याची व राज्याच्या रक्षणाच्या बाबतीत परिस्थिती न जाणून घेता आपल्या अमर्याद सत्तांधतेमुळे सैन्यास त्याची तयारी नसताना आक्रमण करावयास आज्ञा देणे अथवा युद्धभूमीवरील खरी परिस्थिती जाणून न घेता माघार घेण्याचा निर्णय घेणे म्हणजे संभ्रमाची परिस्थिती निर्माण करणे होय. येथे सन त्झु स्पष्टपणे हेच सांगू इच्छितो की, अशा बाबतीत सैनिकी कारभाराचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तीने म्हणजे सेनाधिपतीनेच असे निर्णय घ्यावयास हवेत, कारण तोच या क्षेत्रात निपुण असतो. राज्यकर्त्याने या बाबतीत लुडबुड करू नये. असे केल्यास साहजिकच संभ्रमित होऊन सैन्य आपली

कर्तव्ये व आज्ञापालन करण्यात कुचराई करू शकतात. इथे सन त्झु परखडपणे म्हणतो की, अडाणी व कसलीही माहिती नसलेल्या राजाने सैन्याच्या कारभारात केवळ सत्तेच्या बळावर ढवळाढवळ करू नये. यामुळे राष्ट्राच्या अस्तित्वास धोका पोहोचतो. सेनाधिपती हा राजाशी वचनबद्ध असतो व त्याच्या आज्ञेशी त्याची बांधिलकी असते. याचा अर्थ हा नाही की त्याने प्रत्येक वेळेस निर्बुद्धीने त्याचा निर्णय पाळायलाच पाहिजे. इथे आणखी एक गोष्ट नमूद करण्याजोगी ही की, राजाला वेळोवेळी योग्य व आवश्यक माहिती देऊन त्याला घातक निर्णय घेण्यापासून परावृत्त करण्याची जबाबदारीदेखील बऱ्याच अंशी सेनाधिपतीवर असते. ही त्याची सत्त्वपरीक्षा असते व जर राजाशी त्याचा समन्वय असला व सुसंवाद असला तरच हे साध्य होते. आपल्या राज्याचे व प्रजेचे रक्षण ही सेनापतीची नैतिक व कालातीत जबाबदारी आहे.

आजच्या व्यवस्थापनशास्त्रात याला 'Unity of command' अथवा 'आज्ञेची एकसूत्रता' असे म्हटले आहे. सर्व परिस्थितीत आज्ञा एकाच सूत्राकडून मिळणे आवश्यक आहे. एवढेच नाही, आधी सांगितल्याप्रमाणे त्या सूत्राचा स्रोत, सूत्रधार एक निपुण, प्रशिक्षित, अनुभवी, जबाबदार, जाणकार व सहिष्णू अधिकारी असला पाहिजे. या तत्त्वाचा उपयोग व्यवस्थापनशास्त्रात तर होतोच; परंतु याचा वापर इतर क्षेत्रातही केला गेला आहे. हे तत्त्व असे 'The principle that no subordinate in an organization should report to more than one boss' म्हणजेच संस्थेतील कोणत्याही कनिष्ठास एकापेक्षा अधिक वरिष्ठ अधिकारी असू नये.

वचन 13

सैन्य संभ्रमात असते व कुचराई करत असते तेव्हा शेजारचे राज्यकर्ते त्याचा गैरफायदा घेतात. यास एका संभ्रमित व कचखाऊ सैन्याने शत्रूच्या सैन्यास विजय मिळवून देणे असे म्हणतात.

वचन 12 मधील तत्त्वे इथे पुढे चर्चेस आणण्यात आलेली आहेत.

सन त्झुच्या कारकीर्दीत तेव्हाच्या ग्रीष्म व वसंत ऋतूच्या काळात अनेक राज्ये स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडत होती. आजूबाजूच्या दुबळ्या प्रांतांना व परगण्यांना आपल्यात विलीन करून घेण्याच्या प्रयत्नात होती. अशा प्रकारे प्रत्येक राज्य कोण अधिक संवेदनशील अथवा नाजूक स्थितीत आहे यावर लक्ष ठेवून होते.

यावरून दिसून येते की, तुमच्याकडे पुरेशी उपयोगी माहिती असेल तर तुम्ही स्वतःचा निर्णय स्वतःच घ्यावयास हवा. असे न करता तुम्ही दुसऱ्यांच्या सल्ल्यावर अवलंबून राहून तो मुकाट्याने मानू लागलात तर तुम्ही स्वतःची स्थिती दुबळी करून बसता.

सैन्य संभ्रमित बनले असेल तर निश्चितच तुमच्या नेतृत्वात एकसूत्रता नसेल व त्याचा फायदा आजूबाजूची शत्रूची राज्ये घेतील. अशा प्रकारे त्यांना तुम्ही तुमच्या संभ्रमाने विजय प्राप्त करून देऊ शकाल.

वचन 14

म्हणून कोण जिंकेल हे जाणण्याचे पाच घटक आहेत

आपण केव्हा लढू शकतो व केव्हा नाही हे ज्याला ठाम माहीत असते तो विजयी होईल.

या आधी आपण हल्ला केव्हा करायचा व माघार केव्हा घ्यायची यावर सविस्तर चर्चा केली आहे. या सर्वांचा सारांश हा की, आपल्या सामर्थ्याचा अंदाज बांधून, समयसूचकता बाळगून जो निर्णय घेतो व रणनीती तयार करतो, तोच पक्ष विजयी होतो.

येथे उल्लेख केलेले पाच घटक पहिल्या अध्यायात उल्लेख झालेल्या पाच घटकांपेक्षा (एक : मार्ग अथवा नीती, दोन : स्वर्ग/अध्यात्म, तीन : धरती/भूमी, चार : नेतृत्व, पाच : नियम) वेगळे आहेत. हे घटक कमी व्याप्ती असलेले असून तुम्हाला संघर्षाच्या परिस्थितीत विजय कसा प्राप्त करायचा या बाबतीत मार्गदशक आहेत.

यातील पहिला घटक म्हणजे कृती केव्हा करायची व केव्हा नाही हे समजून घेणे. तुम्हाला केव्हा लढायचे व केव्हा नाही हे समजून घेण्यापासून परावृत्त करणारी बाब म्हणजे दक्षता वा सावधगिरीऐवजी केवळ उद्दामपणाची भावना. या उद्दामपणामुळे तुम्ही आपली कुवत व तयारी खूप उत्तम आहे असा अवाजवी अंदाज घेता व त्यामुळे एक असाध्य योजना बनवून पुढचे पाऊल टाकता. हा उद्दामपणा तुम्हाला अरेरावीचे निर्णय घेण्यास उद्युक्त करतो. अशा प्रकारे उद्दामपणे, अरेरावीने वर्तन करणे व घातकी निर्णय घेण्याचे टाळण्यासाठी आपल्या वास्तविक स्थितीबद्दल संयमाने, एका शांत जागी बसून तुम्ही विचार केला पाहिजे. अशा प्रकारच्या हेतुपुरस्सर आत्मपरीक्षणामुळे सर्व संभाव्य, अवास्तव व घातक निर्णय टाळले जातात. आत्मपरीक्षणाच्या मन:स्थितीत आपल्या कुवतीचा व तयारीचा योग्य अंदाज न घेतल्याने भविष्यात होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचे, विनाशाचे चित्र प्रत्यक्ष कृती करण्याआधीच डोळ्यासमोर आणू शकता. अशा प्रकारे लढाई केल्यास तुम्ही केव्हा जिंकाल व केव्हा जिंकू शकणार नाहीत, याचा योग्य अंदाज घेऊ शकता.

वचन 15

जो लहान व मोठ्या शक्तींचा वापर कसा करायचा हे जाणतो तो विजयी होतो.

वर उल्लेख केलेल्या पाच घटकांपैकी दुसरा घटक म्हणजे लहान व मोठ्या शक्तींचा वापर. येथे सन त्झू मनुष्यबळाबद्दल बोलत आहे. बरोबर काम करीत

असलेल्या प्रत्येक व्यक्तीस आपण महत्त्वाचे आहोत अशी भावना त्याच्या मनात जागृत करणे, त्याच्या वैशिष्ट्यांचा पुरेपूर वापर करून घेणे हे सेनाधिपतीचे कर्तव्य आहे. हुद्दा वा पातळी कोणतीही असो, प्रत्येक व्यक्तीचे वैशिष्ट्य व कसब ओळखणे, त्यास अभिमान वाटेल असे काम देणे, अशा प्रकारच्या संघटनेचा उत्तमरीत्या वापर करून सैन्यातील प्रत्येक व्यक्तीचे मनोबल उंच ठेवून आयोजन करणारा सेनाधिपती विजयी होतो, असे त्याचे मत आहे. यात प्रत्येकाशी सुसंवाद साधणे, योग्य व उत्तम कामाबद्दल प्रशंसा करून त्यास पुरस्कृत करणे हे सेनाधिपतीचे कर्तव्य आहे. अशा प्रकारे प्रत्येकाच्या कामाचे व्यवस्थापन करून सर्व लहान व मोठ्या शक्तींचा सर्वोत्कृष्ट पद्धतीने वापर करून, समन्वय साधणारा सेनापती आपल्या सैन्यास विजयी करतो.

एक सेनाधिपती प्रेरणात्मक संदेश देऊन आपल्या सैनिकांची निष्ठा व कर्तव्याची भावना जागृत करतो, लहान मोठ्या सर्व हुद्द्यावरील लोकांना आपल्या ध्येयप्राप्तीसाठी समाविष्ट करून घेतो त्यावरच त्याचे यश अवलंबून असते. अशा प्रकारे अगणित लोकांना ध्येयप्राप्तीसाठी तो प्रेरित करतो.

आजच्या व्यवस्थापनक्षेत्रातसुद्धा Dignity and division of labour हा सिद्धांत मोठ्या प्रमाणात अमलात आणला गेलेला आहेच.

वचन 16

ज्याला सैन्यातील सर्व वरिष्ठ व कनिष्ठ पातळीवरील सैनिकांना एकजूट कसे करायचे हे ठाऊक आहे तो विजयी होईल.

वरील पाच घटकांपैकी तिसरा घटक म्हणजे 'सैन्यामध्ये संघभावना व एकजूट निर्माण करणे.' हा घटक पहिल्या पाच तत्त्वांपैकी 'मार्ग' या घटकाशी मिळताजुळता आहे. सैन्यातील अधिकाऱ्याचे पद हे त्या अधिकाऱ्याच्या निपुणतेवर, अनुभवावर, ज्ञानावर व युद्धनीतीतील कौशल्यावर ठरविले जावे. एक उत्तम सैन्य तयार करण्याचा हा 'मार्ग' आहे. वरिष्ठ व कनिष्ठ पदावरील सैनिकांमध्ये, तसेच अधिकारी, जवानांमध्ये जो सेनाधिपती एकजुटीची भावना निर्माण करतो, त्याचे सैन्य खूप उच्च मनोबळ असलेले, एकमेकांचा आदर करणारे व एकाच ध्येयाने प्रेरित झालेले असते. अशा वातावरणात नेता, त्याचे अधिकारी व सामान्य सैनिक एकाच लक्ष्याच्या प्राप्तीसाठी झटत असतात. अशी संघभावना कशा प्रकारे निर्माण करायची हे ठाऊक असलेला सेनाधिपती विजय मिळवितो. येथे सन त्झुच्या सुजाणतेची दाद द्यावी लागेल. त्याचे हे तत्त्व आजच्या जगात कुठल्याही क्षेत्रात, समाजात लागू होते. ज्या राष्ट्रात, कारखान्यात किंवा समाजात अशा प्रकारचा स्तरविद्वेष असत नाही व

जेथे सर्व स्तरातील लोक एकजुटीने संस्थानाच्या लक्ष्यप्राप्तीसाठी झटत असतात, ते विजयी ठरतात.
जपानमधील कारखान्यात प्रस्थापित झालेली कायझेनसारखी प्रणाली अथवा आपल्या भारतातच आपले स्तर विसरून ताज हॉटेलवर अतिरेक्यांचा हल्ला झाला, त्यावेळेस अगदी उच्च पदापासून कनिष्ठ पदापर्यंतच्या सर्व कर्मचाऱ्यांनी पाहुण्यांना वाचविण्यासाठी केलेला त्याग व झुंज या एकजुटीचे द्योतक आहेत.
सर्वांचे समान लक्ष्य काय आहे याची जाणीव देऊन लोकांना एकाच ध्येयाने प्रेरित करता येते. मोठ्या समूहात वेगवेगळे कौशल्य, ज्ञान, नैपुण्य व स्वभावभिन्नता असणे स्वाभाविक आहे; पण असे असूनही प्रत्येकाचे गुण ओळखून त्यांच्याकडून सर्जनशील व संशोधनात्मक काम करवून क्रांती घडवून आणणे, हेच नेत्याचे काम आहे व तोच समाज, राष्ट्र अथवा समूह विजयी होतो. एका ध्येयाच्या छत्राखाली आलेले लोक आपली भिन्नता, मतभेद विसरून विजयाकडे आगेकूच करतात.

वचन 17

जो स्वतः संपूर्ण तयारीनिशी, शत्रूची तयारी झाली की नाही याची वाट पाहतो तो विजयी होतो.

वरील पाच घटकांपैकी चौथा घटक म्हणजे तयारी. सन त्झुच्या म्हणण्यानुसार संपूर्णपणे तयारी केलेले सैन्य सशक्त असते. ज्याची तयारी अर्धवट असते वा झालेली नसते, ते सैन्य दुबळे असते. हा मुद्दा समयोचिततेशी व कालमानाशी निगडित आहे. आवश्यक तेवढा वेळ खर्च करून संपूर्ण तयारी करणारे सैन्य प्रबळ होते. अशा वेळेस आपणहून हल्ला न चढविता दुबळ्या शत्रूची वाट पाहावी. यातील सुप्त गर्भितार्थ असा की, तुम्ही आधीच तयार असता, तुमचा शत्रू आपली तयारी वाढवत असतो, त्याला तुमच्याएवढेच तयार होणे आवश्यक असते. या अवधीत तुम्ही त्याहून अधिक तयारी करून आपली अग्रेसर बाजू कायम ठेवू शकता. अशा प्रकारे शत्रू तुमच्याएवढी तयारी करून तुम्हाला मागे टाकूच शकणार नाही. अशा प्रकारे प्रत्यक्ष युद्ध टाळूनदेखील तुम्ही त्याच्यापेक्षा आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करू शकता.

वचन 18

जो सेनाधिपती कर्तबगार असतो व ज्याच्या कामात राजा ढवळाढवळ करीत नाही तो विजयी होतो.
वरील पाच घटकांपैकी शेवटचा पाचवा घटक म्हणजे सेनाधिपतीची पात्रता, त्याची कर्तबगारी व राजाचा त्यावरील विश्वास. तसेच राजाने सेनापतीच्या कामात लुडबुड करू न देण्यास लागणारे कौशल्य. सेनाधिपतीच्या कामात राजाने ढवळाढवळ करण्याची दोन कारणे असू शकतात. पहिले कारण म्हणजे सेनाधिपती कर्तबगार

नसणे व यामुळे राजाचा त्यावर अविश्वास असणे. त्यामुळे राजाला आपल्या इच्छेविरुद्ध सैनिकी व्यवस्थापनात ढवळाढवळ करावी लागणे. या बाबतीत सेनाधिपती अशी परिस्थिती निर्माण होण्यास जबाबदार असतो. त्या दोघांत सामंजस्य, पारस्परिक आदरभाव व विश्वास नसतो. यामुळे संपूर्ण सैन्य संभ्रमित होते. राजाने ढवळाढवळ करण्याचे दुसरे कारण म्हणजे त्याचा उद्दाम, अरेरावीचा स्वभाव व सेनाधिपतीबद्दल अकारण अविश्वास व अनादर. राजाचा विश्वास व आदर कसा संपादन करायचा किंवा राजाला कसे सामोरे जाऊन प्रसंगी खडसावयाचे, याची जबाबदारीदेखील सेनाधिपतीचीच होय. अखेरीस काही झाले तरी प्रजेच्या सुरक्षेची जबाबदारी स्पष्टपणे त्याची आहे. याबद्दल सन त्झुने आधीच्या वचनांमध्ये विस्तारपूर्वक आपले मत मांडले आहे.

सन त्झुच्या म्हणण्यानुसार सेनाधिपतीचा आत्मविश्वास येथे खूप महत्त्वाचा आहे. राजाच्या चुकीच्या धोरणाने व अरेरावीमुळे केलेल्या ढवळाढवळीने अपरिमित हानीची उदाहरणे इतिहासात आहेत. सेनाधिपतीने शेवटच्या घटकेपर्यंत राजाज्ञेचा विरोध करून आपल्या आत्मविश्वासाच्या, समर्पिततेच्या व आपल्या प्रजेच्या सुरक्षेच्या भावनेपोटी राजाशी संघर्ष झाला तरीही आपल्या मताशी ठाम राहून विजय मिळविणाऱ्या बाजीप्रभू देशपांडेंचा इतिहास आजही स्मरणात आहे.

त्याचप्रमाणे नेपोलियनला राजाने मुक्तहस्ते व अधिकाराचे निर्णय दिल्याने अधिकांश यश मिळाले, हेही उदाहरण आहेच.

तुमचे कौशल्य, नैपुण्य व युद्धनीतीतील अनुभव एक प्रकारची कृती करण्यास सांगत असेल व अशा वेळेस तेवढे ज्ञान व अनुभव नसलेल्या लोकांनी केवळ त्यांच्या सत्तेपायी या विपरीत कृती करण्याचा सल्ला दिला, तर तो पाळणे चुकीचे आहे.

आयुष्याच्या संघर्षात जिंकायचे असेल तर तुम्हाला विचारसरणी, नीतिमूल्य, सदसद्विवेकबुद्धी व सहिष्णुतेवर गाढ श्रद्धा हवी. तुम्ही डळमळीत व कमजोर होऊन चालणार नाही. विरुद्ध पक्षास हळूहळू आपल्या विचारसरणीची वैधता समजावून देण्याने तो तुमच्या बाजूस येऊन संघर्ष व हानी टाळता येते. मग तो शत्रू असो वा तुमचा वरिष्ठ.

वरील पाच घटकांचे ज्ञान ज्यास असेल व जो ते अमलात आणेल तो जिंकेल.

वचन 19

म्हणून मी प्रतिपादन करतो की,

ज्याला शत्रूचे व स्वतःच्या शक्तीचे ज्ञान आहे त्याला शंभर लढायांमध्येदेखील कसलाही धोका उद्भवत नाही.

ज्याला शत्रूचे ज्ञान नाही व स्वतःचे ज्ञान आहे तो कधी जिंकेल व कधी हरेल हे अनिश्चित असते.

ज्याला शत्रूचे व स्वतःचेही ज्ञान नाही त्याला युद्धात नेहमीच धोका असेल.

सन त्झुच्या पुस्तकातील सर्वांत अधिक अभ्यासलेले, चर्चा झालेले असे हे वचन आहे. युद्धात पराभव होण्याचे अचूक कारण येथे दर्शविण्यात आले आहे.

आपल्याला दिसून येते की, जेव्हा युद्ध पराकोटीस पोहोचते तेव्हा आपण आपल्या कारवाईतच गर्क असतो व शत्रूचा मागोवा घेण्याचे विसरतो. आपला बचाव कसा करायचा किंवा भावनांच्या आहारी जाऊन बदला कसा घ्यायचा, याचे आयोजन करण्यातच मग्न होतो. आधी सांगितलेली पूर्वतयारी, शत्रूच्या शक्तीचा अंदाज, त्याच्या संसाधनांचा उपयोग, शत्रूच्या मनात संभ्रम निर्माण करणे, इ. शत्रूशी निगडित सर्व बाबी आपण विसरून जातो. म्हणजे थोडक्यात त्याच्याबद्दलची माहिती काढत नाही किंवा काढणे थांबवितो. त्या स्थितीचा सांगोपांग व त्रयस्थाच्या दृष्टीतून जो विचार व्हायला हवा तो करीत नाही. अशा परिस्थितीत निश्चित पराजय होतो. उदा. शत्रूने आपली शस्त्रात्रे बदलली असतील, त्याने हल्ल्याची दिशा बदलली असेल किंवा आक्रमण तूर्तास थांबविले असेल, या व तत्सम बाबींची तुमच्याकडे माहिती नसेल तर तुमचा नाश होणे अटळ आहे. याहून वाईट परिस्थिती म्हणजे केवळ सावळागोंधळ. सेनाधिपतीस स्वतःच्या आणि शत्रूच्या सैन्याची, बलस्थानांची व रणनीतीची माहिती नसेल तर अशा परिस्थितीत तुमचा पराजय निश्चित आहे.

शत्रूची वा प्रतिस्पर्ध्याची रणनीती समजून त्याप्रमाणे आपली नीती बदलणे यास आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात बेंच मार्किंग (Bench marking) म्हणतात. या प्रणालीत स्वतःची व शत्रूची वैशिष्ट्ये, शत्रूची कार्यपद्धती यांची तुलना करीत आपली रणनीती नेहमी परिवर्तनशील ठेवली जाते. एवढ्या पुरातनकाळात याच तत्त्वाचा सन त्झुने प्रयोग केला आहे, ही बाब त्याचा चाणाक्षपणा दर्शविते.

युद्धाच्या इतिहासात तर अफगाणिस्तान अथवा व्हिएतनामच्या युद्धात तेथील परिस्थितीची संपूर्ण माहिती व ज्ञान नसताना करण्यात आलेल्या सैनिकी कारवाईंचा परिणाम काय झाला, याला आपण सर्वजण साक्षी आहोत.

अध्याय 3

आक्रमणाचे आयोजन

सारांश -

एका उत्कृष्ट सेनाधिपतीस खालील ज्ञान असणे अत्यावश्यक आहे :

1) सर्वप्रथम आपला शत्रू कुठल्या प्रकारे पराजित होऊ शकतो, याचे ज्ञान असणे व नेमक्या त्याच क्षणी हल्ला करणे.

2) शत्रू स्वत:च त्याच्या पराभवाची संधी तुम्हाला देतो.

3) शत्रूच्या सर्व दुबळ्या घटकांचे संपूर्ण ज्ञान व नेहमी त्याच्या आयोजनावर लक्ष हवे.

4) स्वतःचे निर्णय ठामपणे घेणे.

5) आपल्या बळानुसार नीती बनविणे.

6) शक्यतो राजधानीवर हल्ला न करणे.

7) आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष युद्ध न करता विजय प्राप्त करणे

या नीतीचे व्यवसायात महत्त्व

1) आपली स्थिती कमीत कमी पाचपट मजबूत करेपर्यंत आक्रमण करू नका.

2) स्थिती प्रतिकूल असताना गुंतवणूक करू नका.

3) व्यवसायातील वेगवेगळ्या विभागात विनाकारण ढवळाढवळ करू नका.

4) आपल्या संघटनेस एका लक्ष्याने प्रेरित करून उच्च-नीच, असे हेवेदावे दूर करा.

5) आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध कुठलाही व्यवसाय उभा करण्याआधी त्याच्या बलस्थानांचा बेंच मार्क करून संपूर्ण आढावा घ्यावा व त्याप्रमाणे रणनीती ठरवा.

□□□

अध्याय 4
पूर्वतयारी व रचना

या अध्यायात दोन्ही प्रतिस्पर्ध्यांनी एकमेकांवर नजर ठेवल्याने दोघांनाही एकमेकांच्या तयारीची जाणीव कशी होते हे समजाविले आहे. म्हणूनच तुम्ही तुमची स्थिती जेवढी झाकून ठेवाल तेवढी ती गुप्त असेल व उघडकीस येईल तेवढी तुमची नीतीदेखील शत्रूस समजेल व त्यामुळे तुमचा पराजय होईल. यामुळे तयारीतील गोपनीयता ही एक अति महत्त्वाची बाब ठरते. पहिल्या अध्यायात 'संभ्रम निर्माण करण्याची पद्धत म्हणजे युद्ध आहे', असे सन त्झुने म्हटलेच आहे.

शत्रूला सामोरे जाताना तुम्ही केलेली सैन्याच्या स्थानाची आखणी म्हणजे रचना नव्हे. ही रचना म्हणजे तुमची अशी अभेद्य स्थिती असते जी शत्रुपक्ष कधीच उद्ध्वस्त करू शकत नाही. अशी अभेद्यता आपल्याला प्रत्यक्ष युद्धात उतरण्याच्या घटनात लक्षणीय घट करते. कारण तुमची मजबूत पूर्वतयारी व रचना म्हणजे आयोजन पाहूनच शत्रू त्याच्या आक्रमणातील फोलपणा जाणून घेतो व आक्रमण करीत नाही. वरील परिच्छेदात आपण गोपनीयतेबद्दल बोलत होतो व इथे मात्र शत्रू आपली स्थिती पाहून गांगरून जाईल असे आपण म्हटले आहे. याचाच अर्थ असा की, कोणत्याही परिस्थितीत आपले बाह्य स्वरूप एवढे बलाढ्य दिसले पाहिजे की जे शत्रूस हल्ल्यापासून परावृत्त करेल.

या अध्यायात लहान-सहान; परंतु पुढे जाऊन खूप मोठे स्वरूप धारण करण्याची शक्यता असलेल्या व संघर्ष वाढविण्याची क्षमता असणाऱ्या समस्यांचे निवारण करून विजय कसा मिळवायचा याबद्दलदेखील चर्चा केली आहे.

वचन 1

सन त्झु म्हणतो,

पुरातनकाळात युद्धात निष्णात असलेले लोक स्वतःस अजेय व अजिंक्य बनवीत आणि मग ते शत्रूच्या भेद्य होण्याची अथवा दुबळे होण्याची वाट पाहत बसत.

अजिंक्य व पराक्रमी बनणे आपल्या हातात असते; पण शत्रूचे दुबळे होणे व भेद्य होणे हे त्याच्यावर अवलंबून असते.

आपले सैन्य पूर्णतः सुसज्ज व तयार असेल, शत्रुपक्षाचा संपूर्ण अभ्यास करून स्वतःस त्याहून बलिष्ठ केले असेल, आपल्या सैनिकांचे मनोबल शिगेस नेऊन पोहोचविले असेल, आपल्या सैन्यास योग्य शस्त्रास्त्रांनी तयार केले असेल तर आता शत्रूच्या चुकेची वा त्याच्या अगतिकपणाची केवळ वाटच पहावयाची आहे. आपली तयारी

करून घेणे आपल्या हातात आहे व तोपर्यंत कुठलीही हालचाल करणे मूर्खपणाचे ठरेल. कारण हाच नियम तुम्हाला लागू पडेल. हे वेट ॲण्ड वॉच (Wait and watch) चे धोरण आहे. अशा प्रकारे तुम्ही सुरक्षित राहाल. तुमच्या अजिंक्यपणामुळे तुम्हाला त्या संधीचा पुरेपूर फायदा घेता येईल. तुमच्या स्थितप्रज्ञतेमुळे शत्रू भांबावून जाईल व चूक करून बसेल.

या वचनाच्या सुरुवातीस, सन त्झु स्वतःच 'पुरातनकाळी' असा उल्लेख करतो, म्हणजे तो स्वतः एवढ्या प्राचीन काळातील असूनही त्यालासुद्धा हा सिद्धांत पुरातन वाटावा ही बाबच या वचनाची कालातीतता सिद्ध करते.

वचन 2

म्हणूनच युद्धकलेतील निपुण लोक स्वतःस अभेद्य व अजिंक्य बनवू शकतात; पण याचा अर्थ असा नाही की तुम्ही शत्रूस भेद्य व आघात करण्याजोगे बनवू शकाल.

म्हणूनच असे म्हटले जाते की, तुम्हाला जिंकायचे कसे हे माहीत असेल; पण जिंकताच येईलच असे नाही.

एखादे सैन्य अजेय व अजिंक्य असू शकते; पण याचा अर्थ असा नाही की ते दुसऱ्या व तेवढ्याच तुल्यबळ व अजिंक्य सैन्यावर नेहमीच मात करू शकेल. आपल्या सामर्थ्याची जाणीव असणे, त्यामुळे अभिमान वाटणे, सुरक्षित वाटणे, येथपर्यंत हे सर्वकाही ठीक आहे; पण अरेरावीने, उद्दामपणे वागण्याविरुद्ध असा हा मार्मिक सल्ला आहे. तुमच्याकडे सर्वोत्तम आयोजन लागू करण्याचा अनुभव, ज्ञान असेल व साधने असतील; पण तुमचा शत्रू तुमची ही नीती अमलात आणताना कशी हाणून पाडायची याचे आधीच आयोजन करून बसलेला असू शकतो. तो तेवढाच कावेबाज व चाणाक्ष असू शकतो. यामुळे तुम्ही कितीही बलाढ्य, अनुभवी, निष्णात व निपुण असला तरीही यशाची हमी कधीच नसते. तुम्ही नेहमी जिंकणार व शत्रूस नामोहरम करणार असा तुमचा आत्मविश्वास फाजील ठरू शकतो. त्यामुळे विध्वंस व सर्वनाश होऊ शकतो, अपरिमित नुकसान होऊ शकते. सन त्झु येथे तुम्हाला संयम बाळगण्याचा व स्वतःचे अवाजवी मूल्यमापन न करण्याचा सल्ला देत आहे.

सन त्झुच्या या वचनानुसार तुम्ही स्वतःच्या शक्तीचे वाजवीहून जास्त मूल्यमापन करू नये व शत्रूच्या शक्तीस कमी लेखू नये. खरोखरच तुम्ही तुमच्या शत्रूपेक्षा दुबळे असाल तर वाट पहा व तुम्ही त्याहून बलाढ्य असाल तरीदेखील तो चूक करण्याची वाट पहा व मग कृती करा. अशा प्रकारे लक्षात ठेवा की, एकपक्षी निर्णय घेऊ नये व परिस्थितीनुसार तुम्ही स्वतःस बदलले पाहिजे.

वचन 3

अजेय वा अजिंक्य शत्रूचा सामना करताना बचावात्मक पवित्रा घेतला जातो, भेद्य व दुबळी स्थिती असलेल्या शत्रूवर हल्ला केला जातो.

सुसज्ज शत्रूचा सामना स्वतःचा बचाव करून केला जातो व आपल्याहून कमी बलाढ्य असलेल्याचा सामना हल्ला करून केला जातो.

स्वतःचा बचाव करणे व हल्ला करणे यातील फरक म्हणजे आपली एकाग्रता व शक्ती. थोडक्यात, जेव्हा तुम्ही स्वतःचा बचाव करता तेव्हा तुम्ही ज्या विषयात निपुण असाल त्या विषयावर अथवा कौशल्यावर लक्ष केंद्रित करा. अशा प्रकारे त्या क्षेत्रात, त्या विषयात तुम्ही अजेय व अजिंक्य बनता; पण जेव्हा तुम्ही हल्ला करता तेव्हा स्वतःचा बचाव करणेदेखील आवश्यक आहे. तुमचे लक्ष्य आता दोन कृतींवर केंद्रित होईल व ती म्हणजे हल्ला व बचाव. यासाठी तुमच्याकडे अधिक बळ हवे. तुमची शक्ती सीमित असेल तर ती विभागली जाईल किंवा तुमचे लक्ष बचावावर असणार नाही. अशा प्रकारे तुमची स्थिती अभेद्यपणापासून भेद्य होण्याच्या दिशेने जाईल.

वचन 4

युद्धकलेत निपुण असलेले स्वतःचा बचाव करताना जमिनीच्या खाली स्वतःस खोलवर लपवून घेतात (म्हणजे भूमिगत होतात). आक्रमणात निपुण असणारे अत्यंत वेगाने आकाशमार्गे झंझावातासारखे आक्रमण करतात.

सन त्झु म्हणतो की, स्वतःचा बचाव करायचे ठरल्यावर लढून बचाव करायचा नसतो. तेव्हा भूमिगत होऊन शत्रूच्या नजरेआड व्हायचे असते. चिनी दंतकथांमध्ये ड्रॅगन म्हणजे चिनी भुजंग. हा जमिनीच्या खाली पाताळात दडलेला असायचा; पण हाच ड्रॅगन आक्रमक झाल्यावर तो वायुवेगाने, झंझावातासारखा बलाढ्य होऊन, रौद्र रूप धारण करून आक्रमणासाठी आकाशात उडायचा, म्हणून येथे स्वर्गाचा उल्लेख आहे. सैन्याचा बहुतेक वेळ एका जागी राहून प्रशिक्षण घेण्यात, स्वतःची शक्ती वाढविण्यात जातो. सराव क्षेत्रातदेखील ते राहुट्यात वा तंबूत राहतात. एकदा आक्रमणाचा निर्णय घेतला की मग झंझावाताप्रमाणे, पूर्ण शक्तिनिशी, लवकरात लवकर, शत्रूस चकित करून संपूर्ण ताकदीने त्याचे पालन करायचे असते. यामुळे शत्रूदेखील लवकरात लवकर, कमीत कमी हानी होऊन काबीज करता येतो. याविरुद्ध बचावात्मक धोरण अवलंबले, तर भूमिगत झाल्यानेसुद्धा शत्रू चकित होतो, हानी होत नाही व पुढील आक्रमणासाठी आपली शक्ती शाबूत राहते.

वचन 5

विजय होईल असे सर्वांना वाटत असताना विजय प्राप्त झाला, तर त्याचा दर्जा अत्युत्कृष्ट नसतो.

जेव्हा सगळे जग 'अत्युत्कृष्ट' म्हणते तेव्हाचा विजयसुद्धा 'अत्युत्तम' नसतो.

ज्याप्रमाणे वसंत ऋतू संपणे म्हणजे काही मोठी गोष्ट नाही अथवा सूर्यास व चंद्रास पाहू शकणे हे तीक्ष्ण नजरेचे लक्षण नाही व ढगांचा गडगडाट ऐकू येणे म्हणजे उत्तम ऐकू येण्याचे लक्षण नाही.

सूर्य व चंद्र पाहण्यास घारीची नजर लागत नाही व त्यांना पाहू शकणाऱ्यास दिव्य दृष्टी आहे, असे म्हणता येत नाही अथवा गडगडाट ऐकण्यास खूप तीक्ष्ण श्रवणशक्तीची गरज नाही. त्याचप्रमाणे खरा शहाणपणा, चाणाक्षपणा तेव्हाच निदर्शनाला येतो जेव्हा शत्रुपक्षातील सूक्ष्म हालचाली वा आयोजनातील बदल तुमच्या कुशाग्र बुद्धीने व आयोजनाने तुम्ही टिपता व मग आपली नीती बनवता. शत्रूची कूटनीती त्रासदायक होण्याआधी तिचा नायनाट करणे म्हणजे तुमची कुशाग्रता होय. याचे नेहमी कौतुक होते.

इतिहासात नॉर्मंडीचे युद्ध, याचे उत्तम उदाहरण आहे. जेथे जर्मन सैनिकांना न कळू देता आपल्या कुशाग्रतेने दोस्त राष्ट्रांनी विजय मिळवला होता, हे या वचनास साजेसे उदाहरण आहे. सन त्झुच्या या वचनाचा वापर कसा करण्यात आला, हे सैनिकी विद्यालयात आजही शिकविले जाते.

वचन 6

पुरातनकाळात युद्धकलेत निपुण असणारे जो विजय मिळवायचे तो सहजासहजी मिळवत असत.

म्हणून त्या निपुण लोकांच्या विजयास खूप चाणाक्ष विजय अथवा धैर्यवान विजय, असे संबोधले जात नसे. कारण त्यांच्या विजयात त्यांची नीती, हिशोब व अंदाज कधीच चुकत नसे.

अंदाज न चुकणे म्हणजे जे आधीच हरले आहेत त्यांच्यावर हमखास विजय मिळविणे.

लढावयाची संधी नसेल तर सैनिक आपले शौर्य प्रदर्शन करू शकत नाहीत. युद्ध झाले नाही तर सेनाधिपती आपल्या युद्धनैपुण्याचे प्रदर्शन करू शकत नाहीत. सेनाधिपती व सैनिक आपले कसब, नैपुण्य, धैर्य, नीतिकौशल्य व युद्धकलेतील प्रावीण्य युद्ध वा संघर्ष झाला नाही तर दाखवू शकत नाहीत; पण युद्धात वाहवा मिळविण्याच्या तर्कसंगतपणाच्या संकल्पनेवर इथे सन त्झु प्रश्नचिन्ह उभे करतो. तो स्मरण करून देत आहे की, युद्धात गर्व वा पुरस्कारापेक्षा विजय महत्त्वाचा असतो.

कित्येकदा एखादा 'सोपा' विजय मिळविताना एखाद्या विशेष तंत्राची वा नैपुण्याची गरज असते. उदा. एखाद्या वेळेस प्रतिपक्ष खूप आक्रमक पवित्र्यात वा क्रोधात असताना राजनीतीचा व मुत्सद्देगिरीचा वापर करून तो संघर्ष तुम्ही टाळू शकता; पण त्याहूनसुद्धा अधिक अनुभव व कौशल्य तुमच्याकडे असेल तर तुम्ही तो कशाने

डिवचला गेला आहे याचा कयास घेत त्याचे रूपांतर क्रोधात होण्याआधीच त्याचे परिवर्तन तडजोडीत करून हानी टाळू शकता. याप्रकारे तुम्ही मूळ कारणाचाच नायनाट कराल तेव्हा तुमचा अंदाज चुकण्याच्या घटना खूप कमी होतील. तुम्ही हानीसुद्धा टाळू शकाल. यामुळे संघर्ष संपविण्यातील तुमचे यश वरकरणी व सकृद्दर्शनी फार साधे वाटेल; प्रत्यक्षात मात्र एक दुर्मीळ, अत्युत्कृष्ट दर्जाची संवेदनशीलता व प्रतिस्पर्ध्याच्या मर्मस्थानांची तुम्हास असलेली अचूक ओळख उघडकीस येईल.

याव्यतिरिक्त आणखी एक समीकरण सन त्झुने मोठ्या खुबीने मांडले आहे. तो म्हणतो की, कुठलेही अंदाज बिघडवू न देता जेव्हा संघर्ष सुरू होतो तेव्हा विजय निश्चितच असतो. कारण शत्रू आधीच नामोहरम वा पराभूत झालेला असतो.

वचन 7

युद्धात निपुण असलेले सेनापती आपले मोर्चे असे बांधतात की, ज्यामुळे ते अजेय व अजिंक्य बनतात. ते शत्रूवर हल्ला करण्याची संधी हातातून जाऊ देत नाहीत.

अशा प्रकारे विजयी होणारे सैन्य विजयासाठी अनुकूल परिस्थिती आधीच निर्माण करते व मगच युद्धास उतरते.

पराभव होणारे सैन्य पहिल्यांदा युद्धात उतरते व मग विजयासाठी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करते.

या वचनातदेखील पूर्वतयारीवर भर दिला आहे. संपूर्ण तयारीनिशी, शत्रुपक्षाच्या डावपेचाची माहिती काढून तुम्ही सज्ज होता तेव्हा तुम्ही विजयी होण्यावर आधीच शिक्कामोर्तब करता. हा थोडा विरोधाभास वाटतो खरा; परंतु आधी विजय निश्चित करणारे सर्व आयोजन करा व मगच युद्ध करण्याचा विचार करा. कारण तुम्ही फक्त आपल्या शस्त्रास्त्रांवर विश्वास ठेवला तर विजय कधीच मिळणार नाही.

उदा. दक्षिणध्रुव मोहीम

वचन 8

जे युद्धकलेत निपुण असतात ते मार्गाचे पालन करतात व नियमांचे रक्षण करतात व अशा प्रकारे विजय व पराजयाचे नियंत्रण करतात.

विजय व पराजयाचे नियंत्रण म्हणजे दोन्हींतील ज्याची शक्यता अधिक आहे ते ओळखणे व त्याप्रमाणे कृती करणे, योजना आखणे. चाणाक्ष सेनाधिपती आपल्याहून बलाढ्य सैन्यांशी सामना करण्याचे टाळतो. भूमिगत होऊन आणखी तयारी करतो आणि संभाव्य क्षती टाळतो. आपल्याहून दुबळ्या सैन्याशी गरज पडल्यासच संघर्ष करतो.

त्याचप्रमाणे तुमच्या वैयक्तिक संदर्भात तुम्हाला झेपतील अशाच प्रतिस्पर्ध्यांशी सामना करावा व ज्यांच्याशी दोन हात करण्यास तुम्ही तयार नाही त्यांना टाळावे. याचा अर्थ संघर्ष टाळणे असा नाही. संघर्षात विजय मिळविण्यासाठी व पराजय टाळण्यासाठी हे आयोजन आहे. संघर्ष टाळून पराभूत न होणे व युद्ध करून पराभूत होणे यातील फरक येथे प्रकर्षाने लक्षात येतो.

समस्येकडे दुर्लक्ष करू नका. तिच्याकडे लक्ष द्या, अभ्यास करा आणि मगच तुमचा मार्ग निवडा.

वचन 9

युद्धातील घटक
पहिला घटक—मोजमाप,
दुसरा मात्रा (किती लहान वा मोठे),
तिसरा—हिशेब वा अंदाज,
चौथा—तुलना
व
पाचवा—विजय
मोजमाप जमिनीपासून येते
मात्रा मोजमापावर अवलंबून असते
तुलना मात्रेवरून केली जाते
आणि तुलनेवरून विजय ठरतो.

हे एक फार महत्त्वाचे वचन आहे. या चारी घटकांना समजून घेऊया. मोजमाप म्हणजे जमिनीवरून सर्वेक्षण व मोजमाप करणे. यामुळे आपल्याला शत्रूच्या शक्तीचा अंदाज येतो. त्यावरून जमीन लहान आहे की मोठी, हे कळते. (किंवा प्रत्यक्ष आकड्यात आपल्याकडे माहिती तयार होते.) यावरून ते लहान आहे की मोठे, हे कळून आपल्या शक्तीशी तुलना करता येते. या तुलनेवरून विजयाची शक्यता कुणास अधिक आहे, याचा अंदाज येतो. आपले बळ पाच ते दहा पट असेल तर आपण जिंकणार, याची खात्री होते. याचा दुसरा गर्भितार्थ असा की, संख्यात्मक आकड्यांची तुलना झाल्यावर आपल्याला गनिमी कावा, संभ्रम यासारखी तंत्रे, अशा अदृश्य बाबींची किती आवश्यकता आहे, हे लक्षात येते व त्यानुसार आयोजन करता येते.

या वचनात शेवटी कोण विजयी होईल, हे ठरविण्यासाठी कुठली तर्कसंगत विचारसरणी वापरावयाची याबद्दल चर्चा केली आहे.

जमीन म्हणजे वातावरण, परिस्थिती किंवा संस्कृती अथवा वस्तुस्थिती.

या वस्तुस्थितीनुसार कुठल्या गोष्टी अनुकूल आहेत व कुठल्या प्रतिकूल, हे कळते. याबरोबरच मोजमापनाने प्रतिस्पर्ध्याची बलस्थाने व कमतरता कोणत्या, हे कळते. यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गोष्ट, कोणतीही बाब न वगळता व्यवस्थितपणे मोजली जाते व नोंद केली जाते, ज्यामुळे वस्तुनिष्ठ तुलना होते.
अशा प्रकारच्या तुलनेने अंदाज अचूकपणे घेता येतो
व विजयाची शक्यता यावरून वर्तविता येते.
(आजच्या व्यवस्थापनशास्त्रात याला डाटा बेस्ड वर्किंग (Data based working) म्हणतात. किंबहुना, संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनात (Total Quality Management - TQM) डेमिंग या गुणवत्ता तंत्र क्षेत्रातील गुरूचे एक वचन आहे 'If it can't be measured, it can 't be improved ' म्हणजे ज्याचे मोजमाप करता येत नाही, त्यात सुधारणा करता येत नाही. झेंडे सरांचे पुस्तक उदा.....

वचन 10

विजयी सैन्य एका किड्याविरुद्ध हत्तीसारखे असते
व पराभूत झालेले सैन्य हत्तीविरुद्ध एका किड्याच्या तुलनेसारखे असते
विजयी सैन्य पाण्याच्या अजस्र साठ्यातून बाहेर पडणाऱ्या रुद्र रूपाच्या प्रपातासारखे असते
व यालाच पूर्वतयारी व रचना म्हणतात.

या वचनात शिस्तबद्ध, नियमाप्रमाणे वर्तन करणारे, सुसज्ज, प्रशिक्षित, संख्येने व सर्वांगाने कितीतरी पट मोठे सैन्य कसे असते याची तुलना रुद्र रूपातील पाण्याच्या प्रपाताशी केली आहे. असा त्सुनामीसारखा प्रपात काही क्षणात जोडून सोक्षमोक्ष करतो अथवा निमिषार्धात विजय मिळवून देतो.
तुमची स्थिती अशी भक्कम हवी की, तुमचे पाण्याच्या साठ्यासारखे रूप पाहून व त्याचे रुद्र प्रपातात होऊ घातलेले स्वरूप पाहून शत्रू युद्धास धजावणारच नाही. कारण असे करणे त्याच्यासाठी आत्मघातकी ठरेल. अर्थात यात तुमची तयारी, संवेदनशीलता व नैपुण्य कदाचित सर्वांच्या नजरेस येणार नाही; परंतु तुमच्या पक्षास व शत्रुपक्षास तुम्ही विनाशापासून वाचवाल.

अध्याय 4

पूर्वतयारी व रचना

सारांश -

उत्तम सेनाधिपतीस हे ठाऊक हवे -

1) हल्ला केव्हा करायचा?

2) शत्रूकडून हार न पत्करणे आपल्या हातात असते व हरवण्याची संधी शत्रूच आपल्याला देतो.

एक उत्तम सेनाधिपती पराभवापासून स्वतःचा बचाव करू शकतो; पण शत्रूस पराभूत करण्याची संधी शत्रूच देतो. ती संधी मिळेपर्यंत वाट पाहावी आणि आपली तयारी व सामर्थ्य वाढवावे.

बचाव व आक्रमणाची परिस्थिती

1) बचाव- जेव्हा तुमचे सामर्थ्य शत्रूस काबीज करण्याएवढे नसते तेव्हा भूमिगत व्हा व शत्रूस आश्चर्यचकित करा.

2) जेव्हा परिस्थिती अनुकूल असेल, जेव्हा तुम्ही बलाढ्य असाल, तेव्हा झंझावाताप्रमाणे हल्ला करा.

निपुण सेनाधिपतीने युद्ध मोठ्या सहजपणे जिंकायला हवे. त्याने कोणतीही चूक करता कामा नये. त्याने शत्रूचे बळ अजमाविले पाहिजे व शक्यतो युद्ध न करता हरविण्याची संधी सोडू नये.

युद्धपूर्व तयारी

1) युद्ध -किंबहुना संघर्ष सुरू होण्याआधीच शत्रूची मर्मस्थाने व कमतरता समजावून घ्या

2) नाजूक व अडचणीच्या बाबी समजून घ्या व त्यावर पर्याय शोधा.

3) मार्ग व शिस्त लागू करा. (याचे स्पष्टीकरण पुढील वचनात दिले आहे.)

युद्ध जिंकण्याच्या पाच पायऱ्या

1) शत्रूच्या परिस्थितीचे, संस्कृतीचे, शस्त्रास्त्रांचे मूल्यमापन

2) वरील मोजमापानुसार मात्रा ठरविणे (लहान वा मोठी)

3) आपल्या बळाचा अंदाज

4) त्यावरून तुलना

5) तुलनेनुसार पुढील आयोजन व त्यावरून जय-पराजयाचा अंदाज.

व्यवसायात उपयोग

1) कुठल्याही कंपनीच्या विस्तारासाठी पूर्वतयारी असणे व प्रतिस्पर्ध्याच्या तंत्रज्ञानाची ओळख, त्याची व्यवस्थापन पद्धत जाणून घेणे अत्यावश्यक असते.
2) परिस्थिती, बाजारपेठ कशी आहे हे पाहून निर्णय घ्या, तुमची नीती गुप्त ठेवा.
3) मूल्यमापन, तुलना व संपूर्ण तपशीलवार विचार झाल्यावरच बाजारात प्रतिस्पर्ध्यास तोंड देण्याचा विचार करा.

□□□

अध्याय 5
शक्ती

तुमची तयारी आणि रचना अभेद्य झाली की, तुम्ही जोमाने कूच करू शकता. याची तुलना पाण्याच्या प्रचंड धबधब्याशी वा प्रपाताशी करता येते. आपली सर्व ऊर्जा व साधने एकवटून एका उद्देशाने मोहीम चालविण्याने अशा प्रकारचा जोश निर्माण होतो. यात प्रत्यक्ष संसाधनांचा व इतर रणनीतींचा समावेश असतो. तुमचा शत्रू चूक करतो अथवा गाफील असतो, त्या अचूक क्षणी कारवाई करून अथवा केवळ बलप्रदर्शनाने विजय मिळविता येतो. येथे योग्य वेळेचे व आपल्या शक्तीचा अंदाज घेण्याचे, शत्रूच्या बलाचा अंदाज घेऊन तुलना करण्याचे महत्त्व फार मोठे आहे.

वचन 1

सन त्झु म्हणतो

सर्वसाधारणतः अनेकांचे नियंत्रण हे थोड्या लोकांच्या नियंत्रणासारखेच असते.
ही छोट्या समूहात विभागणी करण्याची बाब आहे.
मोठ्या सैन्यानिशी युद्ध करणे हे लहान सैन्यानिशी युद्ध करण्यासारखे आहे.
यात संदेश निशाणांनी व झेंड्यांनी दिला जातो.

'शक्ती' या मथळ्याच्या या अध्यायातील पहिला धडा म्हणजे त्याचे 'नियंत्रण' या विषयावरील भाष्य. सैन्यात नुसते सळसळणारे चैतन्यच असून चालत नाही, त्यावर सेनाधिपतीचे नियंत्रण हवे. बहुतेकदा मोठमोठ्या आंदोलनात चैतन्य असते; पण नियंत्रण नसते. याउलट एक उत्तम सेनाधिकारी आपल्या सैनिकांचे चैतन्य व ऊर्जा यांचे एका दिशेने संचलन, नियंत्रण व त्यांना एकजूट करतो. यासाठी तो वेगवेगळ्या संकेतांचा, झेंड्यांचा, निशाणांचा व यंत्रणेचा उपयोग करतो. तो व्यक्तिशः उपस्थित नसूनही प्रत्येक सैनिकास त्याचा निर्देश कळतो. याशिवाय तो आपल्या सत्तेचे विकेंद्रीकरण करून आपल्या सैन्यांची विभागणी कौशल्य गटांप्रमाणे करून त्याची जबाबदारी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांवर सोपवतो. अशा प्रकारे सैन्य कितीही मोठे असले तरीही त्याचे आयोजन, व्यवस्थापन व नियंत्रण व्यवस्थितपणे होते-जणू काही ते लहानच सैन्य आहे. ते हजारो-लाखो सैनिकांचे सैन्य असो वा त्याहून बरेच लहान असो, त्यावर नियंत्रण करण्याचे तंत्र एकच असते.

तुम्ही दहा लोकांचे संचलन व नियंत्रण या पद्धतीने करीत असाल तर लाखो लोकांचे नियंत्रणदेखील तुम्ही तितक्याच प्रभावीपणे करू शकाल. संदेश व निर्देश देण्यास तीच चिन्हे, निशाणे व झेंडे वापरू शकता. हाच आधीच्या अध्यायात सांगितलेला

'मार्ग' म्हणजे प्रत्येकास एकजूट करणे, त्यांचा विश्वास नैतिकतेवर संपादन करणे होय. याची सुरुवात स्वतःच्या तत्त्वांवरील दृढनिष्ठेने होते. ज्या अधिकाऱ्यांना तुम्ही तुकडीप्रमुख म्हणून नेमले आहे, त्यांचा विश्वास प्राप्त करणे, ही त्यानंतरची पायरी होय.

आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात 'Communication, delegation and unity of pur pose' अथवा जपानी व्यवस्थापनशास्त्रज्ञ ज्याला 'Single vector' म्हणतात ते हेच आहे. झेंडे यांच्या सुसंवाद, एका दिशेने कूच व लक्ष्याची समानता- असे ते सिद्धांत, सन त्झुच्या या वचनाहून वेगळे आहेत काय?

वचन 2

पुढील गोष्टी सैन्यास शत्रूच्या आक्रमणाचा सामना करण्यास सक्षम बनविणाऱ्या व पराजय न होऊ देणाऱ्या आहेत - सामान्य व असामान्य हालचाली

सैन्य म्हणजे एका अंड्यावर दगड फेकण्यासारखे आहे, हे सामर्थ्य व कमकुवतपणा यातील फरकासारखे आहे.

युद्ध करताना काही हालचाली सामान्य अथवा पुस्तकात दिल्यासारख्या असतात -किंवा तशा वाटतात; पण परिस्थितीनुसार जेव्हा सैन्य सामान्य व असामान्य (विचित्र, अनपेक्षित, संभ्रम निर्माण करणाऱ्या) हालचाली करते तेव्हा ते शत्रूच्या आक्रमणाचा सामना करून विजयी होते. सन त्झु येथे परिस्थितीनुसार आपली रणनीती अचानक बदलण्याच्या महत्त्वाबद्दल बोलत आहे. पराभव न होण्यासाठी दोन्ही गोष्टींची गरज असते. असामान्य हालचाली, अचानक, अप्रचलित, विस्मयकारक अशाच असतात. त्या युद्धात असंतुलन निर्माण करतात, सर्व अंदाज व मोजमापन खोटे ठरवितात. ते शत्रूवर अखेरचा विजयी हल्ला करण्याचे काम करतात.

असामान्य नीतीची परिभाषा अथवा पद्धत ठराविक नसते. आज असामान्य असलेली पद्धत दुसऱ्या परिस्थितीत सामान्य असू शकते.

अंडे व दगडाची उपमा येथे खूप समर्पक आहे. अंड्यावर फेकलेला दगड अचूक बसला नाही तर तो वाया जाईल; पण अचूकपणे नेम बसला तर प्रचंड शक्तीने तो अंडे फोडेल.

वचन 3 व 4

सर्वसाधारणपणे युद्धात सामान्य नीतीचा वापर शत्रूस गुंतवून ठेवण्यास करा व असामान्य नीती विजय प्राप्त करण्यासाठी वापरा.

असामान्य रणनीतीत आकाश व पृथ्वीएवढे असीमित योद्धे असतात व ते नद्या व सागराएवढे अथांग असतात.

ते सूर्य व चंद्रासारखे रोज उगवतात व मावळतात

चार ऋतूंसमान ते संपतात व पुनः आगमन करतात.

येथे नावीन्यपूर्ण, असामान्य विचारशक्ती, नीतींच्या महत्त्वावर व आपल्या सैन्यात असे नैपुण्य असणारे लोक असण्याच्या गरजेवर सन त्झुने भर दिला आहे. कुठल्याही संस्थेत, समाजात, सैन्यात, संशोधनक्षेत्रात पाठ्यपुस्तकाप्रमाणे धोपट मार्गावर प्रवास करून आहे ती स्थिती जोपासण्याचे काम करणारे लोक असतात; पण समाजास विजयी बनविण्यासाठी, क्रांतिकारी बदल घडवून आणण्यासाठी असामान्य, प्रगल्भ व फार वेगळी विचारसरणी असणाऱ्यांची गरज असते. युद्धातदेखील सामान्य अथवा प्रशिक्षणात शिकविलेल्या मार्गाचा वा रणनीतीचा अवलंब शत्रूस युद्धात अडकवून ठेवण्यात व त्याचे लक्ष एकाच बाबीत गुंतवून ठेवण्यात करावयाचा असतो. नंतर असामान्य, अप्रचलित चाल खेळून त्याला हरवावयाचे असते. याला व्यवस्थापनशास्त्रात 'खपर्पेरींळेप' म्हटले आहे. याचे व्यवस्थापन कसे करायचे, त्याला आपल्या संस्कृतीचा भाग कसे बनवायचे, अशा नैपुण्याचे लोक कसे ओळखायचे व त्यांना कसे जोपासायचे, हा एक मोठा विषय आहे.

तसे पाहिल्यास सामान्य मार्ग सीमित असतात व असामान्य मार्ग असीमित; पण असामान्य मार्ग शोधणारे सीमित लोक असतात व सामान्य मार्ग ठाऊक असणारे असीमित लोक असतात. असे हे व्यस्त समीकरण निर्माण झाले आहे, ही मात्र वस्तुस्थिती आहे.

सन त्झुने येथे आणखी एक महत्त्वाचा सल्ला दिला आहे. तो म्हणतो की, अशा प्रकारे असामान्य नीती शोधणारे आकाश व पृथ्वीइतके, नदी व समुद्राएवढे अथांग असतात. म्हणजे त्यांचे ज्ञान एवढे अगाध असते व ते सूर्य, चंद्र व ऋतूंसारखे नियमितपणे उत्तमोत्तम नवीन मार्ग शोधू शकतात.

वचन 5

संगीतात पाचपेक्षा जास्त स्वर नाहीत; पण त्या पाच स्वरांत चढ-उतार व त्यांचे संमिश्रण केल्यावर ते वेगवेगळे ऐकू येत नाहीत.

चित्रकलेत पाचपेक्षा जास्त रंग नाहीत; पण त्या पाच रंगात संमिश्रण केल्यावर ते वेगवेगळे दिसत नाहीत.

पाचपेक्षा जास्त चवी नाहीत; पण त्या पाच चवींचे संमिश्रण केल्यावर जिभेस त्या वेगवेगळ्या जाणवत नाहीत.

युद्धात आक्रमणाचे प्रकार दोनहून अधिक नाहीत.

असामान्य व सामान्य; पण असामान्य व सामान्यमधील वैविध्य सहजपणे उमजत नाही.

असामान्य व सामान्य एकमेकांची निर्मिती करतात व ती एका सीमाहीन वर्तुळासारखी असते.

त्याला कोण समजू शकतो?

संगीतातील वेगवेगळ्या मूळ स्वरांचे चढ-उतार आणि संमिश्रण करून वेगळे संगीत तयार होते; त्यानंतर त्यातील मूळ स्वरांचे वेगळे अस्तित्व ओळखणे कठीण होते. असे संमिश्रण करणारा असामान्य असतो. स्वर त्याच मूळ स्वरूपात गाणे हे सामान्य व बाळबोध असते. संमिश्रण करून असामान्य संगीताची निर्मिती, उच्च कोटीची प्रतिभा असलेले संगीततज्ज्ञच करू शकतात. याचप्रमाणे चित्रकलेत वा पाककलेत हीच उपमा लागू पडते. सन त्झु या सर्जनशीलतेची तुलना करून सांगतो की, युद्धातदेखील प्रचलित व अप्रचलित रणनीती एवढी मिसळून गेलेली असते की, त्यामुळे संभ्रमाची परिस्थिती निर्माण होते. यात खरे काय व खोटे काय, हे कळत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाभारतातील मयसभा. जेव्हा तुमचा शत्रू असामान्य चालीची अपेक्षा करतो तेव्हा सामान्य चाल खेळा. सामान्य अपेक्षा करतो तेव्हा असामान्य चाल खेळा; पण हे वरचेवर एक पद्धत बनण्याजोगे करू नका. म्हणूनच तो म्हणतो, 'त्यास कोण समजू शकतो?'

चिनी संस्कृतीत पाच हा आकडा अनेक पंचमहाभूतांचे द्योतक आहे. जसे की पृथ्वी, धातू, काष्ठ (लाकूड), अग्नी व पाणी. पाच दिशा म्हणजे मध्य, पश्चिम, पूर्व, दक्षिण व उत्तर. पुरातन चीनमध्ये ही पाच तत्त्वे व दिशा हे सर्वव्यापी व निरंतरपणे उपस्थित सिद्धांत आहेत. म्हणून येथे सातऐवजी पाच शब्दांचा वापर करण्यात आला आहे. इतर सर्व संस्कृतीत रंग व स्वर सात आहेत -भारतीय संस्कृतीत चवी 6 आहेत व महाभूते 5 आहेत.

आणखी एक पहा -हा 5 वा अध्याय व 5 वा श्लोक आहे!!!

कुठलीही चाल मुळात सामान्य असल्याशिवाय ती असामान्य बनत नाही. ताओ व आपल्या संस्कृतीतदेखील गुण व अवगुण, भले व बुरे एकत्र असतात. एकाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व नाही. सामान्य व असामान्य नीतींचे असेच आहे,

एकापासून दुसऱ्याची उत्पत्ती होते.

अशा प्रकारे सामान्य चाल कोणती व असामान्य कोणती हा संभ्रम शत्रूच्या मनात नेहमीच राहतो.

वचन 6

खडकावरून सुसाट्याने वाहणारे पाणी शक्तीचे द्योतक आहे.

पक्ष्याने आघात करून आपल्या लक्ष्याचे शरीर तोडणे हे अचूक वेळेच्या निवडीचे द्योतक आहे

म्हणूनच युद्धात निपुण असणाऱ्यांचा हल्ला हा झंझावातासारखा असतो व तो केव्हा करायचा त्या वेळेची निवड (timing) अचूक असते.

त्याची शक्ती एका खेचलेल्या बाणासारखी असते व त्याची शक्ती तो सोडण्याच्या अचूक वेळेवर अवलंबून असते.

या वचनात सन त्झुने अपरिमित शक्तीची अचूक वेळेशी सांगड किती लक्षणीय घातली आहे हे सांगितले. नुसती शक्ती वा सत्ता असून उपयोग नाही. ऐनवेळी अथवा योग्य वेळेस तेवढी शक्ती तुमच्याकडे नसेल तर काहीच उपयोग नाही. योग्य वेळी अपरिमित सामर्थ्याने केलेला हल्ला झंझावातासारखा असतो. आज अपरिमित शक्तीचे उदाहरण द्यायचे झाले तर ते वेगाने धावणारे रेल्वे इंजिन आहे. एकाच दिशेने जाणाऱ्या, थांबविणे अशक्य असलेल्या शक्तीचा अचूक वेळेस वापर म्हणजे विजय.

विजय व कामाची गती हे एकमेकांशी निकटचा संबंध असलेले दोन घटक आहेत. तुम्ही जेव्हा जिंकता तेव्हा तुम्ही प्रेरित झालेले असता. त्यामुळे आणखी ऊर्जेची निर्मिती होते. अशा प्रकारे तुम्ही आणखी विजय प्राप्त करता. या सामर्थ्याबरोबर योग्य वेळेची निवड हा अत्यंत निर्णायक घटक बनतो.

वचन 7

रणधुमाळीत असूनही युद्धाच्या गोंधळात ते संभ्रमित नसतात.

सैनिकांची धांदल उडालेली असते; पण युद्धाच्या अशा धुमश्चक्रीतही पराजय करता येत नाही.

बेशिस्तीचा उगम शिस्त, भीतीचा उगम धैर्य, दुबळेपणाचा उगम शक्ती आहे,

शिस्तीचे परिवर्तन बेशिस्तीत होणे हा व्यवस्थापनाचा भाग आहे, धैर्याचे परिवर्तन भीतीत करणे हा सामर्थ्याचा परिणाम आहे व शक्तीचे परिवर्तन दुबळेपणात होणे हा रचनेचा भाग आहे.

या वचनात वरकरणी विरोधाभास दिसून येतो. धैर्याने भीती, शक्तीने अशक्तपणा व शिस्तीने बेशिस्त कशी निर्माण होऊ शकते? जेव्हा शत्रूला संभ्रमित करायचे असते तेव्हा तुम्ही घाबरलेले, बेशिस्त, अशक्त दिसावयास हवे; पण तुम्ही खरोखर तसे नसावे. कारण मग तुम्ही त्याला संभ्रमित करीत नाही, तुम्ही आहात तसे दिसता. त्याचा फायदा त्याने घ्यायचा ठरविला तर तुम्हीच पराभूत व्हाल. म्हणूनच एकदा तुम्ही तयार झालात की, आपल्याभोवती कमकुवतपणाचा देखावा निर्माण करा. त्याला तुमच्या असीमित, असामान्य व योग्य वेळी केलेल्या संघर्षाने सळो की पळो करून दाखवा.

युद्धाच्या धुमश्चक्रीत असताना तुमचे मनोबल तुम्हाला खंबीर व शांत ठेवण्याजोगे असते का? सामान्य दिसणाऱ्या; पण असामान्य अशा व्यूहरचनेमुळे तुम्ही अजिंक्य व अजेय बनता.

या संपूर्ण वचनात सन त्झुने उच्च मनोबल, संभ्रम निर्माण करणे व असामान्य नीतीचा पुरस्कार केला आहे.

वचन 8

म्हणूनच युद्धात आपल्या शत्रूचा पाठलाग करण्यात निपुण असणारे सेनाधिपती व्यूहरचनेचा वापर करतात व या रचनेस शत्रूला प्रतिसाद द्यावाच लागतो,

ते शत्रूला आमिष दाखवितात व अशा प्रकारे शत्रूस कूच करण्यास भाग पाडून त्या संधीचा फायदा करून घेतात आणि मग त्याचा नायनाट करण्याची ते वाट पाहतात.

अस्सल व्यूहरचना वरकरणी साधी व शत्रूला फसविणारी असते. शत्रू त्याला बळी पडतो. हे त्याला दाखविलेले आमिष असते. ते भेद्य दिसते; पण प्रत्यक्षात ते अभेद्य असते. खूप कमकुवत रचना अजेयपणाची असते. याला 'शक्तीच्या स्थितीतून दर्शविण्यात येणारी अशक्तता' असे म्हटले जाते. ही खूप फसवी असते. यामुळे आपल्याकडे असलेल्या शक्तीपेक्षा अधिक दु:साहस करण्यास शत्रूला भाग पाडले जाते. आक्रमक पवित्र्यामुळे तो क्रोधित होतो, सत्तेची हाव धरू लागतो, तुमच्या सापळ्याकडे लक्ष देत नाही. अशा प्रकारे तो संभ्रमित होऊन, असंतुलित स्थितीत उघडा पडतो. तुम्ही त्याला लगेच काबीज करू शकता. हे सर्व खूप कमी अवधीत घडल्याने उभय पक्षांची पुढील हानी टळते.

आता याच प्रकारच्या सापळ्यात तुम्ही मात्र पडणार नाही. कारण तुम्ही आपल्या मनात सहिष्णुतेने वागण्याची, अरेरावीने व क्रोधातिरेकाने कुठलेही काम न करण्याची शपथ घेतली आहे. तुम्ही आक्रमण करणार नाही व त्यामुळे तुम्ही फसणार नाही.

एका चिनी तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे, 'सैन्य वापरताना एक मोलाचे सूत्र आहे- मी यजमान (आक्रमक) होण्याचे धाडस करणार नाही; पण मी पाहुणा (बचाव करणारा) होणे पसंत करेन. मी एक इंचही पुढे जाणार नाही.'

वचन 9

जे युद्धात निपुण असतात ते सामर्थ्याचा वापर करून विजय संपादन करतात व त्यांना फारसे सैन्य लागत नाहीत.

म्हणून ते मोजकेच सक्षम सैनिक निवडतात व आपल्या सामर्थ्याचा पुरेपूर उपयोग करून घेतात.

जे सामर्थ्याचा प्रयोग करतात ते घरंगळणाऱ्या खडकाप्रमाणे व ओंडक्याप्रमाणे सैनिकांचा उपयोग करतात.
खडक व ओंडके सपाट जमिनीवर स्थिर असतात; पण उतारावर ते घरंगळत जातात.
चौकोनी आकार स्थिर राहतात व गोलाकार घरंगळतात.
म्हणून युद्धात निष्णात सेनाधिपती, सामर्थ्याचा वापर जेथे खूप उतार आहे अशा पर्वतावर, खडकांसारख्या सैनिकांचा वापर करतात, याला सामर्थ्य म्हणतात.
एकजुटीचे सामर्थ्य व रणनीती यांची योग्य सांगड घातल्यास विजयी होण्यासाठी खूप मोठे सैन्यबळ लागत नाही. मूठभर सैनिक, त्यांचे नैतिक मनोबल व रणनीती यांची उत्तम सांगड घालून विजय प्राप्त करता येतो, असे सन त्झु येथे म्हणतो.
याचा अर्थ असा की, कोणत्याही कामगिरीवर मूठभर, कर्तबगार व पात्र असे कर्मचारी असले तर खूप मोठ्या मनुष्यबळाची गरज पडत नाही. कर्तृत्व व आयोजन यांचा योग्य समन्वय घालून सामर्थ्यवान संस्था निर्माण करता येते.
सुप्रशिक्षित, सुसज्ज व एकजूट असलेले सैन्य हे गोलाकार अशा ओंडक्यासारखे वा मोठ्या गोल खडकासारख़े असते. उतारावर नुसता धक्का जरी मिळाला तरी ते प्रचंड वेगाने व सामर्थ्य वाढत ते विजयाकडे घरंगळत जातात. त्यांना थांबविणे अशक्यप्राय असते.
हे सामर्थ्य एकजुटीचे व एक-दिशा लक्ष्याच्या प्रेरणेचे असते. ही एकजूट व एकलक्ष्यता तुम्हाला उतारावरील ओंडक्याची वा खडकाची गती प्राप्त करून देते. तुम्हाला थांबविणे अशक्य होते. असामान्य व सामान्य प्रक्रियांचा अवलंब या गतीस पूरक ठरतात.
व्यवस्थापनशास्त्रात याचा अर्थ, सर्वांची vision and mission एक करणे व सर्वांना प्रेरित करणे, योग्य स्थानी योग्य कुशल व्यक्तीची नियुक्ती करणे, एकलक्ष्यतेने संस्थेस पुढे नेणे व प्रगतिपथावर अग्रेसर होणे असा आहे.

अध्याय 5

शक्ती

सारांश -

1) मोठ्या सैन्याचे आयोजन एका लहान सैन्याच्या व्यवस्थापनासारखेच असते. यासाठी सैन्याचे विभाजन त्यांचे कौशल्य, शिस्तबद्धता व तर्कसंगतता यानुसार करावे लागते. त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी व संदेशातील सुसूत्रतेसाठी निशाणे, झेंडे, घंटा इ.चा वापर करावयाचा असतो.

2) सामान्य व असामान्य नीतीचा वापर त्यांची सांगड घालून करावयाचा असतो. युद्धात सामान्य नीतीचा व संघर्षात असामान्य नीतीचा वापर करा. दोन्ही एकमेकांची जागा घेऊ शकतात. एका परिस्थितीतील असामान्य नीती दुसऱ्यात परिस्थितीत सामान्य ठरू शकते.

असामान्य नीती जाणणारे व तशी प्रतिभा असणारे लोक सूर्य व चंद्रासारखे नियमित, समुद्र व नदीप्रमाणे असामान्य कल्पनांचा अथांग साठा असलेले असतात. ते चार ऋतूंसारखे फलदायी असतात.

त्यात पाच रंगांचा, पाच चवींचा व पाच स्वरांचा समन्वय साधून करता येणाऱ्या भिन्न कृतींची सर्जनशीलता व सामर्थ्य असते.

3) उत्कृष्ट सेनाधिपतीस हल्ला करण्याची अचूक वेळ माहीत असते.

4) सामर्थ्य हे उतारावर घरंगळणाऱ्या ओंडक्यासारखे वा खडकासारखे असते.

5) सैन्यातील शिस्त ही एकसूत्रता व एक-दिशा लक्ष्य यावर अवलंबून असते.

व्यवसायात उपयोग -

1) कर्तबगार, कुशल व अनुभवी लोकांची योग्य स्थानी नियुक्ती.

2) Vision amd Mission ची सर्वांस माहिती करून देणे व त्यांचा विश्वास प्राप्त करणे, यासाठी सुसंवाद साधणे.

3) योग्य वेळेची वाट पाहूनच प्रतिस्पर्ध्याशी संघर्ष करण्यास उतरणे.

4) सर्व क्षेत्रात झंझावातासारखे मनोबल निर्माण करणे.

□□□

अध्याय 6
सामर्थ्य व दौर्बल्य

आतापर्यंत सन त्झुने जेथे तुम्ही शत्रूहून प्रबळ आहात अशा सर्व परिस्थितींचे विश्लेषण केले आहे; पण तो शत्रू तुमच्याहून प्रबळ असला तर? या अध्यायात तुमचे दौर्बल्य कसे कमी करावयाचे व आपल्या बलस्थानांचे केंद्रीकरण करून शत्रूस (तो तुमच्याहून बलाढ्य असूनही) कसे निष्प्रभ करायचे, याबद्दल चर्चा केली आहे. तुम्हास येथे आता आकारविरहित बनायचे आहे, यामुळे तुम्ही दुर्बल आहात की सबळ हे कळायचा मार्ग शिल्लक राहणार नाही. तुम्ही भूमिगत होऊन शत्रूची बलस्थाने व दुर्बल स्थाने शोधण्याचे काम करा. अशा प्रकारे प्राप्त केलेल्या ज्ञानामुळे तुम्ही तुमच्या शत्रूच्या शक्तीचा सामना करू शकाल. सर्वांत दुर्बल स्थानावर, मर्मस्थानावर आघात करून त्याला तुम्ही चकित करू शकाल.

वचन 1

सन त्झु म्हणतो,

सर्वसामान्यतः जो युद्धभूमीवर पहिल्यांदा आगमन करतो व शत्रूची वाट पाहतो, तो निश्चिंत असतो;

नंतर जो घाईघाईने येतो व युद्ध सुरू करतो तो थकलेला असतो.

म्हणून जे युद्धात निपुण असतात ते शत्रूस हालचाल करण्यास भाग पाडतात; पण स्वतः मात्र हालचाल करीत नाहीत.

शत्रूला आपणहून पुढाकार घेऊ देण्याने प्रतिस्पर्ध्याची स्थिती फायद्याची होते.

त्याला पुढाकार न घेऊ देणे म्हणजे स्वतःला हानी पोहोचविणे.

सन त्झुला हे वारंवार आढळले आहे की, जे सैन्य संपूर्ण बळानिशी मोक्याच्या ठिकाणी आपला मोर्चा बांधते ते प्रचंड हेवा करण्याजोग्या स्थितीत असते. अशा बलाढ्य शत्रूवर धाड टाकणारे सैन्य उद्विग्न व क्रोधित असते. ते भावनाविवश असते; क्रोध आणि हाव, लालसेने उत्तेजित असते. विवेकबुद्धीचा वापर न करता ते आक्रमण करते, आक्रमणानंतर लवकरच गलितगात्र होते. अशा प्रकारे अचल राहूनही बलाढ्य पक्ष शत्रूच्या आततायी स्वभावाचा फायदा घेऊ शकतो. हा संघर्ष सुरू होण्याआधी तुमची स्थिती एका उत्तुंग पर्वतासारखी असते. हा उत्तुंग पर्वत कोणी चढू शकत नाही, पार करू शकत नाही, त्यास कोणीही नुकसान पोहोचवू शकत नाही. या प्रकारे आपली स्थिती अजेय बनते. शांत व स्थिर मनाने तुम्ही आपली ऊर्जा साठवून अबाधित ठेवलेली असते आणि या विरुद्ध आततायीपणाने, उदंडपणाने व

भावनाविवश झाल्याने तुमचा शत्रू संभ्रमित होऊन आपले सामर्थ्य हरवून बसतो. खंबीरपणा व अचलपणा हा स्थायी भाव तुमच्या यशास कारणीभूत ठरतो व हे यशसुद्धा कमीत कमी रक्तपात, वित्तहानी व मनुष्यहानी करून प्राप्त झालेले असते. वरपांगी हे सर्वकाही संथ व साधे, सोपे दिसते. तुमच्या शत्रूच्या अविवेकी वागण्यानेच असे घडते.

तुमचा शत्रू भावनेच्या आहारी गेल्याने त्याच्या हालचाली तुमच्या मर्जीनुसार, सोयीनुसार नियंत्रित करू शकता. तुम्ही थोडे जरी घाबरविले तरी त्याची अल्पमती व अल्पदृष्टी त्याला गांगरून सोडेल. त्याला आमिष दाखविले तर तो बळी पडेल. यात विरोधाभास हा की, त्याचीच नकारात्मक ऊर्जा त्याच्या विरुद्ध तुम्ही वापरत असता.

वचन 2

म्हणून जर शत्रू आरामात असला तरीही तुम्ही त्याला थकवू शकता.
तो जर भरल्या पोटाने असला तर त्याला तुम्ही उपाशी ठेवू शकता.
तो जर स्थिर असेल तर त्याला पळवू शकता.
तुम्ही अशा जागी प्रकट होऊ शकता जेथे स्वतःचा बचाव करताना त्याची पळापळ होईल.
न थकता हजारो मैल चालायचे असेल तर शत्रू जवळपास नसलेल्या जागी चाला.
हल्ला खात्रीने, यशस्वीपणे करायचा असेल तर शत्रू आपला बचाव करू शकणार नाही, अशा ठिकाणी तो करा.
स्वतःचा बचाव करताना स्वतःचे संरक्षण निश्चितपणे करायचे असेल, तर जेथे शत्रू हल्ला करू शकणार नाही अशा जागी राहा.

आपले सामर्थ्य वाढवायलाच हवे; पण त्याबरोबरच शत्रुपक्षास दुर्बळ कसे करायचे हे येथे सन त्झु समजावून सांगतो. गनिमी कावा वापरून त्याला दमवा, अनपेक्षितपणे त्याला सळो की पळो करा, त्याची दिशाभूल करा, ज्यामुळे तो गलितगात्र होईल. याचबरोबर त्याची रसद तोडा, त्याचे दाणापाणी कोठून येत आहे, ते पाहा व ते थांबवा. तो स्थिर वाटत असेल तर त्याचे चित्त विचलित करा. त्याला बचावात्मक पवित्रा घ्यावा लागेल, अशा ठिकाणी त्याची कोंडी करा. तो तुमची मुळीच वाट पाहत नसेल अशा ठिकाणी तुम्ही अचानक प्रकट व्हा, यामुळे गाफील स्थितीत असताना तो पकडला जाईल. तो जिथे नसेल अशा लांब पल्ल्यावर तुम्ही कूच करीत जा व तो प्रांत आपल्या ताब्याखाली घ्या. तुमचा हल्ला एवढा सणसणीत व झंझावातासारखा हवा की, त्याला तो थोपवणे अशक्यच ठरेल. तुम्हाला स्वतःचा बचावच करून घ्यायचा असेल तर अशा ठिकाणी आसरा घ्या, अशी दुर्गम जागा शोधा, असा प्रदेश

शोधून ठेवा की, तो तेथे पोहोचूच शकणार नाही. तो प्रदेश फक्त तुमच्याच परिचयाचा असेल.
आपले सामर्थ्य वाढविणे व शत्रूची शक्ती ऱ्हासास लावणे हे दुहेरी शस्त्र झाले. अशा प्रकारे तुमची शक्ती शत्रूहून कितीतरी पट वाढण्यास मदत होते. यामुळे कमीत कमी क्षती होऊन संघर्ष लवकरच संपविण्यास मदत होते.
नेहमीच आपली फायद्याची बाजू वापरून शत्रूस नुकसान न पोहोचू देता केवळ मनोवैज्ञानिक दबावानेच हरवायचे, ही सन त्झुची भूमिका आहे. आपले सामर्थ्य त्याच्या नजरेस आल्याने तो लढाईशिवायच जेरीस येऊन शरण येईल. अशा प्रकारे दोन्ही पक्ष व्यथित व घायाळ होणार नाहीत.
आता जर शत्रुपक्ष तुमच्याहून प्रबळ असला तरीही सेनाधिपती गनिमी काव्याने आपल्या सैन्यासाठी अजेय परिस्थिती निर्माण करू शकतो. शत्रू ज्या क्षेत्रात, ज्या युद्धकलेत निपुण आहे तेथे तो आपले सैन्य लढावयास पाठवत नाही. प्रत्येक क्षेत्रात शत्रूचा मुकाबला करण्याऐवजी तो त्याला काही ठिकाणी टाळतो. अशा प्रकारे तो आपली शक्ती वाचवतो व एवढेच नाही, तर तो निश्चिंतपणे व मन स्थिर ठेवून शत्रूची उपस्थिती नसलेल्या प्रदेशातून लांबवर कूच करतो व त्या प्रदेशात आधिपत्य प्राप्त करतो.
थोडक्यात शत्रूच्या बलस्थानापासून दूर राहून तो आपल्या सैन्याच्या सुरक्षिततेची काळजी घेतो.
आपल्या रोजच्या संघर्षात किंवा व्यवसायात आपण हे पाहतो की, जे उत्पादन उत्तम दर्जाचे व उत्तम प्रकारे शत्रूने प्रस्थापित केले आहे, त्या क्षेत्रात घुसून आपण त्याची बाजारपेठ काबीज करणे मूर्खपणाचे ठरते. त्याऐवजी त्याची उपस्थिती नसलेल्या वा तो दुर्बलपणे उपस्थित असलेल्या उत्पादनांचा बाजारपेठेत शिरकाव करून आपण त्याच्यावर त्या क्षेत्रात प्रभुत्व मिळवू शकतो. हे प्रभुत्व, गुणवत्तेच्या आधारावर, किमतीच्या आधारावर अथवा उत्पादनातील वैविध्याच्या आधारावर असू शकते. अशा प्रकारे व्यवसायाच्या उलाढालीच्या आकारातील तफावत कमी होत जाते. तुम्ही मग त्याच्याशी उत्तम प्रकारे लढण्याच्या स्थितीत पोहोचू शकता. शेवटी त्याच्या प्रमुख बाजारपेठेवरदेखील हल्ला करू शकता.

वचन 3

म्हणून आक्रमण कलेत निपुण असलेल्यांविरुद्ध बचाव कुठे करायचा, हे शत्रूला कळत नाही.

बचावात निपुण असलेल्यांविरुद्ध आक्रमण कुठे करायचे, हे शत्रूला कळत नाही.

तरल, अति तरल असतात

ते आकारशून्य होतात
गूढ, अति गूढ असतात
ते नादशून्य होतात
म्हणून ते शत्रूच्या नशिबाचे मालक बनतात.
जी आगेकूच थांबविता येत नाही ती करायची असेल तर त्याच्या दुर्बल स्थानांवर आक्रमण करा.
जी माघार थांबविता येत नाही ती करायची असेल तर प्रचंड वेगाने परत निघा.
या वचनात सन त्झु आपली नीती ठरविताना काय काय करता येते याचे विवरण करीत आहे. तो म्हणतो, तुम्ही जर आक्रमणात निपुण असाल तर शत्रू हल्लाच करीत नाही. कारण तुम्ही प्रतिहल्ला केल्यास रक्षण कसे करायचे हे त्याला माहीतच नसते. त्याचप्रमाणे तुमचा बचाव जर प्रभावी असेल तर हल्ला कसा व कुठे करायचा हे त्याला कळत नाही. या वचनाचा आणखी गहन अर्थ समजून घेण्याचा आपण प्रयत्न केला तर असे लक्षात येते की, हल्ला अथवा आक्रमण व बचाव अथवा स्वरक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तुमचा बचाव उत्तम असो अथवा तुमचा हल्ला उत्कृष्ट असो, मूळ कौशल्य, नीती, मनोबल, एकसूत्रता, एक दिशा, नेतृत्व या सर्व बाबी हव्यातच व यामुळे दोन्हीपैकी कोणतीही नीती तुम्ही परिस्थिती वा समय वा स्थानानुसार वापराल.
आता आपण त्याने वापरलेल्या काही सूत्रांविषयी चर्चा करूया. सन त्झु आकारहीन म्हणजे काय, याचे विवरण करतो. याचा अर्थ तुमची खरी शक्तिस्थाने व दुर्बल स्थाने, आकारहीन म्हणजे दृष्टित्पत्तीस न येऊ देणे. याचे दोन अर्थ आहेत. प्रत्यक्षपणे अंतर्धान पावणे, भूमिगत होणे वा आपले गुण व दोष दोन्हीही बाहेर न येऊ देणे यात तोच संभ्रमाचा सिद्धांत आहे. तुमचा गूढपणाचा आव अथवा बुरखा, तुमचे दुर्बल गुण झाकेल. तुमची इच्छा असेल तर बलस्थानेदेखील मर्मबंधात ठेवा व तरल व्हा. अशा प्रकारचा आकारहीनपणा तुम्हाला वर्चस्व व प्रभुत्व कायम ठेवण्यास मदत करेल. अशा प्रकारे शत्रूस तुमच्या बरोबरीच्या संघर्षात पराभूत करू शकाल.
तुम्हाला संघर्ष समाप्त करण्याची संधी मिळेल तेव्हा त्वरित कृती करा. याचप्रमाणे तुम्ही अत्यंत कठीण परिस्थितीत सापडता, तेव्हा ताबडतोब त्या परिस्थितीमधून बाहेर पडा. हे ताबडतोब बाहेर पडणे आणि अविचाराने, आततायीपणाने, उतावीळपणे, भावनेच्या आहारी जाऊन त्वरित हल्ला करणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. तुमची ही चाल, सूत्रबद्ध, विचारपूर्वक, स्पष्ट व शांत विचाराचे व निर्णय घेण्याच्या शक्तीची द्योतक आहे. तुमच्या शत्रूच्या चाली, अस्पष्ट व भांबविलेले विचार आणि भावनाविवश मनाच्या द्योतक आहेत.

वचन 4

म्हणूनच आपण युद्ध करायचे ठरवले असेल आणि शत्रूच्या भोवताली मोठ्या व उंच भिंती व खोल खंदक असतील तरीही तो युद्धास सामोरे जाऊ शकणार नाही.
कारण आपण ज्यावर हल्ला करू, त्याने स्वतःचे रक्षण करायचे आहे.
आपल्याला युद्ध करायचे नाही, आपण जमिनीवर नुसती एक रेघ जरी काढली तरीही तो युद्ध करणार नाही. कारण या कृतीने आपण त्याच्या हालचालींची दिशा बदलतो.
म्हणून आपण आकारहीन असताना शत्रूस स्थिती उघड करण्यास आपण भाग पाडतो. शत्रू विघटित व संभ्रमित असेल तेव्हा आपण सर्व शक्तिनिशी असतो.
शत्रू विघटित असतो तेव्हा आपण त्याच्यावर त्याच्या शक्तीहून दहापटीने हल्ला करतो.

सन त्झुने या वचनात, जर शत्रूच्या योजनेत एखादे स्थान अभेद्य असेल अथवा त्याच्या शस्त्रास्त्रात एखादे शस्त्र अमोघ असेल, त्यावर खूप विश्वास असेल, इतकेच नव्हे तर ते भेदून आपल्या जवळ कोणीही येऊ शकणार नाही अशी त्याची खात्री व धारणा असेल तर काय करायचे, याबद्दल सांगितले आहे. शत्रूभोवताली अभेद्य भिंत व खंदक असेल, तर तो भाग सोडून आपण त्याच्या इतर ठिकाणांवर हल्ला करण्याची योजना आखावी. मग त्याला ते वाचवावेच लागेल. अशा प्रकारे त्याची अभेद्यपणाची धारणा नष्ट होईल. दुसरा मार्ग असा की, जर त्याने हल्ला केला व आपण युद्ध न करता त्याचे ध्यान इतर ठिकाणी विकेंद्रित केले तरीसुद्धा ते सैन्य दुभागले जाईल. दोन्ही परिस्थितीत सेनापती स्वस्थ बसत नाही; पण शत्रूच्या हालचालींची दिशा बदलण्याचा तो प्रयत्न करतो. एवढेच नाही तर आपण आकारहीन, भूमिगत, गूढपणे अंतर्धान पावल्याने शत्रूला संभ्रमित होऊन आपल्या बळाचे प्रकटीकरण करण्याशिवाय मार्गच उरत नाही. कित्येकदा आपला शोध घेण्यासाठी शत्रू आपले बळ दुभागतो. अशा वेळी आपले सैन्य पूर्ण ताकदीने तयार असेल तर प्रकट होताक्षणीच, त्या विस्मयाच्या धक्क्याने व शत्रूचे विभाजन झाल्याने आपली शक्ती शत्रूहून दसपट होते.

या आकारहीनतेचे महत्त्व वाखाणणे तेवढे कमीच आहे. अशा प्रकारे आकारहीन शत्रूविरुद्ध बलाढ्याहून बलाढ्य सैन्यसुद्धा घायकुतीला येते. आकारहीन असल्याने एक दुर्बल सैन्यसुद्धा सबळ बनते. अफगाणिस्तान, व्हिएतनाम व इतर वरकरणी दुर्बल असलेल्या सैन्यांनी अमेरिकन फौजांच्या नाकीनऊ कसे आणले, हे विदित आहे. तुमची शक्ती व दुर्बलता या दोन्ही गोष्टी तुमच्या शत्रूस ठाऊक नसल्याने तो कोणत्याही प्रकारचे आयोजन करण्यात, युद्धनीती रचण्यात अपयशी ठरतो. अशा

प्रकारे शत्रूच्या विविध स्थानांवर पूर्ण ताकदीने हल्ला करून तुम्ही त्यास जेरीस आणू शकता. तुमची शक्ती प्रत्यक्ष आहे त्याहून कितीतरी पट वाढते.
आधुनिक युगात व युद्धशास्त्रात अथवा व्यवसायातसुद्धा 'Element of superise' हे एक महत्त्वाचे आयुध म्हणून वापरले जाते. कुठलेही नवीन उत्पादन असो, नवीन योजना असो त्याची उपयोगिता वा प्रभाव ते कशा प्रकारे प्रस्तुत केले जाते यावर अवलंबून असते. प्रदर्शित होण्याआधी गूढ वातावरण निर्माण करणे, प्रतिस्पर्ध्यास अंधारात ठेवणे वा दिशाभूल करणारी जाहिरात वा विधाने करून त्याचे लक्ष विचलित करणे (ज्यामुळे तो आपल्या योजना काही काळ बासनात ठेवील) इत्यादी मार्ग अवलंबिले जातात.

वचन 5

म्हणून आपण बलाढ्य असतो व शत्रू दुर्बल
आपण या दुर्बल शत्रूवर हल्ला केला तर तो संकटात जाईल.
युद्धस्थान शत्रूस कळू देऊ नये.
अशा प्रकारे ते माहीत नसेल, तर त्याला अनेक ठिकाणी बचावाची तयारी करावी लागेल.
अनेक ठिकाणाच्या बचावाची तयारी केली तर सैनिकांची संख्या फारच थोडी पडेल.
अशा प्रकारे आपली एकवटलेली संख्या व बळ खूप मोठे असेल व शत्रूचे सैन्य विभागल्याने प्रत्येक ठिकाणी ते खूप कमी पडेल. आपले संपूर्ण सैन्य व ताकद त्याच्याशी एकजुटीने लढायला लागले तर साहजिकच तो मोठ्या संकटात सापडेल. त्याची परिस्थिती बिकट होईल. याशिवाय अनेक मोर्च्यांवर दिशा व निर्देश देणे, एकसूत्रता बाळगणे अशक्य होईल. संभ्रमाने सैन्य विभागले गेले तरी शत्रू मात्र एकाच ठिकाणावर संपूर्ण ताकदीने आलेला पाहून युद्ध सोडून तो पळून जाणार यात नवल काय?
या रणनीतीत आकारहीनता, गोपनीयता, संभ्रम ही त्रिसूत्री महत्त्वाची असल्याचे सन त्झु समजावून सांगतो.
आकारहीनतेने आपली सर्व शक्ती एकाच ठिकाणी केंद्रीभूत होते. गोपनीयतेमुळे आपले आयोजन व नीती नेहेमीच गुप्त राहतात व केव्हाही बदलू शकतात. या दोन्हींच्या वापराने शत्रू संभ्रमित होऊन चुकीचे निर्णय घेतो व आपले सामर्थ्य विभागून बसतो.
सैन्याने आकारहीन राहण्याचे आणखी एक कारण सन त्झु देतो. सैन्यातील सैनिक व संसाधने सीमित आहेत. युद्ध कोठे सुरू होणार याची कल्पना नसल्याने शत्रू सर्व

युद्धस्थळांवर बचावासाठी आपले सैनिक तैनात करतो. अशा प्रकारे आपले सीमित संसाधन व मनुष्यबळ तो उघडकीस आणतो.
या उलट आपण एकत्र, आकारहीन व भूमिगत राहिल्यास शत्रूस आपली खरी परिस्थितीच कळत नाही.
या तत्त्वाची प्रचीती दुसऱ्या महायुद्धात मोठ्या नाटकीयतेने आली. दोस्त राष्ट्रांनी जर्मन सैनिकांना संभ्रमित करण्याची मोठी योजना आखली व ते स्वतः भूमिगत झाले, आकारहीन झाले. जर्मन सैनिकांनी भांबावून जाऊन अनेक जागी आपले सैन्य विभागून मोर्चे लावले. नॉर्मँडीचा किनारा जर्मन सैन्यास अभेद्य वाटत होता व तेथूनच दोस्त राष्ट्रांनी प्रवेश केला व ते आक्रमण यशस्वी झाले.

वचन 6

म्हणून तो जेव्हा पुढच्या बाजूने बचाव करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा सैन्याची मागील बाजू अशक्त बनते.
जर त्याने मागील बाजूचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, तर पुढील बाजू अशक्त बनते.
त्याने जर डाव्या बाजूचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, तर उजवी बाजू दुर्बल होते.
त्याने उजव्या बाजूचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, तर डावी बाजू दुर्बळ होते.
त्याने चोहोकडे बचावाचा प्रयत्न केला, तर चोहोबाजूस तो दुर्बल होतो.
इतरांविरुद्ध आपले संरक्षण करणारे संख्येने कमी असतात व ज्यांच्या विरुद्ध संरक्षण करावयाचे असते ते संख्येने खूप असतात.
म्हणूनच जर युद्धाची जागा व युद्धाचा दिवस ठाऊक असला तर त्याला हजारो कोस कूच करून युद्ध करता येते.
जर त्याला युद्धाची जागा व युद्धाचा दिवस ठाऊक नसेल तर तो आपल्या उजव्या बाजूची मदत करू शकत नाही, तसेच डाव्या बाजूचीही मदत करू शकत नाही.
त्याची आघाडी त्याच्या पिछाडीची मदत करू शकत नाही व त्याची पिछाडी त्याच्या आघाडीची मदत करू शकत नाही.
अशा प्रकारे दोन्हींमध्ये हजारो कोसांचे अथवा काही कोसांचे अंतर असले तरीही फरक पडत नाही.

अनेक ठिकाणी मोर्चे लावल्याने तुमची स्थिती किती नाजूक होते, याचे विवरण सन त्झु आता विस्तारपूर्वक करीत आहे. संपूर्ण वचनात काहीही केले तरी किती बिकट संकट, परिस्थिती निर्माण होऊ शकते, हेच पदोपदी सांगितले आहे. नाटकीयता व प्रभावशीलतेसाठी त्याने आघाडी, पिछाडी, डावा, उजवा यांचा प्रयोग केला आहे. तुम्ही बचावासाठी सैरभैर दहा ठिकाणी धावता, तेव्हा तुमच्या प्रतिस्पर्ध्यास तुमची

स्थिती उत्तम प्रकारे समजते. कारण तुम्ही आपली दुर्बलता उघडकीस आणली आहे. या उलट तुम्ही जेव्हा शांत डोक्याने व संयमाने या संघर्षाच्या वेगाचा व दिशेचा ताबा घेता तेव्हा तुमच्या नैपुण्याची, खंबीरपणाची व कुशलतेची ओळख शत्रूस पटते. उदा. हिटलरचे शेवटचे युद्ध.

सेनाधिपतीचा प्रभाव त्याच्या चाणाक्षपणातून प्रदर्शित होतो, त्याच्या अनुभवातून व ज्ञानातून व्यक्त होतो. या कार्यकुशलतेमुळे आत्मविश्वासाने, जलदपणे, आपल्या सैन्यास बरोबर घेऊन व त्यांचे मनोबल उंच असताना तो निर्णय घेतो. हे निर्णय सहिष्णुतेने व सर्वनाश टळण्याच्या, क्षती कमी करण्याच्या उद्देशाने घेतलेले असतात. या विपरीत भांबावून जाऊन, भावविवशतेने व असंयमाने घेतलेले निर्णय स्वत:चा नाश करणारे ठरतात.

वरील भूमिका समजावून घेण्यास इतिहासातील काही दाखले देता येतील.

जनरल ग्रँट हा ब्रिटिश सेनापती आपल्या शत्रूस नेहमी संभ्रमात ठेवीत असे, त्याची पुढची चाल काय हे समजून घेणे हे महाकठीण काम असे. गंमत अशी की, जेव्हा त्याचे शत्रू आता हा काय करणार याचा सुगावा लावण्यात व समजून घेण्यात गर्क असत तेव्हा हा पठ्ठ्या मात्र स्वत: तग कसा धरायचा म्हणजे बचाव कसा करायचा व कसे आकारहीन व्हायचे, याचीच फक्त योजना आखत असे.

अनेक ठिकाणी बचावात्मक मोर्चे बांधण्यानेदेखील मूळ स्रोताशी सैन्याचा संबंध तुटतो. अनुभव नसलेले सेनापती प्रत्येक ठिकाणी गड लढविण्याचा प्रयत्न करतात. अनुभवी सेनापती एकच लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेत असतात. ते लक्ष्य म्हणजे निर्णायक आक्रमणाविरुद्ध संरक्षण करणे, नगण्य कारवायांकडे व अपयशांकडे दुर्लक्ष करणे.

सेनाधिपतीच्या नैपुण्याची कसोटी म्हणजे तो शत्रूस आपले सैन्य विभाजित करून त्यास सैरभैर होण्यास कशा प्रकारे भाग पाडतो अन् त्यानंतर त्या विघटित सैन्याचा कशा प्रकारे कौशल्याने नाश करतो.

या वरील वचनात आपण एक काल्पनिक चित्र तयार करणे गरजेचे आहे. वेगवेगळे विभाजन होऊन वेगवेगळ्या दिशेने व वेगवेगळ्या ठिकाणी सैन्यांच्या तुकड्या जात आहेत. अशा प्रकारे सैनिक जर अव्यवस्थितपणे वेगवेगळ्या दिवशी तेथे पोहोचले तर शत्रू त्यांचा नाश करेल. जर शत्रू कुठे व केव्हा येणार आहे, हे माहीत नसेल तर आपली सर्व तयारी बचावातच जाईल. अचानक बलाढ्य ताकदीने तो हल्ला करेल. आसपास कुठेही मदत वा सल्ला मिळणार नाही.

वचन 7

माझ्या अंदाजाप्रमाणे युएचे सैन्य खूप मोठे असले तरी विजयाच्या बाबतीत त्याला याचा काय फायदा होता?
म्हणून मी म्हणतो की, विजय प्राप्त करता येतो
जरी शत्रुबळ खूप मोठे असले तरीही त्याच्याशी युद्ध टाळता येते.
म्हणून शत्रूची योजना जाणून घ्या व त्याची बलस्थाने व दौर्बल्य यांचा अंदाज लावा.
त्याच्या आगेकुचीचे स्वरूप समजून घेण्यासाठी त्याला चिथवा,
मृत्यू व जीवन यांची स्थिती समजून घेण्यासाठी त्याची स्थिती ठरवा,
तो कोठे सबळ आहे व कोठे दुर्बल, हे समजून घेण्यासाठी त्याचा खोदून तपास करा.
सन त्झुचा दृढविश्वास आहे की, फक्त मोठा आकार व सैन्यबळ, यामुळे मूलभूत सामर्थ्य व सार्वभौम आधिपत्य प्राप्त होत नाही. तुमची संसाधने तुम्ही कशी उत्तम प्रकारे वापरता व त्यांना तुम्ही कशा प्रकारे वाटून देता, यावरून तुमच्याकडे उपयुक्त शक्ती आहे की नाही व यावरून तुम्ही लाभप्रद स्थितीत आहात की नाही, हे ठरते.
या वचनात उल्लेखलेले युए हे दक्षिण चीनमधील एक राज्य होते व त्याच्या शेजारीच सन त्झुचे वू हे शत्रूचे राज्य होते. युएचे सैन्य बलाढ्य असूनही बहुतेक लढाया वूच्या सैन्याने जिंकल्या होत्या. युएचे सेनाधिपती युद्धनीतीवर भर देण्याऐवजी मनुष्यबळावर अधिक जोर देत असत.
अशा एककल्ली रणनीतीमुळे बलाढ्य सैन्य असूनही नेहमी त्यांचा पराजय होत असे. त्यांच्या विचारसरणीत सहिष्णुतेचा अभाव होता. विजय प्राप्त करण्यासाठी खूप मोठे सैन्यबळ असावे लागते, या विचारसरणीमुळे रणनीतीतील इतर घटकांचा त्यांना विसर पडला होता.
युद्धात एक निपुण सेनापती आपल्या शत्रूची खरी ताकद व रणनीती त्याला एक आमिष दाखवून व प्रतिक्रिया अजमावून ठरवितो. शत्रूने खूपच बलाढ्यपणे उत्तर दिले तर बहुतेक वेळा तो सुसज्ज व शक्तिशाली असतो. जर शत्रू त्या आमिषाचे उत्तर त्वेषाने देत नसेल तर तो नक्कीच दुर्बळ असतो. अशा अनेक चाचण्यांनंतर शत्रूच्या प्रतिक्रिया तर्कसंगत व सातत्यपूर्ण असतील तर शत्रूची निश्चित बलस्थाने कोणती व दौर्बल्य काय, हे सेनाधिपतीस जाणणे सोपे जाते. त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित होतो.
परंतु कित्येक वेळा शत्रूस असे अजमावणे कठीण असू शकते. तुमच्याप्रमाणे तोसुद्धा आकृतिहीन बनू शकतो. असे असूनही तुम्ही माहिती काढू शकता. उदा. एखादा प्रस्ताव ठेवून त्यावरील त्याचे मत, त्याची प्रतिक्रिया पाहून तुम्ही निर्णय घेऊ शकता. सन त्झुच्या म्हणण्यानुसार, त्याच्या शब्दांवरून नव्हे तर त्याच्या भूतकाळातील घटना

व इतिहासावरून तो कसा वागेल, कोणती चाल खेळेल व कशा प्रकारे सामना करेल, याचा अचूक कयास बांधता येतो.
हीच पद्धत अपरिचित व्यक्तीचे खरे चारित्र्य जाणण्यासाठी तुम्ही वापरू शकता. तणावाच्या परिस्थितीत ते कसे वागतात. हे पहा किंवा ते कोणत्याही परिस्थितीत सहिष्णुतेने व संयमाने वागतात का, हे पहा. आमिष दाखविल्यावर शत्रूने व्यक्त केलेल्या आनंदावरून वा उद्विग्नतेवरून त्याची नीती हल्ला परतविण्याची आहे की स्वस्थ बसण्याची आहे, याचा अंदाज लागू शकतो.
अशा प्रकारे तुमची रणनीती त्याच्या भूतकाळातील व वर्तमानकाळातील प्रतिक्रियांवर अवलंबून राहील.

वचन 8

अखेरीस तुम्ही आकारहीन असताना मोर्चा बांधणे यातच तुमचे खरे कौशल्य असते.
तुम्ही आकारहीन असताना अति भेदक हेरसुद्धा तुम्हाला ओळखू शकणार नाहीत आणि अति निपुण सल्लागारसुद्धा तुमचा अंदाज लावू शकणार नाहीत.
व्यूहरचनेमुळे सैन्य विजय प्राप्त करते; पण तरीही विजय कसा मिळाला हे त्यांना उमजत नाही.
कोणत्या व्यूहरचनेमुळे विजय प्राप्त झाला हे प्रत्येकास ठाऊक असते; पण विजय देणारी ती रचना कशी मनात आली हे कुणालाच ठाऊक नसते.
म्हणून विजयासाठी घडणाऱ्या व्यूहरचनांची पुनरावृत्ती होत नाही व शत्रूच्या नीतीवर प्रतिक्रिया म्हणून तयार केलेल्या व्यूहरचना असीमित असतात.
या पुस्तकात अनेक ठिकाणी आकारहीनता वा भूमिगत होणे वा अदृश्य होणे वा दुर्लक्षित होणे वा हेतुपुरस्सरपणे नगण्य ठरणे या सिद्धांताचा वापर करण्यात आला आहे. आकारहीनता म्हणजे नुसते अदृश्य होणे नव्हे.
सन त्झुच्या मते, आकारहीनता म्हणजे अति उच्च दर्जाच्या कौशल्याची निशाणी होय. या वचनात बलाढ्यपणापेक्षा आकारहीनतेचा वरचढपणा येथे प्रस्थापित करण्यात आला आहे.
तुम्ही कितीही बलाढ्य असाल, तुमचे शत्रू तुमची मर्मस्थाने व दौर्बल्य शोधून काढू शकतात; पण तुम्ही आकारहीन व थोडक्यात म्हणज़े दबा देऊन वा अज्ञात असलात तर तुम्ही बलाढ्य नसूनही तुमच्या शत्रूच्या कल्पनेत सामर्थ्यवान, संपूर्ण व सशक्त असू शकता. सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे, आकारहीन होणे म्हणजे विनयशील होणे व आपल्या अहंकाराचा त्याग करणे. शक्तिप्रदर्शनाने कदाचित तुम्हाला सुरक्षित वाटू शकते; पण त्यामुळे तुम्ही इतरांच्या नजरेत भरू शकता. तुमचे अवगुणदेखील प्रकर्षाने दिसून येऊ शकतात.

व्यूहरचना म्हणजे तुमच्या शत्रूविरुद्ध अजेय व अजिंक्य बनण्यासाठी तुम्ही रचलेले डावपेच, याचे कुठे प्रशिक्षण नाही अथवा ते एकसारखे, प्रमाणिकृत नसतात. एका युद्धात वापरलेले डावपेच तशाच; पण वेगळ्या ठिकाणच्या परिस्थितीत तसेच कधीही वापरले जात नाहीत. यातच सेनाधिपतीचे कौशल्य दिसून येते. समोर असलेल्या शत्रूनुसार, युद्धक्षेत्रानुसार, शत्रूच्या डावपेचानुसार व वातावरणानुसार ही रचना बदलते. लवचीकपणा व परिवर्तनशीलता हा रचनेचा गुणधर्म आहे. जेवढे शत्रू व संघर्ष तेवढ्या रचना. सर्जनशीलता, सामान्य व असामान्य उपाय हे या डावपेचांच्या पाठीचा कणा, या मागील अविभाज्य घटक आहे. कित्येक लोक भूतकाळात वापरल्या गेलेल्या व्यूहांचा सखोल अभ्यास करतात. त्यांना पुन्हा तंतोतंत वापरण्याचा प्रयत्न करतात; पण त्यात अपयशी होतात. सन त्झु म्हणूनच म्हणतो, 'कोणत्या व्यूहरचनेमुळे विजय प्राप्त झाला हे प्रत्येकास ठाऊक असते; पण विजय देणारी ती रचना मनात कशी आली हे कुणालाच ठाऊक नसते.' ही विचारसरणी व रणनीती जाणणे आवश्यक असते.

या अशा सल्ल्यामुळेच 'आर्ट ऑफ वॉर' हे पुस्तक प्राचीन असूनही, अर्वाचीन आहे (दोहोतही चीन आहे !!).

या व्यूहाच्या मागे एक सिद्धांत आहे व तो म्हणजे विजय मिळविण्यासाठी आवश्यक अशी व्यूहरचना करणे. विजयासाठी लागणाऱ्या रणनीती विभिन्न असतात. या रणनीतीचे नियम साधे व मोजकेच आहेत. ते समजावून घेण्यास एक आठवडा पुरे; पण त्यामुळे तुम्ही सन त्झु नेपोलियन किंवा शिवाजी महाराज बनू शकत नाही. ते अमलात आणण्यास, लागू करण्यात उभा जन्म खर्ची पडतो.

वचन 9

सैन्याची रचना पाण्यासारखी असते.

पाण्याचा प्रवाह उंच भागाकडे जाण्याचे टाळतो, ते वळचणीस जाते.

त्याचप्रमाणे सैन्याची रचना बलाढ्य विरोध टाळते व ती झपाट्याने कमकुवत प्रतिकाराच्या दिशेने जाते.

पाण्याचा आकार वाहत असताना जमिनीसारखा बनतो.

विजयी होण्यासाठी, शत्रूच्या गुणधर्मानुसार, सैन्याची रचना बनविली जाते

म्हणूनच सैन्याचे बळ स्थिर नसते अथवा त्याची रचनादेखील स्थिर नसते.

परिस्थितीशी जुळते घेत शत्रूच्या प्रकृतीनुसार स्वतःस बदलतात ते विजय मिळवतात, ते दिव्यपुरुष म्हणून संबोधले जातात.

म्हणून पाचही तत्त्वांपैकी कोणताही घटक अचल नाही व चारी ऋतूंपैकी कोणाचेही स्थान अढळ नाही.

सूर्यालादेखील लांब व लहान दिवस असतो; चंद्रसुद्धा उगवतो व मावळतो.

पाणी हे कुठल्याही आकाराशी, पृष्ठभागाशी वा भूगोलाशी जुळवून घेते. म्हणूनच व्यूहरचनेस पाण्याची उपमा चपखलपणे बसते. याशिवाय पाणी हे ताओ तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचे प्रतीक आहे. तुमच्या परिस्थितीशी जुळवून घेऊन योग्य ती व्यूहरचना करण्यास, रणनीती बनविण्यास पाण्याची उपमा देण्यात आली आहे. पाणी जसे एका खडकाळ प्रदेशातून, उंच सखल भागातून, कड्याकपारीतील परिस्थितीशी स्वतःस जुळवून घेत पुढे जाते व शेवटी समुद्रास मिळून विजय प्राप्त करते, त्याचप्रमाणे आपली रणनीती सदैव गतिशील असली पाहिजे, असे सन त्झु प्रतिपादन करतो. ज्याप्रकारे पाणी खडकांवरून वाहत जाते त्याचप्रमाणे दुर्बल घटकांवर लक्ष केंद्रित करून शत्रूचा नीचतम बिंदू ओळखून तुम्ही शत्रूविरुद्ध रणनीती बनवायची आहे.

जे भूतकाळात यशस्वी झाले ते वर्तमानात वा भविष्यात यशस्वी होणारच, याची कसलीही हमी नसते. कोणतीही गोष्ट स्थिर नसते. प्रवाही असणे, हाच प्रगतीचा मार्ग आहे. युद्धभूमीवरील नेहमी सदोदितपणे बदलत असते. जे लोक या बदलत्या परिस्थितीस जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणून अंगीकारतात व शत्रूच्या परिस्थितीनुसार बदल करतात, ते विजयी होतात. कोणत्याही भ्रामक व पूर्वग्रहांवर त्यांचा विश्वास असत नाही. याची तुलना सन त्झुने सूर्य, चंद्र, चार ऋतू व पाच तत्त्वे यांच्याशी करून त्यातील स्थित्यंतरशीलतेवर भर दिला आहे.

रणनीतीतील सहिष्णुतेचे एक उदाहरण म्हणजे जपानमध्ये मुरोमाची काळात (इ. 1938 स. 1578) केंशिन व शिंगेन हे एकमेकांचे शत्रू होते. केंशिनच्या काही मित्रराष्ट्रांनी शिंगेनच्या मिठाचा पुरवठा रोखला. हे पाहून शत्रू असूनही केंशिनने शिंगेनला मिठाचा मोठा साठा पाठविला व तो म्हणाला, 'मिठाचा पुरवठा थांबविणे अन्याय्य व क्रूर आहे.' केन्शिनने शत्रू असूनही सहिष्णुतेने व सामंजस्याने वागण्याचा निर्णय घेऊन एक पायंडा पाडला. जरी दोन्ही पक्ष शेवटपर्यंत कट्टर शत्रू राहिले तरीही या नीतीने दोन्ही पक्षांचा विनाश झाला नाही. शेवटपर्यंत त्यांच्या मनात एकमेकांबद्दल नितांत आदर होता.

तुमच्या शत्रूचा मुकाबला करताना जर तुम्ही या प्रकारचे सकारात्मक व सर्जनशील पर्याय शोधले तर युद्ध लवकर समाप्त होऊ शकेल. क्रोधाचा मुकाबला सहानुभूतीने करा, हावरटपणाचे परिवर्तन दानशीलतेत करा. तुम्ही शत्रूचे मित्रपक्षात परिवर्तन करू शकला नाहीत; तुम्ही शत्रूच राहण्याचे ठरविले तरीही तुमच्या संघर्षातील कटुता दूर करून त्याचे स्वरूपच बदलून टाका.

हल्लीच्या औद्योगिक व्यवसायात बाजारपेठेत एकच उत्पादन विकणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांनी सहयोग व सहजीवनाचा मार्ग अवलंबिला आहे. उत्पादनप्रक्रिया, कर्मचाऱ्यांशी संबंधित धोरणे इत्यादींसारख्या बाबी एकमेकांच्या संस्थांस भेट देऊन, बाजारात प्रतिस्पर्धी असूनही एकमेकांपासून ते शिकत आहेत.

अध्याय 6

सामर्थ्य व दौर्बल्य

सारांश

1) युद्धभूमीत प्रथम पोहोचा व शत्रूची वाट पाहा.
शत्रू कमकुवत असताना एक हुशार सेनापती त्याची वाट पाहतो.
2) शत्रूची रसद तोडा.
शत्रूचे सैन्य आराम करू म्हणते, तेव्हा त्यास सळो की पळो करा.
शत्रूच्या ठावठिकाण्याचा पत्ता लावा.
शत्रूस आश्चर्यचकित करा.
शत्रूचे सामर्थ्य दुभागा, विभागा व मग त्यावर हल्ला करा.
3) युद्धाची रणनीती पाण्याच्या प्रवाहासारखी गतिशील हवी.
परिस्थिती तीच असली तरीही एकच रणनीती लागू होत नाही.
रणनीतीची पुनरावृत्ती करू नका. रणनीती कशी बनते हे शिका.
रणनीती चार ऋतूंसारखी, सूर्य व चंद्रासारखी, दिवस-रात्रीचा वेगवेगळा अवधी असलेली असू द्या.

व्यवसायात महत्त्व

1) प्रतिस्पर्ध्यांचे गुणधर्म समजून रणनीती बनवा.
2) रणनीतीत सहकार्य वा सहिष्णुता असू द्या.
3) दुर्बल बिंदूंवर हल्ला करा व सशक्त गोष्टींचे अनुकरण करा.
4) परिस्थितीनुसार नीती बदला.

□□□

अध्याय 7
सशस्त्र संघर्ष

सन त्झुच्या आतापर्यंतच्या अध्यायात अनेक प्रकारच्या विषयांवर निर्देश दिले आहेत. एवढेच नाही तर त्या विषयांचे आपण गंभीरपणे अध्ययन केले तर आपणास आढळते की, आपले अनेक पूर्वग्रह या विवेचनाने दूर होतात. समस्यांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून आपण पाहू लागतो.

हे सिद्धांत कालातीत, वस्तू व व्यक्तिनिरपेक्ष असून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत लागू आहेत.

आतापर्यंतच्या अध्यायात आपण पाहिले की, आपले प्रयत्न मन:पूर्वक असूनही कित्येकदा आपण संघर्ष टाळू शकत नाही. शत्रू व प्रतिस्पर्ध्यापासून स्वतःचा बचाव करण्याची पूर्वतयारी म्हणून आपल्याला संघर्ष करावा लागतो. सैन्याच्या परिभाषेत सशस्त्र संघर्ष म्हणजे आपल्या सेनाधिपतीच्या निर्देशानुसार सैन्यास करावी लागणारी कूच, शस्त्रांचा वापर व यामुळे येणारी संकटे होय. हा विषय सहाव्या अध्यायापेक्षा वेगळा आहे. या अध्यायात आता गरज पडल्यास आपण त्याच्याकडे जायचे आहे, हे करण्याचे मार्गदेखील समजावून सांगण्यात आले आहेत. असे करताना आपले कमीत कमी प्रयत्न लागून आपली ऊर्जा कशी वाचवता येते, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

वचन 1

सन त्झु म्हणतो,

सर्वसाधारणपणे युद्धक्षेत्रातील तत्त्वे याप्रमाणे आहेत;

सेनाधिपतीस राज्यकर्त्याकडून आज्ञा मिळतात, मग तो सैन्यास एकत्र करतो, सैन्यास संचलित करतो व तळ ठोकतो.

सशस्त्र संघर्षाहून अधिक कठीण काहीही नसते.

सशस्त्र संघर्षात व्यूहाच्या रचनेचे व गोलाकार रचनेचे परिवर्तन एका रेषेत करण्यात व विषम परिस्थितींचा फायदा करून घेण्यात अडचण येते.

इतर सर्व बाबींचा संपूर्णपणे विचार करून तसेच सेनाधिपतीशी व मंत्रिमंडळाशी सल्लामसलत करून राजा सेनाधिपतीस आज्ञा देतो. त्यानुसार तो युद्धाची तयारी तातडीने सुरू करतो. ही एक महत्त्वाची जबाबदारी असते. कारण याच्याशी वेगवेगळे पक्ष संबंधित असतात. पायदळ, रसद देणारे, शस्त्रास्त्रे चालविणारे, घोडदळ व इतर अनेक जणांचा यात अनेक प्रकारे सहभाग असतो. त्यांनी आपापली

कामे योग्यपणे व वेळेवर करावयाची असतात. सैन्याची कूच सुरू होण्याआधी सर्व तयारी अत्यंत गुप्तपणे व वस्तुस्थिती उघडकीस न आणता करायची असते. अज्ञातस्थळी तळ ठोकायचा असतो. गरज असल्यास संभ्रमाची परिस्थिती निर्माण करायची असते. स्वतः कृती करायची असेल तर काय पूर्वतयारी करायची, याचे वर्णन या वचनात आहे.

यात सेनाधिपतीच्या व्यवस्थापन नैपुण्यावर भर देण्यात आला आहे. त्याने राजाच्या आज्ञा नुसत्याच पालन करून आंधळेपणाने संघर्षास सुरुवात करावयाची नसते. येथे स्वतःच्या कामगिरीबद्दल व कृतींबद्दल तो जबाबदार असतो. येथे सेनाधिपती, कर्ता व करविता दोन्ही आहे.

आता सैन्य आपल्या सेनाधिपतीच्या निर्देशानुसार व रणनीतीनुसार संघर्षाच्या दिशेने कूच करते. त्याच्या आदेशांचे पालन करते; पण आधीच्या अध्यायात विवेचन केलेली वाट पाहण्याची नीती व ही नीती यात फरक आहे. त्यात गनिमी कावा, नीती व बुद्धी याचा बराचसा भाग आहे. सशस्त्र संघर्ष खूप कठीण आहे. यात कठीण परिस्थितीतून मार्ग काढावयाचा आहे. शत्रूची गोलाकार (म्हणजे किचकट) नीती मोडून तिचे रूपांतर सरळ सोप्या नीतीत करायचे आहे व मार्ग सोपा करून घ्यावयाचा आहे. सरळ वा थेट मार्ग म्हणजे धडक हल्ला, त्वरित हल्ला. यामुळे शत्रूविरुद्ध तुम्ही खूप मजबूत स्थितीत येता. सेनाधिपतीने आपल्या कौशल्याने ती वर्तुळाकार व्यूहरचना तोडायची आहे. अशा व्यूहरचनेत आपल्या सैनिकांची होणारी दमछाक टाळायची आहे.

वचन 2

म्हणूनच जर तुम्ही शत्रूचा मार्ग चक्राकार राहू दिलात व त्याला आमिष दाखवले तसेच त्याच्या नंतर सुरुवात केलीत, तरीही तुम्ही त्याच्या आधी पोहोचाल.

याप्रकारे चक्राकार मार्गाचा व थेट मार्गाचा तुम्हाला अंदाज येईल.

म्हणूनच सशस्त्र संघर्षाचे फायदे, तसेच तोटेदेखील आहेत.

फायदा होण्यासाठी संपूर्ण सैन्याने कूच केल्यास तुम्ही वेळेवर पोहोचू शकणार नाही आणि संख्येने कमी असणाऱ्या सैन्याने कूच केल्यास तुमची रसद, शस्त्रे व संसाधनांची क्षती होईल.

म्हणून याच कारणामुळे तुमची शस्त्रास्त्रे व साधने मागे सोडून, दिवस-रात्र एक करून कोठेही न थांबता तुम्ही दुप्पट वेगाने दुप्पट अंतर कापून हजारो मैल पुढे गेलात, तर तुमच्या सेनापतीस पकडण्यात येईल.

ज्या गोष्टीवर शत्रूचे ध्यान केंद्रित आहे, त्यावरून त्याला परावृत्त करून, सोपे आमिष दाखवून सेनापतीस संभ्रमात आणता येते. अशा प्रकारे तो दिशाहीन झाला असताना

तुम्ही त्याच्या पुढे जाऊ शकता.
सन त्झुच्या अनेक गहन वक्तव्यांपैकी हे एक आहे. तो म्हणतो, तुम्ही खूप लांब आहात, असे शत्रूस भासवा व प्रत्यक्षात कमी असलेले अंतर वायुगतीने कापत युद्धस्थळावर झंझावातासारखे पोहोचा. शत्रूची दिशाभूल करा. त्यामुळे त्याची तुमच्याशी चुकामुक होईल. जरी तुम्ही दुर्गम क्षेत्रात असलात, तरीही याचे परिवर्तन एका उत्तम व फायद्याच्या संधीत करता येईल.
प्रत्येक रणनीतीत धोके व फायदेसुद्धा असतात. दोघांची संतुलित तुलना करून निर्णय घ्यायचा असतो. जेव्हा सैन्य व साधनांचा भार हलका करून गतीने पुढे जाऊ इच्छिता, तेव्हा तुम्ही आपल्या सुरक्षिततेशी तडजोड करता. सुरक्षा हवी असेल तर जलदगतीशी तडजोड करावी लागेल.

वचन 3

बलाढ्य सैनिक आधी येतील, दुर्बळ मागे राहतील व त्यांच्यातील फक्त एक दशांशच पोहोचतील, असा नियम आहे.
पन्नास मीटर अंतरावरून पुढे जाण्यासाठी तुम्ही धडपडत असाल तर पुढे असलेला सेनापती धुडकावून लावला जाईल व त्याच्यातील फक्त अर्धेच सैनिक येतील, असा नियम आहे.
तुम्ही तीस मीटर अंतरावर असून फायद्याच्या स्थितीत असाल तर दोन तृतीयांश सैन्य पोहोचेल.
म्हणूनच ज्या सैन्याकडे साधने नसतील,
रसद नसेल आणि
पुरेसा साठा नसेल, ते हरेल.
म्हणून ज्या राज्यकर्त्यास शेजारील राज्याच्या राज्यकर्त्याचे धोरण व विचारसरणी माहीत नसते, ते त्यांच्यांशी तडजोड करू शकत नाहीत.
ज्याला भूभागाची, पर्वतराईची, अरण्याची, ओढ्यांची, दलदलीच्या प्रदेशाची माहिती नसते, तो आपले सैन्य पुढे नेऊ शकत नाही.
जो स्थानिक वाटाड्यांची मदत घेत नाही, तो तेथील भूप्रदेशाचा फायदा घेऊ शकत नाही.
सैन्य जेवढे दूर जाते तेवढ्याच दूरवर त्याच्या बळाची व संसाधनांची विखुरणी होते व त्यामुळे विजयाची शक्यता दुरावते. सैन्याला जेवढी दूरवर कूच करावी लागते तेवढ्या अधिक संख्येत सैनिक मरण पावतात. विनाकारण दूरवर रानावनातून, खाचखळग्यातून सैन्य नेणे हे प्रत्यक्ष युद्धापेक्षा भयंकर असते, असे स्टोनवेल जॅक्सन या अमेरिकन युद्धनीतिज्ञाने म्हटले आहे.

युद्धात सेनापती ही एकच अशी व्यक्ती आहे, जी उत्तम योजना बनविण्यास जबाबदार आहे व या प्रकारचे निर्णय तीच घेते.
यानंतर संपूर्ण वेगाने व शक्तिनिशी आक्रमण कसे करायचे, हे सन त्झु सांगतो. विशिष्ट ज्ञान संपादन करून, भूभागाची व त्या प्रांताची माहिती काढूनच विजय प्राप्त करता येतो. या ज्ञानामुळेच दुर्गम प्रदेश सुकर होतो. वाकडे-तिकडे रस्ते सरळ होतात. वेग याचा अर्थ खूप लवकर पुढे जाणे असा असला, तरी येथे दिशा महत्त्वाची आहे. अशा प्रकारे भूभागाशी परिचय झाल्याने तुम्ही वेगाने शत्रूहून आधी पुढे जाता. 'आर्ट ऑफ वॉर'च्या संदर्भात, तुमच्या शत्रूहून आधी लक्ष्याची प्राप्ती करून घेणे असा आहे. याचा अर्थ शत्रूला नुसतेच मागे टाकणे असा नाही.
शत्रूला नुसतेच मागे टाकण्याच्या भानगडीत तुम्ही तुमची शस्त्रास्त्रे, रसद, साठा, सर्वकाही गमावून बसलात तर अर्थ नाही.
युद्धात मित्रपक्ष व आपले हितचिंतक कोण आहेत, हे जाणण्यासाठी शेजारच्या प्रांताची राजनीती जाणून घेणे आवश्यक असते. सैन्याची कूच त्या प्रदेशातून होणार असेल तर तुम्हाला तेथील पर्वतराई, चढ-उतार, दुर्गम प्रदेश, दलदली इ. स्थानिक वाटाड्याकडून, जाणकार माणसाकडून समजून घेता आले तर त्याचा फायदा शत्रूस कोंडीत धरण्यासाठी होऊ शकतो.

वचन 4

म्हणून फसवणुकीचे तंत्र हा सैन्याचा पाया आहे. ते फायद्याची स्थिती पाहून कूच करते व परिस्थितीनुसार विभागले जाते व त्याची पुन्हा एकजूट केली जाते.
यामुळे ते वाऱ्यासारखे वेगाने कूच करते,
अरण्यासारखे पसरते;
अग्नीसारखे हल्ला करते व सर्वकाही गडप करते;
ते पर्वतासारखे दृढपणे उभे राहते;
अंधारासारखे ते आकारहीन असते;
झंझावातासारखे ते प्रहार करते.
सन त्झु म्हणतो की, युद्धात भ्रम निर्माण करणे हाच यशाचा पाया आहे. टुरेन (इ.स.1765) या फ्रेंच सेनानीने या तंत्राचा 'dissmimulation' अथवा 'disambiguation' या नावाने यशस्वी प्रयोग केला आहे; किंबहुना त्याने या युक्तीचे एका युद्धनीतीत वा शास्त्रात परिवर्तन केले आहे.
सैन्याची विभागणी करणे वा एकजूट करून भ्रमाची स्थिती निर्माण करणे, हे त्या वेळच्या संदर्भावर वा परिस्थितीवर अवलंबून असते.

संभ्रम निर्माण करण्याने तुम्ही एक आकारहीनता प्राप्त करता व यामुळे शत्रूला तुमची शक्ती कोठे एकवटली आहे व मर्मस्थान, दौर्बल्य कोठे आहे हेच कळत नाही. अशा प्रकारे तुमची स्थिती नेहमीच समर्पक व परिस्थितीस अनुकूल होते.
आता सन त्झुने दिलेल्या उपमा किती समर्पक आहेत हे पाहूया; ज्या शक्तींची त्याने उपमा दिली आहे त्या किती सर्वव्यापी व अजिंक्य आहेत, हेदेखील पाहूया. या शक्तींप्रमाणे बनण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण हवे, हेदेखील यावरून लक्षात येईल.

वाऱ्याप्रमाणे कूच

वारा हा नुसताच वेगवान नसतो, तो अदृश्य असतो; तो कोठेही प्रवेश करतो, तो अचानक निर्माण होतो व अचानक थांबतो.

अरण्याप्रमाणे विस्तार

येथे अरण्यासारखा विस्तार याचा अर्थ अरण्यासारखा दाट असा होतो. असे दाट सैन्य अभेद्य असते. त्यात एकदा घुसले की, त्या प्रदेशाची माहिती असल्याशिवाय तेथे निभाव लागणे अशक्य असते. तसेच अरण्य हे शिस्तबद्ध नसते, ते झाडांनी माजलेले असते. तुमची व्यूहरचना शिस्तबद्ध असूनही दाट व माजलेली दिसायला हवी.

अग्नीप्रमाणे हल्ला व सर्वकाही गडप

अग्नीशी मुकाबला करणे अशक्य, त्याचे तापमान प्रचंड असते याचा अर्थ त्याच्या जवळ जाणे अशक्य आहे व सैन्य क्रोधाने पेटल्याने, त्याच्या समक्ष जे येते, ते भस्मसात होते.

पर्वताप्रमाणे दृढ

अशा परिस्थितीत शत्रूकडून तुमचा भेद होणे अशक्य होते, शत्रूस तुमचे स्थान हलवायचे असेल तर ते अशक्यप्राय असते, उत्तुंग व दुर्गम असल्याने ते लांघणे अशक्य बनते.

अंधाराएवढे आकारहीन

तुमच्या हालचाली, त्यांचे स्वरूप (आकार) हा अंधारासारखे गूढ असल्यास काय चालले आहे, हे शत्रूस कळणारच नाही.

झंझावातासारखे प्रहार

तुम्हाला झंझावातासमोर उभे राहता येत नाही, ढगांच्या गडगडाटाचा आवाज कान बंद केल्याने थांबत नाही. विजेचा प्रकाश डोळे बंद केल्याने कमी होत नाही. हा झंझावात असा असतो.
आता या सर्व बाबी आवश्यक मानल्यास सैनिकांचे प्रशिक्षणदेखील दुर्गम भागात, कठीण हवामानात, खूप गरमी व थंडी असलेल्या प्रदेशात, वाळवंटात झाले तर वर

दिलेल्या गोष्टींसारखा परिणाम होईल.
नैसर्गिक तत्त्वांची तुलना करून व उदाहरणे देऊन, 'आपल्या सैन्यास असे बनवा', असा उपदेश सन त्झुने दिला आहे.
आजच्या सैन्यात कमांडो पथक म्हणजे 'हे सर्व गुणधर्म असलेले', असे म्हणावयास हरकत नाही.

वचन 6

जेव्हा तुम्ही गावावर हल्ला चढवता तेव्हा जिंकलेली संपत्ती तुमच्या सैन्यात सम प्रमाणात विभागा.
जेव्हा तुमच्या अधिपत्याचा विस्तार होईल तेव्हा त्याचे विभाजन करा व महत्त्वाची ठिकाणे शाबूत ठेवा.
परिस्थितीचा अंदाज घ्या व आगेकूच करा
ज्यांना चक्राकार व सरळ व्यूहरचनेची तत्त्वे माहीत आहेत, ते विजयी होतील.
सैन्याच्या व्यवस्थापन ग्रंथात हे सांगितले आहे :
युद्धात शब्द स्पष्टपणे ऐकू येऊ नये म्हणून रणभेरी व नगारे वापरले जातात.
सैनिक एकमेकांना स्पष्टपणे पाहू शकू नये म्हणून झेंडे व निशाणे वापरले जातात.
आधीच्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे जेव्हा हल्ला केला जातो तेव्हा तो शत्रूच्या सेनेवर व भूमीवर होतो. आधी सांगितल्याप्रमाणे योग्य नीतीचा वापर करून कमीत कमी नुकसान होऊन विजय प्राप्त केला जातो. युद्धात संपत्ती काबीज केली जाणे स्वाभाविक आहे. ही संपत्ती एका जागी आणून समप्रमाणात वाटली गेली पाहिजे व कुणावरही अन्याय होता कामा नये. ज्यांच्या मदतीने विजय प्राप्त होऊन संपत्ती मिळाली त्यांनादेखील या संपत्तीमधील काही हिस्सा मिळावयास हवा. हे सर्व पारदर्शीपणे झाल्यास यातील स्वार्थाची वृत्ती दूर होईल. तुमच्या सैन्यात एकमेकांवरील विश्वास वाढेल. यात मित्रपक्ष व सहकारी यांचा समावेश झाल्याने शत्रूसमोरही एक आदर्श ठेवला जाईल. यामुळे तुमच्याबद्दलची आदर भावना वाढेल. दैनंदिन जीवनात वा कार्यक्षेत्रातसुद्धा अशा प्रकारचा विजय प्राप्त झाल्यास वा प्रतिपक्षापेक्षा तुमची कामगिरी उत्तम झाल्याने तुमचा आर्थिक लाभ झाल्यास, त्या यशात व आर्थिक लाभात सर्वांचा सहभाग असायला हवा, यात पारदर्शीपणा हवा. अशा प्रकारे त्यांचा विश्वास वाढू शकतो.
यापुढे जाऊन तो म्हणतो की, तुमच्या अधिपत्याखालील परिसर जसजसा वाढत जाईल तसतशी तुम्ही त्याची विभागणी केली पाहिजे. त्यातील महत्त्वाची ठिकाणे हेरून, त्यावर लक्ष ठेवून त्यांची भरभराट होण्यासाठी प्रयत्न करावयास हवेत. स्थानिक लोकांना प्रोत्साहन देऊन त्यांची मदत घेऊन ती ठिकाणे कशी प्रगतिशील

होतील, तेथील प्रजा कशी आनंदात राहील हे सहिष्णूपणाने पहावयास हवे आणि ही योजना केल्यावरच तेथे कार्यक्षम नेतृत्व नेमले गेले आहे व त्या इलाख्याच्या समृद्धीच्या योजना आखल्या गेल्या आहेत, याची खात्री करूनच कूच केली पाहिजे. असे करताना कूटनीती (चक्राकार नीती) व सरळ नीती (थेट नीती) समयानुसार वापरण्याचे नैपुण्य ज्या लोकांकडे असेल, तेच लोक यशस्वीपणे राज्य करू शकतील.

सशस्त्र संघर्षात सुसंवाद कसा साधायचा व आपले संदेश प्रत्येक सैनिकापर्यंत कसे पोहोचवायचे, याचे वर्णन येथे सन त्झुने केले आहे. चीनमध्ये सेनाधिपती आपला संदेश रणभेरी व नगाऱ्यांच्या आवाजाने, निशाणे व झेंड्यांचा वापर करून पोहोचवीत असे. ही एक मानांकित पद्धत होती. हे तंत्र लिखितरूपात उपलब्ध होते. लढाईतील कोलाहल, आवाज, सावळागोंधळ व धुरळा यामुळे निर्देश ऐकणे व एकमेकांस वा सेनाधिपतीस वा अधिकाऱ्यास पाहणे अशक्यप्राय असायचे. म्हणून या बाबींवर एवढा भर दिला आहे. यामुळे आदेशात एकवाक्यता व सुसूत्रता येते; संभ्रमावस्था दूर होऊन सैनिकांचे मनोबल वाढते.

वचन 7

म्हणून रात्रीच्या लढाईत पलिते, मशाली व नगारे वापरा,
दिवसा झेंडे व निशाणे वापरा.
नगारे, झेंडे व निशाणे यांचा वापर सैनिकांची नजर व कान यात एकसूत्रता आणण्यासाठी केला जातो.
जेव्हा सैनिक एकजूट असतात तेव्हा शूर एकट्याने पुढे येऊ शकत नाहीत व एकट्याने माघार घेऊ शकत नाहीत.
यामुळे संपूर्ण सैन्याचे मनोबल खालावते.
मोठ्या प्रमाणात सैन्य तैनात करण्याची ही तत्त्वे आहेत.
सैनिकांच्या पाहण्यात आणि ऐकण्यात एकसूत्रता आणण्यासाठी रात्रीच्या लढाईत खूपसे पलिते, मशाली व नगारे वापरा, दिवसा उजेडी युद्धात खूपसे झेंडे व निशाणे वापरा.

चँग यु हा प्राचीन चिनी सेनाधिपती म्हणतो की, जर पाहणे व ऐकणे एकाच वेळी व एकाच स्थानी, एकाच वस्तूवर केंद्रित झाले तर हजारो सैनिकांची हालचाल फक्त एका सैनिकासारखी अचूक होईल. तो म्हणतो की, जे सैन्याच्या अधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली करून कूच करतात वा माघार घेतात, ते गुन्हेगार असतात. युद्ध परिस्थितीत आदेशाची पायमल्ली झाली आहे की आदेश लक्षात आला नाही हे

कळणे तेथील परिस्थितीमुळे व हलकल्लोळामुळे अशक्य असते. कोणत्याही परिस्थितीत हे घडू द्यायचे नसते.
चँग यु पुढे म्हणतो, वाद्यांचा व निशाणांचा योग्य प्रकारे वापर करून सर्वांना आदेश पोहोचले तर क्रोधाने पेटलेल्या सैन्यातील सर्व तुकड्यांचा सामना करणे अशक्य होईल. याविरुद्ध त्यांना थोपवायचे असेल तरीसुद्धा निर्देशात एकसूत्रता हवी.
चिनी युद्धात एका विशिष्ट पद्धतीने नगारे वाजविले जात नाहीत, तोपर्यंत हल्ला करावयाचा नसतो.
सन त्झुचा दृक व श्राव्य संदेश पद्धतीवर खूप भरवसा आहे. तो पलिते, नगारे, रणभेरी व निशाणे यांच्या वापरावर खूप जोर देतो. याशिवाय या वाद्यांचा तो गगनभेदी आवाज व पलित्यांचा झगमगाट यामुळे शत्रूच्या मनात भयसदृश परिस्थिती निर्माण होते.
याचा मथितार्थ हा की, एकाच ध्येयाने व सुसूत्र व प्रमाणित संदेश पद्धतीने, सर्व संभ्रम दूर झालेले सैन्य प्रचंड ताकदवान होते. जोपासले जाण्याने त्यांची ऊर्जा व मनोबल वाढते व ते विजयी होतात.

वचन 8

शत्रूची शक्ती व त्याच्या सेनाधिपतीचे मनोबल यांचा ऱ्हास केला जाऊ शकतो.
सकाळी ऊर्जा अधिक असते व दिवस चढू लागल्यावर ती क्षीण होते.
सायंकाळपर्यंत ती ऊर्जा संपुष्टात येते. म्हणून जे शक्तिप्रयोगात निपुण असतात ते ऊर्जा अधिक असणाऱ्या वेळेस टाळतात व (शत्रूची) ऊर्जा संपुष्टात आल्यावर आक्रमण करतात.

अशा प्रकारे ऊर्जेचे व्यवस्थापन करायचे असते.

कोणत्याही संघर्षाच्या सुरुवातीस तणाव व ऊर्जा उच्चकोटीची असते. युद्धात निपुण नसलेले शत्रू आपल्या आवेगात, भावनेच्या व नकारात्मक ऊर्जेच्या आहारी जाऊन त्वरित हल्ला करण्यास उतावळे होतात. सन त्झु अशा वागणुकीच्या विरुद्ध आहे. एवढेच नव्हे तर अशा शत्रूपासून आकाररहित बनून दूर राहण्याचा सल्ला तो देतो. अशा प्रकारे शत्रूपक्षाच्या सैन्याची शक्ती व सेनापतीचे मनोबल खच्ची करता येते. त्यांच्यावर प्रतिहल्ला चढविण्याऐवजी वा त्यांचा सामना करण्याऐवजी भूमिगत होऊन वा त्यांच्या नजरेपासून दूर होऊन, कोणताही बचाव न करता, केवळ वेळ काढून त्यांना हरविता येते. अशा प्रकारे अनेक दिवस जसे जातील तसतशी त्यांची ऊर्जा कमी होत जाईल. शेवटी गरज पडल्यास एका हतबल व दुर्बल शत्रूवर नाममात्र आक्रमण करून संघर्ष संपवून विजय मिळवता येतो. यात नमूद करण्याजोगी व विस्मयकारक नीती ही की, जसजसे तुम्ही आपली शक्ती जोपासत जाता तसतसा शत्रूच्या शक्तीचा ऱ्हास होत जातो. जेव्हा त्याची शक्ती रसातळाला

जाते तेव्हा तुम्ही आक्रमण करून अथवा न करून, दोन्ही परिस्थितीतसुद्धा विजय मिळवता येतो.
नेता उतावळा झाला तर सैन्याची मानसिकता तशीच करण्यात तो कारणीभूत ठरतो. पुढे जाऊन वैयक्तिक पातळीवरदेखील सैनिक वरील आदेशांची वाट न पाहता आत्मघातकी व स्वतःच्या सैन्यासाठी विघातक सिद्ध होणारे निर्णय घेतात.
समयोचितपणा हा सेनाधिपतीसाठी आवश्यक गुण आहे. आक्रमण म्हणजे नुसता भिंतींवर वा गावांवर हल्ला नाही. त्याने प्रतिपक्षाच्या मनोबलावर हल्ला करून त्याचे मानसिक संतुलन बिघडविले पाहिजे.
वैयक्तिक, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातसुद्धा हे लागू आहे. सबुरी व संयम ठेवल्याने नुकसान तर होत नाहीच, किंबहुना ऊर्जा व शक्तीच वाढते.

वचन 9

तुम्ही शिस्तबद्ध असाल तर शत्रूच्या बेशिस्तीची वाट पाहा
शांत असाल तर गोंधळाची वाट पाहा,
अशा प्रकारे मनावर काबू मिळवा
जवळ असाल तर अंतर वाढण्याची वाट पाहा,
आरामात असाल तर तो थकण्याची वाट पाहा,
तुम्ही भरपेट असाल तर तो उपाशी होण्याची वाट पाहा,
अशा प्रकारे शक्तीचे व्यवस्थापन करा.
सुयोजित झेंडे असलेल्या सैन्यांशी लढाई करू नका.
सुसंघटित रचना असेल तर त्या शत्रूशी लढाई करू नका.
अशा प्रकारे परिस्थिती सांभाळून घ्या.
म्हणून युद्धक्षेत्राचे नियम असे आहेत,
उच्चस्थानावर असलेल्या सैनिकांवर हल्ला करू नका.
त्याची पाठ डोंगराकडे असताना हल्ला करू नका.
खोट्यानाट्या माघारीवर विश्वास ठेवू नका.
खूप शूर पलटणींवर हल्ला करू नका.
शत्रूच्या आमिषास बळी पडू नका.
माघार घेणाऱ्या शत्रूस अडथळा घालू नका
जर तुम्ही शत्रूस घेरा घातलात तर थोडीशी फट सोडा.
कोंडीत सापडलेल्या शत्रूस घायकुतीस आणू नका,
ही युद्धक्षेत्रातील तत्त्वे आहेत.

या आधीच्या अध्यायात विवरण केलेल्या सक्रिय निष्क्रियतेचा ऊहापोह सन त्झुने येथेदेखील केला आहे.
मूलतः शत्रूस जेरीस आणणे, वेळ काढून थकविणे व त्याला संभ्रमित करणे, मेटाकुटीस आणणे अशा नीतींचा येथे उल्लेख आहे. कालांतराने त्याचा क्रोध, आवेश मावळेल व तो बेशिस्त होईल, दूर जाईल, त्याची रसद व शिधा संपल्याने उपाशी होईल व मग स्वतःच तो शरण येईल वा त्याच्या विरुद्ध खूपच कमी बळ वापरावे लागेल, असा हा सिद्धांत आहे, असे हे तत्त्व आहे.
तो शिस्तबद्ध असेल, त्याची रणनीती, व्यूहरचना उत्तम असेल, त्याची संदेशवहनाची पद्धत उत्तम असेल तर त्याच्यापासून दूर राहून तो याउलट वागण्याची व संभ्रमित होण्याची वाट पाहावी, असा सल्ला सन त्झु देतो.
अशा प्रकारे दोन्ही परिस्थितीत युद्ध न करण्याची कारणे त्याला देऊन वा त्याप्रमाणे वर्तन करून संघर्षातील स्वारस्य दूर करण्याची तुमची नीती असावी. तुम्ही त्याला आपल्या मोहिमेचा पुनर्विचार करण्यास भाग पाडण्याची योजना करीत आहात.
पण कित्येकदा तुमच्याहून निपुण, निष्णात, हुशार व कार्यक्षम प्रतिस्पर्धी असला तर? त्यालाही आकारहीन होण्याचे तत्त्व माहीत असले तर व त्याने ते अंगीकारले तर? त्याने तुम्हाला कृती करण्यास भाग पाडले तर? अशा प्रकारे तुमच्याहून अधिक प्रबळ प्रतिस्पर्धी तुम्हाला भेटला, तर त्या परिस्थितीस तुम्ही सांभाळून घेतले पाहिजे. विनाकारण आगेकूच करण्यात, आक्रमण करण्यात अर्थ नाही. येथे वाट पाहा व सबुरी दाखवा.
येथे सन त्झुने व्यावहारिकता दाखविली आहे. विनाकारण एका अगतिक व उतावीळ शत्रूस सामोरे जाणे काय वा आपल्याहून अति निपुण शत्रूपासून बचाव काय, दोन्ही परिस्थितीत सबुरी हा एकच पर्याय आहे. त्याच्या मते आक्रमणास तोंड देणे, थांबविण्याच्या प्रयत्नात ते प्रदीर्घ काळ चालू ठेवणे हा मूर्खपणा आहे. शत्रूने सहिष्णुता दाखविली नाही तरीही आपण पुढाकार घेऊ शकतो व संघर्ष कोणत्याही हानीशिवाय संपवू शकतो.
शेवटच्या चार सल्ल्यात, शत्रूस तुम्ही घेरले असेल तरीही त्याला माघार घेण्यासाठी युद्धभूमीतच नाही तर तुमच्या मनातही जागा द्या. तो जर माघार घेत असेल तर त्याला आडकाठी घालू नका, त्याचा पाणउतारा करू नका, दयाळू भावनेने त्याला समजावून घ्या व संहार होऊ देऊ नका, असा तो पदोपदी सल्ला देतो. यातच त्याच्या संपूर्ण नीतीचा, उदात्त मानसिकतेचा व सहिष्णुतेचा परिचय होतो.
तुम्ही जेवढे बलाढ्य आहात, तेवढेच तुमचे मन मोठे हवे.

अध्याय 7

सशस्त्र संघर्ष

सारांश -

सयुक्तिक रणनीती सर्वांत कठीण आहे.

आपले सैन्य सुस्थितीत ठेवण्यासाठी सेनापतीस खालील गोष्टी ध्यानात ठेवाव्या लागतात,

1) चक्राकार रचनेचे परिवर्तन सरळ वा थेट रचनेत करणे

सर्व दुर्बल परिस्थितीचे परिवर्तन फायद्याच्या स्थितीत करणे.

2) शत्रूचे आगमन होण्याआधी रणभूमीत आगमन व दबा धरून बसणे.

3) संपूर्ण सुसज्ज सैन्य, प्रवास संथपणे करेल. शस्त्रास्त्रे व संसाधने मागे सोडून कूच करण्याने वेग वाढतो; पण सुरक्षितता पणास लागते.

दिवसरात्र कूच करणे व दुर्गम प्रदेशात सैन्यास जावे लागणे, हे प्रत्यक्ष युद्धापेक्षा वाईट आहे.

4) शस्त्रास्त्रे, कुमक, रसद व साधने नसताना युद्धात पराजय होतो.

आजूबाजूच्या, शेजारी प्रांतांच्या राजांशी हितसंबंध वाढवून तेथील लोकांची मदत घेतल्यास प्रदेशाची चांगली माहिती होते. तेथील वाटाड्या प्रदेशाची माहिती देतो.

5) कूटनीती - शत्रूची दिशाभूल करणे, मोक्याच्या जागेवर जाणे, परिस्थितीनुसार सैन्याचे विभाजन व एकजुटीकरण करणे.

वाऱ्याच्या वेगाने, अग्नीच्या भीषणतेने, अरण्याच्या विस्ताराप्रमाणे, पर्वताच्या दृढतेने व अंधाराच्या आकारहीनतेने आक्रमण करावे.

संदेश देण्यात एकसूत्रीपणा व सुसूत्रता आणण्यासाठी, संभ्रमावस्था टाळण्यासाठी नगारे, रणभेरी व निशाणांचा प्रयोग करावा.

शत्रूची ऊर्जा व शक्ती चरमसीमेवर असताना हल्ला करू नये, वाट पाहावी.

शत्रूस घेरले असताना त्याला बाहेर निघण्यासाठी जागा सोडावी.

माघार घेत असलेल्या शत्रूच्या वाटेत अडथळा आणू नये.

सहिष्णुतेस कधीही विसरू नये.

व्यवस्थापनात सल्ला

1) बलाढ्य संस्थांशी संघर्ष करू नये.

2) सबुरी व योग्य नीती वापरावी.

□□□

अध्याय 8
विभिन्न रणनीती

या अध्यायात नऊ रणनीतींबद्दल सांगितले आहे; परंतु या नुसत्याच नऊ प्रकारे वापरल्या जात नसून त्या अगणित प्रकारे वापरल्या जातात व त्यातून निर्माण होणारे विभिन्न प्रकार आहेत. थोडक्यात अर्थ असा की, आपल्याला संघर्षात असंख्य प्रकारे विविधता व सर्जनशीलतेचा वापर करावा लागतो. पुढे जाऊन या नीतींचा वापर नऊ परिस्थितींमध्ये केला आहे.

सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे, जीवनातील अगणित संघर्षाचा व परिस्थितीचा सामना करणे म्हणजे गरजेनुसार स्वतःस सतत बदलणे होय. जुन्या-पुराण्या, कालबाह्य नीतींना कवटाळत बसल्याने पराभवच होतो. नव्या परिस्थितीने घडविलेल्या जगातील नवीन आव्हानांचा व संकटांचा सामना स्वतःस तयार करून करावयाचा असतो. मूळ तत्त्वे तीच वा तशीच असतील. भावनाविवश होऊन निर्णय घेणे, सहिष्णुतेस सोडून वागणे व आधीच्या अध्यायात दिलेली मूळ तत्त्वे सोडून वागल्यास सर्वनाशच होतो.

वचन 1

सन त्झु म्हणतो,

सेनाधिपतीस राज्यकर्त्याकडून आज्ञा मिळतात, मग तो सैन्यास एकत्र करतो, सैन्यास संचलित करतो व तळ ठोकतो.

या आधीच्या अध्यायाप्रमाणेच हा अध्यायदेखील वरील वचनाने सुरू होतो. राजा सेनाधिपतीस आज्ञा देतो. कोणीही एकजण निर्णय घेत नाही. यश वा अपयश कोणा एकट्याचे नसते. जेव्हा सेनाधिपती आपल्या सैन्याची जमवाजमव करतो तेव्हा ते एकमेकांच्या सहयोगाने टाकलेले पाऊल असते.

वचन 2

प्रतिकूल जागेवर तळ ठोकू नये.

चार रस्ते जेथे एकमेकांस जुळतात, तेथे आपल्या दोस्तराष्ट्रांची मदत घ्या.

ओसाड जागी रेंगाळू नका.

घेरले जाऊ शकाल, अशा जागी सज्ज राहा.

प्रतिकूल जागा म्हणजे जेथे झरे, विहिरी इ. पाण्याची व्यवस्था नाही असे ठिकाण, गुरे, शेत, भाज्या व सरपण नाहीत असे ठिकाण होय. अशा ठिकाणी तळ ठोकण्याने दैनंदिन जीवन कठीण होऊन बसते. आधीच्या अध्यायात म्हटल्याप्रमाणे, अन्नधान्य

व रसद यासाठी स्थानिक सामग्रीचा उपयोग केला पाहिजे. त्यांचा अभाव असलेल्या जागी तळ ठोकल्याने सैनिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.
त्याचप्रमाणे अरुंद मार्गांवरून सैन्यास नेऊ नये, चार रस्ते येऊन मिळतात अशा ठिकाणी आपण चहूबाजूंनी घेरले जाऊ शकतो. अशा ठिकाणी दोस्तराष्ट्रांची मदत घेतल्याने आपली स्थिती तेवढी संवेदनशील होत नाही.
यापुढील अध्याय 10 'युद्धभूमीची रचना' व अध्याय 11 'नऊ यद्धभूमी'मध्ये वरील आदेशांचे आणखी विस्तारपूर्वक विवेचन होईल. ही प्रस्तावना त्यासंदर्भात उपयोगी ठरते.
कठीण भूभाग म्हणजे कूच करण्यास दुर्गम, दलदल, खाच-खळगे, काटेकुटे असणारा असा प्रदेश होय. विशेषत: एक चांगला सेनाधिपती अशा प्रदेशातून पायदळ नेण्यास नेहमीच अनुत्सुक असेल. याचप्रमाणे ज्या ठिकाणी आपली कोंडी होऊ शकते, जेथे आपल्या हालचालींवर प्रतिबंध येऊ शकतो, जेथे मदत मिळणे अशक्य होईल, अशा ठिकाणी तळ ठोकू नये.
जो प्रदेश अनोळखी असेल म्हणजे जेथे चार विभिन्न ठिकाणांहून मार्ग येऊन मिळतात व तीन वेगळ्या दिशांतून हल्ला होण्याची शक्यता आहे, तेथे मित्रपक्षांची मदत घेतल्याने त्या प्रांताच्या अनोळखीपणावर मात करता येते.

वचन 3

काही विशेष परिस्थितीत आक्रमण करू नका व दुर्गम स्थानावर लढा द्या.
काही मार्ग आक्रमू नका.
काही विशिष्ट सैन्यावर हल्ला करू नका.
काही विशिष्ट गावांवर (किल्ल्यासमान रचना असणाऱ्या) कब्जा करू नका.
काही स्थळे जिंकण्याची चढाओढ लावू नका.
काही वेळा आज्ञा पाळायच्या नसतात.

शत्रू रस्त्याच्या कडेपर्यंत तुम्हाला ढकलू शकतो, मग तुम्ही कोठेच जाऊ शकत नाही. शक्यतो अशा दुर्गम स्थानावर अडकू नका व आक्रमण करू नका; पण अशी वेळ आली, तर मात्र या मरणासमान युद्धभूमीवर निकराचा लढा द्यावाच लागेल.
काही जागा, काही मार्ग, काही सैन्य, काही गावं, काही युद्धक्षेत्रे अशी असतात की, जी टाळलेलीच बरी. येथे युद्ध करण्याचे आयोजन केल्यास नेहमीपेक्षा अधिकच नव्हे, तर प्रमाणाबाहेरही नुकसान होऊ शकते. या आधीची चर्चा लक्षात घेतली तर सन त्झु शक्यतो संघर्षाचे रूपांतर प्रत्यक्ष युद्धात होईल अशी अनेक क्षेत्रे, भूभाग व प्रांत टाळण्याचाच पुरस्कार करतो. म्हणूनच एवढे सविस्तर वर्णन दिले आहे. या

सूचना प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. नैतिकदृष्ट्या अशी अनेक बंधने घालून तुम्हाला तुमच्या निर्णयाचे पुन्हा पुन्हा परीक्षण करण्यास तो भाग पाडत आहे.
एवढेच नाही जर वस्तुस्थिती पाहिली व खरोखरच हल्ला केला तर विनाकारण तुमच्या सैन्यास संकटाला सामोरे जाण्यास तुम्ही भाग पाडत आहात.
चँग यु (चिनी सेनापती) हेदेखील म्हणतो की, हल्ला केल्यावर कोणतेही गाव, तुम्ही तुमच्या आधिपत्याखाली ठेवू शकणार नाही अथवा त्याच्याकडे लक्ष देणे तुम्हाला शक्य होणार नाही अथवा त्याला तसेच काबीज न करता सोडले तर, कुठलाही त्रास होणार नसेल तर त्यावर हल्ला करू नका. ट्युरेन (फ्रेंच युद्धशास्त्रज्ञ) देखील हेच म्हणाला आहे. तो म्हणतो, 'एखादे छोटेसे; पण दुर्गम ओसाड गाव काबीज करण्यात सैन्यबळ वाया घालविणे, हा मूर्खपणा आहे. कारण तेवढ्याच खर्चात आपल्याला एक अख्खा प्रांत जिंकता येईल.'
आता या वचनातील शेवटच्या वचनाची चर्चा करूया. ते वरकरणी खूप वादास्पद वाटते.
चिनी भाषेत 'अधिकार' यावर एक म्हण आहे वाई लियाओ त्झु हा तत्त्ववेत्ता म्हणतो, 'शस्त्रास्त्रे म्हणजे काय- गोणीभर उपकरणे. संघर्ष सद्गुणाच्या विरुद्ध आहे व सेनाधिपती म्हणज़े मुलकी जीवनशैलीचा विपर्यास आहे.' पण तरीही कठीण परिस्थितीमध्ये राजाज्ञेची अवहेलना करून सेनाधिपतीस काही निर्णय घ्यावे लागतील व ते त्याने घ्यावेत.
या वचनात सन त्झु चीनच्या आज्ञाधारक संस्कृतीपासून व सार्वभौमत्वाच्या कल्पनेपासून दूर जात आहे. सैन्याच्या संरक्षणासाठी व हितासाठी काही वेळेस त्या स्थानावरील परिस्थितीनुसार, आज्ञेचे उल्लंघन करणे गरजेचे असू शकते. यामुळे परिस्थितीनुसार, त्या परिस्थितीस पोषक असा स्वाभाविक व नैसर्गिक निर्णय घेण्यात सैनिकाने, सेनाधिपतीने कचरू नये. मात्र हा निर्णय सर्वांचे हित लक्षात घेऊन घेण्यात यावा, एवढेच!

वचन 4

म्हणून ज्या सेनाधिपतीस या नऊ परिवर्तनांचे सखोल ज्ञान असते त्याला सैन्य कसे वापरायचे हे माहीत असते.
जर त्याला या नऊ परिवर्तनांचे महत्त्व माहीत नसेल; पण तेथील भूभागाचे उत्तम ज्ञान असेल, तरीही तो त्या ज्ञानाचा फायदा करून घेऊ शकणार नाही.
जो सैन्याचे आधिपत्य करतो, ज्यास पाच तत्त्वांची उत्तम जाण असते, पण ज्यास ही परिवर्तनाची नऊ तत्त्वे माहीत नाहीत, तो आपल्या सैन्याचा पुरेपूर उपयोग करून घेऊ शकणार नाही.

म्हणून एक चाणाक्ष सेनाधिपती आपल्याला असणारे फायदे व नुकसान या दोन्हींसही पडताळून पाहतो.

फायदे पडताळून तो आपला अंदाज अचूक बांधतो व नुकसान पडताळून तो आपल्या अडचणी दूर करतो.

याचा शाब्दिक अर्थ घेतला तर 'फायदा घेणे' म्हणजे नुसते मोक्याच्या जागी असणे एवढेच नसून, तेथील नैसर्गिक घटकांचा व परिस्थितीचा पुरेपूर उपयोग करून घेणे असा आहे. प्रत्येक भूभाग आपल्या वैशिष्ट्याने ओळखला जातो व त्या वैशिष्ट्यानुसार आपली योजना बदलण्यास आपल्याला वाव मिळतो. आपल्या सर्जनशील विचारशक्तीशिवाय या नैसर्गिक घटकांचा आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेणे, कसे शक्य आहे?

आता ज्या पाच तत्त्वांचा उल्लेख केला आहे ती तत्त्वे पाहूया :

1. सर्वांत कमी लांबीच्या रस्त्याने जावे.
2. एकटे पडलेल्या सैन्यावर हल्ला करावा.
3. तुमच्या मोहिमेस खूप धोकादायक व त्रासदायक ठरणाऱ्या गावाला काबीज करावे.
4. एखाद्या जागेवर आक्रमण करण्याचा प्रयत्न करावा.
5. राजाच्या आज्ञा सैनिकी कारवाईस पूरक असतील, तर त्यांचे पालन करावे.

पण काही परिस्थितीत सेनाधिपतीस या पाच निर्देशांचे, मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करता आले नाही, तर त्याने या नऊ व त्याहून शक्य होणाऱ्या अगणित संभाव्य मार्गांचा अवलंब केला पाहिजे. उदा. एखादा रस्ता सर्वांत जवळचा असला, त्यावर शत्रूने खंदक खणले असतील वा स्फोटक पेरून ठेवले असेल तर तो त्याने टाळला पाहिजे.

याशिवाय पहिल्या अध्यायामध्ये आलेली पाच तत्त्वे अशी -

(या तत्त्वांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कारण या अध्यायात ज्या पाच तत्त्वांबद्दल तो बोलत आहे ती वर दिली आहेत; पण मूळ पुस्तकात पाच तत्त्वे खरोखरीने कोणती, यात संदिग्धता आहे)

एक : मार्ग अथवा नीती, दोन : स्वर्ग/अध्यात्म, तीन : धरती/भूमी, चार : नेतृत्व, पाच : नियम.

यासंदर्भात आता विचार केल्यास -

फक्त या तत्त्वांचा वापर करणे फोल आहे, असे सन त्झु या अध्यायात म्हणत आहे. तुमची परिस्थिती रातोरात बदलली तर? फक्त वरील पाच तत्त्वांच्या आधारावर केलेले विश्लेषण व योजना टिकणार नाहीत.

मथितार्थ हा की, प्रस्थापित तत्त्वांचाच नुसता वापर न करता अप्रचलित वैविध्याचा वापर करणारा सेनाधिपती आपल्या सैन्याचा उत्तम उपयोग करू शकतो.

वचन 5

अपेक्षेत सुधारणा केली तर आपल्या योजनेत यश मिळू शकते.
याशिवाय अडचणीत व संकटात असतानासुद्धा आपला फायदा कसा होईल याचा विचार करीत राहिलो, तर आपल्यावर येणारे संकट टाळू शकतो.
शत्रुपक्षाच्या अधिकाऱ्यांना नुकसान पोहोचवून त्यांची संख्या कमी करा व अशा प्रकारे त्यांना त्रास द्या.
त्यांना अशा प्रकारे गुंतवून ठेवा,
त्यांच्या समोर आकर्षक प्रलोभने ठेवा; ज्यामुळे ते त्या दिशेने धाव घेतील.

समजा मला एका धोकादायक स्थितीतून बाहेर यावयाचे असेल तर मला शत्रू कसे घायाळ करू शकेल एवढाच विचार मी करून चालणार नाही. मी त्याच्यावर कशा प्रकारे वर्चस्व गाजवू शकेन, हा विचारदेखील माझ्या मनात नेहमी हवा. माझ्या मनात मी सुज्ञपणे या दोन्ही संकल्पना अमलात कशा आणायच्या, याचे योग्य विश्लेषण व त्याप्रमाणे आयोजन केले, तर मी स्वत:स या परिस्थितीतून यशस्वीपणे बाहेर काढू शकेन.

शत्रुपक्षाच्या अधिकाऱ्यांना नामोहरम करण्याचे काही मार्ग म्हणजे शत्रूतील निष्णात सल्लागार व धुरंधरांना फितूर करा. त्या देशात तोतया व विश्वासघातकी लोकांना घुसवा. शत्रूच्या मंत्र्यांना फसवा व त्यांचे मनोधैर्य व निष्ठा यावर हल्ला करा. त्यांना नजराणे व इतर प्रलोभने दाखवा.

ज्यामुळे ते आपल्या कर्तव्याला विसरून जातील व निष्क्रिय होतील.

वचन 6

म्हणून शेजारच्या राजांना अनेक प्रकारे सतवा, त्यांना सदैव गुंतवून ठेवा, त्यांना आपला फायदा कसा होईल, हे शोधण्यासाठी सळो की पळो करा.
म्हणून युद्धक्षेत्रातील नियम याप्रमाणे आहेत,
शत्रूच्या न येण्यावर विसंबू नका; पण आपल्या त्याच्या विरुद्धच्या तयारीवर भरवसा ठेवा.
शत्रू आपल्यावर हल्ला करणार नाही, या भ्रमात राहू नका तर आपल्या अजेय स्थितीवर अवलंबून राहा.

येथे आजूबाजूच्या राजांनी आपल्यावर संकट आणू नये यासाठी काय करायचे, याबद्दल सन त्झु सांगत आहे.

त्यांना गुंतवून ठेवल्याने ते तुमच्याकडे वळणार नाहीत. थोडक्यात म्हणजे त्यांच्या राज्यात गनिमी काव्याने अराजकता माजवा.
युद्धात स्वतःकडे व स्वतःच्या तयारीकडेही लक्ष द्या. नुसतेच शत्रूच्या चुकांवर विसंबून राहू नका.

वचन 7

खालील चुका कोणत्याही सेनाधिपतीसाठी घातक सिद्ध ठरू शकतात.
1) बेदरकार व निष्काळजी असलेला सेनाधिपती मारला जाऊ शकतो.
2) जो भ्याड असतो, तो काबीज होऊ शकतो.
3) जो शीघ्रकोपी असतो, त्याचा अपमान होऊ शकतो. (यामुळे तो डिवचला जातो.)
4) जो नीतिमत्तावान असेल त्याला लाजविता येते.
5) ज्याचे आपल्या प्रजेवर अतोनात प्रेम असते, त्याला काळजीत टाकता येते.
जर सेनापतीमध्ये हे दोष असतील तर युद्धात ते घातक ठरतात.
या कारणांमुळे कोणत्याही सैन्याचा नाश व सेनाधिपतीच्या मृत्यू होतो.
त्यांचे विश्लेषण केलेच पाहिजे.

काळजी न घेता व पुढचा-मागचा विचार न करता शौर्य दाखविणे काय कामाचे? याला बेदरकारपणा असे म्हणतात. तो धुंद झालेल्या वा चवताळलेल्या बैलासारखा आंधळेपणाने धडक देतो. अशा शत्रूचा पाशवी बळाने विरोध न करता त्याला कोपऱ्यात जेर करावे व अन् मग मारावे. सेनाधिपतीचे गुण जाणून घेताना लोक फक्त त्याच्या धैर्यास प्राधान्य देतात; पण धैर्यवान असणे हा सेनाधिपतीचा एकच गुण नाही. शूर माणूस मुत्सद्दी नसला तर तो स्वतःच्या शौर्यास अवाजवी महत्त्व देतो व पराक्रम गाजविताना भावनाशील होतो. अशा प्रकारे हेकेखोरपणे वागणाऱ्या माणसाची आपण निर्भर्त्सना केली पाहिजे. मरणास तयार असणे म्हणजे शौर्य नव्हे, ते आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे.
यानंतरच्या ओळीत उल्लेख झालेला भ्याड माणूस याचा अर्थ जो पुढे जाऊन फायदा घेण्यास कचरतो असा माणूस होय. एवढेच नाही तर तो धोका पत्करायला तयार नसतो, ठरल्या जागी तो अस्थिर राहून पुढील विचार न करता पळून जातो. जिवंत परत येणे हे त्याचे एकमेव उद्दिष्ट असते. तो कुठल्याही प्रकारचा धोका घेत नाही; पण युद्धात सुनियोजित धोका घेतल्याशिवाय चालत नाही. जो अशा प्रकारचा धोका न घेता आपल्या हातातील संधी दवडतो, तो पुढे संकटास निमंत्रण देतो.
यानंतरच्या ओळीत शीघ्रकोपी सेनाधिपतीचा उल्लेख आहे. इ.स. 357 मध्ये याओ हिसंग व ह्युआंग मेई यांच्यातील युद्धात ह्युआंग मेईचा सेनापती शीघ्रकोपी आहे हे याओ हिसंग याच्या सेनापतीस माहीत होते. तो आपल्या किल्ल्यात लपला होता.

त्याला त्यांनी भडकविले, तो रागावून बाहेर आला व अपमानाने आणखी पेटून त्याने तयारी नसताना हल्ला केला व त्यात हरला.
यानंतरच्या ओळीत सन त्झुने नीतिमत्तेच्या अतिरेकाबद्दल सावधान केले आहे. याचा अर्थ असा नाही की, नीतिमत्ता असणे हा एक दोष आहे; पण अकारणपणे व खोडसाळपणे सेनाधिपतीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणाऱ्या व पसरविल्या जाणाऱ्या बातम्यांकडे त्याने लक्ष देऊ नये. जर तुम्हाला वैभव व विजय प्राप्त करायचा असेल तर अशा गोष्टींकडे लक्ष देऊ नये. ही तुमच्या शत्रूची चाल असू शकते.
यानंतरच्या ओळीत आपल्या सैनिकांवर अवाजवी प्रेम असणे व त्यांचा कळवळा असणे, यावर तो वक्तव्य करतो. आपले मुख्य कर्तव्य काय आहे हे विसरून आपल्या प्रजेवर म्हणजे सैनिकांवर, त्यांच्या प्रत्येक अडचणीकडे अवाजवी लक्ष देणे व त्यांना बाबा पुता करणे (ज्याला इंग्रजीत appeasement) म्हणतात, ते करणे म्हणजे त्या सैनिकांना कोते बनविणे आहे. सेनाधिपतीने सैनिकांची काळजी घेऊ नये असा याचा अर्थ नाही; पण आपल्या सैनिकांच्या सुख-सुविधांसाठी एखादी महत्त्वाची; पण अवघड मोहीम सोडून देणे मात्र हानिकारक असते. ही अल्पकालीन धोरणे आहेत. कारण अशा धोरणांमुळे पराभव झाल्यावर याहून अधिक त्रास होऊ शकतो. क्षणिक कष्टामुळे व्यथित झाल्याने सेनापतीने जर त्यांच्याकडून काम करवून घेण्यात हयगय केली, तर ते घातक ठरते. याऐवजी त्याने अलिप्तपणाचे प्रदर्शन केले पाहिजे व त्यास सहानुभूतीची जोड दिली पाहिजे. गरज पडेल तेथे कठोर होणे, आवश्यक आहे.
आता या पाचपैकी तीन सिद्धांत तर सरळसोट आहेत. शेवटचे दोन सिद्धांत थोडे वादग्रस्त होऊ शकतात; पण युद्धजन्य व संघर्षमयसंदर्भात अवास्तव नीतिमत्ता (Holier than Pope) व लोकांवर विलक्षण प्रेमाचा अतिरेक करू नये म्हणून दिलेली, ही चेतावनी आहे.
आपल्या आततायी, शीघ्रकोपी, भ्याड व शिथीलपणामुळे आपल्या राष्ट्राला पराभव पत्करण्यास कारणीभूत झालेल्या सेनापतींच्या उदाहरणांनी इतिहास भरलेला आहे. म्हणून सेनापतीने वरील पाच कारणांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, अन्यथा सन त्झु म्हणतो त्याप्रमाणे त्याचा किंवा त्या राष्ट्राचा मृत्यू अटळ आहे.

अध्याय 8

विभिन्न रणनीती

सारांश -

1) सेनाधिपतीस वैविध्याचे महत्त्व ठाऊक असणे आवश्यक आहे.
2) दुर्गम जागी तळ ठोकू नये.
3) ओसाड जागी रेंगाळू नये.
4) डोंगराळ, सखल भागात राहू नये.
5) घेरले गेले असताना निकराची लढाई केली पाहिजे व आपली स्थिती नाजूक असली, तरी आपली बलस्थाने वापरून फायदा करून घ्यावा.
6) तुम्ही अजेय आहात असे तुम्हाला वाटले व वस्तुस्थिती तशी असली तरीही गाफील राहू नका.

सेनाधिपतीच्या पाच जीवघेण्या चुका

1) बेदरकारपणा व निष्काळजीपणा
2) भ्याडपणा
3) शीघ्रकोपीपणा
4) नीतिमत्तेचा अतिरेक
5) प्रजेवर अतोनात व अवाजवी प्रेम

व्यवसायात उपयोग

1) वस्तुनिष्ठ राहा.
2) आपली रणनीती बदलत राहा
3) सेनाधिपतीस दिलेला, पाच चुका टाळण्याचा सल्ला येथेही तंतोतंत लागू आहे.

□□□

अध्याय 9
सैन्याचे डावपेच

दुर्गम प्रदेशात व कारस्थानी शत्रूंचा सामना करताना वापरण्यात येणाऱ्या युक्त्यांना 'सैन्याचे डावपेच' असे म्हणतात. एकदा त्या दुर्गम परिसराशी व तेथील अडचणींशी तुमचा परिचय झाला व तेथे वापरण्यात येऊ शकणाऱ्या युक्त्यांचा परिचय झाला की मग त्याप्रमाणे आपली रणनीती बनवू शकता. या अध्यायात सन त्झु आपल्याला त्या दुर्गम प्रदेशातील कुठल्या बाबींना समजून घ्यायचे, तेथे कोणती काळजी घ्यायची तसेच शत्रूच्या बाह्य स्वरूपापलीकडे जाऊन त्याची खरी ओळख कशा प्रकारे करून घ्यायची, त्यानुसार आपण कसा सामना करून त्याची खरी मोहीम कशा प्रकारे हाणून पाडायची, याबद्दल सल्ला देत आहे.

वचन 1

सन त्झु म्हणतो,
सर्वसामान्यपणे सैन्याची आखणी करताना व शत्रूची पाहणी करताना,
पर्वत ओलांडताना, दरी असलेल्या प्रदेशाजवळ राहा.
उंच प्रदेशावर राहून निरीक्षण करा व सूर्यप्रकाश असलेल्या बाजूकडे तोंड करा.
जर शत्रू तुमच्याहून जास्त उंचीवर असेल, तर वर चढत जाऊन त्याच्याशी लढाई करू नका.
अशा प्रकारे पर्वतभागामध्ये सैन्याची रचना करा.

याचा अर्थ असा की, ओसाड माळरानात न राहता पाणी व गवत असलेल्या दरीसारख्या प्रदेशाजवळ तळ टाका. उंच जागी रहा. याचा अर्थ खूप उंच पर्वतांवर असा नसून टेकड्यांवर असा आहे. तुमचे तोंड पूर्वेकडे हवे.

पर्वत म्हणजे सैन्यासाठी असलेले एक आव्हान आहे. विनाकारण घाटात खूप मेहनत करून कूच करण्यापेक्षा सखल भागात राहून त्याला फेरा घालून ओलांडू शकता. सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे, विनाकारण दमछाक करण्याने प्रगती होत नाही. एखाद्या कठीण समस्येस सरळ हात घालण्याने, झगडण्याने, तिच्याशी झुंझण्याने मार्ग सापडतोच असे नाही. याची तुलना उंच जागी बसलेल्या शत्रूशी करण्यात आलेली आहे.

आपले ठिकाण उंच जागी शोधण्याने खाली असलेल्या शत्रूची हालचाल स्पष्टपणे पाहता येते. उतरणीमुळे शत्रूचा हल्ला मंदावतो. त्याला आक्रमण करता येत नाही.

आपले तोंड सूर्याकडे असल्याने शत्रूच्या पाठीमागे सूर्य असतो व त्यामुळे समोरच्या उतरणीवर असलेला सूर्य त्याला पूर्ण प्रकाशात आणतो व आपल्याला दूरवर दिसते. तुम्ही कोठेही असलात तरीही तुम्हाला शत्रूचा ठावठिकाणा स्पष्टपणे दिसला तरी पाहिजे किंवा माहीत तरी असला पाहिजे. वर चढत जाऊन, नैसर्गिक आपत्तींना तोंड देत हल्ला कधीही करू नये.

वचन 2

नदी पार केल्यावर, तिच्यापासून खूप दूर रहा.
जर शत्रू नदी पार करीत असेल, तर त्याला पाण्यामध्ये भेटू नका.
जेव्हा त्याच्या अर्ध्या सैन्याने नदी पार केली असेल, तेव्हा हल्ला करणे फायद्याचे ठरते.
जर तुम्हाला शत्रूशी लढाई करायची असेल, तर तुमच्या सैन्यास पाण्याजवळच्या भागात शत्रूस सामोरे करू नका.
सूर्यप्रकाशाकडे तोंड करून पाण्याच्या वरच्या भागाजवळ रहा, पाण्याच्या खालच्या भागात राहू नका.
अशा प्रकारे नदीजवळील प्रदेशात सैन्याची ठेवण करा.
दलदल व ओल असलेली जमीन ओलांडताना लवकरात लवकर त्यातून बाहेर पडण्याची धडपड करा, तिथे रेंगाळत राहू नका.
जर दलदल व ओल असलेल्या जमिनीवर युद्ध करायचे झाले तर जवळपास गवत असलेल्या व तुमच्या पाठीमागे झाडे असलेल्या जागी राहा.
अशा प्रकारे दलदल व ओल असलेल्या प्रदेशात सैन्याची ठेवण करा.
सखल प्रदेश आरामात पार करता येईल.
तुमच्या उजव्या बाजूस उंच जमीन असेल अशा ठिकाणी सैन्यांची ठेवण करा.
धोकादायक प्रदेश पुढे असू द्या व सुरक्षित भाग तुमच्या मागे.
अशा प्रकारे सखल प्रदेशात सैन्याची रचना करा.

नदी सैन्य व त्याच्या शक्तीचे विभाजन करते.

यासंदर्भात एक रोचक; पण प्रत्यक्ष घडलेली घटना आहे.

एकमेकांचे शत्रू असलेली दोन सैन्ये नदीच्या दोन काठांवर होती. एका रात्री एका सेनापतीने आपल्या सैनिकांना नदीच्या वरच्या बाजूला रेती भरलेली दहा हजार पोती टाकून एक पूल बांधण्यास सांगितले. मग आपले अर्धे सैन्य नदीत पाठवून त्याने शत्रूवर हल्ला केला; पण थोड्या वेळाने आपण हरलो असे सोंग करीत तो नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर आला. या अनपेक्षित विजयामुळे शत्रुपक्ष खूप आनंदी झाला. त्याला भ्याड म्हणू लागला व नदी ओलांडू लागला. परत आलेल्या सेनाधिपतीने

रेतीची पोती काढण्यासाठी आपल्या सैनिकांना वरच्या बाजूला पाठविले व अचानक पाणी सोडले. यामुळे पाण्यातील सैनिक तर वाहून गेलेच; पण त्याबरोबर उरलेले सैनिकसुद्धा नदी पार करू शकले नाहीत. नदीत सापडलेल्या उरल्या-सुरल्या सैनिकांचा त्याने नायनाट केला. समोरच्या किनाऱ्यावरील उरले-सुरले सैनिक सैरावैरा पळून गेले.

पाणी खालच्या दिशेने वाहत असते. आपण आपला तळ खालच्या बाजूला टाकू नये. कारण शत्रू वरच्या झडपा उघडून आपल्याला पुरात वाहवू शकतो. नदीतील युद्धात आपण पाण्याच्या विरुद्ध दिशेने कूच करू नये. याचा अर्थ हा की, शत्रुपक्षाच्या उंचीहून कमी उंचीवरील ठिकाणावर आपण थांबू नये. कारण प्रवाहाचा फायदा करून घेत तो आपला नायनाट करू शकेल. दुसऱ्या काही विश्लेषकांनी हेही म्हटले आहे की, शत्रू पाण्यात विष कालवून आपल्या खालच्या बाजूला असल्याने त्या पाण्याने मारू शकतो.

नदीच्या क्षेत्रात युद्ध झाले, तर सन त्झु हा सल्ला देतो.

दलदल व ओल असलेला प्रदेश सैन्यास गडबडून टाकतो. त्यातल्या त्यात गवत असलेल्या प्रदेशात त्यांना हालचाल करताना धरायला काहीतरी मिळते व गवताचा पाया असलेली जमीन त्यातल्या त्यात घट्ट असते, तसेच झाडे असलेला प्रदेश सैनिकांना दडवू शकतो.

सखल प्रदेशात तुमच्या उजव्या बाजूस उंच प्रदेश असू द्या व धोक्याचा प्रदेश तुमच्या समोर. अशा प्रकारे तुमच्या वर किंवा पाठीमागून हल्ला होऊ शकणार नाही.

सन त्झुने दलदल व ओल यांची उपमा देऊन किचकट प्रसंगांशी त्यांची तुलना केली आहे. यात गवत व झाडे यांचा उल्लेख करून असा दुर्गम प्रश्नसुद्धा कसा सोडवता येतो, हे सांगितले आहे.

उदा. तुम्हाला एखादा किचकट प्रश्न सोडविताना सतत अपयशच पदरी पडत असेल, तर हताश होऊन कपाळाला हात लावून बसायचे नसते. त्याऐवजी परिस्थिती बदलून (गवत व झाडाप्रमाणे) प्रयत्न करायचा असतो. आपले पूर्वग्रह व भ्रामक कल्पना सोडून द्यायच्या असतात. आपले मूलभूत सिद्धांत बदललेल्या परिस्थितीत काळाची आव्हाने पेलू शकतात का, हे पहायचे असते. अशा प्रकारच्या आत्मनिरीक्षणाने तुमचे वर्तमान व भविष्यकाळातील संकट दूर करता येते.

जेव्हा आपत्काल वा संघर्षाचा सामना आपण करतो तेव्हा आपल्या पुढील संकटांचा विचार करावा. मागे होऊन गेलेल्या घटनांचा विचार केल्याने विमनस्कताच पदरी पडते.

वचन 3

पीत (पिवळ्या) प्रांताच्या सम्राटाला फायद्याच्या चार स्थानांनी चार अधिपतींचा पराजय करण्यास मदत केली.
सर्वसाधारणपणे सैन्यास उंच जागी राहावयास आवडते व खालच्या भागात राहायला आवडत नाही, त्याला सूर्यप्रकाश असलेली बाजू मूल्यवान वाटते. सावली असलेली बाजू ते टाळतात. आपल्या तब्येतीचे रक्षण करतात व अन्नधान्य असलेल्या जागी राहतात व अगणित व्याधी टाळतात.
या घटकांचा अर्थ आहे विजय.
जेथे पर्वत व पाण्याचा भरणा असतो, तेथे तुमचे सैन्य सूर्यप्रकाश असलेल्या जागी तुम्ही ठेवायला हवे. पर्वत आणि पाण्याचे भराव तुमच्या उजवीकडे हवेत.
हे सैन्यास फायद्याचे ठरते.
भूमीचा वापर स्वतःच्या मदतीसाठी करून घ्या.
सन त्झु म्हणतो की, दूरवर पाहू शकण्यासारखे काही निश्चित फायदे असल्यामुळे उंच भागावर राहणे सैन्यास आवडते. खालील भाग दुर्गम, दलदलीचा व ओलीचा असतो. तो आरोग्यास हानिकारक असतो. तेथून युद्ध करणे मुश्किलीचे असते. सेनाधिपतीस आपल्या सैनिकांच्या स्वास्थ्याची काळजी असेल तर तो सैनिकांस कोरड्या जागी ठेवेल. कारण कोरड्या हवेत रोगराई पसरत नाही.
सन त्झु म्हणतो की पर्वत, नद्या, दलदली व ओल, उंच सखल भाग यासारख्या अडचणी असल्या तरीही या चार ठेवणींचा उपयोग करून अशा विपरीत परिस्थितींचा सामना करणारा सेनापती सैन्याचे मनोबल उच्च पातळीवर ठेवू शकतो. यामुळे संघर्ष कठीण असो वा सोपा असो, सद्य:स्थितीत आपल्याला अनुकूल परिस्थितीत कसे आणायचे व सुरक्षित कसे राहायचे, हे या चार सूत्रांतून स्पष्ट करण्यात आले आहे.
चिनी इतिहासकारांनुसार, पीत प्रांताचा सम्राट इ.स.पू.2697 ते 2597 या कालात राज्य करीत होता. त्यानेच मार्शल आर्ट्सचा शोध लावला. त्याने पूर्वेतील हरित सम्राट, पश्चिमेतील श्वेत सम्राट, दक्षिणेतील लाल सम्राट व उत्तरेतील काळ्या सम्राटांचा पाडाव करून सार्वभौमत्व प्राप्त केले. त्याचा येथे उल्लेख करताना सन त्झु म्हणतो की, त्याने चारी दिशांवर आधिपत्य मिळवताना सर्व प्रकारच्या भूभागातून, दुर्गम प्रदेशातून मोहीम गाजवत विजय मिळवला व त्या या चार ठेवणी आहेत.
या चार ठेवणींचा वापर केल्याने निश्चितच तुम्ही विजय मिळवाल व आपल्या सैन्यास सुरक्षित ठेवाल. कदाचित हा विजय लगेच मिळणार नाही; पण जसजसे तुम्ही या ठेवणींचा वापर कराल तसतशी तुमची मोहीम यशस्वी होईल व भूभागाचा तुमच्यावर प्रभाव पडणार नाही.

सामान्य जीवनातही प्रत्येक परिस्थितीचे निरीक्षण सकारात्मकपणे केले तर त्यातून निश्चितपणे मार्ग सापडू शकेल.

वचन 4

मुसळधार पावसाने जेव्हा नदी दुथडी भरून वाहत असेल व त्यावर खूप फेस आला असेल तेव्हा पूर ओसरेपर्यंत वाट पाहा

ज्या प्रदेशात अचानक दिसणारे उंच सुळके असतील व त्यांच्या मध्यभागी रौद्र रूप धारण करून वाहणारे पाण्याचे स्रोत असतील, खोल नैसर्गिक डोह असतील, चिंचोळ्या व अरुंद जागा असतील, दाट जाळ्या असलेले जंगल असेल, दलदल असेल, खंदारे असतील तर अशा ठिकाणांहून ताबडतोब तळ हलविला पाहिजे किंवा अशा ठिकाणी जाऊच नये.

याच संदर्भात तो हे म्हणतो,

(जेथे घळी व खिंडी असतील, स्वर्गाच्या विहिरी असतील, स्वर्गाचे तुरुंग (सापळे) असतील, स्वर्गाचे जाळे असेल, स्वर्गाचे बोगदे असतील, स्वर्गाचे दार असेल तर अशा ठिकाणाहून तुम्ही त्वरित बाहेर पडले पाहिजे.)

अशा ठिकाणाहून स्वतःस दूर ठेवावे; परंतु शत्रूस अशा ठिकाणी जाण्यास भाग पाडावे. आपण त्याला सामोरे जाऊ, तेव्हा आपली पाठ अशा प्रदेशांकडे असावी.

जेथे गेल्यास कोणीही संकटात पडेल, अशा सर्व दुर्गम प्रदेशांचे सन त्झु वर्णन करीत आहे. चोहोबाजूने घेरलेला व खाली पाणी असलेला भाग, तीन बाजूला सुळके असलेला (जाण्यास सोपा; पण बाहेर निघण्यास कठीण असा), खाली पानवेलींचे जाळे असलेला, घोडदळ व पायदळ न नेण्यासारखा, खंदारे असलेला असा हा प्रदेश असतो. या सर्व नैसर्गिक घटकांचा स्वतःच्या विजयासाठी कसा फायदा करून घ्यायचा, हे सन त्झु सांगत आहे.

येथे नमूद करण्यासारखे आहे की, आता सेनाधिपतीने आपल्या सैन्यास खरोखर युद्धात उतरविले असून अजूनही स्वतः हातघाई न करता नैसर्गिक आपत्तीचा फायदा घेऊन युद्ध कसे जिंकायचे, याचे तो सविस्तर निर्देश देत आहे.

मुसळधार पाऊस म्हणजे अचानक आलेली नैसर्गिक आपत्ती अथवा आयुष्यात अचानक आलेले संकट होय. याचा सामना करताना त्याची तीव्रता कमी होण्याची वाट पाहा, हा सल्ला तो देत आहे. कारण आपत्कालात आपली विवेकशक्ती क्षीण होते व चरमसीमेची परिस्थितीदेखील बिकट असते. म्हणून संयम बाळगून काही काळ वाट पाहणे श्रेयस्कर ठरते. तुम्हाला चवताळलेल्या शत्रूचा वा वाघाचा सामना करायचा असेल, तर ती वेळ टाळणे केव्हाही सुज्ञपणाचे ठरेल.

भूभागाच्या वेगवेगळ्या प्रदेशांचे वर्णन करताना सन त्झुने कल्पकता दाखविली आहे.

तो म्हणतो,
(जेथे घळ व खिंडी असतील, स्वर्गाच्या विहिरी, स्वर्गाचे तुरुंग, (सापळे), जाळे, बोगदे किंवा स्वर्गाचे खंदार असेल तर अशा ठिकाणाहून तुम्ही त्वरित बाहेर पडले पाहिजे.)
या सर्व भूभागात हालचाल करणे अशक्य असते. सैन्य व सैनिक या प्रदेशात आले, तर अडकून पडू शकतात. या सर्वांना तो 'स्वर्गाचे' असे नाव देतो. कारण हे सर्व भूभाग ईश्वरी असतात, यावर आपला प्रभाव नसतो. दुर्दैवाने येथे जावे लागले, तर ताबडतोब बाहेर तरी निघावे वा आधी माहिती असेल तर तेथे जाऊच नये. आपल्या आयुष्यातसुद्धा अशा अनेक परिस्थिती किंवा दुर्धर आजार असू शकतात, ज्यांना टाळण्यासाठी ते कसे होतात हे जाणून घेणे श्रेयस्कर असते व झाल्यास त्यांच्यावर त्वरितपणे इलाज करून त्यातून बरे होणे, हाच एक मार्ग असतो.
शेवटी तो म्हणतो की, या परिस्थितीत शत्रूस कसे अडकवायचे हे ठरविले, तर ही दुर्गम स्थिती तुमच्या यशाचे कारण बनू शकते.

वचन 5

तुमच्या तळाच्या जवळपास डोंगराळ प्रदेश असेल, पाणथळीचे गवत असेल, बोरू दलदल असेल किंवा पाळामुळांची बेफाम वाढलेली झाडे असतील, तर त्यांना काळजीपूर्वकपणे साफ करा.
कारण अशा जागीच दबा धरून हल्ला करणारे लोक व लपून हेरगिरी करणारे हेर बसलेले असतात.
शत्रू जवळच व गप्प असेल, तर तो आपल्या ठिकाणच्या नैसर्गिक स्थितीचा फायदा घेत असतो.
तो जेव्हा अलिप्त असतो व चिथविण्याचा प्रयत्न करतो तेव्हा दुसऱ्या पक्षाच्या हालचालीची त्याला काळजी वाटत असते.
त्याने तळ ठेवलेली जागा सहजपणे पोहोचण्याजोगी असेल, तर तो तुमच्यापुढे प्रलोभन ठेवत आहे
जेव्हा तो दूर असतो व तुम्हाला युद्धास आव्हान करतो तेव्हा तुम्ही पुढे यावे असे त्याला वाटत असते, याचे कारण म्हणजे तो त्याच्या सोयीच्या सखल भूमीवर असतो.
आपण आपल्या विरुद्ध कारवाया करणाऱ्या विश्वासघातकी लोकांपासून स्वतःचे रक्षण केले पाहिजे. ते अशा आडोशाच्या जागेत, झाडा-झुडपात लपून आपल्यावर पाळत ठेवून आपल्या योजना, संभाषण ऐकत असतात.
आपण मजबूत स्थितीत असल्याने ते आपल्यास अस्वस्थ व विस्कळीत करण्याचा प्रयत्न करतात. ते आपल्याजवळ येऊन आपल्यावर युद्ध लादण्याचा प्रयत्न करतात;

तेव्हा अशा प्रकारच्या आव्हानास, आमिषास, उत्तेजित करण्याची क्षमता असलेल्या कृत्यास आपण बळी पडू नये.
या वचनात सन त्झु, आता वेगवेगळ्या भूभागांत कशा प्रकारे आपली स्थिती मजबूत करायची, या सल्ल्यापासून थोडे दूर जाऊन शत्रूचे काळजीपूर्वक निरीक्षण कशाप्रकारे करायचे, याबद्दल सांगत आहे. असे करताना त्याच्या हालचाली कशा ओळखायच्या याबद्दलदेखील त्याने सांगितले आहे. तो म्हणतो की, कठीण भूभाग खूप त्रासदायक असतो. तो सैन्याच्या हालचालीस अडथळा आणतो, एवढेच नाही तर तो शत्रूस आपले हेर व अचानक हल्ला करणाऱ्या लोकांना लपण्याच्या जागा उपलब्ध करून देतो.
संघर्षकाळात सेनाधिपती नुसतेच शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवत नाहीत; त्या हालचालींमागचा हेतूदेखील समजून घेण्याचा प्रयत्न करतात. या हालचालींमागील खरे कारण समजून घेतल्याने, बाह्य देखावा काहीही असला तरीही सेनापती खरोखर कशा प्रकारे उत्तर द्यायचे वा निष्क्रिय राहायचे याचा निर्णय घेऊ शकतात. याचप्रमाणे बोलण्यामागील खऱ्या अर्थाचा गंभीर व खोल विचार केला, तर शत्रूची खरी योजना कळून येते.
दूरवर असूनही शत्रू तुम्हाला आव्हान देत असेल तर उघड आहे की, तो तुम्हाला मैदानात खेचू इच्छित आहे. तो सखल भूमीवर असल्याने फायद्याच्या स्थितीत आहे.

वचन 6

अरण्याच्या झाडांमध्ये हालचाल दिसून आल्यास याचा अर्थ हा की, शत्रू आगेकूच करीत आहे.
दाट गवतामध्ये अचानक अनेक पटले (पडदे) दिसण्याचा अर्थ म्हणजे शत्रू आपल्याला संशयात टाकत आहे.
उडणारे पक्षी अचानक वरच्या दिशेने, उंच जाऊ लागले याचा अर्थ अचानक हल्ला असा आहे.
दचकलेले श्वापद म्हणजे अचानक आक्रमण होत आहे.
उंचवर धूळ उडते तेव्हा रथ आक्रमण करण्यासाठी कूच करीत आहेत, धुळीच्या थराची उंची कमी असेल व ती खूप मोठ्या प्रदेशात विखुरलेली असेल, तर याचा अर्थ पायदळ तुमच्या दिशेने येत आहे.
जेव्हा ती अनेक दिशांत विभागलेली असेल तेव्हा याचा अर्थ हा की, वेगवेगळ्या दिशांतून इंधन (सरपण) आणण्यास सैनिकांना पाठविले गेले आहे.
जर धूळ विरळ असेल व पुढेमागे अशी उडत असेल तर याचा अर्थ हा की, सैन्य तळ टाकून विसावले आहे.

विनम्र संवाद व वाढलेली तयारी ही आता शत्रू केव्हाही आगेकूच करेल, तुमच्या दिशेने येईल याची लक्षणे आहेत.

जर तो भलते-सलते व आततायीपणे बोलू लागला व जणू काही हल्ला करणार आहे अशा आवेशाने पुढे येऊ लागला, तर हे त्याच्या माघार घेण्याचे लक्षण आहे.

झाडांची हालचाल याचे दोन मथितार्थ आहेत. पहिला म्हणजे शत्रू रस्ता मोकळा करण्यासाठी झाडांची काटछाट करीत आहे व यामुळे ती हलत आहेत. दुसरा हा की, शत्रूने आपले निरीक्षण करण्यासाठी उंच झाडावर आपले खबरे बसविले आहेत. त्यामुळे ते चढत असताना झाडे हलत आहेत.

पटल वा पडद्यांचा अर्थ असा की, शत्रू पलायन करीत आहे व जाताना त्याने लपण्याची जागा तयार करून तेथून आपल्यावर हल्ला होईल, असा भ्रम आपल्या मनात निर्माण करण्याची योजना आखली आहे.

पटल वा पडदे म्हणजे घाईघाईने गवताचे दोर बनवून त्यांचा वापर करून तयार केलेले निवारे होय.

पक्ष्यांची वरच्या दिशेने उड्डाणे म्हणजे, एका दिशेत उडणारे पक्षी अचानक वरच्या दिशेने जाणे. याचा अर्थ, खाली शत्रू अचानक हल्ला करण्याच्या तयारीत आहे किंवा त्याने वाटेत हल्ला केला आहे.

धुळीच्या चिन्हांवरून कोणत्या प्रकारचे दळ येत आहे, याचा अंदाज करता येतो. रथ व घोडदळ कूच करीत असताना उंचवर धूळ उडते व या उंचीवरून कयास बांधता येतो. पायदळात सैनिक मोठ्या संख्येने असतात. ते मार्ग आक्रमित असताना खूप मोठ्या भागात धूळ उडते, विखुरलेली धूळ असेल तर वेगवेगळ्या दिशेत सरपण आणण्यास सैनिक गेले आहेत, मुक्कामाची तयारी होत आहे. धूळ खूप कमी व राहून राहून तुरळक स्वरूपात उडत असेल तर याचा अर्थ हा की, सैन्य विश्रांती घेत आहे.

प्रत्येक सैन्यात धुळीच्या स्वरूपावरून सैन्याच्या आगेकुचीचा, कोण आक्रमण करण्यास येत आहे व सैन्य विसावले आहे का, रसद शोधत आहे का, इ. अंदाज बांधण्यासाठी या चिन्हांची माहिती असणारे म्होरके पुढे जात व परत येऊन शत्रूच्या हालचालींची माहिती सेनापतीस देत असत.

ब्रिटिश सेनापती बेडन पॉवेलने म्हटलेच आहे, 'शत्रूच्या प्रदेशात तुम्ही जसजसे कूच करीत जाल तसतशी दूरवर शत्रूच्या दिशेने त्याचा सुगावा काढण्यासाठी, त्याची चिन्हे शोधण्यात, त्याच्या प्रदेशात उडणारी अनपेक्षित व अचानक धूळ, पक्ष्यांच्या अनपेक्षित हालचाली, चकचकणाऱ्या शस्त्रांचा अचानक दिसणारा प्रकाश, इत्यादींवर तुमची नजर हवी.

रसद आणण्यासाठी मूठभर सैनिक सैनिकी छावणीतून आजूबाजूस पाठविले जातील व हे थोड्याशा धुळीचे कारण असते.
शत्रूच्या सैनिकांस काबीज केल्यावर तो जर आपल्यासमोर खूप भीती दाखवीत उभा असेल, तर शत्रूचा उद्देश आपल्याला निष्काळजी व बेदरकार बनविणे असा आहे.
याचप्रमाणे शत्रूचा दूत जर बढाया वा फुशारक्या मारीत असेल व जोरात पुढे येत असेल, तर तो माघार घेण्याचे आयोजन करीत आहे.

वचन 7

तो माफी व याचनेच्या स्वरात बोलत असेल, तर त्याला लढाईतून सोडवणूक हवी आहे.
त्याचे हलक्या वजनाचे रथ जोरात दौडत येत आहेत व बाजूस आपले स्थान घेत आहेत, तर तो युद्धाची तयारी करीत आहे.
तो कराराशिवाय शांतीचा प्रस्ताव करत आहे, तर तो अंदाज घेत आहे.
तो तातडीने मोर्चा बांधत असेल, तर तो आणखी मदत येण्याची वाट पाहत आहे.
त्याचे अर्धे सैन्य आगेकूच करीत असेल व अर्धे सैन्य माघार घेत असेल तर तो तुम्हाला संभ्रमात टाकण्याचा प्रयत्न करीत आहे, तुम्हाला प्रलोभन दाखवीत आहे.
त्याचे सैनिक शस्त्रांवर झुकू लागतात, तेव्हा ते भुकेले आहेत.
पाणी काढणारे लोक लगेच पाणी पीत असतील, तर ते तहानले आहेत
त्यांना फायदा समोर दिसत आहे; पण ते त्याचा वापर करीत नाहीये, तर ते थकले आहेत.
पक्ष्यांची जमवाजमव सुरू झाली असेल, तर तो तिथे उपस्थित नाही.
त्याचे सैनिक रात्री रडत असतील, तर ते घाबरले आहेत.
सैन्य सैरभैर असेल, तर सेनाधिपती दुर्बल आहे.
शत्रूचे झेंडे व निशाणे इतस्ततः फिरत असतील, तर त्याच्याकडे सावळा गोंधळ झाला आहे.
त्याचे अधिकारी चिडचिडे झाले असतील, तर ते थकले आहेत.

सन त्झु शत्रूच्या वागणुकीचे अर्थ आपल्याला समजावून सांगत आहे व त्याप्रमाणे त्याच्या सभोवताली असलेल्या निसर्गातील बदलसुद्धा काय निर्देशित करतात याबद्दल चर्चा करीत आहे.
सन त्झुच्या तीक्ष्ण नजरेतून व त्याच्या अनुभवी व अनुभवसिद्ध तर्कशास्त्रातून अनेक निरीक्षणांचा व संकेतांचा उगम होताना या पुस्तकात आपण आतापर्यंत पाहिले आहे. प्रत्यक्ष युद्धात वास्तविक आणि थेट माहिती मिळणे अशक्यप्राय असते. त्याचप्रमाणे

शत्रूची देहबोली, कृती आणि शब्द यात फरक असू शकतो. अशा परिस्थितीत एक अनुभवी सेनाधिपती काय निष्कर्ष काढतो, हे समजून घेण्याजोगे आहे.
शत्रू तुमच्याकडे क्षमायाचना करीत असतो, तेव्हा त्याला काही काळ सुटका वा सोडवणूक हवी असते. ती मिळाल्याने पुन्हा नव्या जोमाने तयारी करावयास त्याला वेळ मिळतो. असे वर्तन प्रामाणिकपणाचे आहे की आव आहे, हे समजणे आवश्यक असते. तो त्याच्या नेहमीच्या स्वभावाच्या उलट अनैसर्गिक विनयाने बोलत असेल, माफी मागत असेल तर त्याला तुमचाकडून काहीतरी मदत हवी असते.
त्याच्या सैन्यात हालचाल सुरू झाली असेल व हलक्या वजनांचे रथ आपल्या जागेवर त्याने आणून ठेवले असतील, तर तो युद्धाची तयारी करीत असेल. कारण त्याला अजूनही वाटत असेल की, तुम्ही हार मानाल. जड रथांसहित व तोफांसहित त्याने स्थान घेतले, तर मग माघार घेणे अशक्य होईल. अशा वेळेस या संकेतांबरोबरच इतरही निरीक्षणांच्या मदतीने तुम्ही निर्णय घ्यावयास हवा.
तो तहाचा वा शांतीचा प्रस्ताव घेऊन आला असेल; पण तो औपचारिकपणे करारपत्रावर स्वाक्षरी करण्यास पुढे-मागे पाहत असेल, तर याचा अर्थ तो वेळकाढूपणा करून तुमचा अंदाज घेत आहे. तुम्ही प्रस्ताव लगेच मानला तर त्याच्या लगेच लक्षात येते की, तुमची तयारी कमी पडते. त्याच्या मनात खरोखर तह करून शांती प्रस्थापित करायची नसेल, तर तो लेखी करार करण्याची टाळाटाळ करेल.
त्याने घाईघाईने मोर्चे बांधण्यास सुरुवात केली असेल, तर नक्कीच त्याने आणखी सैन्य वा मदत बोलावली आहे. अशा वेळेस तुमचे, त्याच्या सैन्यबळाचे अंदाज चुकीचे ठरू शकतात व त्याप्रमाणे तुम्हाला वेगळ्या प्रकारे आयोजन करण्याची गरज भासू शकते.
त्याने अर्धे सैन्य पुढे पाठविले व अर्धे माघारी धाडून दिले, तर नक्कीच तो तुम्हाला फसवीत आहे. अशा वेळेस चाल करून येणाऱ्या सैन्याचा पवित्रा पाहून निर्णय घ्यावा लागेल. ते हूल देण्यास आले आहेत की लढण्यास आमंत्रण देण्यास?
सन त्झु सैनिकांच्या शारीरिक लकबींचे विश्लेषण आता करीत आहे. माणूस भुकेने व्याकूळ झाला असेल, तर तो वाकतो व त्यामुळे तुम्ही त्याचा फायदा घेऊन निष्क्रिय राहण्याचा निर्णय घेऊ शकता किंवा थोडक्यात युद्ध संपवून त्या सैन्यास प्रेमाने अन्न देऊ शकता. भुकेला सैनिक चवताळलेलासुद्धा असू शकतो व अशा वेळी तो आततायीसुद्धा बनू शकतो. अशा परिस्थितीत तो अगतिक, वेडापिसा होऊन लढण्यास उतरू शकतो.
याचप्रमाणे तहानलेल्या सैनिकास कसे ओळखायचे, ते त्याने येथे सांगितले आहे. वाळवंटात सापडलेल्या माणसाला जर पाण्याचा साठा सापडला तर तो कसा

वागेल? त्यावरून तुम्हाला कळेल की, ज्या प्रदेशात तो आहे तेथे पाण्याचा तुटवडा आहे. हा घटकदेखील तुमच्या रणनीतीचा एक भाग बनू शकतो.
अशाच प्रकारे विभिन्न देहबोलींवरून काढायचे निष्कर्ष त्याने साध्या भाषेत समजावून सांगितले आहेत व यांचा वापर पुढील नीती बनविण्यासाठी करता येतो. भीतीने सैनिक विचलित होतात. रात्री ते रडतात, ओरडतात. आपले धैर्य अबाधित ठेवण्यासाठी स्वतःशीच बडबड करतात. काही माणसांच्या वर्तणुकीवरून सैन्याच्या वर्तनाचा व मनोबलाचा अंदाज घेता येतो. त्याने विवरण केलेले निरीक्षण - तहानलेले, भुकेले, थकलेले, जागा सोडून गेलेले, सैरभैर धावणारे, दिशाहीनपणे संकेत देणारे व चिडचिडे झालेले शत्रूचे सैन्य तुम्ही कसे ओळखायचे, हे तुम्हाला कळाले तर तुमची पुढील पावले काय हे नक्कीच ठरवता येते. याशिवाय आपल्या स्वतःच्या सैन्यात अशी लक्षणे दिसून आली तर आपल्या सैन्याचीसुद्धा काळजी घ्यायला पाहिजे, असा अर्थ निघतो.

वचन 8

त्याच्या घोड्यांना धान्य देण्यात येत असेल व सैनिकांना मास, त्याच्या चुली पेटत नसतील व भांड्यात अन्न शिजत नसेल, त्याचे सैन्य मुक्कामाला परत येत नसेल, तर तो घायकुतीस आला आहे.
सैनिक छोट्याछोट्या घोळक्यात जमा होत असतील व कुजबुज करीत असतील तर सेनाधिपती आपल्या माणसांना गमावून बसला आहे.
तो वरचेवर इनाम देत असेल, तर त्याच्या साधनांचा व संपत्तीचा ऱ्हास होत आहे.
तो वरचेवर शिक्षा देत असेल, तर तो कठीण परिस्थितीत आहे.
जर सुरुवातीस हिंसक व क्रूर असेल व नंतर तो मोठ्या सैन्यास पाहून घाबरत असेल, तर त्याने कर्तव्यशून्यतेचा कळस गाठला आहे.
तो स्तुती करीत व प्रस्ताव घेऊन आला असेल, तर त्याला आता यातून सुटका हवी आहे.
त्याचे सैन्य तुमचा आवेश पाहून नुसतीच धडपड करीत असेल; पण कोणत्याही स्थितीत युद्ध करीत नसेल वा युद्धभूमी सोडूनही जात नसेल तर याचा शोध घेतला पाहिजे.

चीनमध्ये सर्वसाधारणपणे सैनिकांना धान्य व घोड्यांना गवत दिले जाते; पण आता अशी रसद नसल्याने घोड्यांना उरलेसुरले धान्य दिले जात आहे, सैनिकांना मृत सैनिकांचे मांस दिले जात आहे. सैन्यातील भोजनगृहदेखील बंद पडले आहे. सैनिक आपल्या राहुट्यात, तळावर परत येत नाहीत. याचा अर्थ म्हणजे हलाखीची स्थिती व

अशा परिस्थितीत वाट पाहणे व त्याची आपोआप स्थिती खालावू देणे हा पर्याय असू शकतो.

सैनिक लहान-लहान गटात जमा होऊन हलक्या आवाजात कुजबुज करू लागतात, तेव्हा याचा अर्थ हा की, त्यांना तुमच्याशी सल्लामसलत करण्याची मुभा नाही-काही निर्णय त्यांना मान्य नाहीत, ही गंभीर स्थिती आहे. याची प्रचीती कार्यालयांत, कारखान्यांतसुद्धा येते. अशा प्रकारचे वर्तन म्हणजे विश्वासभंग. यामुळे अफवा पसरतात, वातावरण कलुषित होते. तसेच मनोबल व संघभावना संपुष्टात येते.

प्रोत्साहन व संवाद यांचा वापर न करता आपल्या सैनिकांना खूश करण्यासाठी बक्षिसांचा वापर होतो. यामुळे संघभावना आणखी खालावते. सैन्यातील शिस्त भंग होते व सैनिक मनात येईल तसे वागू लागतात, तेव्हा बंड होण्याची शक्यता असते. अशा वेळी आमिष म्हणून, त्या बंडखोरांना बंड वा उठाव न करण्यासाठी लाच म्हणून बक्षिसे दिली जातात. यात संपत्तीचाही नाश होतो. प्रामाणिकपणा व कर्तव्यनिष्ठता अशा प्रकारे विकत घेतले जाऊ शकत नाही. कारणे योग्य असली तरीही वरचेवर अशा प्रकारे बक्षिसांची खैरात करणे योग्य नाही.

अशा प्रकारे भांबावून जाऊन तो सेनापती पदोपदी, लहानसहान चुकांसाठीदेखील आपल्या लहरीनुसार शिक्षा देतो, याचा अर्थ आता परिस्थिती खूपच नाजूक आहे. शिक्षा देण्याने चुका सुधारत नाहीत. चूक का घडली, याचे निदान करून त्याचे मूळ कारण दूर करावयास हवे.

आरंभशूरपणे तो क्रौर्य दाखवीत असेल पण; मोठे आव्हान आल्यावर मात्र ते पाहून घाबरून जात असेल, तर नाकर्तेपणाची ही चरमसीमा असते. सरतेशेवटी तो आमिषे व तहाचे प्रस्ताव घेऊन येतो. कारण त्याला आता यातून सुटका हवी असते.

तो रागात असेल; पण त्याच्या त्या धमकीचे अजून आक्रमक लढाईत परिवर्तन झाले नसेल तर तो बेभान व धुंद मनःस्थितीत नाही, तो कदाचित दुर्बलही असेल, तो आणखी कुमक येण्याची वाट पाहत असेल वा त्याने तुमच्यासाठी काहीतरी सापळा रचला असेल. तुम्ही भावनाविवश होऊन त्याच्या रागास उत्तर दिले, तर त्याच्या सापळ्यात तुम्ही सापडाल. यामुळे रागाने युद्धभूमीवर येण्याच्या कृतीचे कारण शोधा, वाट पाहा. तो रागाने तुमचा सामना करण्यास युद्धास उतरतो; पण युद्ध करीत नाही. आपली जागा सोडत नाही. यामागील खरे कारण मात्र शोधून काढलेच पाहिजे.

वचन 9

सैनिकांची संख्या खूप मोठी असणे याचा अर्थ तुमचे स्थान खूप अचल आहे असा नाही.

आक्रमक वृत्तीने आगेकूच करू नका.

आपले सैन्य एकत्र करणे, शत्रूचा अंदाज घेणे व आपल्या सैन्याचा आधार घेणे हे पुरेसे आहे.

अशा प्रकारची दूरगामी व सयुक्तिक योजना ज्याच्याकडे नसेल व जो शत्रूस कमी लेखत असेल, तो पकडला जाऊन त्याला काबीज केले जाईल.

आपल्या सैनिकांची संख्या खूप मोठी आहे, ही एकच महत्त्वाची बाब नाही. याचा अर्थ एवढाच की आपल्यावर सरळ व थेट पुढून हल्ला होणार नाही; पण एवढ्यावरच अवलंबून सरळ पुढे जाऊ नये. याऐवजी सयुक्तिक आयोजन करा आणि मगच संघर्षास उतरा.

सन त्झु सांगतो की, युद्धात कोणत्याही गोष्टीची हमी देता येत नाही. तुम्हाला सहजसाध्य वाटणारी वस्तुतः तुमच्या कपटी व चाणाक्ष शत्रूची भेदक चाल असू शकते. शत्रूपेक्षा तुमची स्थिती मजबूत असतानादेखील तुम्ही खूप काळजीपूर्वकपणे पाऊल उचलले पाहिजे.

कोणत्याही परिस्थितीत आपल्या सैन्यास एकजूट करून ठेवणे व त्यांच्यात त्यांच्या उपयोगितेची, तसेच आपली भूमिका महत्त्वाची आहे, अशी भावना जागृत करण्याची गरज आहे..

संयत, विवेकी व दूरगामी विचार तुमच्या स्वभावात नसेल, तुमच्या वर्तणुकीत अहंभाव असेल, तुम्ही शत्रूस तुच्छ लेखत असाल तर तुम्हाला नामोहरम करणे शत्रूस फार सोपे जाईल.

वचन 10

स्वामिनिष्ठ बनण्याआधी तुम्ही सैनिकांना प्रताडित करीत शिक्षा दिलीत तर ते आज्ञेची अवहेलना करतील व अवज्ञाकारी होतील.

ते आज्ञेची अवहेलना करणारे बनल्यास त्यांचा उपयोग करणे कठीण जाईल.

स्वामिनिष्ठ झाल्यानंतर, त्यांच्या दुर्वर्तनासाठी, सैनिकांना प्रताडित करून शिक्षा दिली नाही तर त्यांचा तुम्हाला उपयोग होणार नाही

म्हणून त्यांना सेनाधिपती सहिष्णुतेने आज्ञा देत असेल, शिस्तीने एकजूट करीत असेल तर त्याला निश्चितच विजय मिळेल.

प्रशिक्षण देताना आज्ञांचा वापर सातत्याने केला, तर ते आज्ञाधारक बनतील.

प्रशिक्षण देताना आज्ञांचा वापर सातत्याने केला नाही, तर ते सैनिक अवज्ञाकारी होतील. (आज्ञेचे पालन न करणारे होतील)

आज्ञांचे पालन सातत्याने होते, तेव्हा ते वर्तन सेनाधिपतीच्या निर्देशानुसार असते.

विश्वास व शिस्त एकत्र असले पाहिजेत. विश्वासाशिवाय शिस्तीस अर्थ नसतो. शिस्तीशिवाय सैन्य प्रभावहीन बनते. विश्वास व शिस्त यांना जोडणारा दुवा म्हणजे

सहिष्णुता व सद्भाव. तुम्ही त्यांची कदर करता, काळजी करता असे तुमच्या सैनिकांना वाटत असेल तर त्यांना शिस्त लावता येते. ते तुमच्या आज्ञा, तुमचे निर्देश व तुमची शिक्षासुद्धा मागेपुढे न पाहता पाळतील.
तुमच्याबद्दल सैनिकांच्या मनात आदर, भक्ती, प्रेम, निष्ठा अशा भावना जागृत होण्याआधी तुम्ही त्यांचे प्रताडन केले व त्यांना शिक्षा सुनावली तर ते तुमचे ऐकून घेणार नाहीत. आपले सेनाधिपती आपल्या भल्यासाठीच आहेत व आपल्या जीवनात पुढे येण्यासाठी त्यांच्याकडून, बरेच काही शिकण्याजोगे आहे असा विश्वास व अशी निष्ठा निर्माण होईपर्यंत, ती आपुलकी येण्याआधी तुम्ही दिलेली शिक्षा त्याच्याकडून अव्हेरली जाईल. एकदा का ही स्वामिनिष्ठा प्रस्थापित झाली की, मात्र या नियमांचे स्वरूप बदलते. त्यानंतर मात्र त्याची चूक झाली तर तुम्ही शिक्षा देऊ शकता किंवा क्षमाही करू शकता. कारण आता तुम्ही तो विश्वास कमावला आहे. शिस्त व अनुशासन प्रस्थापित करण्यासाठी, चुकीसाठी शिक्षा करावीच लागेल.
एक आदर्श सेनापती, सहिष्णुता व शिस्त यांचा संगम करतो. मृदुपणा व काठिण्य यांचे ते संमिश्रण असते. आज्ञा देणे व त्यांचे बेचूक, तंतोतंत पालन करणे हे एका सक्षम व प्रभावी सेनेचे महत्त्वाचे लक्षण आहे. सन त्झुच्या म्हणण्यानुसार, विश्वास सातत्याने वाढतो. सातत्य म्हणजे सर्वांप्रति समभाव व समान वागणूक. सेनाधिपतीसुद्धा तेच नियम पाळतो.

अध्याय 9

सैन्याचे डावपेच

सारांश -

सैन्याचा मुकाबला कसा करायचा?

1) पर्वत ओलांडताना दरीच्या जवळपास राहा.
कोठून हल्ला होऊ शकतो, याचा अंदाज घ्या.
शत्रू तुमच्यापेक्षा उंचावर असला, तर चढून हल्ला करू नका.
2) नदी वेगाने ओलांडा.
नदी ओलांडताना अर्धे सैनिक दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचेपर्यंत काळजी घ्या.
पाण्यात युद्ध करू नका.
पाण्याच्या खालच्या भागाजवळ राहू नका. कारण वरील पाण्याचा प्रवाह वाढल्यास तुम्ही वाहून जाल.
आपला तळ उंच स्थानी टाका.
3)दलदलीच्या व ओल असलेल्या ठिकाणातून लगेच बाहेर पडा.
दलदलीचा प्रदेश ओलांडताना झाडे व गवत असलेल्या ठिकाणांचा शोध घ्या.
जमिनीवर असताना सूर्यप्रकाशाकडे तोंड व मागे उतार असू द्या.
4) शत्रू जवळ व गप्प आहे, याचा अर्थ तो आक्रमणास तयार आहे.
तो दूर असताना तुम्हाला जवळ येण्याचे आमिष दाखवीत असेल, तर तो युद्धास आतुर आहे.
5) दलदलीच्या प्रदेशात त्याचे हेर लपलेले असू शकतात. त्या जागा नीट पिंजून काढा.
6) हलणारी झाडे म्हणजे शत्रू पुढे येत आहे.
पक्षी व श्वापदांची लगबग म्हणजे शत्रू हल्ला करण्यास येत आहे.
क्षितिजावर उंचवर उडणारी धूळ म्हणजे येत असलेले हलक्या वजनाचे रथ व पायदळ.
शत्रूकडून विनम्र विनवणी म्हणजे तो अजून तयारी करीत आहे व त्यासाठी अधिक वेळ मिळण्याची संधी शोधत आहे.
उत्तेजितपणाचा आव म्हणजे तो माघार घेत आहे.
रथ योजनेप्रमाणे स्थानावर आले, तर याचा अर्थ शत्रू युद्धाची व्यूहरचना करीत आहे.
लिखित कराराशिवाय तहास अर्थ नाही, हे वेळकाढू धोरण आहे.
सैनिकांना शिस्तबद्ध करण्यासाठी सातत्य व विश्वास संपादन करणे महत्त्वाचे आहे.

व्यवसायात उपयोग

1) लोकांचा विश्वास संपादन केल्याशिवाय कोणतेही नियम लागू होत नाहीत.
2) बाजारपेठेतील अनेक चिन्हांचा, घडामोडींचा अभ्यास करून धोरण ठरवा. जाहिरातींचे वाढते प्रमाण, एखाद्या वस्तूची अचानक कमी झालेली किंमत इ.
3) विश्वास संपादन केल्यावर बक्षीस व शिक्षा यांचा योग्य व सातत्याने वापर करा.

□□□

अध्याय 10
भूमितळावरील रचना

या अध्यायात सन त्झु सहा प्रकारच्या जमिनीची माहिती देतो. तुम्हाला संघर्षाच्या संदर्भात सामोरे जाव्या लागणाऱ्या सहा प्रकारच्या परिस्थिती असेदेखील याला म्हणता येते. यातील संभाव्य धोक्यांचा तो शोध घेतो. याचबरोबर शत्रूस सामोरे जाताना हे धोके तुमच्या फायद्याचे कसे ठरू शकतात हेदेखील तो समजावून सांगतो. या सहा भूरचनांचा एक संच 'आर्ट ऑफ वॉर' पुस्तकात विशद केलेल्या सोळा भूरचनांपैकी एक आहे. याच अध्यायात पराभवाचे सहा मार्गदेखील चर्चिले आहेत. हे टाळावे, असा आग्रह येथे करण्यात आला आहे. कारण या मार्गावर तुम्ही आलात, तर तुम्हाला संकटांचा व वेदनांचा विनाकारण सामना करावा लागतो. या विविध अडचणींवर मात करण्यासाठी तुम्हाला नि:स्वार्थ बनून, स्वतःचा दुरभिमान व अहंभाव विसरून काम करावे लागेल. याच्या परिणामस्वरूप लोक तुमची आठवण काढतील व तुम्हाला आदर प्राप्त होईल.

वचन 1

सन त्झु म्हणतो,
आपण भूरचना सहा भागांत विभागू शकतो.
त्या या प्रकारच्या आहेत - सुगम,
सापळ्यात सापडविणाऱ्यात सारख्या, शह देणाऱ्या, चिंचोळ्या,
खूप कठीण उभ्या चढणीच्या,
व *विस्तृत*

सन त्झुच्या म्हणण्यानुसार, या भूरचनांचे गुणधर्म व भौतिक रचना समजून घेतल्यास युद्धात त्या त्या प्रकारच्या नैसर्गिक प्रकाराचा उपयोग करून आपली नीती ठरविता येते. अतिशय दुर्गम भागातही शत्रूविरुद्ध या ज्ञानाचा तुम्हाला फायदाच होतो. तुम्ही प्रत्येक प्रकारच्या भूभागाचे धोके समजून घेतले पाहिजेत. त्याप्रमाणे कृती करून, काळजी घेऊन त्यांच्यावर मात केली पाहिजे.

आता या सहापैकी प्रत्येकास एक एक करत समजून घेऊया.

1) सुगम भूभाग

या रस्त्यावर दळण-वळण व संदेश वाहतूक नेहमी चालू असते. या भागात तुम्ही जाऊ शकलात आणि शत्रू प्रवेश करू शकणार नसेल तर त्याला सुगम भूभाग म्हटले जाईल.

2) सापळ्यात सापडविण्यासारखे भूभाग

जाळ्यासारखा भागात प्रवेश केल्याने तुम्ही अडकू शकता.
अशा प्रकारच्या भूभागात शत्रू पूर्वतयारी व संपूर्ण माहिती नसताना आल्यास तुम्ही त्याला अडकवू व हरवू शकता; पण शत्रू तुम्ही यायची तयारी करून आला असेल व तुम्ही त्याला हरवू शकला नाहीत, तर तुम्हाला माघार घेऊन परतणे अशक्य होईल.

3) शह देणाऱ्या

येथे घुसल्याने बाहेर निघण्यास विलंब होतो, येथे तुम्ही भांबावून जाता.
अशा परिस्थितीत दोन्ही पक्षांना हालचाल करणे अशक्य असते व कोंडीची स्थिती बनते. अशा परिस्थितीत पुढे जाण्याऐवजी मागे जावे व शत्रूस हल्ला करण्यास चिथवावे. यामुळे कोंडी सुटेल व आपल्यालाही हालचाल करून हल्ला करता येईल.

4) चिंचोळे भूभाग

यावर एका वेळेस एकच अथवा खूप कमी माणसे चालू शकतात. आपण आधी तेथे पोहोचलो, तर शत्रूला नेटाने रोखून धरा व त्याच्या अगतिक होण्याची वाट पाहा. आता पुढाकार घेणे आपल्या हातात असेल. आपण अचानक व अनपेक्षित हल्ला करून शत्रूस चकित करू शकतो व हरवूही शकतो.

5) कठीण व उभ्या चढणीचे भूभाग (सुळके)

या ठिकाणी शत्रूआधी पोहोचा व सूर्यप्रकाशाकडे तोंड करून तयार राहा. उंचीवर असल्यामुळे आता शत्रू तुमच्या कारवाया पाहू शकणार नाही. अशा प्रकारचे सुळके व उंच ठिकाणावरचे भूभाग फक्त लढण्यासाठीच नाही, तर ते घातक पूर व पाण्याचा लोट यापासूनही आपले रक्षण करतात.

6) विस्तृत भूभाग

शत्रूपासून खूप दूर अंतरावर असाल व दोघेही तुल्यबळ असाल, तर युद्ध करणे सोपे नाही. आपण एवढ्या अंतरावर कूच करून आक्रमणाचा विचारदेखील करू नये. आपण या हालचालीनेच थकून जाऊ. आधीच्या अध्यायातदेखील या मुद्द्याचा उल्लेख आहे.

वचन 2

ही सहा प्रकारची संकटे आहेत.
ती सेनाधिपतीची जबाबदारी आहे व त्यांचे त्याने विश्लेषण केले पाहिजे.
युद्धात,
1. पलायन,
2. अवज्ञा (आज्ञा न पाळणे),

3. अवनती वा ऱ्हास,
4. विनाश,
5. अंदाधुंदी
6. व पिछेहाट
या गोष्टी होऊ शकतात.
या गोष्टी स्वर्गातून (नशिबामुळे) वा भूभागामुळे घडत नाहीत, त्याचे मूळ कारण सेनाधिपती असतो.

1) पलायन

युद्धात जो बलाढ्य असतो त्याच्याशी सामना करावा लागला, तर दोन्हींपैकी जो दुर्बल असतो त्याला पलायन करावे लागते.

2) अवज्ञा

यासंदर्भात तियेन पु (इ.स.पू. 821) या सेनाधिपतीची गोष्ट सांगितली जाते. तो नवीन होता व त्याच्या सैनिकांचा त्याच्यावर विश्वास नव्हता. (संदर्भ- अध्याय 9 विश्वास व आज्ञा) त्याला वँग तिंग साऊच्या सैन्याशी लढा द्यावयाचा होता; पण त्याच्या आधिपत्यात असणारे त्याचे सैनिक, अपरिचय व अविश्वासामुळे त्याच्याकडे नेहमीच कलुषित नजरेने पाहत असत. त्याची अवहेलना करण्यासाठी ते आपल्या छावणीत हजारोंच्या संख्येने गाढवांवर बसून हिंडत. तियेन पु याबाबतीत काहीही करण्यास असमर्थ होता. काही दिवसांनी त्याने आपल्या सैन्यास युद्धात येण्याची आज्ञा दिली. सैन्य त्याच्या आज्ञांचे उल्लंघन करून दहा दिशांना पळून गेले. यानंतर त्या दुर्दैवी सेनाधिपतीने आपला गळा कापून आत्महत्या केली.

3) अवनती

अधिकारी जोशात असतात व आगेकूच करू पाहतात; पण सैनिकांच्या शक्तीचा ऱ्हास झालेला असतो तसेच त्यांची अवनती झालेली असते.

4) विनाश

सेनाधिपती क्रोधात असतो. सैनिक उद्विग्न झाल्याने आज्ञापालन करीत नाहीत. आपल्या कर्तव्याबद्दल तिरस्काराची भावना मनात ठेवून ते शत्रूशी युद्ध करतात. त्यांच्या या मनःस्थितीची त्यांच्या सेनाधिपतीस जाणीवच नसते. अशा परिस्थितीत विनाशाची परिस्थिती उद्भवते. याचा अर्थ असा की, सेनाधिपती विनाकारण (सैनिकांच्या रागाचे कारण माहीत नसताना) रागात असतो. त्याला आपल्या सैनिकांच्या क्षमतेचे ज्ञान नसते व यामुळे तीव्र द्वेष निर्माण होतो व विनाशाचा तो धनी बनतो.

5) अंदाधुंदी

सेनाधिपती कर्तृत्वहीन, अधिकारहीन असतो, त्याच्या आज्ञा स्पष्ट नसतात, आपल्या सैनिकांना व अधिकाऱ्यांना तो त्यांची कामे नीट वाटून देत नाही. अशा प्रकारे जेव्हा सैन्याची रचना होते, तेव्हा अंदाधुंदी माजते.

सेनाधिपती आपल्या आज्ञा निर्णायक व स्पष्टपणे देत असेल, तर त्याचे सैनिक त्या पुन्हा ऐकण्याची वाट पाहत नाहीत. त्यांच्या मनात कुठलीही शंका नसते. ते त्यांचे पालन करण्यास पुढेमागे पाहत नाहीत. जनरल बेडन पॉवेल म्हणतो, 'तुमच्या सैनिकांकडून उत्तम व यशस्वी काम करून घेण्याचे रहस्य तुमच्या निर्देशातील व आज्ञातील नि:संदिग्धपणात असते. सैन्यातील सर्वांत प्राणघातक घटना म्हणजे विभाजन. सैन्यावर येणारी आपत्ती म्हणजे त्याच्या सैनिकांची व अधिकाऱ्यांची द्विधा मनःस्थिती होय.'

6) पिछेहाट वा माघार

सेनाधिपती आपल्या शत्रूच्या ताकदीचा अंदाज लावण्यास असमर्थ ठरतो व आपल्या दुर्बल सैन्यास बलवान सैन्यांशी लढाई करण्यास भाग पाडतो किंवा एका बलाढ्य शत्रूविरुद्ध लहानशा तुकडीस लढायला लावतो. पुढील मोर्चात उत्तम सैनिक तैनात करण्यास विसरतो, तेव्हा त्या सैन्याला माघार घ्यावी लागते.

युद्ध करायचे असते तेव्हा सर्वांत उत्तम लढवय्ये पुढील मोर्चात तैनात केले पाहिजेत, यामुळे आपली शक्ती वाढते व शत्रूचे मनोबल ढासळते.

वचन 3

सैन्यात पराभूत होण्याचे सहा मार्ग आहेत.
हार टाळणे ही सेनाधिपतीची जबाबदारी आहे.
पराभूत होण्याचे सहा मार्ग याप्रमाणे
1) शत्रूच्या ताकदीचा अंदाज घेण्यात निष्काळजीपणा
2) अधिकाराचा दुरुपयोग
3) चुकीचे प्रशिक्षण
4) विनाकारण राग
5) शिस्तभंग
6) कुशल सैनिकांचा वापर न करणे
वरील बाबींची जबाबदारी घेणाऱ्या सेनाधिपतीने योग्य नोंद केली पाहिजे.

1) शत्रूच्या ताकदीचा अंदाज घेण्यात निष्काळजीपणा

आपल्या देशाची भौगोलिक रचना व त्याची माहिती, या गोष्टी सैनिकाचे खरे मित्र आहेत. हवामान व ऋतुमान नेहमीच सारखे नसतात व जे भौगोलिक स्थितीचा वेळोवेळी मागोवा घेतात त्यांना हे नवीन नाही.

शत्रूचा अंदाज घेणे व आपल्या सैन्याचे विजयाच्या दिशेने नियंत्रण करणे, वेगवेगळ्या युक्त्या वापरून आपल्या अडचणींचा नायनाट करणे, धोके व दूरवरच्या अंतरावर प्रवास करताना येणारी संकटे दूर करणे, ही सेनाधिपतीसमोरील आव्हाने आहेत.
ज्या सेनाधिपतीस याची जाणीव असते, लढताना जो सेनाधिपती या ज्ञानाचा उपयोग करतो तो युद्धात यश मिळवितो. ज्याला याचे ज्ञान नसते वा जो या गोष्टी अमलातदेखील आणत नाही तो नक्कीच पराभूत होतो.

2) अधिकाराचा दुरुपयोग व 3) चुकीचे प्रशिक्षण

लढण्याची परिणती निश्चित विजयात होणार असेल, तर तुम्ही लढावयासच हवे. जरी तुमच्या राजाने मनाई केली असेल, तरीही लढलेच पाहिजे. लढण्याची परिणती पराजयात होणार असेल, तर राजाने लढण्याची आज्ञा दिलेली असली तरीही तुम्ही लढू नये. सैन्याच्या मोहिमेची व हालचालीची जबाबदारी व अधिकार सेनाधिपतीकडेच असावयास हवेत. त्याचे नियंत्रण राजाने केले तर यशस्वी परिणाम क्वचितच मिळतात. म्हणून सुज्ञ व चाणाक्ष राजा आपल्या राज्याचे कल्याण करताना व हित पाहताना असे सर्व अधिकार सेनाधिपतीस देतात व या मोहिमेत दुय्यम भूमिका निभावतात. इतकेच नव्हे तर ते सेनाधिपतीच्या शब्दास किंमत देतात, त्याच्याशी विवेकाने व विनम्रतेने वागतात. चिनी संस्कृतीत राजाला स्वर्गातील देवाचा दूत अथवा प्रतिनिधी म्हणून संबोधले जाते व असे असूनही पुरातन राजा चँग यु म्हणतो, स्वर्गाच्या या दूताच्या आज्ञा सैन्याच्या छावणीच्या भिंतींना भेदू शकत नाहीत.
जो सेनाधिपती आगेकूच करून आक्रमण करताना प्रसिद्धीची हाव धरत नाही व माघार घेताना मानहानीची चिंता करीत नाही, फक्त आपल्या देशाचे रक्षण कसे करायचे एवढाच विचार ज्याच्या मनात सतत वास करीत असतो, ज्याच्या ध्यानीमनी फक्त देशसेवाच असते तो आपल्या राज्याच्या कोंदणातील हिरा असतो.
अशा प्रकारचे प्रशिक्षण व अंगीकृत भावना नसलेला सेनाधिपती अयोग्य ठरतो.
अशा प्रकारच्या व्यक्तीस त्रास झाला, तरीही त्याला आपल्या वागण्याची खंत नसते.
त्याला प्रशिक्षणात सैनिकांची आपल्या अपत्यासारखी काळजी घेण्याचे शिक्षण दिलेले असते. मग ते खोल दऱ्याखोऱ्यात, वादळ वाऱ्यात, घमासान युद्धातसुद्धा साथ देतात. त्यांची स्वतःच्या मुलांसारखी काळजी घेतली, तर ते तुमची मरणापर्यंत साथ देतात.
वु ची या एका आदर्श व प्रसिद्ध सेनाधिपतीचे व्यक्तिचित्र चिनी बखरीत अशा प्रकारे चितारले आहे.
'तो तेच कपडे घालत असे व सामान्यात सामान्य सैनिक जे अन्न खाईल, तेच हासुद्धा खात असे. तो उमदे घोडे व आरामदायक बिछान्याची अपेक्षा कधीच करीत नसे. तो

आपल्याकडे उरलेला शिधा आपल्या सैनिकात वाटून देत असे. त्याच्या एका सैनिकास गळू झाले असताना त्याने स्वतः त्यातील पू चोखून बाहेर काढला. (ही त्याकाळी पद्धत होती). हे ऐकून त्या सैनिकाची आई हमसून-हमसून रडू लागली. तिला कोणीतरी विचारले, 'बाई, का रडतेस? तुझा मुलगा साधासुधा सैनिक असूनही सेनाधिपतीने स्वतः त्याचे गळू चोखून त्यातील पू बाहेर काढला आहे.' त्या स्त्रीने उत्तर दिले, 'काही वर्षांपूर्वी वुचीने अशा प्रकारची मदत माझ्या नवऱ्यास दिली होती. शेवटपर्यंत माझ्या नवऱ्याने त्याची साथ सोडली नाही. अखेर आपल्या देशाचे रक्षण करताना तो शत्रूकडून मारला गेला. आता माझ्या मुलासही त्याने अशा प्रकारे उपकृत केले आहे, तोसुद्धा आता देशाची सेवा करताना कसलीही हयगय करणार नाही. सेनाधिपतीच्या या कनवाळूपणाने ते अशा प्रकारे देशभक्त बनले आहेत.'

अशाच प्रकारे युद्धातील दिवसभराची धुमश्चक्री संपल्यावर एक सेनाधिपती प्रत्येक राहुटीत जाऊन आपल्या सैनिकांचा हालहवाला विचारत असे. थंडीचे दिवस होते व या भेटीनंतर सैनिक म्हणत, 'तो आम्हा सर्वांना भेटला, त्याने आम्हाला प्रोत्साहन दिले व आम्हाला वाटत आहे की त्याने आपले ऊबदार, शाही कपडे आम्हाला दिले आहेत.'

4) विनाकारण राग व 5) शिस्तभंग

तुम्ही सहिष्णू असाल; पण तुमचा अधिकार वापरू शकत नसाल, कनवाळू असाल; पण तुम्ही अधिकार गाजवू शकत नसाल व भरीस भर म्हणून बेशिस्तपणा चिरडण्यास अपात्र असाल, तर तुमच्या सैनिकांची तुलना व्रात्य व बिघडलेल्या लहान मुलांशी करण्यात येईल. या अवगुणांवर पांघरूण घालण्यासाठी तुम्ही आपल्या क्रोधाचा वापर करणे मूर्खपणाचे लक्षण आहे.

तुम्ही तुमच्या सैनिकांना घाबरवू शकलात तर तुमचे सैनिक शत्रूस घाबरणार नाहीत. यासंदर्भात एक कथा सांगितली जाते.

इ. स.219 मध्ये लु मँग नावाचा सेनाधिपती चिअँग लिंग या गावात, ते काबीज केल्यावर वास्तव्य करून होता. त्याने आपल्या सैनिकांना सक्त ताकीद दिली होती की, काबीज केलेल्या गावातील ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारे त्रास देऊ नये व त्यांच्या मालमत्तेस हात लावू नये. त्याच्या हाताखाली त्याच गावाचा रहिवासी असलेला; पण त्याच्या सैन्यात सैनिक असलेला एक माणूस होता. त्याने पावसापासून रक्षणासाठी आपल्या हेल्मेटच्या वर घालण्यासाठी बांबूची एक टोपी गावातील एका माणसाकडून मागून घेतली. लु मँगने हे कळाल्यावर या शिस्तभंगावर कारवाई म्हणून त्याला देहांताची शिक्षा सुनावली. तो त्या गावातील रहिवासी असूनही या बाबतीत त्याला कुठलीही दयामाया त्याने दाखविली नाही. या कठोर शिक्षेस पाहून

सर्व सैन्य सतर्क व भयभीत झाले. तेव्हापासून सेनाधिपतीच्या कोणत्याही आज्ञेचा भंग त्यांनी केला नाही. एवढेच नाही, तर रस्त्यात बेवारशी पडलेल्या वस्तूंनाही हात लावण्यास ते धजले नाहीत.

आपले सैनिक आक्रमणाच्या संपूर्ण तयारीत असतील; पण शत्रू त्या आक्रमणास तोंड देण्याच्या तयारीत नसेल, तर आपण विजयाच्या दिशेने फक्त अर्धाच रस्ता पार केला आहे.

त्याचप्रमाणे शत्रूची आक्रमणास तोंड देण्याची तयारी असेल; पण आपण आक्रमण करणार आहोत किंवा नाही हे आपल्याला माहीत नसेल, तरीसुद्धा आपण विजयाच्या दिशेने अर्धाच रस्ता पार केला असेल.

एकदा कूच केली की, एक प्रशिक्षित व अनुभवी सैनिक कधीही भांबावून जात नाही. एकदा त्याने छावणी सोडली की, तो कधीही अडखळत नाही. कारण त्याने संपूर्ण आढावा घेऊनच हालचाल सुरू केली असते. त्याला विजयाचा संपूर्ण विश्वास असतो. त्याने आवेशात येऊन कूच करण्यास सुरुवात केलेली नसते. म्हणून तो कोणतीही चूक न करता पुढे जाऊ शकतो.

6) कुशल सैनिकांचा वापर

म्हणूनच तुमच्या कुशल सैनिकास ओळखा, हे स्वतःस ओळखण्यासारखे आहे. ते कुशल सैनिक तुम्हाला विजय प्राप्त करून देतील, त्यांच्यावर विश्वास ठेवा. त्यांना जाणणे म्हणजे स्वर्ग व पृथ्वीस जाणण्यासारखे आहे.

आपल्या सैन्यातील निष्णात लोक, ऋतुचक्र, भूभागाची भौगोलिक व नैसर्गिक लक्षणे यांचे संपूर्ण ज्ञान व त्यांचा वापर करून बनविलेली रणनीती हा विजयाचा राजमार्ग आहे.

अध्याय 10

भूमितळावरील रचना

सारांश -

1) हे सहा प्रकारचे भूप्रदेश आहेत -
सुगम, सापळ्यात सापडविणाऱ्यासारखे, शह देणारे, चिंचोळे, खूप कठीण उभ्या चढणीचे व विस्तृत भूभाग.
2) ही सहा प्रकारची संकटे आहेत -
युद्धात पलायन, अवज्ञा (आज्ञा न पाळणे), अवनती वा ऱ्हास, विनाश, अंदाधुंदी व पिछेहाट / माघार.
3) रचना व संकटे या दोन्ही बाबी सेनाधिपतीच्या जबाबदारीत मोडतात.
युद्धात विजयास जबाबदार पैलू खालीलप्रमाणे आहेत -
भूभागाचा उपयोग, अंतर, धोके, संकटे, शत्रूची ताकद, आपल्या सैन्याची बलस्थाने.
4) आत्मविश्वास नसेल, तर युद्ध करू नका.
5) युद्ध चरमसीमेवर असताना राजाची आज्ञा तर्कसंगत वाटत नसेल, तर स्वतःचा निर्णय घ्या.

उत्तम सेनाधिपतीची लक्षणे

उत्तम सेनाधिपती विजयाच्या दिशेने व सैनिकांच्या हितासाठी अनुरूप असेच निर्णय घेतो. त्याला स्वतःच्या प्रसिद्धीची वा अवहेलनेची काळजी नसते. तो प्रत्येक कृतीची जबाबदारी स्वतःवर घेतो. नेहमी देशाचे भले पाहतो. विजयासाठी तो शत्रूस जाणून घेतो, आपल्या भूभागाची, सैन्यातील कुशल सैनिकांची व त्यांच्या मनोबलाची माहिती ठेवतो, तो त्यांना प्रोत्साहित करतो. शिस्त व सहिष्णुता यांचा तो संगम साधतो.

व्यवसायात उपयोग

1) आपल्या कर्मचाऱ्यांच्या शिस्तबद्ध वर्तनाची काळजी घ्या.
2) कुशल कर्मचाऱ्यांची ओळख ठेवा.
3) सहिष्णुतेने वागा.
4) आपला व्यवसाय ज्या वातावरणात केला जातो त्याची, तेथील व्यापाऱ्यांची, ग्राहकांच्या गरजांची माहिती असू द्या.

□□□

अध्याय 11
नऊ रणांगणे

(सन त्झु म्हणाला, 'आर्ट ऑफ वॉर'- युद्धकलेत नऊ प्रकारची रणांगणे ओळखली जातात.

1) Dispersive Ground : आपल्या /घरच्या बाजूचे युद्धक्षेत्र

2) Facile Ground : शत्रूच्या प्रदेशात खोलवर नसलेले, त्याच्या सीमेची सुरुवातीचे क्षेत्र.

3) Contentious ground : दोन्ही बाजूंना फायद्याचे ठरणारे क्षेत्र

4) Open ground : दोन्ही सैन्ये मुक्तपणे प्रवेश करू शकतील असे क्षेत्र

5) Ground of intersectiong highways : तीन राज्ये तीन बाजूस असलेले क्षेत्र

6) Serious ground : अनेक ध्वस्त झालेली शहरे मागे टाकून आत घुसल्यावर लागणारे क्षेत्र

7) Difficult ground : पर्वत, अरण्ये, उंच सुळके असे दुर्गम क्षेत्र

8) Hemmed in ground : चिंचोळ्या वाटेने पोहोचू शकू असे क्षेत्र, यात जाण्यासाठी अरुंद रस्त्यातून, दुर्गम खाचखळग्यातून जावे लागते

9) Desperate ground : लढण्याशिवाय पर्याय नसलेले व लढण्याशिवाय वाचण्याची शक्यता नसलेले क्षेत्र

आता प्रत्येक क्षेत्राचे गुणधर्म समजावून घेऊया.

1) Dispersive Ground : आपल्या / घरच्या बाजूचे युद्धक्षेत्र :

सैन्य आपल्याच क्षेत्रात लढाई करीत असते तेव्हा त्यास असे म्हटले जाते. आपल्याच क्षेत्रात लढाई चालू असल्याने, सैनिकांची घरे जवळ असल्याने, त्यांची बायका-मुले जवळच असल्याने अशा ठिकाणी सैनिक इतस्ततः व आपल्या घराच्या दिशेत जातात. त्यांच्या हालचालीत जोम व शौर्य नसते व माघार घेण्यास त्यांना आश्रय शोधण्यास तळ मिळतो.

2) Facile Ground :

जेव्हा तुम्ही शत्रूच्या हद्दीत नुकतेच घुसले असाल व फार दूरवरदेखील गेला नसाल तेव्हा त्या क्षेत्रास Facile Ground म्हटले जाते. आता असा प्रवेश झाल्यानंतर तुम्ही आत येताना वापरलेले पूल, बोटी इ. जाळून टाकाव्यात, म्हणजे प्रत्येकास स्पष्ट होईल की आता माघार नाही.

3) Contentious ground :

उभय पक्षांना सोयीचे व फायद्याचे ठरते असे हे क्षेत्र. दोन्ही पक्षांनी हे काबीज करण्यासाठी संघर्ष करावयाचा असतो. अशा क्षेत्रात मूठभर सैन्य किंवा कमकुवत सैन्य अनेक सैनिकांना व प्रबळ सैन्यास हरवू शकते. अशा क्षेत्राचे उदाहरण म्हणजे खिंडीचे वा बोगद्याचे प्रवेशद्वार अथवा तोंड. जेव्हा तुमच्यापेक्षा दसपट असलेल्या सैन्यांचा मुकाबला करायचा असतो तेव्हा यापेक्षा चांगले क्षेत्र शोधूनही सापडणार नाही.

4) Open Ground :

याचा एक अर्थ -सर्व बाजूंनी चांगले रस्ते असलेले क्षेत्र (हे क्षेत्र बुद्धिबळाच्या पटासारखे असते.) अशा क्षेत्रात परस्परांशी संबंध ठेवणे सोपे असते.

5) Ground of intersecting highways :

जेथे आपल्या राज्याच्या बाजूस शत्रूचे राज्य आहे व दोन्हींच्या सीमेवर आणखी एक राज्य असते, असे क्षेत्र जो कोणी सर्वप्रथम जिंकतो त्याला दोन्ही बाजूंवर राज्य करता येते. ती दोन्ही राज्ये त्याची दोस्त राज्ये बनू शकतात.

6) Serious ground :

जेव्हा एखादे सैन्य शत्रूच्या गोटापर्यंत घुसलेले असते व मागे अनेक किल्ले व सभोवताली भिंत असलेली गावे त्याने ध्वस्त केलेली असतात तेव्हा त्याला Serious ground असे म्हणतात.

7) Difficult ground :

जेथे पर्वत, दुर्गम चढण, दलदल व चिखल असते, ज्या प्रदेशात दळणवळण व हालचाल करणे खूप कठीण असते त्याला म्हणतात.

8) Hemmed in ground :

ज्या क्षेत्राचा मार्ग चिंचोळ्या घळीतून, खूप खोल खड्ड्यातून जातो व त्यातून आपण बाहेर यायचे असेल तर ते फक्त कठीण रस्त्यानेच करू शकतो. आपल्याला ध्वस्त करायला शत्रूची एक छोटीशी तुकडीच पुरेशी असते. याला Hemmed in ground म्हणतात.

9) Desperate ground :

यात व जाळ्यासारख्या जमिनीत फारसा फरक नाही. येथून बाहेर निघणे व पळून जाणे अशक्य असते. एक पर्वतप्राय सुळका समोर आहे, मागे मोठी नदी आहे -पुढे जाऊ शकत नाही, माघार अशक्य आहे. चेन हाओ म्हणतो, हे म्हणजे गळक्या जहाजात बसण्यासारखे अथवा आग लागलेल्या घरात अडकण्यासारखे असते.
याचे एक ज्वलंत उदाहरण तु मु देतो.

‘कोणत्याही स्थानिक वाटाड्यांची मदत नसताना तुम्ही शत्रूच्या प्रतिकूल इलाख्यात आहात. तुम्ही मृत्यूच्या विळख्यात आहात व आता शत्रूच्या सहानुभूतीची अपेक्षा करीत आहात. डावीकडे घळ आहे, उजवीकडे पर्वत आहे, रस्ता एवढा भयानक, जोखमीचा आहे की, तुमच्या घोड्यांना तुम्ही दोरीने एकत्र बांधलेले आहे व रथ खेचले जात आहेत. पुढे जायला खुला मार्ग नाही, माघार घेण्याचे रस्ते बंद झालेले आहेत. पुढे एकामागे एक अशा एकाच ओळीत जाण्याशिवाय पर्याय नाही. आता सैनिकांची जमवाजमव होतच आहे, तेवढ्यात शत्रू बहुसंख्येने अचानक तुमच्यावर चालून आला आहे. पुढे जाऊन श्वास घ्यायलाही जागा नाही व माघार घ्यायची म्हटली तर तीही शक्य नाही. तुम्ही निकराची लढाई सुरू करता; पण तेही फोल ठरते. एका क्षणाचीही उसंत मिळत नाही. आपण नुसतेच तळ टाकून आपल्या जागी ठाम राहिलो तर महिनोंमहिने वाया जातील व थोडीशी हालचाल जरी केली तरीही पुढून व मागून शत्रूच्या हल्ल्यास सामोरे जावे लागेल. सगळा इलाखा दुर्गम आहे, पाणी नाही, झाडेझुडुपे नाहीत, आपल्याकडे रसद नाही, शिधा नाही, कुमक नाही, घोडे थकलेत, माणसे कंटाळलीत, गलितगात्र झाली आहेत. शक्ती व नैपुण्याचा ऱ्हास झाला आहे. रस्ता एवढा चिंचोळा आहे की एकटा माणूस दहा हजारांना थोपवून धरू शकेल. आक्रमणाची सर्व आयुधे शत्रूच्या हातात आहेत. आपल्या फायद्याच्या सर्व वाटा आपण गमावून बसलो आहोत. ही अत्यंत भीषण परिस्थिती आहे. आपल्याकडे शूर सैनिक, अत्युत्तम अद्ययावत शस्त्रास्त्रे असूनही त्यांचा वापर कसा करायचा?’

यावर मात करण्याचे मार्ग

Desperate ground वर लढाई करू नये. Facile ground वर रेंगाळू नये.

Contentious ground वर असताना हल्ला करू नये.

या ऐवजी मोक्याच्या जागी सर्वप्रथम तळ ठोकण्यावर आपली सर्व ताकद खर्च करा. जर शत्रूने आपल्यावर कुरघोडी केली असेल तर आक्रमण करण्यासारखा वेडेपणा नाही. Contentious ground वर असताना तुम्ही आधीच फायद्याच्या स्थितीत असता. जर ती जागा आधीच शत्रूच्या हातात असेल तर त्यावर हल्ला करण्याआधी दहादा विचार करा. आपण पलायन करीत आहोत असा देखावा निर्माण करून त्याला तो विजयी झाल्याचे प्रलोभन दाखवा. आपले नगारे वाजवत अशा ठिकाणी जा की जिथे तो तुमच्यावर मातच करू शकत नाही. अशा प्रकारे तो Contentious ground मधून बाहेर पडेल. खूप धुरळा उडवा, तुमच्या सैन्याची एक उत्तमात उत्तम तुकडी दूर पाठ्वा व तो तेथे येताक्षणीच घाव घाला. मग तुमचा शत्रू सैरावैरा पळू लागेल.

Open ground वर असताना शत्रूचा मार्ग रोखून उभे राहू नका. असा प्रयत्न केल्यास तो फोल ठरेल. अशा प्रकारे रस्ता रोखून आहेत ते उघडे पडतील. त्यांच्या जिवास

गंभीर धोका निर्माण होईल. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व सैन्य एकत्र घेऊन पुढे चला.

Ground of Interesecting highways वर तुमच्या मित्र वा दोस्त सैन्यांशी हात मिळवा किंवा बाजूच्या राष्ट्रांशी हात मिळवा.

Serious ground वर एकत्र व्हा व लूटमार करू नका.

पण असे करताना, सैन्य शत्रूच्या क्षेत्रात प्रवेश करते, तेव्हा तेथील स्थानिक लोकांना अन्याय्य पद्धतीने वागवू नका तर त्यांना जवळ करा. हान सम्राट काओ त्सु ने जेव्हा चीईन प्रांतात विजय प्राप्त करून प्रवेश केला तेव्हा स्त्रियांना मानाने वागविले व लूटमार केली नाही.

Serious ground वर असताना लक्षात घ्या की, आता पुढे कूच करण्याची शक्यता कमी आहे व माघारदेखील घेणे अशक्य आहे. यामुळे प्रदीर्घकालीन मुकाबला करण्यासाठी सर्व बाजूने साधनसामग्री गोळा करा व शत्रूवर बारीक लक्ष ठेवा.

Difficult ground वर धीराने आगेकूच करा. तेथे तळ टाकू नका.

Hemmed-in ground वर युद्धनीतीचा प्रयोग करा. कोणत्यातरी असाधारण तंत्राचा वापर करा. अशा ठिकाणी अशी कोणतीतरी क्लृप्ती केली पाहिजे, जी त्या परिस्थितीस अनुरूप असेल. अशा प्रकारे आपण जर शत्रूस गुंगारा देऊ शकलो तर संकट टळेल.

याचे उदाहरण असे-

प्राचीन चीनमधील एका युद्धात एक पक्ष डोंगराळ भागात अडकला होता. सर्व मार्गांची नाकेबंदी झाली होती. काय करायचे हे कळत नव्हते. मग एक अफाट क्लृप्तीचा उपयोग त्या पक्षाने केला. रात्रीच्या वेळेस झाडाच्या कोरड्या फांद्या त्यांनी आपल्या सैन्यातील 200 एक बैलांच्या शिंगाला बांधल्या. फांद्यांना त्यांनी पेटवून दिले. त्या बैलांना शत्रूच्या बाजूस सोडून दिले. अशा प्रकारे वेगाने आपल्याकडे येत असलेले पलिते पाहून शत्रू भयभीत झाला व पळून गेला.

Desperate ground : वर लढा. त्यावाचून तुमच्या हातात काहीही नाही. जर तुम्ही निकराची लढाई केलीत तर जगण्याचा व जिंकण्याचा मार्ग तुम्हाला सापडू शकेल. निष्क्रिय राहिलात तर नाहीतरी तुम्ही मरणारच आहात.

वचन 1

पुरातनकाळात जे युद्धकलेत निष्णात होते त्यांना शत्रूच्या आघाडी व पिछाडी यांच्यामध्ये फूट कशी पाडायची हे माहीत होते. अशा प्रकारे लहान व मोठ्या तुकड्यातील समन्वय ते तोडत.

दुर्बळ झालेल्या सैन्यास मदत करण्यास ठेवलेल्या तुकडीस त्यांचे काम करण्यास अडथळा निर्माण करत.
अधिकाऱ्यांनी आपल्या सैनिकांना सांभाळून घेण्याच्या कामात ते अडथळा आणत.
जेव्हा शत्रूचे सैनिक विखुरलेले असत तेव्हा त्यांची जमवाजमव ते होऊ देऊ नसत.
सैन्य एकत्र असलेल्या सैन्याच्या तुकडीत ते बेशिस्त माजवीत.
त्यांच्या फायद्याचे असेल तेव्हा ते आगेकूच करीत अन्यथा ते आहे त्या ठिकाणी मुक्काम ठोकून राहत असत.
याचा अर्थ असा की, शत्रूच्या पुढच्या व मागच्या भागाच्या सैनिकांमधील संपर्क तोडण्यात येत असे. यामुळे त्यांच्यातील ताळमेळ नष्ट होत असे. त्यांची हालचालीत सुसूत्रता नसे. अशा प्रकारे शत्रूच्या सैन्यांतील समन्वयात व्यत्यय आल्यामुळे ते स्थैर्य प्राप्त करण्यासाठी कुठल्याही परिस्थितीत आगेकूच करीत, काही फायदा झाला नसेल तर ते आहेत त्या स्थितीत थांबत. अशा प्रकारे त्यांच्यात कृती व परिणाम यातील सुसूत्रता भंग होत असे.
शत्रूच्या सैन्यांचे विभाजन करून, त्यांच्या सैनिकांना सैरभैर करून, त्यांना एकजूट होऊ देऊ नसत. ते एकत्र असले तरी त्यांच्यात बेशिस्त माजवून सुसूत्रतेत बाधा आणत.

वचन 2

आपल्यावर चालून येत असलेल्या एखाद्या शत्रूच्या बलाढ्य व शिस्तबद्ध फौजेस कसे थांबवायचे हे मला विचारलेत तर मी म्हणेन, त्याच्या अत्यंत प्रिय अशा गोष्टीवर विजय मिळवून सुरुवात करा. मग अशा प्रकारे तुमच्या मागण्या मान्य करण्यास त्याला भाग पाडता येईल.
युद्धात सर्वांत मूल्यवान गोष्ट आहे वेग.
शत्रूच्या कमकुवत तयारीचा फायदा घेण्यासाठी त्याची तयारी जेथे अपूर्ण आहे अशा ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी अनपेक्षित मार्गांचे अवलंबन करा.
तुम्ही शत्रूच्या क्षेत्रात खोलवर घुसला असता, तुमचे सैन्य एकवटले असते तेव्हा आक्रमण करणे हा सर्वसाधारणपणे एक उत्तम मार्ग आहे
अशा वेळेस तुमचा शत्रू तुमच्यापेक्षा वरचढ होऊ शकणार नाही.
जर तुम्ही सुपीक शेतांवर हल्ला केलात तर तुमच्या सैन्यास भरपूर शिधा मिळेल
जर तुम्ही कमी श्रम करून उमदी कामगिरी केलीत तर तुम्ही एकजूट राहाल व तुम्ही आपले बळ वाढवाल.
या वचनात सन त्झु काय म्हणत आहे याबद्दल वाद आहे. काही मतांप्रमाणे तो काही महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख करीत आहे, ज्यावर शत्रू खूप अवलंबून आहे, ज्या

गोष्टींवर शत्रू अवलंबून असतो व ज्यांच्या प्राप्तीवर त्याचे यश अवलंबून असते त्या अशा
1) मोक्याच्या ठिकाणावर स्वारी करणे
2) शत्रूच्या संस्कृतीस उद्ध्वस्त करणे
3) स्वत:च्या संदेशवाहकांचे रक्षण. शत्रूच्या योजनांचा नाश करणे हा आपला उद्देश हवा.
याव्यतिरिक्त शत्रूस महत्त्वाच्या बाबी म्हणजे सैन्याचे मनोबल अथवा आपल्या शस्त्रास्त्रांपैकी काही महत्त्वाची शस्त्रे.
सैन्यात विजय प्राप्त करण्यासाठी आवश्यक, नव्हे अति आवश्यक बाब म्हणजे वेग. याबद्दल सन त्झु आधीच्या अध्यायातसुद्धा बोलला आहे; पण तरीदेखील सगळ्या नीतींचे सार जर जाणून घ्यायचे असेल तर ते एका शब्दात - 'वेग' असे आहे. सैनिक शास्त्राचा हा गाभा असून सेनाधीपतीचे हे मुख्य काम आहे.
यापुढे जाऊन सन त्झु असे म्हणतो की, शत्रूच्या तयारीचा अंदाज घ्या. तो कोणत्या बाबतीत तयार नाही ते पाहा. त्याच्या महत्त्वाच्या; परंतु खूपच दुर्लक्षित ठिकाणांवर हल्ले करा. त्याच्यासाठी महत्त्वाची आहेत अशी अनेक ठिकाणे तुम्हाला सापडतील; त्या ठिकाणी त्याचे लक्ष नसेल.
यानंतर तो म्हणतो की, तुम्ही जसजसे एखाद्या शत्रूच्या राज्यात शिरू लागाल तसतसे तुमच्या सैन्याचे मनोबल उंचावत जाईल. शत्रू पेचात सापडेल, तो भांबावून जाईल. आता मनोवैज्ञानिक दबावाचा वापर करायची वेळ असून अशा वेळी आपले सैन्य एकदम जोमात असणे आवश्यक आहे, यामुळे त्यांच्या अंगात दहा हत्तींचे बळ येईल. यासाठी शत्रूच्या देशातील शिधा वापरू लागा. अशा वेळेस तुम्ही तुमच्या सैनिकांचे थोडेसे लाड जरी केले तरी हरकत नाही. त्यांना चांगले खाऊपिऊ घाला. त्यांची उत्तम काळजी घ्या. त्यांचा जोश व ताकद कशी अबाधित राहील याकडे लक्ष द्या. एक सेनाधिपती या नात्याने त्यांच्याबरोबर जेवा.

वचन 3

तुमचे सैन्य सदोदित संचलित ठेवा व चपखल व्यूहरचना तयार करा, अजेय आयोजन करा.

माघार घेता येणार नाही, जेथून सुटका नाही अशा जागी तुमचे सैन्य तैनात करा. अशा दुर्गम जागी त्यांना पाठवा की जेथून लढण्यापेक्षा मरण पत्करले तर बरे असे त्यांना वाटेल. मग अशा स्थितीत तुम्ही जिंकू शकणार नाहीत अशी कोणतीही गोष्ट असणार नाही.

चेंग वु हे समजावून सांगण्यासाठी एक उदाहरण देतो-'जर एखादा माणूस उघड्या तलवारीनिशी एखाद्या भरबाजारात सैरावैरा धावू लागला तर प्रत्येक जण त्याच्या वाटेतून दूर होतो. याचा अर्थ हा नाही की, फक्त हाच माणूस शूर असतो व इतरांना त्याचा मुकाबला करणे अशक्य असते अथवा ते भ्याड असतात. फरक एवढाच असतो की या तलवारीनिशी पळत असलेला माणूस आपल्या जिवावर उदार झालेला असतो व आपल्याला काय होईल याची तो तमा बाळगत नाही आणि इतरांना आपल्या जिवाची काळजी असते व म्हणून त्यांची तुलनाच होऊ शकत नाही.'

वचन 4

अधिकारी व सैनिक-दोघेही आपल्या ताकदीचा समान व निकराने प्रयोग करतील. जर ते नामुश्कीच्या जागी असले तर आपली शक्ती एकवटून ते निकराची झुंझ देतील.

वचन 5

जेव्हा सैनिक अगतिक झालेले असतात तेव्हा त्यांच्या मनातील भीती पळून गेलेली असते. त्यांना आश्रय मिळो वा न मिळो, ते खंबीरपणे उभे राहतील. ते प्रतिकूल प्रदेशात असतील, अत्यंत बिकट प्रदेशात असतील, तरीही ते निश्चलपणे उभे राहतील. मदत मिळाली नाही, कुमक मिळाली नाही तरीही ते जीव पणाला लावून लढतील.

वचन 6

अशा प्रकारे तुमच्याकडून निर्देशांची वाट न पाहता, तुमचे सैनिक तुम्ही काहीही न मागता तुम्हाला हवे तेच सर्वकाही करतील. मनात कोणतीही आडकाठी न ठेवता ते आपला विश्वासूपणा दाखवतील. त्यांना तुम्ही आज्ञा देण्याची गरज नाही. त्यांच्यावर तुम्ही संपूर्ण विश्वास टाकू शकता.

वचन 7

कोणत्याही दृष्टांताची वाट पाहू नका. अंधश्रद्धांवर विसंबू नका. मग प्रत्यक्ष मरण येईपर्यंत तुम्ही कोणत्याच संकटांची भीती बाळगायचे कारण नाही.

अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणारे नेहमी खूप साशंक असतात, काहीही करण्यास नेहमी कचरत असतात. ते भ्याड बनून आपली अवनती करून घेतात व अशा प्रकारे प्रत्यक्ष मरण येण्याआधीच अनेकदा मरण पावतात. अमानवी शक्तींच्या अगम्य अस्तित्वावरील विश्वास, फेरे व मंत्रतंत्र यावर संपूर्णपणे बंदी घातली पाहिजे. आपल्या सैन्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने दैवी शक्तींचा कौल मागण्यावर सक्त मनाई केली पाहिजे. नाहीतर अशा अंधविश्वासू वर्तनामुळे सैनिकांतील जोश व

उत्साह पळून जाईल. ते विनाकारण प्रत्येक गोष्टीत अंधश्रद्धेने देवावर भरवसा टाकून असाहाय्य होतील. याचा अर्थ हा की, मनातील सर्व शंका-कुशंका, अंधश्रद्धा पळवून लावल्या पाहिजेत. यामुळे तुमचे सैनिक विचलित होणार नाहीत व मृत्यू येईपर्यंत खंबीर राहतील. (येथे मृत्यूचा उल्लेख वरचेवर करण्याचे कारण हे की एकदा त्याची भीती गेली की मग सैन्य आपल्या असलेल्या शक्तीपेक्षा अधिक व जिवावर उदार होऊन लढेल. या भावनेतील व आपल्या भगवद्गीतेतील 'हतो वा प्राप्स्यसी स्वर्ग---' या वचनातील साम्य नमूद करण्याजोगे आहे.

वचन 8

जर आपले सैनिक संपत्तीत लोळत नसतील तर याचा अर्थ असा नाही की, त्यांना श्रीमंत व्हायला आवडत नाही. ते दीर्घायुषी नसतील तर त्याचा अर्थ असा नाही की दीर्घायुषी होणे त्यांना पसंत नाही.

सन त्झुने हे वचन मोठ्या मानभावीपणे लिहिले आहे. संपत्ती व दीर्घायुष्य कुणास नको असते? सर्वच मनुष्यप्राण्यांना त्यांचे आकर्षण असते. म्हणून आपली संपत्ती व आयुष्य याचा त्याग करणे -आपल्या प्रियजनांचा त्याग करणे, संपत्तीवर तिलांजली देणे व प्राण पणास लावणे या काही त्यांना आवडणाऱ्या गोष्टी नाहीत; पण त्यांच्याकडे दुसरा पर्याय नसल्याने त्यांना हे करावे लागते. सन त्झु सांगू इच्छितो की, हे सैनिकसुद्धा अखेरीस सामान्य माणसेच आहेत. ते लूटमार करण्यास वा युद्ध न करण्यास वा तसल्याच काही प्रलोभनास बळी पडणार नाहीत हे पाहण्याचे त्यांच्या सेनाधिपतीचे कर्तव्य आहे.

वचन 9

त्यांना युद्धास जाण्याची आज्ञा दिली जाईल, त्यादिवशी ते कदाचित अश्रू ढाळू लागतील हळवे, भाववश होतील.

पण एकदा त्यांना युद्धभूमीवर आणले जाईल तेव्हा ते अमाप शौर्य दाखवतील.

चिनी भाषेतील याचा अर्थ नुसत्या अश्रू ढाळण्यापलीकडचा आहे. त्यांना आत्यंतिक शोक झालेला असेल. त्यांच्या अश्रूंचे खरे कारण भीती नव्हे. त्यांनी शपथ घेतली आहे की, ते युद्ध करतील किंवा अखेरपर्यंत लढा देत राहतील व गरज पडल्यास जीवदेखील देतील. त्यांचे अश्रू संमिश्र भावनांचे प्रतीक आहे- अगतिकचे, आपल्याला मिळालेल्या संधीचे, कदाचित आपल्या प्रियजनांना पुन्हा भेटता येणार नाही याची जाणीव झाल्यामुळे होत असलेल्या विरहाचे. एक सेनाधिपती म्हणून त्याकडे सामंजस्याच्या दृष्टिकोनातून पाहा.

इलियड या महाग्रंथातसुद्धा त्यातील थोर योद्ध्यांचे वर्णन अशाच प्रकारे करण्यात आलेले आहे, तेदेखील भावनाविवशतेने अश्रू ढाळताना दाखविले गेले आहेत.

वचन 10

युद्धातील निष्णात कूटनीतिज्ञाची तुलना चीनमधील 'शुआई जान' या सापाशी करता येईल. शुआई जान हा साप चँग प्रांतात सापडतो. त्याच्या डोक्यावर वार केला तर त्याची शेपटी तुमच्यावर वार करेल. जर त्याच्या शेपटीवर प्रहार केला तर त्याचे डोके तुमच्यावर प्रहार करेल. त्याच्या मध्यभागी मारले तर डोके व शेपूट दोन्ही बाजूने तो आक्रमण करेल.

शुआई जान याचा चिनी भाषेतील अर्थ म्हणजे 'अचानक' किंवा 'वेगाने'. या सापाला नि:संदिग्धपणे हेच नाव देण्यात आलेले आहे. याचे कारण त्याचा वेग व त्याचा अचानकपणे हल्ला करण्याचा गुणधर्म. या गुणधर्मामुळे 'शुआई जान' ही संज्ञा आता 'सैनिकी नीतीसाठी' वापरली जाते.

वचन 11

सैन्याला शुआई जानचे अनुकरण करता येईल का? तर माझे उत्तर असेल की - होय.

पण उदाहरण असे - वु व युएह हे एकमेकांचे व त्यामुळे त्यांचे सैनिकही साहजिकच एकमेकांचे शत्रू आहेत; तरीही ते जर एकाच नावेत नदी पार करीत असतील व ते एका वादळात सापडतील तर, ज्याप्रमाणे उजवा हात डाव्या हाताची मदत करतो त्याचप्रमाणे ते दोघेही एकमेकांची मदत करतील.

याचा अर्थ असा की एकाच संकटाचा सामना करताना दोन शत्रूसुद्धा एकमेकांची मदत करतील.

वचन 12

म्हणून नुसते घोड्यांना लगाम लावण्यात वा रथांची चाके जमिनीत रुतवून ठेवण्यात अर्थ नाही.

सन त्झु म्हणतो, की अशा तांत्रिक बाबींनी पलायन अशक्य करणे एवढेच पुरेसे नाही. जोपर्यंत तुमचे लोक व सैनिक एकजूट होऊन एकाच लक्ष्याकडे, विजयाकडे ध्यान केंद्रित करीत नाहीत, एकमेकांशी सहानुभूतीने सहकार्य करीत नाहीत तोपर्यंत कोणतीही रणनीती उपयोगाची नाही. शुअन जानच्या उदाहरणावरून शिकण्याचा हा धडा आहे.

वचन 13

एका उत्तम सैन्याच्या रचनेचे मूळ तत्त्व म्हणजे धैर्यशालीपणाचा एक मापदंड तयार करणे. ही पातळी प्रत्येकाने गाठावयासच हवी.

शब्दशः याचा अर्थ हा की, सैन्य हे एक एकजूट, वेगळे अस्तित्व असलेली संस्था आहे असे आपण समजले तर त्यातील प्रत्येक घटकाचे गुणधर्म तेच व समान असतील.

त्याहून निकृष्ट त्यांचे गुणधर्म असू शकणार नाही. म्हणूनच एक समूह म्हणून हा मापदंड असणे अत्यावश्यक आहे.

वचन 14

युद्धभूमीचा वापर करून सशक्त व दुर्बल, या दोन्ही घटकांचा सर्वोत्तम वापर कसा करून घ्यायचा ही एक परीक्षा आहे.

सन त्झु म्हणतो की, सशक्त व दुर्बल घटकांचा सर्वोत्कृष्ट वापर करून घ्यायचा एकमेव मार्ग म्हणजे युद्धभूमीतील नैमित्तिक फरकांचा वापर करून घेणे. कमी कुशल सैनिक मोक्याच्या जागी व सर्वोत्तम ठिकाणी तैनात केले तर तेदेखील त्यांच्याहून सशक्त अशा सैनिकांएवढीच उत्तम कामगिरी करतील. युद्धक्षेत्रातील उत्तम व मोक्याच्या ठिकाणामुळे कमकुवत सैन्यांची दुर्बलता निष्क्रिय होण्यास मदत होते. त्यामुळे त्यांचा जोम व धैर्य वाढते. कर्नल हेंडर्सनसुद्धा म्हणतो,' युद्धनीतीवरील सर्व साहित्य व प्रशिक्षण यांचा आदर ठेवून मी एवढेच म्हणू इच्छितो की अनेक पुस्तकांत व प्रशिक्षणात युद्धभूमीच्या योग्य वापरावर फारसा भर दिला गेलेला नाही. वेगवेगळ्या स्थानांना फारसे महत्त्व दिले गेलेले नाही. युद्धभूमीच्या नैसर्गिक फायद्यांचा वा तोट्यांचा योग्य त्या प्रकारे विचार करावयासच हवा.'

वचन 15

यामुळे एक कुशल सेनाधिपती आपल्या सैन्याच्या तुकड्यांचं असे मार्गदर्शन करतो की जणू काही तो एका सैनिकास बोटाने धरून नेत आहे.

या वाक्याचा अर्थ असा की, एक कुशल सेनाधिपती आपले काम लीलया, सोपेपणाने (तो निष्णात असल्याने) करीत आहे.

वचन 16

गोपनीयता बाळगणे, खंबीर, न्यायप्रिय व मितभाषी असणे हे एका सेनाधिपतीचे कर्तव्य आहे.

गरज भासल्यास आपल्या अधिकाऱ्यांना व सैनिकांना संमोहित करण्याची, खोटे अहवाल व देखावे निर्माण करण्याची पात्रतासुद्धा त्याकडे हवी. गरजेनुसार त्यांना संपूर्ण अंधारात त्याला ठेवता यावयास हवे.

आपल्या मनातील खऱ्या योजना सुरुवातीसच आपल्या सैन्यास उघडपणे सांगू नयेत. यामुळे काही होण्याआधीच ते आनंदाने जल्लोष करतील. शत्रूची दिशाभूल करणे, त्याला संमोहित करणे व त्याला आश्चर्यचकित करणे हे युद्धाचे सर्वांत पहिले तत्त्व आहे. याशिवाय आपल्याच सैनिकांना संमोहित करण्याबद्दल या मुद्द्याचा ऊहापोह होत असल्याची शक्यता निर्माण होऊ शकते; परंतु वस्तुत: अनेक युद्धात या क्लृप्तीचादेखील खूप विस्तृतपणे वापर करण्यात आला आहे.

युद्धकला ही संभ्रम निर्माण करण्याच्या कलेवर आधारित आहे. असे असताना हे फक्त शत्रुपक्षासच लागू नसून आपल्या सैनिकांनादेखील लागू आहे. त्यांना तुमच्या मागे येऊ द्या; पण त्यामागील कारण त्यांना कळू देऊ नका.

वचन 17

एक उत्तम सेनाधिपती आपली योजना व युद्धनीती गरजेनुसार वेळोवेळी बदलतो. शत्रूस तो आपल्यापुढील कारवाईचा छडा लागू देत नाही. वेळोवेळी आपला तळ बदलून, आपला मार्ग बदलून, चक्राकार मार्गाने कूच करीत आपली योजना शत्रूने समजून घेण्याच्या मार्गात तो अडथळे निर्माण करतो.

अत्यंत नाजूक क्षणी एखाद्या माणसाने खूप उंचावर चढल्यानंतर ज्या शिडीने तो चढला तीच त्याने ढकलून पाडून दिली तर कसे वाटेल? त्याच पद्धतीने तो वागतो. मदतीचा हात देण्यापूर्वी तो आपल्या लोकांना शत्रूच्या प्रांतात खूप खोलवर घुसवतो. अशा प्रकारे त्याच्या सैनिकांच्या परतीचा मार्ग आता संपूर्णपणे बंद झालेला असतो.

वचन 18

तो आपली आणलेली सर्व जहाजे जाळून टाकतो, सगळ्या पळवाटांचा मार्ग नष्ट करतो. मेंढ्या हाकणाऱ्या एखाद्या मेंढपाळाप्रमाणे तो आपल्या सैनिकांना मनात येईल त्या दिशेने घेऊन जातो. आपण कोणत्या दिशेने जात आहोत याचा त्यांना संभ्रम पडतो.

सैनिकांना आपण पुढे जात आहोत की मागे एवढेच कळते. त्यांना त्यामागील आक्रमणाचा व काबीज करण्याचा उद्देश माहीत नसतो.

वचन 19

आपल्या सैनिकांना वेळोवेळी एकत्र आणणे व धोक्यास तोंड देण्यास भाग पाडणे - हे सेनाधिपतीचे कर्तव्य आहे असे मानले पाहिजे.

सन त्झु म्हणतो की, एकदा कूच केली की शत्रूवर आघात करण्यात कोणतीही दिरंगाई नसावी. हा मुद्दा या संपूर्ण पुस्तकात वरचेवर येतो. आपल्या सैन्यास दगा देऊन सैनिकांनी ऐनवेळी पलायन करणे हे त्याकाळीदेखील होत असे म्हणून ही काळजी.

वचन 20

नऊ प्रकारच्या युद्धक्षेत्रास अनुकूल असे उपाय म्हणजे आक्रमण वा बचाव त्वरितपणे करणे व त्याबरोबरच मानवी स्वभावाचे मूलभूत नियम सदोदित लक्षात ठेवून त्यानुसार आचरण करणे. या गोष्टींचा सतत अभ्यासदेखील चालू ठेवला पाहिजे.

वचन 21

शत्रूच्या राज्यात आक्रमण करताना नेहमी खोलवर घुसल्याने सैन्यातील एकजूट वाढते व अत्यंत थोड्या अंतरावर शिरकाव केल्यास सैन्य विखुरते. हा एक अढळ नियम आहे.

वचन 22

जेव्हा तुम्ही तुमचा देश मागे टाकून तुमचे सारे सैन्य शेजारच्या प्रांतात नेता तेव्हा तुम्ही स्वतःस अडचणीच्या परिस्थितीत टाकता.

जेव्हा चारी दिशांस दळणवळणाची साधने उपलब्ध असतात तेव्हा हे क्षेत्र 'Intersecitng highways' **या परिभाषेत गणले जाते.**

जेव्हा तुम्ही शत्रूच्या क्षेत्रात खोलवर घुसता तेव्हा ते क्षेत्र 'Serious ground' **असते**

व

तुम्ही थोडासाच शिरकाव केलेला असतो तेव्हा ते 'Facile ground' **असते.**

जेव्हा शत्रू तुमच्या पिछाडीस बलाढ्यपणे हल्ला करत असतो व तुमच्यासमोर अरुंद खिंड असते तेव्हा ते 'Hemmed-in ground' **असते.**

जेव्हा आसरा घेण्यास कोठेच जागा नसते तेव्हा त्याला 'Desperate ground' **असे म्हणतात.**

म्हणून** 'Dispersive ground' **वर असतानाच मी माझ्या सैनिकांना एकजूट होण्याच्या उद्देशाने प्रेरित करेन.

हे उद्दिष्ट बचावात्मक धोरणाची नीती असताना व युद्ध टाळावयाचे आहे अशी योजना असताना सर्वोत्कृष्ट प्रकारे साध्य करता येते.

'Facile ground' वर असताना माझ्या सैन्याच्या सर्व तुकड्यांमध्ये उत्तम समन्वय आहे, याची मी खात्री करून घेईन.

तु मु या सेनाधिपतीच्या म्हणण्यानुसार, दोन प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीपासून संरक्षण होण्यासाठी हे केले जाते.

1) आपल्या सैन्यातूनच लोक फितूर होणे वा त्यांनी सैन्यातून निघून जाणे.

2) शत्रूकडून अचानक आक्रमण होणे.

याओ चेन (निष्णात योद्धा) म्हणतो, 'आगेकूच करीत असताना सर्व तुकड्यांनी एकमेकांशी जवळच्या संपर्कात असणे गरजेचे असते व तळ ठोकला असताना तळ मजबूत करण्यात सातत्यता व एकसूत्रीपणा असावा लागतो.'

'Contentious ground' वर मी सैन्याच्या पिछाडीस घाई करीन.

आपल्या सैन्याची पिछाडी लवकरात लवकर पुढे आणल्याने सैन्याचा मध्य भाग व पुढील भाग लवकरात लवकर आपल्या ध्येयापर्यंत पोहोचतो. याचाच अर्थ हा की, तिन्हीमध्ये जास्त अंतर असून चालत नाही. समजा शत्रू अजून त्याच्या अंतिम

ठिकाणावर पोहोचला नसेल व आपण त्याच्या मागे असू तर त्याला अंतिम ठिकाणावर पोहोचू न देण्यासाठी वेगाने त्याचा पाठलाग केला पाहिजे.
खुल्या मैदानावर मी माझ्या बचावफळीवर करडी नजर ठेवेन. 'Intersecting highways' वर मी माझ्या दोस्तराष्ट्रांशी असलेले माझे संधान आणखी दृढ करेन.
'Serious ground' वर रसद व कुमक अव्याहतपणे येत आहे याची मी काळजी घेईन. (यातील गर्भितार्थ संभाषणास व संदेशांससुद्धा लागू आहे, म्हणजे माझ्या प्रदेशाशी संभाषण व संदेशाची देवाणघेवाणही चालू ठेवीन.)
'Difficult ground' वर मी रस्त्यावरून सतत आगेकूच करीत राहीन.
'Hemmed in ground' वर मी माझ्या माघारी जाण्याचा प्रत्येक मार्ग मी बंद करून टाकेन.
सकृद्दर्शनी असे दिसेल की, मी माझा बचाव करीत आहे; पण माझी खरी योजना अचानकपणे शत्रूच्या सैन्यावर हल्ला करण्याची आहे. यामुळे माझे सैनिक निकराचे व जिवावर उदार होऊन युद्ध करतील.
'Desperate Ground' वर असताना मी माझ्या सैनिकांसमोर त्यांनी आपला जीव वाचविण्याच्या प्रयत्नाच्या फोलपणाचा पुनरुच्चार करीन.
अशा वेळेस तुमचे सर्व सामान जाळून टाका, तुमची रसद व शिधा फेकून द्या, सर्व विहिरी बुजवून टाका, तुमची स्वयंपाकाची सर्व भांडी मोडून टाका. तुमच्या सैनिकांना स्पष्ट कळू द्या की, आता जगणे अशक्यप्राय आहे. त्यांनी जिवात जीव असेपर्यंत प्राण पणाला लावून लढायलाच हवे. जगण्याची कोणतीही आशा न ठेवण्यातच जीव वाचविण्याची काहीतरी शक्यता आहे. या संपूर्ण पद्धतीमधील हेतुपुरस्सर, पूर्वनियोजित विक्षिप्तपणा व तर्कसंगतीचा अभाव नमूद करण्याजोगा आहे.
वाचकाने हा अध्याय व याआधीचा अध्याय यांची सांगड घालून परिस्थितीनुसार निर्णय घ्यावयाचे आहेत. या संपूर्ण पुस्तकात वरकरणी परस्परविरोधी विधानेदेखील सापडतील; पण काही उपाय पर्यायवाचीदेखील असू शकतात.
काळाच्या ओघात कदाचित अनेक वाचकांनी व अभ्यासकांनी आपली मते सल्ल्याच्या स्वरूपात जोडली असल्याची शक्यतादेखील नाकारता येत नाही.
घेरले गेले असताना तुल्यबळ प्रतिकार करणे, जेव्हा दुसरा काहीच पर्याय नसेल तेव्हा तुंबळ युद्ध करणे व संकटात असताना दिलेल्या आज्ञांचे संपूर्ण पालन करणे हा तर सैनिकांचा स्वभावच असला पाहिजे.
शेजारच्या राजांची नीती काय आहे, त्यांच्या योजना काय आहेत हे कळेपर्यंत त्यांच्याशी आपल्याला संबंध प्रस्थापित करता येत नाहीत. प्रदेशाची संपूर्ण ओळख (तेथील दरीखोरे, पर्वत, अरण्ये, तेथील दुर्गम प्रदेश, दलदल, ओल, सुळके, त्या

प्रदेशाच्या भूभागाची नैसर्गिक जडणघडण) इ. समजल्याशिवाय आपण आपल्या सैन्याचे नेतृत्व करण्यायोग्य नसतो. मुरलेल्या स्थानिकांची मदत घेतल्याशिवाय आपल्याला त्या नैसर्गिक फायद्यांचा उपयोग करून घेता येत नाही.
- हे वचन अध्यायामधील असून त्याचे महत्त्वाचे प्रतिपादन करण्यासाठी त्याचा पुनरुच्चार करण्यात आला आहे.

वचन 23

खाली दिलेल्या 4 ते 5 तत्त्वांकडे दुर्लक्ष करणे हे युद्धशास्त्राशी संबंध असणाऱ्या कोणत्याही अजिंक्य सम्राटास शक्य नाही.

तो सम्राट एखाद्या बलाढ्य राज्यावर चालून जातो, तेव्हा शत्रूच्या बळाची एकजूट न होऊ देण्यात त्याच्या निष्णातपणाची ओळख पटते. तो आपल्या शत्रूंना भारावून टाकतो व शत्रूचे हितचिंतक शत्रूशी हातमिळवणी करण्यापासून परावृत्त केले जातात. एका बलाढ्य राज्यावर तुम्ही जेव्हा चालून जाता तेव्हा त्याच्या सैन्याचे विभाजन करण्यात तुम्हाला यश आले तर तुमचे श्रेष्ठत्व निदर्शनास येते. अशा प्रकारे तुम्ही शत्रूस भयभीत करून सोडता. तुम्ही शत्रूस भयभीत केलेत तर त्याचा परिणाम शेजारच्या राज्यांवरही होऊन ते तुमच्या शत्रूशी हातमिळवणी करणार नाहीत. ते बलाढ्य राज्य एकदा जरी हरले तरीही आजूबाजूची छोटीमोठी राज्ये त्याच्याशी हातमिळवणी करणार नाहीत. याचाच दुसरा अर्थ असा की, आपण आततायीपणे आपल्याहून बलाढ्य राज्यावर हल्ला केला तर आपल्या प्रजेचा रोष ओढवून घेऊ. इतकेच नव्हे, आपली सैनिक ताकद शत्रूच्या ताकदीहून अर्ध्यापेक्षा कमी असेल तर आपली मित्र राज्ये घाबरून व आपली साथ सोडून देतील.
म्हणून सर्वांशीच तो संबंध जोडत नाही; इतर राज्यांची सत्ता घ्यायची इच्छादेखील तो बाळगत नाही. तो स्वतःच्याच गुप्त योजना लढवत असतो व त्यामुळे त्याचे विरोधक त्याला भिऊन असतात.
तो बलाढ्य असल्याने गुंतागुंतीचे असे मित्रत्वाचे करार तो नाकारतो, तसे करणे त्याला परवडते. तो स्वतःच्याच गुप्त योजनांचा पाठपुरावा करतो. याबरोबरच तो मित्रत्वाचे इतर बाह्य प्रस्ताव एक आत्मसन्मानाची बाब म्हणून तो नाकारतो.
अशा प्रकारे तो त्यांची शहरे व राजधान्या जिंकतो व त्यांची राजसत्ता उलटून लावतो.

वचन 24

आधीच्या नियमांची तमा न बाळगता इनाम द्या व शिक्षा करा (ही शिक्षा देहांताची शिक्षादेखील असू शकते.)

वु त्झु (थोड्या उपरोधाने) म्हणतो की, आगेकूच करणाऱ्यास इनाम द्या व माघार घेणाऱ्यास शिक्षा करा.

फितुरीचा बीमोड करण्यासाठी शत्रू नजरेस आल्यावरच निर्देश द्या. उत्कृष्ट कार्य केल्यावरच इनाम द्या. तुम्ही आधी दिलेल्या सूचना व निर्देश व अंतिम निर्देश यात संबंध नसावा. तुमच्या योजना आधीच उघडकीस आणू नयेत.
तुमच्या नियमांत व योजनांत बाध्यता व ताठरपणा असू नये.
युद्धजन्य परिस्थिती व प्रत्यक्ष युद्ध या दोन्हींत नियम व योजना लवचीक असाव्या लागतात. कित्येकदा तर त्या ऐन घटकेस बदलाव्या लागतात.
अशा प्रकारे तुम्ही जणू काही एकच सैनिक सांभाळत आहात एवढ्या सुलभपणे अख्खे सैन्य सांभाळू शकाल.

वचन 25

तुमच्या सैनिकांना तुम्ही फक्त काय करायचे आहे (कृती) एवढेच सांगा. त्यामागील योजना व विचारधारा त्यांना उघडपणे कधीच सांगू नका.
परिस्थिती खूप उत्साहवर्धक व आशादायी असेल तेव्हा ती त्यांच्या समक्ष ठेवा; पण ती जेव्हा निराशाजनक असेल तेव्हा त्यांना काहीच सांगू नका.
आजच्या व्यवस्थापनशास्त्राच्या विचारसरणी व सिद्धांतानुसार कर्मचारी सहभाग' हा कोणत्याही संस्थेच्या भरभराटीसाठी अत्यावश्यक म्हणून स्वीकृत करण्यात आला आहे. त्याला नुसताच एक बाहुला वा काम करणारा असे न समजता त्याला दिलेल्या कामामागील भूमिका व विचारसरणी काय व ते सुधारण्यासाठी त्याचे विचार यावर भर दिला जातो. यामुळे त्याचा सहभाग वाढतो व उत्तम दर्जाचे निकाल मिळतात.
परंतु युद्धात व सैन्याच्या संदर्भात एकसूत्रता व समन्वय साधण्यासाठी ती विचारसरणी कितपत योग्य आहे हे सेनापती व सैन्याचे अधिकारीच सांगू शकतील.

वचन 26

तुमच्या सैन्यास प्राणघातक संकटात टाकले तर ते नक्कीच बचावतील व त्यांना अशक्यप्राय स्थितीत टाका- ते नक्कीच सुरक्षितपणे बाहेर निघतील.
हे वचन आधीच्या अध्यायातदेखील आहे. या पुनरावृत्तीचे कारण म्हणजे त्याचे महत्त्व. अशा प्रकारे जेव्हा सैन्य संकटात सापडले असेल तेव्हा ते विजयासाठी आक्रमण करण्यास सक्षम असते.
धोक्याची परिस्थिती माणसास आणखी बळकट करते.

वचन 27

शत्रूच्या योजनेप्रमाणे घडते आहे असा फसवा देखावा आपण निर्माण केल्याने युद्धात विजय मिळतो.
'मूर्खपणाचा आव आणा, आपण शत्रूच्या इच्छेनुसार शरण जात आहोत व हार मानत आहोत असा आव आणा. जर शत्रू कूच करण्याची योजना आखत असेल तर त्याला

तसे करू द्या. त्याला जर माघार घ्यायची असेल तर मुद्दाम त्याला विलंब करायला लावा (त्याला पुनर्विचार करू द्या). यामागे त्याला त्याचा अंदाज चुकू देणे हा असून आपला अंतिम हल्ला करण्याआधी त्याला डिवचणे, त्याचे खच्चीकरण करणे हा आहे.

वचन 28

शत्रूच्या पाठीशी सातत्याने लागण्याने दीर्घविधीत (बऱ्याच अंतराने) आपण यशस्वी होऊ.

याला फक्त धूर्तपणाचा वापर करून आपले ईप्सित साध्य करणे असे म्हणतात.

वचन 29

तुम्ही सूत्रे हातात घ्याल तेव्हा पुढच्या वाटेतील सर्व खिंडी अडवा व अधिकृत नाके ध्वस्त करा.

त्या काळात आजच्यासारखेच नाके होते ज्यांना ओलांडून तुम्ही दुसऱ्या राज्यांत प्रवेश करू शकत होता. सर्व राजदूतांचे येणे-जाणे बंद करा.

वचन 30

तुमच्या राजसभेत खंबीर राहा.

कोणत्याही प्रकारचे दौर्बल्य राजदरबारात प्रदर्शित करू नका. राजाने तुमच्या योजना स्वीकृत कराव्यात याचा आग्रह धरा. यामुळे परिस्थिती तुमच्या ताब्यात राहील.

वचन 31

शत्रूचे द्वार उघडे राहिले तर तुम्ही ताबडतोब तेथे प्रवेश केला पाहिजे.

वचन 32

तुमच्या शत्रूला जे प्रिय आहे त्यावर कब्जा करा व युद्धक्षेत्रात तो तुमच्या सोयीनुसार येईल अशी क्लृप्ती लढवा.

तुम्ही त्याला प्रिय आहे अशा एखाद्या जागेवर कब्जा केला; पण शत्रू त्या ठिकाणी तुम्हाला पाहिजे त्या वेळेस पोहोचला नाही तर त्याचा उपयोग नाही. तुम्हाला हव्या त्या वेळेस त्याने येण्याचे आयोजन करण्यासाठी गुप्तचरांचा वापर करून संभ्रम निर्माण करा.

वचन 33

सर्वसामान्य नियमांनुसार वा अपेक्षेनुसार तुम्ही आपली चाल खेळा, शत्रूच्या अपेक्षेप्रमाणे वर्तन करा, योग्य क्षणी निर्णायक हल्ला करा.

युद्धात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे विजय. पारंपरिक प्रशिक्षणाचे व नियमांचे तंतोतंतपणे व निर्बुद्धपणे पालन करून तो कधीच मिळवता येत नाही.

तु मु म्हणतो, शत्रूच्या नीतीप्रमाणे व इच्छेनुसार काही काळापर्यंत वर्तन करा. जेव्हा योग्य संधी मिळेल तेव्हा निर्णायक युद्धात त्याचा पराजय करा.

सुरुवातीस एका तरुणीसारखे लज्जित असल्यासारखे दाखवा. मग तुम्हाला शत्रू संधी देईपर्यंत वाट पाहा. त्यानंतर एका सशाच्या चपळतेचे प्रदर्शन करा व यामुळे शत्रूस तुमचा विरोध करण्यास एव्हाना खूप उशीर झाला असेल.

येथे सशाची तुलना फक्त चपळतेचे उदाहरण देण्यासाठी करण्यात आलेली आहे. कारण ससा भ्याड म्हणूनही प्रसिद्ध आहे.

अध्याय 11

नऊ प्रकारची क्षेत्रे

सारांश -

नऊ प्रकारची क्षेत्रे

1) Dispersive Ground

स्वतःच्या प्रांतात युद्ध

कृती : युद्ध करू नये

2) Facile Ground

शत्रूच्या इलाख्यात पण आपल्या प्रदेशाजवळील क्षेत्र

कृती : थांबू नका व शत्रूच्या प्रदेशात दूरवर घुसण्याचा प्रयत्न करा.

3) Contentious ground

उभय पक्षांना फायद्याचे क्षेत्र

कृती : शत्रूने आधीच तळ ठोकला असेल तर हल्ला करू नका.

4) Open Ground

उभय पक्षांना या क्षेत्रात हालचाल करता येते.

कृती : शत्रूस येथे घुसू देऊ नका.

5) Ground of intersecting highways

हे क्षेत्र आजूबाजूच्या तीन राज्यांस सामरिक महत्त्वाचे ठरते. एक राज्य जिंकणारे इतर तीनवर राज्य करतात.

6) Serious ground

मागे अनेक किल्ले व गावे सोडून शत्रूच्या इलाख्यात खोलवर गेल्यावर असणारे क्षेत्र

कृती : शत्रूच्या लहानमोठ्या तुकड्यातील सामंजस्य भंग करा व शत्रूचा बचावात्मक पवित्रा मोडून काढा.

7) Diffucult Ground

दलदल, चिखल, कडे, सुळके, पर्वत, जंगल व दुर्गम प्रदेश

कृती : या प्रांतात तळ ठोकू नका.

8) Hemmed-in Ground

चिंचोळ्या खिंडीतून, निदरीतून पोहोचावे लागते असा प्रदेश

कृती : पर्यायी योजना.

9) Desperate Ground

अत्यंत गंभीर परिस्थिती

कृती : निकराची, जिवावर उदार होऊन युद्ध

त्वरेने केलेल्या हालचाली शुआई जान सापासारख्या हव्यात.

1) शिरावरील हल्ला शेपूट परतवून लावते.
2) शेपटीवरील हल्ला शिर परतवून लावते.
3) मध्यभागी हल्ला केला तर शिर व शेपूट हल्ल्यास परतवून लावते.

युद्धापूर्वी

1) शेजारच्या राज्याशी मैत्री.
2) शत्रूच्या नैसर्गिक भूभागाशी ओळख.
3) स्थानिक वाटाड्यांचा वापर.

युद्ध त्वरेने जिंकण्यासाठी

1) अचानकपणे अनपेक्षित हल्ला.
2) संभ्रम

व्यवसायात उपयोग

1) व्यवसायाचे स्थान नीट पाहा
2) आपले नियम लवचीक ठेवा
3) इनाम व शिक्षा याचा वापर करा
4) संभ्रम निर्माण करून प्रतिस्पर्धा करा

□□□

अध्याय 12
अग्नी आक्रमण

अग्नीचा प्रयोग करून केलेले हल्ले शत्रूस प्रिय असणाऱ्या सर्व गोष्टींचा नाश करण्यात विशेष प्रभावी असतात. इतर प्रकारच्या शस्त्रास्त्रांची निवड करण्याऐवजी सन त्झु येथे अग्नीची निवड करतो-कारण एकच - त्याची सहजपणे उपलब्धता. आपल्या अध्यायाची सुरुवात तो पाच प्रकारच्या अग्नी आक्रमणांनी करतो. त्यानंतर अग्नीची उत्पत्ती करणाऱ्या पाच मार्गांची चर्चा करतो. त्यांच्या निश्चित फायद्यांचेदेखील विवरण करतो. या आयुधात लपलेल्या धोक्यांबद्दलसुद्धा तो आपल्याला सचेत करतो. त्यानंतर नि:संदिग्धपणे प्रतिपादन करतो की अशा प्रकारच्या हल्ल्याचे आयोजन उगीचच नाश करायचा म्हणून केले गेले नसून संघर्षास लवकरात लवकर संपविण्यासाठी याचा वापर करावयाचा आहे. खरे पाहिले तर त्याची अपरिमित शक्ती व विध्वंसक सुप्त सामर्थ्य पाहता, आपले ईप्सित काय आहे, याची पूर्णपणे जाणीव नसताना आपण एक ठिणगीसुद्धा पाडावयास नको.

वचन 1

अग्नीचा वापर करून करावयाचे पाच प्रकारचे हल्ले आहेत.

1 सैनिकांना जाळणे

2 रसद व कुमक जाळणे

3 संसाधने जाळणे

4 साठ्याचे ठिकाण जाळणे

5 शस्त्रास्त्रे जाळणे.

1 सैनिकांना जाळणे याचा शब्दशः अर्थ सैनिकांना जाळणे असा नसून त्यांना बाहेर हाकलण्यासाठी त्यांच्या इमारतींना जाळणे असा होतो. (एवढेच नाही तर त्या काळात उपलब्ध असलेले मर्यादित तंत्रज्ञान पाहता तसेही प्रत्येक सैनिकास जाळणे अशक्य होते. शत्रूच्या वास्तव्याची ठिकाणे, रसद, संसाधने, साठा शस्त्रास्त्रे व इतर अमूल्य संपत्ती जाळण्याने त्यांच्यात घबराट माजते व अशा प्रकारे त्यांची दुर्बलस्थाने उघडकीस येतात. यामुळे त्यांच्या मनात असलेली युद्ध करण्याची इच्छाच मावळते.

दैनंदिन जीवनात तुमच्या प्रतिस्पर्ध्याच्या मनात क्रोधाची आग पेटविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच्या आत्मप्रतिष्ठेस धक्का पोहोचविणे. यामुळे ते युद्ध करण्याचा विचारच बदलतील. त्यावर आपली प्रतिक्रिया अत्यंत असंस्कृतपणे व्यक्त करतील.

अशा प्रकारे त्याचे आपल्या मुख्य उद्देशावरील लक्ष भटकेल व ते गौण बनेल. हे होत असताना तुम्ही वेगाने आगेकूच करत राहाल व त्यास भेकड बनवाल.

वचन 2

हल्ला करण्यासाठी आपल्याकडे योग्य ती साधने असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आग प्रज्वलित करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू आपल्याकडे नेहमीच असल्या पाहिजेत.

सुकलेल्या काटक्या, लाकूड, गवत, तेल इ. आपल्याकडे साठा करून ठेवलेले हवे.
अग्नीचा हल्ला करण्याचे काही विशिष्ट ऋतू असतात व आग लावण्याचे काही विशेष दिवस असतात.
हवा शुष्क व कोरडी असते व चंद्र सप्तमी, चतुर्दशीला असतो तेव्हा हे हल्ले करायचे असतात. कारण या दिवशी वारा जोरात, वरच्या दिशेने वाहत असतो.

आगीचा हल्ला करताना ज्या पाच घटना घडू शकतात, त्या ध्यानात ठेवल्या पाहिजेत.

- जेव्हा शत्रूच्या छावणीत आग लागते तेव्हा ताबडतोब बाहेरून हल्ला करावा.
- जर आग लागली असेल; पण शत्रूचे सैनिक शांत असतील तर तुम्ही दबा धरून बसा, वाट पाहा व हल्ला करू नका.

आगीचा हल्ला करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे शत्रूच्या गोटात सावळागोंधळ माजवणे. जर हे घडले नाही तर याचा अर्थ असा की, शत्रू आपली वाट पाहत आहे. म्हणून हा सल्ला दिलेला आहे.

- आगीच्या ज्वालांचा दाह खूप उंचवर पोहोचला असेल, तेव्हा त्याच्या पाठोपाठ हल्ला करा. ते शक्य झाले नाही तर आहात त्या ठिकाणी थांबा.

तुम्हाला दिसत असणारा एखादा मार्ग कठीण असेल तर थोडे मागे हटा.

- बाहेरून आगीचा हल्ला करता येत असेल तर ती आग आतून लागण्याची वाट पाहू नका. योग्य वेळी बाहेरून हल्ला करा.

शत्रू खूप वाळलेल्या गवताच्या ठिकाणी मुक्कामाला असेल अथवा त्याचा तळ एखाद्या ज्वलनशील ठिकाणावर असेल तर आपल्या बरोबर आग लावण्याची सामग्री नेऊन योग्य वेळेस आग लावली पाहिजे, नाहीतर आपण येण्याआधी ते आजूबाजूचे गवत जाळून टाकतील व आपली योजना फोल ठरेल.

वचन 3

- आग लावाल तेव्हा तुम्ही वाऱ्याच्या विरुद्ध दिशेस उभे राहा. वारा ज्या दिशेस वाहत आहे त्या दिशेत आग लावल्यावर उभे राहू नका.

तुम्ही आग लावाल तेव्हा शत्रू त्या आगीपासून माघार घेईल. त्या माघारीस तुम्ही विरोध केलात व त्याच्यावर हल्ला चढविलात तर तो निकराने लढेल, यामुळे तुमच्या यशात बाधा निर्माण होईल.
वारा पूर्व दिशेस वाहत असेल तर शत्रूच्या पूर्वेकडून जाळ लावा. त्या बाजूनेच हल्ला करा. जर पूर्वेकडून जाळ लावला व पूर्वेकडूनच हल्ला केलात तर तुमच्या शत्रूसारखीच तुमची हलाखीची परिस्थिती होईल.
- दिवसा वाहणारा वारा बराच वेळ टिकतो; पण रात्री वाहणारा वारा लवकर थांबतो.
रात्री वाहणारा खूप सोसाट्याचा वारा सकाळपर्यंत टिकत नाही. दिवसा वाहणारा वारा रात्र होईपर्यंत शांत होतो व रात्री वाहणारा वारा पहाटेपर्यंत शांत होतो. सर्वसाधारणपणे हाच निसर्गाचा नियम आहे.

वचन 4

प्रत्येक सैन्याने आगीशी संबंधित अशा पाच बाबी ध्यानात घ्यावयास हव्यात. आगीचा हल्ला करण्याआधी आपण ताऱ्यांची स्थित्यंतरे नमूद करून ठेवावयास हवीत. विशिष्ट दिवसांवर नजर ठेवावयास हवी. ताऱ्याचा मार्ग, ज्यादिवशी वारा वाहू लागेल इ. बाबींचा आराखडा आपण आधीच बांधून ठेवला पाहिजे. आपण आपल्या शत्रूवर कशा प्रकारे हल्ला करायचा एवढेच शिकणे पुरेसे नाही; पण शत्रूचा हल्ला आपल्यावर कशा प्रकारे होऊ शकतो हेदेखील समजून घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आपल्या बचावाची योजनादेखील आखणे आवश्यक आहे.

वचन 5

- म्हणूनच जे लोक हल्ला करण्यासाठी आगीचा प्रयोग करतात ते आपल्या बुद्धिमत्तेचा परिचय देतात. जे हल्ल्यात पाण्याचा वापरही करतात, ते आणखी सामर्थ्य संपादन करतात.

-पाण्याचा वापर करून शत्रूची कूच थांबवता येते; पण त्याला नामोहरम करता येत नाही.

पाण्याचा वापर करून आपल्याला त्याचा मार्ग रोखता येतो; पण त्याची सर्वच रसद नष्ट करता येत नाही. पाणी विघातक आहे; पण त्याच्या वापरात आगीएवढी विध्वंसक शक्ती नाही. म्हणूनच अग्नीबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. पाण्याचा नाममात्र उल्लेख करण्यात आला आहे. जर शत्रूचे सैन्य दलदलीच्या व खोलगट भागात, जेथून पाणी वाहून जाऊ शकत असेल अशा जागी तळ ठोकून असेल, मुसळधार पाऊसही पडत असेल तर तो तळ पाण्यात बुडून जाऊ शकतो. शत्रूचा तळ पानवेलींनी वेढलेल्या भागात असेल व तेथे खूप सुसाट्याचा वारा वाहत असेल तर तो आगीने ध्वस्त करता येतो.

वचन 6

कोणी कल्पकतेचा व चातुर्याचा प्रयोग न करता युद्ध व हल्ले यशस्वीपणे जिंकण्याची आशा बाळगून असेल तर तो आपला अमूल्य वेळ वाया घालवीत आहे व तो असलेल्या जागीच राहणार.

युद्धात व आक्रमणात निश्चितपणे विजय संपादन करायचा असेल तर मिळणाऱ्या संधींचा अचूक वेळी उपयोग करून घेणे आवश्यक आहे. अशा वेळेस त्यांनी साहस दाखविण्यात दिरंगाई करू नये व त्यांनी अग्नी, पाणी व तत्सम कल्पक मार्गांचा अवलंब केलाच पाहिजे. खंबीर राहणे व आपल्याकडे असणाऱ्या साधनांचा पुरेपूर फायदा करून घेणे हेच शेवटी त्यांना विजय प्राप्त करून देईल.

वचन 7

- एक जागृत अधिपती आपले आयोजन खूप आधीच करून ठेवतो व एक उत्कृष्ट सेनाधिपती आपली संसाधने जोपासतो.

एक उत्तम अधिपती सैनिकांवर आपली हुकूमत अधिकाराचा वापर करून गाजवितो, त्यांना विश्वासात घेऊन त्यांची एकजूट करतो. त्यांना देण्यात येणाऱ्या इनामांमुळे त्यांचे मनोबल सदोदित उच्च दर्जाचे असते. जर विश्वासाचा ऱ्हास झाला तर विजयाच्या प्रक्रियेत खंड पडेल व इनामात कमतरता आढळली तर आज्ञांचे उल्लंघन होईल.

वचन 8

- काहीतरी फायदा आहे असे दिसेपर्यंत कूच करू नका, कृती करू नका, काहीतरी संपादन करण्याजोगे असल्याशिवाय तुमच्या सैन्याचा वापर करू नका, स्थिती नाजूक नसेपर्यंत लढाई करू नका.

'सन त्झुची काही वचने वरकरणी विनाकारण खूप सावधानीची वाटतात. तो म्हणतो, मी पहिली चाल कधीच खेळणार नाही, मी बचावात्मक पवित्राच घेईन. मी एक तसूभरही पुढे जाणार नाही व फूटभर माघार घेण्यास पुढेमागे पाहणार नाही.'

वचन 9

स्वत:च्या प्रौढीचे समाधान करण्यासाठी कोणत्याही राजाने आपले सैन्य युद्धभूमीवर पाठवू नये. नुसती फुशारकी म्हणून कोणत्याही सेनाधिपतीने युद्ध करू नये.

वचन 10

जर फायदा असेल तरच पुढील चाल खेळा, नाही तर आहे त्या ठिकाणी स्वस्थ बसा. याची पुनरावृत्ती वेळोवेळी झाली आहे.

वचन 11

क्रोधाचे परिवर्तन कालांतराने आनंदात होऊ शकते व निराशेचे परिवर्तन समाधानात होऊ शकते.

पण एकदा उद्ध्वस्त झालेले साम्राज्य पुन्हा अस्तित्वात येऊ शकत नाही व मरण पावलेले पुन्हा जिवंत होऊ शकत नाहीत.

वचन 11

म्हणूनच एक प्रबुद्ध राजा नेहमी दक्ष असतो, एक उत्कृष्ट सेनाधिपती नेहमी सावधान असतो. अशा प्रकारे आपल्या राज्यात सुख, समृद्धी व शांती प्रस्थापित करता येते व आपले सैन्य अबाधित ठेवता येते.

अध्याय 12

अग्नी आक्रमण

आगीचा प्रयोग करून करावयाच्या आक्रमणाचे प्रकार
1) शत्रूची छावणी जाळणे
2) त्यांची रसद व कुमक जाळणे
3) त्यांची संसाधने जाळणे
4) त्यांच्या साठ्याची ठिकाणे जाळणे
5) शस्त्रास्त्रे जाळणे

हल्ला करण्यापूर्वी ध्यानात ठेवण्याच्या बाबी

- वातावरण
- संसाधन
- वाऱ्याची दिशा
- ऋतू

एक उत्कृष्ट सेनाधिपती आपली संसाधने जोपासतो.
अनुकूल परिस्थिती असल्याशिवाय कूच करीत नाही.
प्रबुद्ध राजा नेहमी दक्ष असतो व एक उत्कृष्ट सेनाधिपती नेहमी सावधान असतो. अशा प्रकारे आपल्या राज्यात सुख, समृद्धी व शांती प्रस्थापित करता येते व आपले सैन्य शाबूत ठेवता येते.

□□□

अध्याय 13
गुप्तचरांचा वापर

गुप्तचरांच्या वापरासंबंधी लिहिलेला हा अध्याय तसा वादास्पद व संशयास्पद समजला जातो; परंतु त्याची तशी कुप्रसिद्धी होण्यास सबळ कारण नाही. या अध्यायात कोणत्याही कूट-कारस्थानांबद्दल वा दुष्ट हेतूंबद्दल सन त्झुने लिहिले नसून यात फक्त त्याने प्रभावीपणे माहिती कशी गोळा करायची व शत्रूच्या गोटाची खबर कशी काढावयाची याबद्दल सांगितले आहे. लवकरात लवकर संघर्ष कसा संपवायचा हाच या मागील हेतू आहे. अशा प्रकारची गोपनीय माहिती असणाऱ्या लोकांना गुप्तहेर म्हटले आहे. या शब्दाचा प्रचलित लौकिकार्थ स्वयंकेंद्रित गद्दार लोक असा अभिप्रेत आहे; पण तसे नसून सन त्झुच्या म्हणण्याप्रमाणे हे लोक नुसती फितुरी करण्यापलीकडे एखाद्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन लवकरात लवकर संघर्ष समाप्त करण्याच्या उद्देशाने आपला जीव धोक्यात घालतात.

गुप्तचरांचा वापर

वचन 1

सन त्झु म्हणतो,

हजारो-लाखो सैनिक असलेले सैन्य उभे करणे व त्यांना मैलोन्मैल कूच करावयास लावणे याची परिणती प्रचंड क्षती व राज्याच्या संपत्तीचा ऱ्हास यात होते. या सर्वाचा खर्च रोजी एक हजार सुवर्णमुद्रा एवढा होतो.

देशांतर्गत व देशाबाहेर होणारी कारवाई, मार्गात थकलेले सैनिक व दैनंदिन कारभार न करणाऱ्यांची संख्या सात लाख कुटुंबे एवढी असते.

फक्त एका दिवसाच्या निर्णायक विजयाच्या आशेत उभय पक्ष वर्षानुवर्षे एकमेकांसमोर उभे राहून, युद्धाच्या प्रतीक्षेत तिष्ठत बसतात.

आधुनिक काळातील युद्धाप्रमाणेच पुरातन काळातील युद्धसुद्धा एक खर्चीक बाब होती. यामुळे देश व नागरिक यांची अपरिमित आर्थिक, मानसिक व इतर अनेक प्रकारची हानी होत असे. दुसऱ्या अध्यायातदेखील याचा उल्लेख झाला आहे. दुसरा कोणताही पर्याय बाकी नसतानाच संघर्ष व परिणामी युद्ध हा पर्याय अनुसरावा.

युद्धात लढणाऱ्या प्रत्येक चिनी सैनिकाच्या पाठीशी परिस्थितीशी झगडणारी सात कुटुंबे असत. अशा प्रकारे युद्धामुळे देशावर व नागरिकांवर नुसता आर्थिक भारच पडत नसे. युद्धाची घोषणा झाल्यावर संपूर्ण देश युद्धपूर्व तणावाचा कठीण सामना

करीत असे. कोणत्याही युद्धाचा प्रभाव प्रत्यक्ष युद्ध करणाऱ्या लोकांवरच पडत नाही; पण देशातील सामान्य जनतेवरही त्याचा परिणाम होतो.
अल्पकाळात जर युद्ध निर्णयात्मक ठरले नाही तर शत्रूच्या अनोळखी देशात आपले सैन्य वर्षानुवर्षे तिष्ठत असते. या सर्वांना सांभाळण्याचा खर्च देशास करावा लागतो. इराक व पाकिस्तानात सैनिक व त्यांचा खर्च ही अमेरिकन युद्धनीतीची व या वचनाची ज्वलंत उदाहरणे आहेत.
याची तुलना फक्त सामूहिक अंत्यसंस्काराशीच करता येईल.

वचन 2

अशा स्थितीत शत्रूची खरी परिस्थिती जाणून घेण्यासाठी शंभर मुद्रा खर्च करण्याची तयारी न दाखवणे, हा खरोखर मूर्खपणा आहे व माणुसकीस सोडून वागणे आहे.

'येथे गुप्तचरांवर शंभर मुद्रा खर्च करण्याची तयारी न दाखविणे' हा अर्थ गर्भित आहे. येथे सन त्झुने केलेले स्पष्टीकरण त्याच्या चाणाक्षपणास व दूरदृष्टीशी साजेसेच आहे. तो आपल्या चर्चेची व प्रस्तावाची सुरुवात युद्धजन्य परिस्थितीने निर्माण केलेले दारुण दैन्य, प्रचंड खर्च व रक्तपात यांच्या उल्लेखाने करतो. आता जर तुम्हाला शत्रूची खरी परिस्थिती माहीत नसेल व तुम्ही या माहितीअभावी एकदम अचूक क्षणी हल्ला करण्याच्या परिस्थितीत नसाल तर हे युद्ध वर्षानुवर्षे अनिर्णायक स्थितीत रेंगाळत राहील. यामुळे उभय पक्षांची अपरिमित आर्थिक, भावनिक, मानवी व इतर अनेक प्रकारची हानी होईल. हे सर्व संपवायचे असेल, भ्रामक व काल्पनिक योजनांना थारा द्यावयाचा नसेल तर तुम्ही शत्रूकडील अधिक माहिती काढण्यास खर्च करण्याची तयारी दर्शविली पाहिजे. अशा वेळी अनुदार/कंजूस होऊन चालणार नाही. एका बाजूस तुम्ही युद्धासाठी आपल्या देशाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर उदार होऊन लढाईस उतरला आहात व दुसऱ्या बाजूस गुप्तचरांवर खर्च करण्यास तुम्ही तयार नाही. हा विरोधाभास लढाई लवकर संपविण्यास पोषक नाही. एवढेच नाही, तर हा प्रचंड खर्च व ताण गरीब नागरिकांवर वर्षानुवर्षे पाडण्याचा गुन्हा तुम्ही करीत आहात. शेवटी सन त्झु आपला युक्तिवाद, गुप्तचरांचा वापर न करणे हे माणुसकीस सोडून आहे, असे वक्तव्य करून संपवितो.

वचन 3

जो असा कंजूसपणा दाखवतो तो सैन्याचे नेतृत्व करूच शकत नाही, तो आपल्या सार्वभौम राज्याची कोणत्याही प्रकारे मदत करीत नाही व तो विजयाचा स्वामी बनू शकत नाही.

वचन 4

अशा प्रकारे जागृत सार्वभौम राजास व उत्कृष्ट सेनाधिपतीस, हल्ला करण्यास व विजय प्राप्त करण्यास पोषक बाब व सर्वसामान्य माणसांच्या आवाक्याबाहेरील गोष्ट म्हणजे पूर्वसूचना.

याचा अर्थ शत्रूच्या योजना व त्याने त्या तशा का आखल्या आहेत, याची कारणमीमांसा जाणून घेणे होय.

वचन 5

आता ही पूर्वसूचना काही आकाशातून येणार नाही वा तुमच्या पूर्वानुभावावरून तुम्ही त्याचा अंदाज लावू शकणार नाहीत.

शत्रूच्या गोटातील माहिती, अन्य कोणत्याही मार्गांनी वा तत्सम परिस्थितीचा अभ्यास करून मिळणार नाही. ती निर्णायक अनुमानावरूनदेखील मिळत नाही.

लांबी, रुंदी, अंतर व संख्या यांसारख्या गणिती बाबींचे ते समीकरण असते; पण माणसाचा स्वभाव व कृती अशा गणिती पद्धतीने समजू शकत नाही.

वचन 6

शत्रूच्या योजनांची, वृत्तीची व कलाची माहिती दुसऱ्या माणसांकडूनच काढता येते.

मेईयाओ-चेन हा तत्त्ववेत्ता म्हणतो,

आत्मा व दैवी चमत्कारांचे ज्ञान दैवी ज्ञानातूनच मिळू शकते. नैसर्गिक विज्ञानाबद्दलचे निष्कर्ष भौतिक व वैज्ञानिक समीकरणांचा आधार घेऊन काढता येतात. खगोलशास्त्राचा अभ्यास गणिती समीकरणांचा अभ्यास करून केला जातो; पण शत्रूच्या योजना व त्याची वृत्ती, त्याची रणनीती यांची महिती गुप्तहेर आणि फक्त गुप्तहेरांकडूनच काढता येते.

वचन 7

गुप्तचरांचे पाच प्रकार आहेत

1) स्थानिक गुप्तचर

2) अंतर्गत गुप्तचर

3) दुहेरी (दुतोंड्या) गुप्तचर-

4) भावी /संभाव्य गुप्तचर

5) जिवंत गुप्तचर

जेव्हा या सर्व प्रकारचे गुप्तचर कार्यरत असतात तेव्हा आपली गुप्त यंत्रणा कुणालाच समजू शकत नाही. याला 'धाग्या-दोऱ्याची/सुगावा काढण्याची दैवी रचना' असे म्हटले जाते. ही त्या राज्याची सर्वांत अमूल्य यंत्रणा असते.

1) स्थानिक गुप्तचर

हे तैनात करणे म्हणजे त्या जिल्ह्यातील, इलाख्यातील नागरिकांचा वापर करणे.

तु मु म्हणतो, 'शत्रूच्या देशात सहानुभूतीने वागून तेथील लोकांची मने जिंका व नंतर त्यांचा गुप्तहेर म्हणून उपयोग करा.'

2) अंतर्गत गुप्तचर

म्हणजे शत्रुपक्षाच्या सैन्यांतील अधिकाऱ्यांचा हेर म्हणून वापर करणे.

तु मु म्हणतो,

'शत्रुपक्षाच्या सैन्यातून तिरस्कृत होऊन अपमानित केलेले कार्यक्षम अधिकारी, शिक्षा भोगलेले गुन्हेगार, संपत्तीची लालसा असलेल्या वारांगना, कनिष्ठ दर्जात खितपत पडलेले गौण अधिकारी, आपले सैन्य हरावे अशी इच्छा बाळगणारे लोक, भ्रमिष्ट, फक्त आपल्या फायद्याची लालसा असणारे व आपल्या ऐशआरामाचाच विचार करणारे सैनिक यांना गुप्तपणे भेटावे, त्यांना बहुमूल्य नजराणे भेट द्यावेत. अशा प्रकारे शत्रुपक्षातील सद्य:स्थिती, त्यांच्या भविष्यातील योजना इ. तुम्हाला कळू शकतील व त्यांच्या सैन्यातील अधिकाऱ्यांचा एकमेकांशी असलेला ताळमेळ तुम्ही मोडू शकाल.

हे सर्व करताना परमकोटीची सावधानता बाळगावी लागते.

3) गुप्तचर/परिवर्तित हेर

म्हणजे शत्रूच्या गुप्तहेरास काबीज करणे व त्याला आपल्या कामासाठी वापरणे.

खूप मोठी लाच देऊन व प्रलोभने दाखवून शत्रूच्या गुप्तहेरास आपल्या बाजूने काम करण्यास प्रवृत्त करणे. त्यांच्या तोंडून आपल्या हालचालींबद्दल चुकीची माहिती शत्रूच्या गोटात पसरविणे किंवा आपण गाफील असल्यासारखे वागणे व मुद्दाम त्यांच्या उपस्थितीत चुकीची वक्तव्ये करणे, आपली खोटी मोहीम जाहीर करणे.

4) भावी हेर-दिशाभूल करणारे हेर

काही लोकांनी आपल्याच हेरांसमोर चुकीच्या बातम्या देणे. यानंतर ते हेर शत्रूकडून पकडले गेल्यावर त्यांच्या तोंडून ही चुकीची माहिती शत्रूपर्यंत पोहोचते; पण ती माहिती चुकीची आहे हे कळाल्यावर शत्रू आपल्या हेरांना देहांताची शिक्षा देऊ शकतो.

5) जिवंत गुप्तचर

म्हणजे ते गुप्तचर जे शत्रूच्या गोटातून जिवंत परत येतात व तेथील इत्थंभूत माहिती देतात.

वचन 8

म्हणूनच संपूर्ण सैन्यात गुप्तहेरांचे जेवढे घनिष्ठ संबंध असतात तेवढे कुणाचेच नसतात. मुक्तहस्ताने त्यांच्यापेक्षा अधिक बक्षिसे कुणासही देऊ नये. दुसऱ्या कोणत्याही व्यवसायात याहून अधिक गोपनीयता सांभाळायची गरज नसते.

गुप्तहेरांचे एवढे घनिष्ठ संबंध असतात की, त्यास प्रत्येक ठिकाणी मुक्तद्वार असते व तो सेनाधिपतीच्या शयनकक्षातदेखील निश्चितपणे जाऊ शकतो.
तु मु म्हणतो की, हेरांशी त्यांच्या कानात बोलून संभाषण केले पाहिजे. त्यांना घसघशीत बक्षीस दिले पाहिजे. त्यांची खरी ओळख फारच कमी लोकांना असली पाहिजे.

वचन 8

आपल्याकडे धूर्तपणा व चाणाक्षपणा असल्याशिवाय हेरांची नियुक्ती करू नये.

हेरांची नियुक्ती करायची असेल तर अस्सल परिस्थितीची आपल्याला माहिती हवी, आपल्याला खरे काय व खोटे काय, हे माहीत हवे.
सद्भाव व सडेतोडपणा असल्याशिवाय त्यांची देखरेख करता येत नाही.
उत्तम पगार देऊन त्यांची नियुक्ती केल्यावर तुम्ही त्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवला पाहिजे. मग ते तुमच्याबरोबर संपूर्ण निष्ठेने काम करतील.
आपण चाणाक्ष नसाल तर त्यांच्याकडून मिळणाऱ्या अनपेक्षित माहितीवर तुम्ही विश्वास ठेवणार नाही.

वचन 9

सौम्यतेने, धिम्या गतीने, कुणासही कळू न देता सर्व कामात त्यांचा वापर करा.

वचन 10

हेराने एखादी माहिती निश्चित वेळेआधीच शत्रूस सांगितली, तर त्याला देहांताची शिक्षा सुनवा.

वचन 11

जेव्हा एखाद्या सैन्यावर हल्ला करून त्याचा नायनाट करायचा असेल, एखाद्या शहरावर चालून जायचे असेल किंवा एखाद्या व्यक्तीचा खून करायचा असेल तर त्याची सुरुवात तेथे तैनात इसमांची नावे समजून घेण्याने होते. तेथे द्वारपाल कोण, त्या सेनाधिपतीचे अंगरक्षक कोण आहेत, हे समजून घेण्यासाठी गुप्तहेर तैनात केले पाहिजेत.

वचन 12

आपल्यावर हेरगिरी करण्यात आलेल्या शत्रूच्या गुप्तहेरांचा मागोवा घेतला पाहिजे, त्यांना लाच देऊन आपलेसे करून घेतले पाहिजे, त्यांना राहण्यास आरामदायक निवासस्थान दिले पाहिजे. अशा प्रकारे ते आपल्या बाजूस येतील व आपण त्यांच्याकडून काम करून घेऊ शकू.

अशा प्रकारे फितूर झालेल्या हेराने पुरविलेल्या माहितीच्या आधारे आपण स्थानिक व अंतर्गत हेर नियुक्त करू शकू.

शत्रुपक्षात कोण संपत्तीची लालसा ठेवतो व कोण निष्ठावान नाही, याची माहिती अशा परिवर्तन झालेल्या हेरांकडून मिळेल. आपल्याला अशा प्रकारच्या फितूर हेराकडून चुकीची माहिती शत्रुपक्षात पाठविता येईल.
काही विशिष्ट कामासाठी, विशिष्ट वेळेस अशा हेरांचा आपल्याला वापर करता येईल.
या सर्व पाच प्रकारच्या हेरांचे आयोजन करण्यामागील उद्देश म्हणजे शत्रूच्या गोटातील माहिती काढणे व ही माहिती एका परिवर्तीत हेराकडून आपण काढू शकू.
अशा परिवर्तीत हेरास संपूर्ण स्वातंत्र्य देणे फार महत्त्वाचे आहे.

वचन 13

म्हणूनच फक्त एक जागृत अधिपती व चाणाक्ष सेनाधिपतीच सैन्यातील अत्युच्च बुद्धिमत्तेचे लोक गुप्तहेर म्हणून वापरतात व अशा प्रकारे खूप उच्च दर्जाचे यश संपादन करतात.

हेर हा युद्धातील सर्वांत महत्त्वाचा दुवा आहे.

सन त्झुचा सर्वव्यापीपणा

1) विविध क्षेत्रातील उपयोगिता

व्यवस्थापकांसाठी सन त्झुच्या तत्त्वांचे औचित्य

1) तुमची बाजारपेठ कोणत्याही प्रकारची नासधूस न करता काबीज करा

'युद्धात आपले राज्य शाबूत ठेवणे, हे धोरण असते. त्याचा नाश होऊ देणे, हा कनिष्ठ पर्याय आहे. शंभर युद्धात शंभर विजय मिळवणे हा काही पराक्रम नाही. शत्रूच्या शक्तीचा ऱ्हास युद्ध न होऊ देता करणे, हे खरे उच्चकोटीचे कौशल्य.'

- सन त्झु

सन त्झुने पदोपदी युद्ध न करता संघर्ष समाप्त करून विजय प्राप्त करण्याबद्दल प्रतिपादन केले आहे. तुमच्या व्यवसायाचे व प्रतिष्ठानाचे अंतिम उद्दिष्ट बाजारपेठ काबीज करणे व व्यवसायात दीर्घकाळ भरभराट कायम ठेवणे हे आहे. बाजारपेठेच्या दुर्बल क्षेत्रांचा अभ्यास करून तेथे तुम्ही प्रवेश करू शकता. कोणत्याही परिस्थितीत किमतीच्या आधारावर, एकमेकांशी स्पर्धा (युद्ध) करू नये.

2) शत्रूच्या दुर्बल स्थानांचा परिचय करून घ्या व त्यावर हल्ला करा.

'प्रत्येक सैन्याची तुलना पाण्याशी करता येते. वाहते पाणी उंच भाग टाळते व वळचणीच्या भागास जोरात वाहत जाते. याचप्रकारे एक निष्णात सैन्य शक्तिस्थानांचा मुकाबला टाळते व दुर्बल स्थानांवर हल्ला करते.'

- सन त्झु.

व्यवसायातील स्पर्धेवर पाश्चात्त्य विचारसरणीचा खूप मोठा पगडा आहे. अनेक कंपन्या प्रतिस्पर्ध्याच्या बलस्थानावर हल्ला, थेट आक्रमण करतात. यामुळे उभय पक्षांचे अपरिमित नुकसान होते. या ऐवजी त्याच्या दुर्बल घटकांचा अभ्यास करून त्या क्षेत्रात तुम्ही प्रवेश करा. त्या त्रुटी तुम्ही स्वतःच्या उत्पादनातून नाहीशा केल्या तर तुम्ही प्रतिस्पर्ध्यास मागे टाकू शकाल. शत्रूची बलस्थाने नष्ट करणे आत्मघातकी ठरेल.

3) व्यावसायिक प्रतिस्पर्धात्मक कार्यक्षमता उच्चतम पातळीवर नेण्यासाठी पूर्वज्ञान व संभ्रम यांचा अधिकाधिकउपयोग करा.

"तुमच्या शत्रूस ओळखणे स्वतःस ओळखण्याजोगे आहे व यामुळे शंभरपैकी एकाही संघर्षात तुम्ही संकटात पडणार नाही."

-सन त्झु

तुमच्या प्रतिस्पर्ध्याची रणनीती समजून घेण्याआधी तुम्हाला त्यांच्या अधिकाऱ्यांची रणनीती, त्यांची विचारसरणी, त्यांच्या योजना व इच्छा यांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे व त्या तुलनेत आपली रणनीती व या सर्व बाबींचेही तितकेच सखोल ज्ञान असावे लागते. तुमच्या कार्यक्षेत्रातील विशिष्ट गुणधर्माची ओळख तुम्हास हवी. तुमच्या खऱ्या योजना शत्रूस कळू नयेत म्हणून त्या तुम्ही गुप्त ठेवून संभ्रम निर्माण करावयास हवा, दिशाभूल करावयास हवी.

4) प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी पूर्वतयारी आणि वायुवेगाने काम केले पाहिजे.

पूर्वग्रहांवर व गावंढळ लोकांवर विश्वास ठेवणे व पूर्वतयारी न करणे, हा सर्वांत मोठा गुन्हा आहे; कोणत्याही संकटास तोंड देण्यासाठी पूर्वतयारी करणे हा सर्वांत मोठा सद्गुण आहे.

- सन त्झु

पूर्वज्ञान व संभ्रमाच्या क्लृप्त्यांचा पुरेपूर फायदा करून घेण्यासाठी तुम्ही झंझावाताप्रमाणे काम केले पाहिजे. याचा अर्थ घिसाडघाई असा नाही. अतिवेगाने काम करण्यासाठी फार मोठी पूर्वतयारी लागते. तुमच्या कंपनीत निर्णय घेण्यास लागणारा वेळ, नवीन उत्पादनांनी झंझावाताप्रमाणे (वेगाने) बाजारात प्रवेश करणे व ग्राहकांच्या समस्यांचे समाधान वेगाने करणे अशा या गोष्टी आहेत. तुमच्या अशा कृतींविरुद्ध तुमच्या स्पर्धकाचा काय पवित्रा असतो हेदेखील अभ्यासले गेले पाहिजे.

5) व्यवसायात मैत्री व इतर नियंत्रण बिंदूंचा वापर करून तुमच्या प्रतिस्पर्ध्यांना तुम्ही आकार देऊ शकता व अशा प्रकारे तुमच्या इच्छेनुसार ते वागू लागतात.

"म्हणून जे लोक युद्धात निष्णात असतात ते शत्रूस युद्धभूमीत उतरवितात व त्यांना युद्धात स्वतःस बोलविण्याची संधी ते मिळू देत नाहीत."

- सन त्झु

स्पर्धकास आकार देणे म्हणजे प्रतिस्पर्ध्याचे नियम बदलणे व स्पर्धकास तुमच्या इच्छेनुसार व कृतीनुसार काम करण्यास भाग पाडणे. याचा अर्थ स्थितीच्या नियंत्रणाची सूत्रे स्पर्धकाच्या हातातून काढून घेऊन आपल्या हातात घेणे. यासाठी मैत्रिपूर्ण संबंधांचा वापर करणे, हा एक मार्ग आहे. तुम्ही अनेक लोकांशी मैत्रीयुक्त संबंध निर्माण करून त्यांना जोपासले, तर प्रतिस्पर्ध्याचे मार्ग बंद होतात. त्याचप्रमाणे तुम्ही व तुमच्या मित्रांनी मिळून नियंत्रणबिंदूंवर प्रभाव पाडला, तर प्रतिस्पर्ध्यांना तुमच्या म्हणण्याप्रमाणे काम करावे लागते.

उदा. वेगवेगळे चेंबर ऑफ कॉमर्स यांनी मिळून परदेशातील प्रतिस्पर्ध्याची घुसखोरी थांबविता येते.

6) तुमच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी तुम्ही एक नेता म्हणून आपले वर्तन व चारित्र्य विकसित करा.

"जेव्हा लोकांना तुम्ही परोपकारी वृत्तीने, न्याय्यपणे व सदसद्विवेकबुद्धीने वागविता, त्यांच्यावर दृढविश्वास व्यक्त करता, तेव्हा तुमचे मन मानसिक व शारीरिकरीत्या संघटित व एकजूट होते व आपल्या नेत्यांची सेवा सहर्षपणे करते."

- सन त्झु

हे सिद्धांत अमलात आणण्यासाठी एका विशेष प्रकारच्या नेत्याची गरज असते. यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता व कार्यक्षेत्रातील आनंदभाव द्विगुणित होतो. तो नेता हुशार, सहिष्णू, धैर्यवान व शिस्तप्रिय असावा लागतो. असे नेते पुढाकार घेऊन संकटांचा सामना करतात. ते सर्वांशी मिळून-मिसळून वागतात. ते आपल्या कर्मचाऱ्यांच्या समस्यास व त्या सोडविण्यास प्राधान्य देतात. अशा चारित्र्याचे नेते आपल्या कर्मचाऱ्यांकडून अत्युत्कृष्ट दर्जाची कामगिरी करून घेतात व असे करताना कर्मचाऱ्यांनाही अभिनान वाटतो.

सन त्झुची ही तत्त्वे सर्व क्षेत्रांत लागू आहेत.

कंपनीचे धोरण ठरविण्यासाठी आवश्यक सर्जनशीलता

सन त्झु म्हणतो

'मी जेव्हा काही रणनीती वापरून विजय प्राप्त करतो, तेव्हा ती रणनीती पुन्हा वापरतोच असे नाही. प्रत्येक परिस्थितीस अनुरूप अशी वेगळी नीती मी वापरतो.'

परिस्थितीनुसार वेगवेगळे धोरण ठरविण्यासाठी व युक्त्या शोधण्यासाठी सर्जनशीलतेची गरज भासते.

याची काही उदाहरणे पाहूया

जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीने ग्राहकांपर्यंत आपली उत्पादने योग्य व अचूक वेळेस पोहोचण्यासाठी आपली जाहिरात स्टॉक ब्रोकिंगच्या वेबसाइटवर अशाप्रकारे टाकली की, स्टॉक मार्केट खालावल्यावर ती दलालांना दिसत असे. ते उत्पादन होते, डोकेदुखीच्या गोळ्या.
जिलेट ब्लेडदेखील अशाच प्रकारे निर्माण झाले. त्याचे आजचे, वापरानंतर फेकून द्यायचे स्वरूप 1895 मध्ये बाजारात आले व त्याची प्रेरणा होती, बाटल्यांची बुचे.
सर्जनशीलता ही काही मूठभर लोकांचीच जहांगीर नाही. ती संपूर्ण संस्थानात दिसून यावयास हवी व त्यासाठी तेथील सेनाधिपती म्हणजे व्यवस्थापक जबाबदार आहे.
सन त्झु म्हणाला होता, चवी पाचच असतात; पण त्याचे कल्पकतेने केलेले संमिश्रण हजारो चवींना निर्माण करते व त्यात मूळ चव विलीन होऊन जाते.

दुर्बलतेचे सबलतेमध्ये परिवर्तन

सन त्झुच्या धोरणात्मक तत्त्वज्ञानाचे सार म्हणजे प्रतिस्पर्ध्याच्या दुर्बल स्थानांवर हल्ला होय. तो म्हणतो,
'कोणत्याही सैन्याची तुलना वाहत्या पाण्याशी करता येते. ते उंचावर जाण्याचे टाळते व वळचणीस जाते. ते भूभागाचा आकार घेते. याचप्रमाणे सैन्य शत्रूच्या बलस्थानांना सोडून देते व दुर्बल स्थानांवर हल्ला करते.
उदा. कोका-कोला हे अमेरिकेतील लोकप्रिय पेय म्हणून ओळखले जात व त्याची ओळख अमेरिकन संस्कृतीशी केली जात असे. या सबलतेचे परिवर्तन पेप्सी कंपनीने दौर्बल्यात करताना आपल्या पेप्सी कोला या पेयास 'पुढील तरुण पिढीचे पेय' म्हणून पुरस्कृत केले. अशा प्रकारे कोका-कोला हे पेय जुन्या पिढीचे झाले. असे करताना पेप्सीने त्या सबलतेचे, परंपरागत पेयाचे परिवर्तन अशा प्रकारे दुर्बलतेत केले.
नमूद करण्याजोगी काही वचने

1) 'तुमचे क्षेत्र तयार ठेवा'

- सन त्झु

तुमचे उत्पादन व सेवा दणकट व प्रतिस्पर्ध्यास टक्कर देण्याजोगे बनवायचे असेल तर वेगाने पूर्वतयारी करण्यात तुमचा वेळ व साधने खर्च करा. खूप ऊहापोह केल्यावर तुमच्या उत्पादनात काय खास असायला पाहिजे, हे ठरवा. या खासपणाने प्रतिस्पर्ध्याची बाजारपेठ तुम्हाला काबीज करता येईल. यालाच इंग्रजीत USP (unique selling point) म्हणतात.

2) 'काही गावांवर हल्ला करायचा नसतो व काही प्रदेश जिंकायचे नसतात.'

- सन त्झु

तुमचे ग्राहक व तुमचा माल कोण वापरेल, याची निवड विचारपूर्वक करा. बाजारपेठेची निवड करताना खूप काळजी बाळगा. गरीब गावात महागडी उत्पादने व सधन बाजारपेठेत स्वस्त उत्पादने विकण्याची चूक महाग पडते.

3) 'विजय मिळविण्यात वेग फार महत्त्वाचा असतो.'

- सन त्झु

विक्री व विक्रीपूर्व क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा फार महत्त्वाचा सल्ला आहे. एकदा कारखान्यात नवीन उत्पादन तयार झाले की, विक्रीपूर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी त्या उत्पादनाशी संबंधित सर्व तयारी जलद गतीने केली पाहिजे. त्या उत्पादनाचे विशेष फायदे, त्यावर अपेक्षित प्रश्न, ते बाजारात आल्याबरोबर प्रतिस्पर्ध्याच्या उत्पादनावर हल्ला, हे सर्व सुनिश्चित असायला हवे. ग्राहकाने काहीही न विचारता त्याला आपल्या संभाव्य प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजे.

4) 'लढाई न करताच संघर्षात विजय प्राप्त करणे व लढाई केव्हा करायची याची जाणीव असणे.'

- सन त्झु

कोणत्या वेळेस युद्धात उतरणे व केव्हा नुसताच आव आणणे याचे उदाहरण म्हणजे जाहिरात युद्ध. प्रत्यक्ष उत्पादन केव्हा आणायचे व केव्हा नुसत्या क्लृप्त्या वापरायच्या, याची उदाहरणे म्हणजे भारतात मोटारसायकलींचे मोठ्या प्रमाणात आगमन व स्कूटरचे उच्चाटन होय.

5) 'त्वरित निर्णय व नि:संदिग्ध अधिकार'

- सन त्झु

सैन्यात वा व्यवसायात सावळागोंधळ म्हणजे सेनाधिपतीस हवा तो आदर दिला जात नाही. विक्री व व्यापार विभागातील कर्मचारी एकाच ध्येयाने प्रेरित नसतील व एकमेकांवर दोषारोपण करीत असतील, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसतो व निर्णयदेखील त्वरित दिले जात नाहीत, तसेच अधिकारांची व्याप्ती सुसंगत नसते.

6) वैयक्तिक जबाबदारी

'आज्ञेची भाषा व वापरलेले शब्द स्पष्ट नसतील व त्यांचा अर्थ सुस्पष्ट नसेल व दिलेले निर्देश सहजपणे समजण्याजोगे नसतील, तर त्याचा दोष सेनाधिपतीस द्यावयास हवा.'

- सन त्झु

जर व्यवसायातील संभाषण स्पष्ट नसेल, दिलेल्या दिशा स्पष्ट नसतील तर ती व्यवस्थापनाची चूक असते. प्रत्येक पत्र, सूचना, ई-मेल सुस्पष्ट हवा. त्यात योग्य निर्देश

दिलेले हवे, अडचणीच्या वेळेस कुणास संपर्क करायचा ते हवे. आपत्कालात कोणत्या क्रमांकावर फोन करायचा हे दिलेले हवे.

7) आपले मनोधैर्य अबाधित ठेवणे

'शिस्तबद्ध व शांत राहणे, शत्रूकडे बेशिस्त होण्याची वाट पाहत, तेथे अंदाधुंदी माजण्याचा प्रतीक्षेत यालाच स्वतःचे मनोधैर्य अबाधित ठेवणे असे म्हणतात'

- सन त्झु

आपली उत्पादकता व कार्यक्षमता गमाविण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे शीघ्रकोपीपणा. कोणत्याही व्यवसायात असे कर्मचारी असतात. त्यांच्यावर नजर ठेवा. प्रतिस्पर्धी अशा लोकांवर लक्ष ठेवून असतो व त्याला उत्तेजित करीत असतो . उत्तेजित केल्यावर तो रागावून चूक करण्याची वाट पहतो व ही चूक खूप महाग पडू शकते.

तुमच्या बरोबरच्या व वरिष्ठांबरोबरील दैनंदिन व्यवहारात संयमाने वागा.

8) व्यवसाय वाढविण्यासाठी उद्यमी बना.

'तुम्ही जसजशी कार्यक्षेत्रं बळकावित जाल तसतशा संधी द्विगुणित होत जातील.'

- सन त्झु

एखाद्या विशिष्ट कामासाठी तुम्हाला अधिक मेहनत करावी लागली तर जरूर करा. तिला प्रगतीची एक संधी समजा. अशा प्रकारे लोक तुम्हाला ओळखू लागतील.

9) तुमचे नातेसंबंध वाढवा.

'कोणत्याही धोरणाशिवाय आयोजन म्हणजे नुसताच गाजावाजा. कुठलेही आयोजन नसलेले धोरण म्हणजे विजयाकडे अत्यंत धिमी चाल होय.'

आपले सहकारी, विक्रेते, ग्राहक, सहकर्मचारी यांना आपले मित्र (allies) बनवा. त्यांचा फायदा आपल्या प्रतिस्पर्ध्याहून अग्रेसर होण्यासाठी करून घ्या.

10) नि: स्वार्थ बना

'जो सेनाधिपती प्रसिद्धीची आशा न बाळगता आगेकूच करतो व नामुश्कीची पर्वा न करता माघार घेतो, ज्याचे एकमेव ध्येय देशाचे रक्षण व आपल्या राज्याची उत्तम सेवा करणे असते, तो आपल्या राज्याच्या कोंदणातील हिरा असतो.'

- सन त्झु

कट-कारस्थान करणारे लोक व्यवसायात टिकू शकत नाहीत, किंबहुना दीर्घकाळ टिकू शकत नाहीत. वैयक्तिक प्रसिद्धी वा बदनामीची चिंता न करता आपल्या संस्थानास फायद्याचे निर्णय व्यवस्थापकाने घेतले पाहिजेत. त्यात सुरक्षा, गुणवत्ता, समाजाशी व आपल्या कर्मचाऱ्यांशी आपली बांधिलकी अशा व इतर अनेक गोष्टी समाविष्ट आहेत.

11) आपल्या मर्यादांस जाणीवपूर्वकपणे स्वीकृती द्या व मग त्यातून मार्ग काढा.

'युद्धात नुसत्या सैन्यबळाचा काही फायदा नाही.'

- सन त्झु

गरज ही सर्जनशीलतेची जननी आहे. व्यवसायात आपल्या क्षमतेस काही मर्यादा आहेत, याचा विनयशीलतेने स्वीकार करणे ही त्यातून मार्ग काढण्याची पहिली पायरी आहे. अशा प्रकारे आपल्या मर्यादा समजावून घेतल्यानंतर तुम्ही आपल्या सहकाऱ्यांना हाताशी घेऊन अनेक नावीन्यपूर्ण मार्ग शोधून त्या मर्यादांवर मात करू शकता.

तुमच्या कंपनीत असलेले मनुष्यबळ, यंत्र-सामग्री, संसाधने यावर काही मर्यादा असतातच; पण आपल्या कर्मचाऱ्यांचे मनोबल नेहमी उच्च ठेवण्याचा प्रयत्न झाला, तर यातून निश्चित मार्ग निघतो.

12) मर्यादांची भिंत पाडण्यासाठी सर्जनशीलतेचा व नावीन्यपूर्ण उपक्रमांचा वापर करा.

'आपले सैन्य आगेकूच करीत असताना नवनवीन व अफाट योजना आखा.'

- सन त्झु

याचा अर्थ असा की, दैनंदिन काम चालू असतानादेखील त्या कामात कशा प्रकारे सुधारणा करता येईल, हे पाहा. यासाठी उत्तम लोक कोण, हे शोधा.

13) नैतिकता

'मार्ग' अथवा नैतिकता हा सन त्झुच्या शिकवणीचा मूळ पाया आहे. आपल्या दैनंदिन जीवनात हे आपले मुख्य उद्दिष्ट बनू शकते. एका प्रतिस्पर्धात्मक वातावरणात नैतिकता ही प्रबळ शक्ती बनू शकते. व्यवसायात याचा वापर झाला, तर ग्राहकांची सर्वोत्तम सेवा व त्यांच्या अपेक्षांची पूर्ती हे उद्दिष्ट या 'मार्गाचे' द्योतक बनते. गुणवत्ता याचा एक अविभाज्य घटक बनतो.

14) नेतृत्व

'एक नेता वैयक्तिक उदाहरणाने सैनिकांना आपले अनुकरण करण्यास प्रेरित करतो. जेव्हा तो सैनिकांना परोपकारी भावनेने, न्यायाने व सदसद्विवेकबुद्धीने वागवतो, त्यांच्यावर दुर्दम्य विश्वास ठेवतो तेव्हा ते सैन्य एकजूट असते व ते आनंदाने आपल्या नेत्याची सेवा करण्यास तयार असते.'

- सन त्झु

हे 'कर्मचारी सहभाग' या संकल्पनेशी निगडित आहे. असा नेता असला, तर कोणता कर्मचारी आनंदाने व निष्ठेने काम करणार नाही? कर्मचाऱ्याच्या मनात भीती असेल,

त्याला धाक वाटत असेल, त्याची सुनवाई नाही असे त्याला वाटत असेल, तर तो निष्ठेने काम करणार नाही.

□□□

सन त्झु आणि कर्मचारी धोरण

योजना आणि धोरणांची आखणी या नंतर कर्मचारी नियोजन या विषयाला 'आर्ट ऑफ वॉर' मध्ये सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे. या पुस्तकाच्या 13 प्रकरणात कोठेही वरील मथळ्याचा उल्लेख नसूनही या विषयावर अगणिक वेळा विस्तृतपणे लिहिण्यात आले आहे. कर्मचारी धोरणाचा उल्लेख ज्या प्रकारे करण्यात आला आहे ती सात कलमे अशी -

1) कोणत्या पक्षाचा, उद्योगाचा प्रमुख आपले राज्यकारभार व व्यवस्थापन नीटपणे सांभाळतो?

2) कोणत्या पक्षाचा सेनापती बुद्धिमान आहे?

3) कोण काळ आणि युद्धभूमीचा सर्वोत्तम फायदा करून घेतो?

4) कोणत्या राज्यात योग्य नियम, घटना व त्यांची अंमलबजावणी करणारे लोक आहेत?

5) कोणाचे सैनिक (कर्मचारी) बलाढ्य आणि सुसज्ज आहेत?

6) कोणत्या सैन्यातील सैनिक उत्तमपणे प्रशिक्षित आहेत?

7) कोणत्या राज्यात बहुमान आणि शिक्षा (रिवॉर्डस आणि पनिशमेंट) यांची योजनाबद्ध प्रणाली आहे?

वरील कलमे लक्षात घेतल्यास उद्योगक्षेत्रातील एच. आर. (मानवसंसाधन) विभागाच्या धोरणांच्या पायाभूत तत्त्वांची आठवण होते. यश प्राप्त करण्यासाठी आवश्यक सर्व घटक (क्रिटिकल सक्सेस फॅक्टर्स) कर्मचाऱ्यांच्या सहभागाशी व सहकार्याशी संलग्नित आहेत. येथे उत्तम व्यवस्थापन व राज्यकारभार, आपल्या कर्मचाऱ्यांना आपुलकीने वागविणे, सर्व कर्मचाऱ्यांना समानतेची वागणूक देणे. त्यांना प्रशिक्षित करून त्यांच्या कौशल्यात भर पाडणे. चांगले काम केल्यास गौरव करणे आणि वाइटास दंडित करणे, आपल्या कर्मचाऱ्यांबद्दल सौहार्दाची भावना निर्माण करणे इत्यादी बाबींना आधुनिक मानवसंसाधनाच्या तत्त्वात महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे.

वरील कलमे हे कोणत्याही मानवसंसाधनप्रणालीत मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी नीट होते की नाही, हे पडताळण्यात उत्कृष्ट साधन आहे. तत्त्वे आणि धोरणे अस्तित्वात असली तरी ती परिणामकारकपणे लागू झाली आहेत वा नाहीत, यासाठी सन त्झुच्या या कलमांचा आधार घेता येतो. आपल्या प्रजेवर (कर्मचाऱ्यांवर)

मुलांप्रमाणे प्रेम करा, वरिष्ठ व कनिष्ठांसाठी एकाच प्रकारची धोरणे व मार्गदर्शक तत्वे लागू करा, सर्वांनी एकाच प्रकारच्या सिद्धांतांवर विश्वास ठेवावा (व्हिजन व मिशन), इत्यादी मार्गदर्शक तत्त्वे त्याने 'आर्ट ऑफ वॉर'मध्ये लिहिली आहेत.

या सर्व सिद्धांतांचा सातत्याने प्रयोग करणे म्हणजे संपूर्ण गुणवत्ता नियोजनासाठी आज प्रचलित असलेल्या 6 सिग्मा पद्धतींचा अवलंब होय. एवढ्या उच्च दर्जाचे सातत्य प्राप्त करण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याची निष्ठा, एकाग्रता, नैपुण्य, प्रशिक्षण योग्य व्यक्तीची निवड, इ. आधुनिक सिद्धांताचा त्याने त्या काळीच आपल्या पुस्तकात पुरस्कार केला आहे.

वांछित परिणाम प्राप्त करण्यासाठी सन त्झुने आपल्या सैनिकांना सर्वोच्चपातळीपर्यंत नेण्याचा पुरस्कार केला आहे. याचा अर्थ हा की, प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करताना आपल्या कर्मचाऱ्यांचे सामर्थ्य, नैपुण्य, जिद्द पणास लागली पाहिजे. ही कला सेनापतीस (व्यवस्थापकास) अवगत हवी.

□□□

सन त्झु आणि मार्गदर्शनाचे (नेतृत्वाचे) नियम

सन त्झु आणि मार्गदर्शनाचे (नेतृत्वाचे) नियम

जहाज तर कोणीही चालवू शकतो; पण त्याला योग्य दिशा देण्याचे काम फक्त एक नेताच करू शकतो.

सन त्झुने आपल्या पुस्तकात वेळोवेळी सेनापतीकडून योग्य आयोजनाचा, नेतृत्वाचा, आपल्या सैनिकांबद्दल सौहार्दभावनेचा व नेतृत्वास आवश्यक इतर अनेक गुणांचा उल्लेख केला आहे.

इतिहासातील दोन उदाहरणे या सिद्धांतास कशा प्रकारे योग्य सिद्ध करतात हे पाहूया.

इ.स. 1911 मध्ये दोन चमू दक्षिण ध्रुवाच्या मोहिमेवर निघाल्या होत्या.

या दोन्ही चमूंनी वेगवेगळ्या योजनांचा व मार्गांचा वापर केला.

त्यांनी अवलंबलेल्या मार्गांचा अभ्यास केल्यावर नेतृत्वाचे (मार्गदर्शनाचे) नियम आणि सन त्झु ज्याचा पुरस्कार करतो, त्या तत्त्वांची सार्थकता आपल्याला कळते.

यापैकी एका मोहिमेचा नेता होता रोअल्ड ॲमन्डसन आणि तसे पाहिल्यास त्याला जायचे होते, उत्तर ध्रुरवावर! पण जेव्हा त्याच्या लक्षात आले की, मोहीम दक्षिण ध्रुवावर जाण्याची आहे तेव्हा त्याने आपल्या ध्येयात बदल केला.

ॲमन्डसनने आपली योजना काळजीपूर्वकपणे बदलली.

कूच करण्याआधी त्याने आपल्या मोहिमेचे काटेकोरपणे आयोजन केले. त्याने एस्किमो आणि आर्क्टिक प्रदेशात वावर असणाऱ्या अनेकांच्या दळण-वळणाच्या पद्धतींचा अभ्यास केला. तेथील स्थानिक कुत्र्यांच्या गाडीचा वापर करून आपले सर्व सामान आणि उपकरणे हलविण्याची योजना आखली. (युद्धभूमीत स्थानिक संसाधनांचा वापर करा- सन त्झु- अध्याय 4) त्याने निष्णात भारवाहू कुत्रे सांभाळणाऱ्यांची निवड केली. त्या मागील विचार अगदी साधासरळ होता. तो म्हणजे रोज सहा तासांत पंधरा ते वीस मैल पल्ला गाठणे. अशा प्रकारे मोहिमेवरील लोक आणि कुत्र्यांना पुरेशी विश्रांती निश्चितपणे मिळू शकेल. (आपल्या सैनिकांना व इतर पशूंना विश्रांती मिळेल अशा प्रकारे आयोजन करा- सन त्झु अध्याय 6)

ॲमन्डसनचे आयोजन आणि प्रत्येक बाबतीत त्याने केलेला सखोल अभ्यास थक्क करणारा होता. (सेनापतीचे काम आहे आयोजन, नैपुण्य व दूरदृष्टी - सन त्झु अध्याय

8). त्याने प्रत्येक टप्प्यावर आपली रसद व इतर साहित्य साठवण्यात आल्याची खात्री करून घेतली होती. (शत्रुपक्षातील रसदीचा फायदा करून घ्या. बरोबर शिधा नेण्याने नुकसान होते व वेग कमी होतो- सन त्झु- अध्याय 2)
अशा प्रकारच्या अत्यंत कुशल व सखोल नियोजनामुळे तो आपल्या मोहिमेत यशस्वी झाला, त्याचे सर्व साथीदार त्याच्या नेतृत्वावर भाळले होते, तो त्यांच्या स्तुतीस व निष्ठेस पात्र झाला.

स्कॉटने मार्गदर्शनाचे (नेतृत्वाचे) नियम मोडले

दुसऱ्या चमूचा नेता होता रॉबर्ट फाल्कन स्कॉट, जो एक ब्रिटिश नौसेनाधिकारी होता. त्याने आधी अँटार्क्टिका क्षेत्रात काही मोहिमा चालविल्या होत्या. स्कॉटची मोहीम ॲमन्डसनच्या उलट, विरुद्ध होती. कुत्र्यांच्या गाड्यांऐवजी त्याने मोटारींवर चालणाऱ्या गाड्या आणि तट्टाण (लहान घोडी) वापरायचे ठरवले. पाच दिवसांतच त्यांच्या मोटारींनी दगा दिला. हवामानाची सवय नसल्याने तट्टाण कुचकामी ठरली. ट्रसअटलँटिक डोंगराईत पोहोचेपर्यंत ती सर्व मरण पावली. बरोबरीच्या 200 पौंड वजनाच्या स्लेडज (बर्फावरील घसरगाडी) त्या चमूच्या सदस्यांना स्वत: वाहून न्याव्या लागल्या. (स्थानिक परिस्थितीनुसार आणि तेथील पद्धतींनुसार आयोजन करा. सन त्झु अध्याय 8 व 11). आपल्या चमूच्या पोशाखावर देखील स्कॉटने फारसे लक्ष दिले नव्हते. त्यामुळे बहुतेक लोकांना अति थंडीची (फ्रॉस्ट बाईट) बाधा झाली. अनेक जण जखमी झाले व त्यामुळे गँगरीन झाला. रस्त्यातील अन्नधान्याचा साठा अपुरा होता. तो कोठे साठवला गेला होता, याची माहिती नव्हती. स्कॉटने काही विचार न करता आपल्या चमूत आयत्या वेळेस पाचवा अतिरिक्त माणूस घेतला व त्यामुळे शिधा अपुरा पडू लागला.
एवढे सर्व करून 17 जानेवारी, 1912 रोजी स्कॉट व त्याचे साथीदार जेव्हा तेथे पोहोचले, तेव्हा नॉर्वेचा ध्वज तेथे आधीच फडकला होता. कारण ॲमन्डसन तिथे आपल्या साथीदारांसमवेत एक महिना आधीच पोहोचला होता.
एक नेता इतरांपेक्षा अधिक दूरवर आणि इतरांआधी पाहतो - लेरॉय आइम्स
नेतृत्व म्हणजे चातुर्य, विश्वासपात्रता, परोपकाराची भावना, धैर्य व शिस्त होय.
नियम म्हणजे संघटन, अधिकाराची साखळी, दळण-वळणाची साधने व खर्चावर नियंत्रण करणे होय.
या पाचही घटकांची जाणीव सेनापतीस असणे आवश्यक आहे. जो सेनापती हे जाणतो तो विजेता बनतो व जो जाणत नाही, तो पराभूत होतो.
आपल्याला असलेल्या माहितीचा फायदा घ्या व त्याप्रमाणे अनपेक्षित परिस्थितींचा सामना करण्यासाठी कुमक बांधा. -सन त्झु

गनिमी युद्धाचा इतिहास

गनिमी युद्धाचा इतिहास प्राचीन आहे. निपुण चिनी योद्धा आणि सेनापती सन त्झुने लिहिलेल्या 'आर्ट ऑफ वॉर' या पुस्तकात याच्या वापराचा उल्लेख केला आहे. या पुस्तकाने अनेक सेनापती प्रेरित झाले व चिनी मुत्सद्दी माओ आणि व्हिएतनामी नेता हो चि मिन्ह या दोघांनीही सन त्झुच्या गनिमी शैलीचा वापर केला आहे. याच पद्धतीचा वापर क्युबामध्ये फोको युद्धशैलीत आणि अफगाणिस्तानात सोव्हिएट मुजाहिदीनांनी सुद्धा केला आहे. आधुनिक गनिमी युद्धातील संसाधने व अस्त्रे बदलली असतील; परंतु मूळ तत्त्वे अबाधित आहेत. त्यातील एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे - शत्रूस संभ्रमित करून सळो की पळो करणे, अनपेक्षित जागी अचानक हल्ला करून चकित करणे.

व्हिएतनाम युद्ध

अमेरिकेत व्हिएतनाम युद्ध हे गनिमी युद्ध म्हणूनच ओळखले जाते; पण हे एवढे साधे नसून सन त्झुच्या 'आर्ट ऑफ वॉर' च्या माओने केलेल्या अभ्यासावर आधारित अशी ही युद्ध रचना होय. व्हिएतनामकडून इ. स. 1965 मध्ये अमेरिकन सैन्याविरुद्ध हे तंत्र अवलंबण्यात आले.

नॅशनल लिबरेशन फ्रंट या व्हिएतनामी संघटनेत स्थानिक रहिवासी, सर्वसामान्य कामगार आणि इतर नागरिक सहभागी होते. 1965 च्या सुमारास अमेरिकेने हस्तक्षेप केला; परंतु अमेरिकन सैन्यास नामुश्कीच्या ठिकाणी पकडून सळो की पळो करण्यात गनिमी युद्धनीतीचा मोठा वाटा होता.

सन त्झुच्या युद्धनीतीचे आजच्या काळातील महत्त्व

युद्ध न करता जिंकण्याचे तत्त्व - युद्ध टाळण्याचा सिद्धांत

सर्वसाधारणपणे शत्रूवर नियंत्रण मिळवणे ही सर्वोत्तम रणनीती आहे. नाश करून विजय प्राप्त करणे, हे त्याहून कनिष्ठ दर्जाचे समजले जाते. शंभर युद्धे जिंकणे हे निष्णातपणाचे लक्षण नसून लढाई न करता शत्रूवर विजय प्राप्त करणे, ही श्रेष्ठ कामगिरी आहे- सन त्झु

सन त्झुने आपल्या पुस्तकात सेनापतीसाठी युद्धनीतीचे धडे दिले आहेत, त्यातील अत्यंत महत्त्वाचा धडा वर दिला आहे. या पुस्तकात विजयाची कृती दिली नसून रणनीती दिली आहे. आयोजनाबद्दल विस्तृतपणे सूचना दिल्या गेल्या आहेत आणि शिवाय अर्वाचीन युद्धाला सामोरे जाणारी आपली रणनीती बनवित आहेत.

प्रत्यक्ष रणभूमीवर, हातात हत्यार असलेल्या सैनिकास एकही गोळी न झाडता युद्ध जिंकता येते हे सांगणे हास्यास्पद वाटू शकते; परंतु वरिष्ठ पातळीवरील निर्णय घेणारे रणनीतिज्ञ त्या प्रकारे योजना बनवू शकतात. क्युबामधील 1962 चा शस्त्रास्त्र संघर्ष,

1994 मधील हैती संघर्ष आणि तैवान मधील 1996 चा अग्निबाण संघर्ष या तत्त्वाचा वापर करून टाळण्यात आला.
अशा प्रकारे अनेक फळ्या उघडून आपल्या सैन्याला अनेक आघाडींवर लढण्यास भाग पाडू नका, असा सल्ला सन त्झुने दिला आहे. याचे उदाहरण म्हणजे 1941 साली जर्मनीने सोव्हिएत युनियनवर केलेला हल्ला. नाझी जर्मनीच्या हातून पश्चिम युरोपचा पराभव झाल्यावर हिटलरला आपला मोर्चा सोव्हिएत युनियनकडे वळवायचा होता. त्याने स्टॅलिनविरुद्ध आपली प्रसिद्ध ऑपरेशन बार्बारोस्सा ही मोहीम हाती घेतली. हाती अत्यंत मर्यादित नाझी सैन्यबळ असताना संयुक्त मित्रराष्ट्रांविरुद्ध त्याने दोन आघाड्या बांधण्याची विनाशक चूक केली. सन त्झुच्या रणनीतीचा अभ्यास करून त्याच्या सेनाधिपतीने त्याला असे न करण्याचा सल्ला दिला होता. हिटलरचा आडमुठेपणा आणि अत्यंत धोकादायक अशी ही मोहीम यामुळे ऑपरेशन बार्बारोस्सा हे तर अयशस्वी ठरलेच; पण या मुळेच हिटलरचा अंत झाला.

हिटरलच्या एकाच वेळी हाती घेतलेल्या तीन मोहीम

शत्रूच्या रणनीतीवर हल्ला करा आणि मग त्याच्या मित्रराष्ट्रांचे विभाजन करा आणि म्हणूनच हे महत्त्वाचे आहे की, शत्रूच्या रणनीतीवर हल्ला करणे आणि त्यानंतर सर्वांत उत्तम म्हणजे त्याच्या मित्रराष्ट्रांना विभागणे. शहरांवर हल्ला करणे ही सर्वांत कनिष्ठ रणनीती आहे- सन त्झु.
याचे उदाहरण म्हणजे 18 एप्रिल 1942 साली डूलिटल या अमेरिकन सेनापतीने जपानच्या सैन्यभूमीऐवजी मुलकी भूमीवर केलेला बाँबहल्ला. हा हल्ला झाल्याबरोबर जपानने आपला तळ बदलला, त्यानी घाईघाईने आपला तळ इंडोचायनाच्या दक्षिणेऐवजी मध्यभागी नेला. त्यास आपली रणनीती बदलावी लागली. अशा प्रकारे रणनीतीत वर्चस्व प्रस्थापित झाल्यावर अमेरिकेस जपानवर विजय प्राप्त करणे तेवढे कठीण झाले नाही.
या रणनीतीच्या वापराचे आणखी एक उदाहरण म्हणजे अमेरिकेच्या नेतृत्वाखाली 2003 साली मित्रराष्ट्रांनी अमलात आणलेली ऑपरेशन इराकी फ्रिडम ही मोहीम. युद्धानंतर असे उघडकीस आले की, अमेरिकेची मित्रराष्ट्रे कुवेतमध्ये प्रवेश करून बगदादवर हल्ला करू शकतील, याची शक्यता इराकची रणनीती ठरवणाऱ्या युद्धनीतिज्ञांनी धुडकावून लावली होती. त्यांनी इराणी लोक आपले कट्टर शत्रू आहेत

असे गृहीत धरले होते. आपल्याकडे असलेल्या शस्त्रास्त्रांबद्दल साशंकतेचे वातावरण निर्माण करण्याची खात्री सद्दाम हुसेनला होती. यामुळे तो इराणी व आपल्या शत्रुपक्षांना कारवाईपासून परावृत्त करण्याची योजना आखत होता. या कुजबुजीमुळे इराकी नेते आपल्यापासून खरोखरच काहीतरी लपवत आहेत, असे अमेरिकेस वाटल्याने अखेरीस त्याचा परिणाम इराकच्या पराभवात झाला. इराकच्या या, चुकीच्या का होईना, रणनीतीवरील हल्ल्यामुळे व समजुतीमुळे इराकचा पराभव झाला.

जवळ-जवळ साठ वर्षांपूर्वी चिनी नेता - माओ त्से तुंग (1894-1975) ने ऑन ग्वेरिला वॉरफेअर-गनिमी कावा युद्धपद्धतीबद्दल ते पुस्तक लिहिले आणि त्यात त्याने प्रतिपादन केले की, पारंपरिक सैन्ये सुद्धा काही विशिष्ट परिस्थितीत गनिमी काव्याचा अवलंब करू शकतात आणि त्यानंतर काही वेगळ्या परिस्थितीत पुन्हा पूर्वस्थितीत जाऊ शकतात; परंतु पारंपरिक आणि गनिमी सैन्ये ही दोन्ही विकसित होऊ शकतात (चि आणि चेंग) आणि सुसंगतपणे युद्ध करू शकतात. त्याचे हे प्रतिपादन त्याने केलेल्या सन त्झुच्या अभ्यासावर आधारित आहे असे समजले जाते, एवढेच नाही तर त्याने या पद्धतीचा अवलंब आपल्या चिनी राष्ट्रीय सैन्याविरुद्धच्या लढ्यात केला होता. माओच्या मोहिमेचे स्पष्ट असे तीन घटक आहेत आणि ते सन त्झुच्या 'आर्ट ऑफ वॉर' वर आधारित आहेत. 1) प्रारंभिक यश प्राप्त करण्यासाठी राजनैतिक संघटन 2) गनिमी काव्याने युद्ध 3) शत्रूच्या सैन्यास हरवण्यासाठी पुन्हा पारंपरिक पद्धतीने युद्ध करणे (संभ्रम). माओच्या या एकमेव नीतीचा आणि गनिमी काव्याचा नियमितपणे वापर करून चिनी कम्युनिस्ट पार्टीने जनरल चियँग कै शेकच्या (अमेरिकेचे पाठबळ असलेल्या) नॅशनल आर्मीचा 1949 साली यशस्वीपणे पराभव केला आणि आपल्या कम्युनिस्ट राजवटीची -पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना या ध्वजाखाली बीजिंगमध्ये स्थापना केली.

सन त्झुची क्रीडा क्षेत्रातील उपयोगिता

प्रत्येक खेळ प्रतिस्पर्धात्मक असतो, मग तो सांघिक असो की वैयक्तिक. युद्ध व प्रतिस्पर्धात्मक क्रीडा क्षेत्रात फारसा फरक नाही, हे आपण लक्ष देऊन मनन केले तर आपल्याला आढळेल. दोन्हींत सामर्थ्य, योजना, धोरण व शेवटी विजय या सर्व घटकांचे महत्त्वाचे स्थान आहे. सन त्झुच्या सल्ल्याचे या क्षेत्रात तेवढ्याच प्रभावीपणे अनुकरण करता येते व आपले लक्ष्य प्राप्त करता येते. या पुस्तकातील प्रत्येक अध्यायाची क्रीडा क्षेत्रातील उपयोगिता आता आपण पाहूया.

अध्याय 1

युद्ध योजना

यात मार्ग, आज्ञाधारकपणा, नीती व शिस्त यांचा उल्लेख आहे.

-आज्ञाधारकपणा : आपल्या प्रशिक्षकाच्या सूचनांचे पूर्णतः पालन करणे.

-नीतिमत्ता : नियमबाह्य वर्तन (अमली पदार्थांचे सेवन), क्रीडेचे, स्पर्धेचे नियम न तोडणे. नीतिमत्तापूर्ण वर्तनामुळे तुम्ही तुमच्या प्रतिस्पर्ध्याच्या आदरासुद्धा पात्र व्हाल.

-शिस्त : सरावाची, आहाराची व जीवनसरणीची शिस्त पाळणे.

अध्याय 2

युद्ध पुकारणे

'युद्धात विजयप्राप्ती हे लक्ष्य हवे -विनाकारण लांबलचक मोहिमा आखू नका.' -सन त्झु

या अध्यायात तुम्ही थकून, दमून जाण्याच्या आधीच शत्रूस वा क्रीडा क्षेत्रात प्रतिस्पर्ध्यांना हरविले पाहिजे, याचे प्रतिपादन केले आहे. यामुळे तुमचा शक्तिपात होणार नाही. याचा अर्थ असा की, कोणतीही ढिलाई न करता खेळाच्या सुरुवातीपासूनच प्रयत्न केल्यास तुम्ही लवकरच विजय प्राप्त कराल.

अध्याय 3

आक्रमणाचे आयोजन

कोणत्याही क्रीडाप्रकारात नैपुण्य मिळविण्यासाठी सातत्याने सराव करावा लागतो. याचाच अर्थ असा की, प्रत्यक्ष आक्रमणासाठी संपूर्ण तयारी हा आयोजनाचा भाग आहे व याशिवाय तुम्ही संघर्ष करूच शकत नाही. सांघिक खेळात प्रत्यक्ष किंवा

अप्रत्यक्ष हल्ला करणे योग्य की नाही याचे धोरण ठरविणे हादेखील या आयोजनाचाच भाग आहे.

अध्याय 4

पूर्वतयारी व रचना

'तुमच्या शत्रूची माहिती म्हणजेच स्वतःस समजून घेणे.' सन त्झु

हे तुम्हाला पूर्णपणे माहीत असेल तर तुम्ही शंभरातील शंभर युद्धे जिंकाल. आपल्या प्रतिस्पर्ध्याची सखोल माहिती, त्याचे डावपेच, कोणत्या क्षेत्रात तो उत्तम कामगिरी करतो, हे जाणणे म्हणजेच त्यानुसार आपली रणनीती बनविणे. क्रिकेटचे वा हॉकीचे उदाहरण घेऊन हा सिद्धांत पडताळून पाहा, त्याच्या अस्सलपणाची प्रचीती लगेचच येईल.

अध्याय 5

शक्ती/ऊर्जा

आपल्याकडे असणारी शक्ती वा ऊर्जा संपूर्ण जोराने शत्रूविरुद्ध वापरणे व त्याची वेळ (Timing) तितकीच महत्त्वाची असते. मानसिक खंबीरपणा, एकलक्ष्य होऊन प्रयत्न व त्याची वेळ याला ऊर्जा म्हणतात. सर्व खेळाडूंची शक्ती एकवटून हल्ला करणे. उदा. हॉकी वा फुटबॉलच्या खेळात पास देत गोल करणे. यात शक्तीच्या केंद्रीकरणाची गरज आहे.

अध्याय 6

सामर्थ्य व दौर्बल्य

'अशक्त घटकांवर हल्ला करा व सशक्त घटकांना टाळा' -सन त्झु.

जर तुमच्या शत्रूची सशक्तता कोठे आहे व अशक्तता कोठे हे जर जाणून खेळ केला तर तुमची स्थिती मजबूत होते.

उदा. टेनिसच्या खेळात प्रतिस्पर्ध्याचा बॅक हँड जोरात असला व फोर हँड अशक्त असला, तर फोर हँडच्या दिशेने चेंडू मारावा. हॉकीत सशक्त प्रतिस्पर्ध्याला 'मार्क' करून त्याला टाळण्यासाठी अडथळा आणावा.

अध्याय 7

सशस्त्र संघर्ष

संघर्ष करताना चातुर्य व हुशारी वापरा. आपल्या चमूच्या खेळाडूंना आपण काय सांगत आहोत, हे स्पष्टपणे कळण्यासाठी खाणाखुणा व संकेतांचे नियम बनवा. संपूर्ण सहयोगासाठी सुस्पष्ट संवाद व पारस्परिक ताळमेळ आवश्यक आहेत.

अध्याय 8

विभिन्न रणनीती

हा अध्याय व मुद्दा समजण्यास सोपा आहे. प्रतिस्पर्ध्याच्या धोरणावर व रणनीतीवर मात करण्यासाठी त्याच्या योजनेनुसार आपला खेळ बदला. आक्रमणाच्या दोन पद्धती आहेत, हल्ला व बचाव. त्यांचा परिस्थितीनुरूप वापर करा. अचानक, अनपेक्षित चाली खेळा.

अध्याय 9

सैन्याचे डावपेच

प्रतिस्पर्ध्याची कूटनीती समजून डावपेच बदला. एका परिस्थितीतील डावपेच पुन्हा तीच परिस्थिती वापरू नका. क्रिकेटमध्ये आपले क्षेत्ररक्षण बदला. गोलंदाजाला आपल्या गोलंदाजीत सतत अनपेक्षित बदल करण्यास लावा. फलंदाजास आपले स्ट्रोक बदलण्यास सांगा.

अध्याय 10 व 11

भूमितळावरील रचना व नऊ रणांगणे

क्षेत्र, हवामान, भाग यासारख्या बाबी नेहमी ध्यानात ठेवून आपले धोरण ठरवा. प्रत्येक सांघिक खेळात (क्रिकेट, हॉकी, फुटबॉल) हवेचा झोत, हवेतील आर्द्रता, तापमान इ. बाबींचा परिणाम होतो. गोल्फसारख्या खेळात तर भूभागाच्या रचनेवर तुमचे नैपुण्य अवलंबून असते. या सर्व गोष्टींवर लक्ष द्या.

अध्याय 12

अग्नी आक्रमण

तुमच्या प्रतिस्पर्ध्यावर वणव्यासारखे आक्रमण करा, त्याची झळ त्याला लागू द्या. त्याचा प्रभाव जाळाप्रमाणे वेगाने पसरू द्या. वाऱ्याप्रमाणे वेगवान, पर्वताप्रमाणे दृढ, पाण्याप्रमाणे लवचीक व अग्नीप्रमाणे सर्वव्यापक बना.

अध्याय 13

गुप्तचरांचा वापर

जेव्हा गरज भासेल तेव्हा प्रतिस्पर्ध्याची माहिती काढा. त्याच्या प्रशिक्षणाची पद्धत, त्यातील असंतुष्ट व लोभी खेळाडू, त्याची सामग्री इ. विषयीची माहिती तुम्हाला रणनीती बनविताना मदत करेल.

लक्षात असू द्या, युद्ध व खेळातील प्रतिस्पर्धा या बहुतेक एकच आहेत.

- तुमच्या चमूच्या सदस्यांना आपले ध्येय एकच असल्याचे प्रतिपादन करा.
- त्यामुळे तुमचे सर्व प्रयत्न एकाच दिशेत राहतील.

□□□

संदर्भ

1) Art of War -Lionel Giles
2) Art of War- James Clavell
3) Art of War , Spirituality for Conflict - Thomas Hyunh
4) Art of War -Six strategic principles for Managers- Mark Mc Neilly (Sun Tzu and Art of Business)
5) Sun Tzu -Strategic Creativity- Suntzu1.com
6) 5 B2B lessons for SMEs- Art Of War-Piyush Aggarwal
7) Lessons from San Tzu's Art of war- Amrish Sahgal
8) Sun Tzu's seminal work -Art of War- Tucker Cummings
9) Wikihow.com San Tzu -Use in Sports- Elizabeth Bogner